विनायक स. वाकसकरकृत

# अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे

संपादक

**अरुण घोडे**

(गोषेगावकर)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

श्री. सयाजी साहित्यमाला, बडोदा

## विनायक सदाशिव वाकसकरकृत

अठ्ठयाणणवाव्या इतिहास गुच्छातील पुष्प

# अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे

संपादक

## अरुण घोडे

(गोषेगावकर)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

**पुस्तकाचे नाव :** विनायक सदाशिव वाकसकरकृत अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे

**संपादक :** अरुण घोडे (घोषेगावकर)

**प्रथमावृत्ती : २०१८**

**प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई- ४०० ०२५.

© **प्रकाशकाधीन :**

**मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे- ४११००१.

**किंमत : रु. १२१/-**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

## अध्यक्षांचे मनोगत

तंजावरचे मराठी राजे सरफोजी यांनी इ.स. १८०६ साली ‘बालबोध मुक्तावली’ हे पुस्तक छापून मुद्रित मराठी प्रकाशनाची सुरुवात केली. पुण्यातील गणपत कृष्णाजी पाटील या कल्पक उद्योजकाने इ.स. १८३१ मध्ये महाराष्ट्रात मराठी मुद्रण व प्रकाशनाची सुरुवात केली. इ.स. १८८२ च्या सुमारास पुण्यात रावजी श्रीधर गोंधळेकरांनी मराठी प्रकाशनाची पायाभरणी केली. त्यांचे पुत्र केशवरावांनी छपाई व्यवहारात नाव कमावले. महाराष्ट्राचे शेतकऱ्यांचे एक सुपुत्र, योगायोगाने बडोद्याचे राजपद मिळवून कल्याणकारी राज्यकारभाराची उभारणी करणारे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी पुण्यातील गोंधळेकरांच्या छापखान्यास भेट दिली. इ.स. १८९६ मध्ये त्यांना आदराने बडोद्यात नेऊन सरकारी छापखान्याचे प्रमुख केले. पुढे या छापखान्यात २५० कामगार काम करू लागले. बडोदे ग्रंथ व ग्रंथप्रकाशनाचे केंद्र बनले.

महाराजा सयाजीराव या दूरद्रष्टी राजाने ग्रंथाचे महत्त्व ओळखले. निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर पुस्तके तयार झाल्याशिवाय शिक्षणाचे कार्य सिद्धीस जाणार नाही. मराठी भाषेत चांगले ग्रंथ निपजले नाहीत, तर लोकशिक्षणाचे सर्व प्रयत्न लंगडे पडतील. यातून देशी भाषेत चांगले ग्रंथ निर्माण करण्यासाठी त्यांनी स्वतंत्र हुकूम काढून दोन लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. शिक्षण खात्याकडे काम सोपविले. ग्रंथलेखन करून घेणे, लिहिणाऱ्यास चांगले मानधन देणे, उपयुक्त पुस्तके तयार करण्यासाठी देशभरातील मान्यवरांची मदत घेणे, इतर भाषांतील ग्रंथ मराठी-गुजरातीत भाषांतरित करण्यासाठी भाषांतर विभाग सुरू करणे ही कामे सुरू केली.

शिक्षण विभागाने महाराष्ट्र ग्रंथमाला, राष्ट्रकथा माला सुरु केल्या. साहित्यासोबत शास्त्रीय विषयाचे ग्रंथ देशी भाषांत यावेत याकरिता श्रीसयाजी ज्ञानमंजूषा व श्रीसयाजी लघुज्ञान मंजूषा या शास्त्रीय ग्रंथमाला सुरू केल्या. शाळांतून देशी खेळांना प्रोत्साहन मिळावे म्हणून क्रीडामाला पुस्तके छापली. या सोबत इतर भाषेतील साहित्यविषयक ३८० ग्रंथ श्रीसयाजी साहित्यमालेत छापली. मुलांसाठी संस्कार करणारे आणि विज्ञानाची ओळख करून देणारे सयाजी बाल ज्ञानमालेत २९३ पुस्तके प्रकाशित केली. श्रीसयाजी ग्रामविकासमाला ३६ पुस्तके, श्री. मातोश्री जमनाबाई स्मारक ग्रंथमालेत ८ पुस्तके प्रकाशित केली. प्रकाशित पुस्तकांच्या लेखकांना उत्तेजन मिळावे म्हणून ग्रंथोत्तेजनार्थ बक्षिसे सुरू केली. ही रक्कम सयाजीराव महाराज खानगी खात्यातून देत असत. वरील ग्रंथ सरकारी खर्चाने छापून ग्रंथालयांना पुरविली जात.

अशा प्रकारे बडोदे हे महाराष्ट्राच्या वाङ्मयाचे एक प्रमुख केंद्र बनले होते. ग्रंथ, ग्रंथकार, ग्रंथप्रकाशन आणि ग्रंथालयास मदत करून महाराजा सयाजीराव गायकवाड हे सर्वांचे पोशिंदे झाले होते. अशाच श्रीसयाजी साहित्यमालेत प्रकाशित 'अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे' हा विनायक सदाशिव वाकसकरांचा हा ग्रंथ १९२५ साली शिक्षण विभागाने प्रकाशित केला. नव्वद वर्षांपूर्वी प्रकाशित या ग्रंथांचे पुनर्प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ करीत आहे. या ग्रंथ संपादनाची जबाबदारी श्री. अरुण घोडे यांनी स्विकारून ते काम त्यांनी पूर्ण केले. त्यामुळे मराठी वाङ्मयाच्या सयाजी युगाचा एक ग्रंथ वाचकांना उपलब्ध होऊ शकला.

१२ जून, २०१८

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य,
आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

*प्रकाशकीय*

आपल्या देशी भाषांच्या साहित्याची अभिवृद्धी करण्याच्या सद्हेतूनें श्रीमंत पतितपावन महाराजसाहेब श्री सयाजीराव गायकवाड,

सेनाखासखेल, समशेर बहादूर, जी. आय. ई. ह्यांनी कृपावंत होऊन दोन लक्ष रूपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे, तिच्या व्याजांतून श्री सयाजी साहित्यमालेंत विविध विषयांवर पुस्तके तयार करण्यांत येत असतात.

अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे हे स्वतंत्र पुस्तक असून ते रा. रा. विनायक सदाशिव वाकसकर, बडोदें, ह्यांचेकडून लिहवून मालेतील इतिहास गुच्छांत अठ्याण्णवावे पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर शाखा,
विद्याधिकारी कचेरी
न. शि. शास्त्री. नं. के. दीक्षित.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

संकृत दर्शनी अगदी क्षुल्लक दिसणाऱ्या व्यक्तींनाही इतिहासांत एकाद वेळांच का होईना पण अमूल्य कामगिरी केलेली असते. अशा अनेक व्यक्ती मराठ्यांच्या इतिहासांत पदोपदी आढळतात. त्यांची मिळतील तेवढी चरित्रे मिळवून ती वाचकांस सादर करण्याचा हेतू अल्पांशाने या पुस्तकरूपाने सिद्धीस जात आहे. या बद्दल आनंद वाटतो.

देवी अहल्याबाईसारख्या व्यक्ती जगत्प्रसिद्ध असूनही त्यांची अवश्य ती माहिती बहुजनसमाजास नसते असे प्रत्ययास आल्यावरून तशी एक दोन चरित्रे मुद्दामच यांत घातली आहेत. हे पुस्तक विद्यार्थी वर्गासाठी मुद्दाम लिहिले असल्याने यांत चालेपर्यंत जुना पत्र व्यवहार जशासतसा उद्धृत करू नये असा आरंभी संकल्प होता. पण अस्सल पत्रांतील भाषेहून सुंदर व परिणामकारक भाषा मला लिहितां न आल्याने काही ठिकाणी पत्रातीलच उतारे निरूपायाने घेतले आहेत.

यांतील कांही चरित्रें निरनिराळ्या ठिकाणी प्रथम प्रसिद्ध करून त्यातील चुका दाखवून, अधिक भर घालण्यासाठी जाहीर विनंती केली होती.

पण तिचा म्हणण्यासारखा उपयोग झाला नाही. तथापि ती या पुस्तकांत घेतांना जरूर ती सुधारणा त्यांत केलेही आहे. हे पुस्तक म्हणजे रा. रा. गो. स. सरदेसाई यांच्या रियासतीचे छोटेसे बालक आहे, हे स्पष्टपणे सांगितल्याने या पुस्तकाच्या चांगुलपणाचे श्रेय वाचकांनी कोणास द्यावे हे निराळे सांगावयास नको.

श्रीमंत गायकवाड सरकारांच्या विद्याखात्याने या पुस्तकास आश्रय दिल्यामुळे हे प्रसिद्ध करतां आले या बद्दल लेखक त्यांचा आभारी आहे. तसेच आत्माराम छापखान्याचे मालक रा. रा. श्री. के. चित्रे यांनी हे पुस्तक आपले स्वतःचेच काम समजून छापून दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानणे आवश्यक आहे.

दि. 23 ऑगस्ट 1925 विनायक सदाशिव वाकसकर.

# सुधारित आवृत्तीची प्रस्तावना

भूतकाळातील घटनांची नोंद म्हणजे इतिहास. हा इतिहास लिहिणारा जसा असेल तसा इतिहास लिहिला जातो. हे लिहितांना यंत्रवत् टिपायचा म्हटला तरी परिप्रेक्ष्यानुसार महत्त्व कमी जास्त करता येतं. दृष्टीकोन जसा असेल, तसं अंकित होतं. हत्तीचं उदाहरण कितीही गुळगुळीत झालं तरी आंधळ्यांना हत्ती विचारला तर ज्याच्या हाती सोंड येते तो तशी व्याख्या करतो. एका आंधळ्याला पाय हाती लागतो, तो हत्ती खांबासारखा, तर शेपटी ज्याच्या वाट्याला येते  तो आणखी वेगळं वर्णन करतो. मी परिप्रेक्ष्य स्पष्ट करण्यासाठी गायीचं उदाहरण सांगत असतो. गाय एकच; पण खाटिक, गोपालक गवळी, चांभार तिघांचे तराजू वेगळे. खाटिक मासाचं मोल करतो, गवळी दुधाचं तर चांभार कातड्याचं. सांगण्याचं तात्पर्य हेच की, इतिहासकार कोण? यावर तो इतिहास अवलंबून असतो. इतिहासकार प्रामाणिक आहे असं गृहित धरलं तर त्याच्या ओंजळीतूनदेखील काही घेता घेता निसटून जातं किंवा राहून जातं. अशा वेळी काही काही चरित्रनायक नायिकेवर अन्याय अनाहूतपणे, कळत-नकळत होतो. तर अशा चरित्रनायकांवर प्रकाश टाकायचं काम विनायक सदाशिव वाकसकर यांनी १९२५ साली केलं. महाराजा सयाजीराव गायकवाड महाराजांच्या काळात समशेर बहाद्दूर (GCIE) यांनी त्याकाळात दोन लक्ष रुपये मुद्दल ठेव ठेवून त्याच्या व्याजात 'श्री. सयाजी साहित्यमाला' नामक पुस्तकमाला प्रकाशित केली. या मालिकेतील अठ्ठ्याण्णवावे पुस्तक 'अप्रकाशित ऐतिहासिक चरित्र' २३ ऑगस्ट २५ साली प्रकाशित केले. त्र्याण्णव वर्षांनंतरही आज यातही चरित्र अप्रकाशित असल्यागत दुर्लक्षित राहिल्याची जाणीव मला झाली. गेल्या नव्वद वर्षांमध्ये या चरित्रात काही टाकायची तर आणखी खंड शोधून सारांश रुपाने पाठ्यपुस्तक वजा या पुस्तकाची सुधारित आवृत्ती संपादनकार्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने माझ्यावर सोपवलं. पुस्तकाचं शीर्षक त्या काळात 'अप्रकाशित ऐतिहासिक चरित्रे' योग्य होतं; पण कालौघात नव्वद वर्षांचं पाणी पुलाखालून गेल्यामुळे आता पुनश्च या पुस्तकाला 'अप्रकाशित' संज्ञेत ठेवता येणार नाही.

युगद्रष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आजच्या गुजरात

राज्यातील बडोदा संस्थानात उणीपुरी साठ वर्षे राज्य केले. या सहा दशकांत रयतेवर संततीवत, लेकरासारखं प्रेम केलं. त्यांनी केलेल्या कामगिरीचा लेखा-जोखा प्रचंड मोठा आहे. तो स्वतंत्र रुपाने चार-पाचशे पानांचे शंभर खंड होतील एवढे अफाट कार्य आहे. त्यापैकी किमान पन्नास खंडांची सामग्री प्रकाशनपथावर आहे. तात्पर्य एवढंच की, महाराजा सयाजीरावांच्या कार्याची साहित्यरूप गंगा सूज्ञ वाचकांसाठी उपलब्ध करून देण्याचं भगीरथ कार्य ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड करीत आहेत. तर महाराजांनी केलेली लोकोपयोगी कामं, त्यातच सुधी-सूज्ञ ग्रंथप्रेमींसाठी ज्ञानसंपदा वास्तवाशी फारकत न घेता विज्ञानवादी, इहलोकवादी करण्यासाठी महाराजांनी ग्रंथलेखन-प्रकाशनाची लोकोपयोगी योजना अंमलात आणली. या धाडसी वैचारिक प्रकल्पासाठी दोन लाख रुपये अनामत ठेवून त्याच्या नुसत्या व्याजावर 'श्री. सयाजी साहित्यमाला' स्थापन झाली. यामध्ये गुजराती, मराठी, इंग्रजी रुपांतरं करण्यासाठी भाषांतर शाखा, विद्याधिकारी आदि तज्ज्ञांना नेमून त्यांच्यामार्फत या साहित्यमालेतून अप्रसिद्ध उपेक्षित, अर्थपूर्ण साहित्य प्रकाशित होऊ लागले. यात विज्ञान, सचित्र चरित्रे, इतिहास, धार्मिक शिक्षण आदि सर्वांगीण विद्याशाखेत (faculties) अनेक अप्रकाशित, दुर्लक्षित, उपेक्षित विषयांवर ग्रंथ प्रसिद्ध करण्यात आले. ही ग्रंथसंपदा प्रामुख्याने मराठी, हिंदी, गुजराती भाषेत प्रसिद्ध करण्यात आली. त्यावेळी मराठीतील कुळवाडीभूषण शिवाजी राजे, संत तुकाराम महाराज, बडोद्याचे मराठी साहित्य आदीवर प्रकाशित ग्रंथ संख्येने भरपूर आहेत. श्री सयाजी साहित्यमालेअंतर्गत विनायक सदाशिव वाकसकर यांचे 'अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्र' पुस्तक २३ ऑगस्ट १९२५ ला प्रकाशित झाले. यातील उल्लेखानुसार ते मराठी रियासतकार गो. स. सरदेसाई यांच्यासोबत बडोदा संस्थानात नोकरीत असावेत. सदर पुस्तकाव्यतिरिक्त मराठ्यांच्या इतिहासाची साधने, राधेय कर्णचरित्र, तंजावरचे मराठी राजे, ९१ कलमी बखर, शिवप्रभुचे चरित्र (सहलेखक कृष्णाजी अनंत सभासद), सर यदुनाथ सरकारकृत 'शिवाजी व शिवकाल' (मराठी अनुवाद, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय -१९३०) आदि ग्रंथ प्रसिद्ध झाले. या कालखंडात लेखक स्वतःचा परिचय देत असल्याने या ग्रंथाचे ग्रंथकर्ते वाकसकरांच्या अनुषंगाने परिचयात्मक चरित्राच्या माहितीचा स्रोत तितकासा उपलब्ध

झाला नाही. तरी ग्रंथातील पेशव्यांच्या इत्यंभूत माहितीवरून बहुधा पुणे जिल्ह्यातील असावेत असे वाटते. तसेच रियासतकाराबद्दलच्या प्रस्तावनेतील उल्लेखावरून ते पुणे परिसरातील असावेत. श्री सयाजी साहित्यमालेच्या अठ्ठावण्णव्या पुष्पाच्या रुपाने अप्रकाशित 'ऐतिहासिक चरित्रे' पुस्तक प्रकाशित झाले आहे.

१९२५ साली विनायक सदाशिव वाकसकरकृत सदर पुस्तकांत धार्मिक, न्यायशास्त्रीय, पराक्रमी, पराक्रमांचे कीर्तिमान करणारे बलाढ्य चरित्र ऐतिहासिकदृष्ट्या गौणत्व लक्षात घेऊन रणदुदुंभी गाजवणाऱ्या असामान्य योद्ध्या व्यक्तीची प्रेरणादायी चरित्रे आहेत. नायकांच्या चरित्र लेखनात कसलीही हातचलाखी न करता विनायक सदाशिव वाकसकरांनी विद्यार्थ्यांसाठी ही चरित्रं लिहिली आहेत हे शब्द मर्यादेवरूनही लक्षात येते. (पाठ्यपुस्तकीय पाठमर्यादा) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरीय नायकांची ही चरित्रे आहेत. तत्कालीन माहिती स्रोतांची मर्यादा लक्षात घेता संक्षिप्तीकरणातही समर्पकतेने पूर्णत्त्वास नेली आहेत. त्यामुळे चरित्रमालिकेतील चरित्रनायकांची वैयक्तिक माहिती तोकडी आहे. तत्कालीन परिस्थिती, साधन-स्रोतांची वाकसकरावर पडलेली मर्यादा म्हणता येईल. या सर्व परिवेशाची पूर्ण कल्पना असल्याशिवाय या पुस्तकाचं महत्त्व लक्षात येणार नाही. म्हणून वाचकांनी ही मर्यादा लक्षात घेऊनच या ग्रंथाकडे पहावे. १९२५ च्या कालखंडातील भाषा चरित्रनायकाचा परिचय देतानाचा चष्मा/नजर सूज्ञ वाचकांच्या लक्षात आल्यावाचून रहात नाही. तत्कालीन भाषा ही आजच्या बदललेल्या वातावरणात तितकीशी परिचयाची नसल्याने इच्छा असूनही संपादन मर्यादा भाषाबदल करू देत नसल्याने ती जशास तशी ठेवणे आवश्यक होते. म्हणून विद्यार्थ्यांच्या दृष्टीने भाषा ऐतिहासिक रसद कायम पुरवत रहाते.

रियासतकार गो. स. सरदेसाई यांच्या लेखनाचा आदर्श समोर ठेवून हा ग्रंथ पूर्णत्वाकडे नेला आहे. या उपेक्षित मानकऱ्यापैकी काही चरित्रे अगोदर प्रसिद्ध झाल्याचेही वाकसकरांनी नम्रपणे नमूद केले आहे. या पुस्तकातील बहुतांश नायक हे पेशव्यांशी निगडित असल्याने पहिल्या पेशव्यापासून १७१३-१७२० च्या बाळाजी विश्वनाथ ते शेवटच्या बाजीराव १७९५-१८१६ या कालावधीतील उल्लेख वारंवार येतो. म्हणूनच या ग्रंथाचं

अवलोकन करण्यापूर्वी पेशव्यांचा इतिहास नजरेआड करता येत नाही. पेशव्यांच्या कारकीर्दीचं अवलोकन झाल्याशिवाय या ग्रंथात रममाण होणं जरा अवघडच आहे. ऐतिहासिक, धार्मिक, न्यायिक क्षेत्रातील उपेक्षित चरित्रांच्या मालिकेत पहिलं चरित्र आहे ते पेशव्यांच्या कारकीर्दीतील रामचंद्र बाबा सुखठणकर उपाख्य 'रामचंद्रबाबा' शेणवी तथा रामचंद्र मल्हार सुखटणकर सारस्वत ब्राह्मण असून कोकणातील आरवलीचे कुलकर्णी आहेत. उपजीविकेसाठी त्यांना आरवली सोडावी लागते. साताऱ्याला येतात. या काळात गादीवर शाहू महाराज होते. त्यांच्या दरबारी बाळाजी विश्वनाथ हा पेशवा असतो या प्रसंगी राजगुरू कचेश्वर बाबा ओतुरकर या रामचंद्र मल्हार उपाख्य रामचंद्र बाबास आश्रय देतात. ओतूरकर बाबांच्या आश्रयाने रामचंद्रबाबा शाहूंच्या दरबारात कुशलतापूर्वक राज्यकारभाराची कामं करून हळूहळू आपलं बस्तान बसवतात. पहिले पेशवा बाळाजी विश्वनाथाच्या कृपाप्रसादाने रामचंद्रबाबांच्या कर्तबगारी व यशाचा आलेख उत्तरोत्तर चढत जातो. दुसरा पेशवा बाजीराव बल्लाळ (१७२०-१७४०) यांनी माळवा प्रांत काबीज केला. हा प्रांत पेशवा, शिंदे, होळकर आणि पवार यांच्या मदतीने काबीज केल्याने रामचंद्र बाबांनी या प्रांताची वाटणी उपरोक्त चौघांत अत्यंत कल्पकतेने केली. म्हणजे यात चौघांपैकी कोणीही नाराज न होऊ देता. पुढे नानासाहेब पेशवे, सदाशिवराव, रघुनाथराव यांचे शिक्षण रामचंद्रबाबांच्या देखरेखीने झाले. याचबरोबर उत्तरेकडील मुलुखगिरीत ते सहभागी होऊ लागले. यानंतर रामचंदबाबा लक्षाधीश झाले. नानासाहेब पेशवे हे द्रव्यलोभी असल्याचेही इथे स्पष्ट झाले आहे. या धोरणाचा परिणाम पानिपतच्या १७६१ च्या युद्धावर झाला. मराठ्यांच्या मदतीस एकही राजपूत धावून आला नाही हेही उघडपणे लक्षात आले. रामचंद बाबाने पुण्यास सात मजली वाडा बांधलो जो १७६३ साली आगीत जळून खाक झाला. त्याने उत्तर हिंदुस्तानात अनेक घाटं-देवस्थानं उभारली. एवढं सगळं असूनही रामचंद्र बाबा हे कारस्थानी कारकून असल्याचा दावा लेखकाने केला असून त्यासाठी मल्हारराव सदाशिवराव यांच्यातील वैमनस्य प्रकरण पुढे केले आहे.

नानासाहेब पेशवे यांना वश करून रामचंद्रबाबा पुन्हा पेशवाईचा कारभार पाहू लागला. पुढे साताऱ्याच्या रामराजेंच्या कारभारात सारे सरदार जड

झाल्याने आणि राणी ताराबाईंच्या प्रचंड हस्तक्षेपाने राज्यकारभार खिळखिळा झाला. अशा प्रसंगी रामचंद्रबाबा आणि सदाशिवराव भाऊ आणि राजाराम यांनी साताऱ्याच्या राज्याची सांगोल्यास काही व्यवस्था केली. रामचंद्र बाबांनी पेशव्यांना द्रव्यलोभी बनवले. त्यामुळे राजपुतान्यात मराठ्यांची पत कवडीमोल झाली. अशाप्रकारे या धर्त्या पुरुषास शेवटी पेशव्यांनी घरी बसवले. या कालखंडात तीर्थाटनेही त्यांनी केली. यात त्यांना नवज्वराचा आजार झाला. आजाराच्या सातव्या दिवशी ४ ऑक्टोबर १७५४ रोजी सकाळी दहा वाजता बाबांचे निधन झाले. पत्नी द्वारकाबाई सती गेली. जमाखर्चाच्या पद्धतीचा उगम नानासाहेब पेशव्यांच्या कालखंडात १७५० साली झाला. या जमाखर्चाच्या पद्धतीचा उद्गाता रामचंद्रबाबाच होता. या अभ्यासातून पुढे नाना फडणविसांसारखे उदयास आले. हिशेबाची कचेरी (यंत्रणा) म्हणजे फड आणि या यंत्रणेचा मुखी फडणवीस तर या कचेरीचा संस्थापक रामचंद्रबाबाच ठरला. रामचंद्र मल्हार सुखटणकरआधी कुलकर्णी होता. स्वकर्तृत्व आणि बुद्ध्यांकावर तो पेशव्यांचा कारभारी झाला. बुद्धिमान कर्तव्यदक्ष माणूस स्वराज्यात हमखास यशस्वी होत असल्याचे लेखकाने शेवटी नमूद केले आहे.

**रामदासपंत**

रामदासपंत हा चरित्रनायक रामचंद्र मल्हार सुखटणकरांसारखाच कारभारी होता. रामदासपंतांच्या चरित्राच्या प्रारंभकाळात अठराव्या शतकात दक्षिणेत दोन राजसत्ता बलाढ्य होत्या. एक सातारचे शाहू तर पुण्याचे पेशवे आणि दुसरी राजसत्ता हैदराबादच्या निजामाची. यांच्यात सातत्याने लढाया होत. पहिल्या बाजीरावाने निजामाला दाती तृण धरायला भाग पाडले होते. अशावेळी बहुतेकांचा होरा असा होता की बाजीरावानंतरच्या पेशव्यांनी अथवा शाहूंनी निजामशाही संपुष्टात आणायला हवी होती. निजामशाही मराठी राज्यात विलीन करायला पाहिजे होती. मात्र लेखक इथे निजामशाही विलीन न करण्याच्या मर्मस्थळाचा व मर्यादांचा संयुक्त उल्लेख करतो व तो तर्क अतिशय जोरकस वाटतो. त्यानंतर शाहूच्या पश्चात तिसरे पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशव्यांच्या हातात सत्ता आली. त्यांनी निजामाचे प्रकरण हाताळण्यास प्रारंभ केला. त्याप्रसंगी निजाम दरबारात एक विलक्षण व्यक्ती कारभारावर होती. ती व्यक्ती म्हणजे या प्रकरणाचा

चरित्रनायक रामदासपंत होय.

रामदासपंत शिकाकोलचा ब्राह्मण होता. तो नासेरजंगाजवळ नोकरीस होता. नासेरजंगाने कर्नाटकावर स्वारी केली. त्याला फ्रेंचांचा मुखी डुप्लेने पराभूत केले. यास कारस्थानी रामदासपंतांनी सैनिकी व्यूहरचनेत डुप्लेस आतून मदत केली. डुप्लेने त्याला 'राजा रघुनाथदास' हा खिताब बहाल केला. अशा या फंदफितुरीतून रामदासपंताला 'राजा रघुनाथदास' खिताब मिळालाच, पण नासिरजंगाची जागाही मिळाली.

तिकडे निजाम कमरुद्दीन खान निवर्तला. फ्रेंचांच्या बूसी निजाम राजवटीत kingmaker झाला. अशा या बादशाही इतमामात वावरणाऱ्या बूसीसमवेत रामदासपंतांचे चांगले मेथकूट जमले. बूसी आणि रामदासपंतांनी सलाबतसंगास निजाम केले. पुढे रामदासपंतांचे प्रस्थ एवढे वाढले की तिसरा पेशवा नानासाहेबास रामदासपंत तारणहार वाटले. जाणोजी निंबाळकरांच्या मदतीने रामदासपंतांनी नानासाहेबास चकविले. या चकवण्यासाठी १७५१ च्या अजिंक्य राणी ताराबाईसमवेत झालेल्या युद्धात रामदासपंतांनी पेशव्यांना सहकार्य केले होते. त्यानंतर रामदासपंतांनी पेशव्यांना केवळ आमिष दाखवले. पुढे पेशव्याचा पाच लाखांचा खजिना बूसीच्या मदतीने रामदासपंतांनी लुटला. मात्र या लुटीच्या अनुषंगाने त्याने सपशेल कानावर हात ठेवले व पैसे परत केल्याचेही रेटून नेले. मात्र ही त्यांची नौटंकी लवकरच उघडी पडली. याचा परिणाम निजाम-पेशवे असा संघर्ष होऊन कुकडी नदीवरील युद्धात पेशवे पराभूत झाले. (२१.११.१७५१) निजामाचा कारभार चालवणाऱ्या अशा मुत्सद्दी रामदासपंतांचे कायमचे पारिपत्य करायचे पेशव्यांनी ठरवले. दुसरीकडे निजाम फौजेस वेतन न मिळाल्याने असंतुष्ट होऊन बीदरनजीकच्या भालकीला ७ एप्रिल १७५३ रोजी रामदासपंतांचा खून केला. अशा या मुत्सद्दी, महत्त्वाकांक्षी चरित्रनायकाचे चरित्र रक्तरंजित घटनेने एकाकीपणे संपले.

**चंगीजखान**

तेमूजिन उर्फ चंगीजखान हे या ग्रंथातील आंतरराष्ट्रीय चरित्र आहे. चंगीजखानाचा जन्म ११६३ मध्ये झाला. भारतात १५२६ मध्ये बाबराने मोगल साम्राज्याचा पाया रचला. चंगीजखान बाबराच्या आईकडून पूर्वज आहे. इ.स. १२५० पर्यंत पूर्व समुद्र, कॅस्पियन समुद्र, व्होल्गा नदी,

बुखोरा, काबूल, कंदहार, इराण, चीनचा काही भाग, अफगाणिस्तान आदी भूभाग चंगीजखानाने काबीज केला.

चंगीजखानाकडे अवाढव्य लष्कर होते. ज्याच्या बळावर त्याने अवाढव्य भूप्रदेश काबीज केला. बरेच राजे, राजवाडे त्याच्या अधिपत्याखाली आले. मात्र त्याचे वर्तन निंद्य, राक्षसी असल्याचे मत लेखकाने नोंदवले आहे. त्याचा सर्वात वाईट गुण म्हणजे धर्माची, धर्मग्रंथांची अवहेलना. आशिया खंडातली प्रमुख ग्रंथालये त्याने उद्‍ध्वस्त केली. पवित्र बायबल, पवित्र कुराण एका मशिदीत घोड्याच्या टापाखाली तुडविले. असा क्रूरकर्मा अजिंक्य सम्राट १२२७ साली कॅस्पियन समुद्राकाठी मरण पावला. त्याच्या आत्म्यास चिरशांती मिळावी म्हणून चाळीस कुमारिकांना बळी देण्यात आल्याचेही लेखकाने नमूद केले आहे. तब्बल एक कोटी चाळीस लोकांचा नरसंहार करणाऱ्या चंगीजखानाला मानवी राक्षसाला लेखकाने चरित्रनायक करावे हे एक न उलगडणारे कोडे आहे. असो. विद्यार्थ्यांसाठी चरित्रमाला असल्याने सुकृत्य करणाऱ्या चरित्रनायकासमवेत हे विकृत, अमानवीय भीमपराक्रमी चरित्रही लेखकाने रेखाटले असावे या अनुषंगाने त्याच्या काही मर्यादाही असू शकतात.

**अहिल्याबाई**

बहुगुणी–बहुपराक्रमी इंदूरची राणी अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र चंगीजखानानंतर घालून लेखकाने जणू प्रायश्चित्त घेतले असावे. मोरोपंतांची एक आर्या प्रारंभी टाकल्याने मोरोपंतांनी राणी अहिल्याबाई होळकरांना देवी संबोधल्याचे लेखकाने नमूद केले आहे. वाचकाच्या सुलभतेसाठी होळकर घराण्याच्या वंशवृक्षाचीदेखील पुष्टी जोडली आहे. ही वंशावळी लेखकाने इतिहासाचार्य राजवाडे यांच्या एका लेखावरून घेतली आहे. होळकर घराण्याचे मूळ आडनाव वीरकर असून होळकरांनी मराठी मुलुखात विविध नऊ ठिकाणी वस्ती करून शेवटी त्यांनी इंदूर येथे कायम बस्तान बसविल्याचे लेखकाने स्पष्ट केले आहे. तसे पाहता राणी अहिल्याबाई खंडेराव होळकर यांचे माहेर बीड जिल्ह्यातील चोंडी होय. १९२५ साली चोंडी गाव आजच्या औरंगाबाद जिल्ह्यात होते. बीड जिल्हा तालुका असल्याचे लेखकाने नमूद केले आहे. वडील माणकोजी शिंदे हे चोंडीचे पाटील होते. रुपाने सर्वसाधारण असलेल्या अहिल्याबाईंचे वयाच्या तेराव्या

वर्षी इंदूरचे युवराज खंडेरावांशी १४ मे १७३८ साली विवाह झाला. अहिल्याबाईंना मालेराव नावाचा मुलगा तर मुक्ताबाई नावाची मुलगी होती. पुढे पती खंडेराव कुंभारीच्या युद्धात गोळी लागून १३ मार्च १७५४ रोजी मरण पावला. वयाच्या अवघ्या ३९ व्या वर्षी अहिल्याबाईंना वैधव्य आले. पुढे सासरे १७६६ मध्ये निवर्तले. यानंतर अहिल्याबाईकडे राज्यकारभाराची सूत्रे आली. अशातच मुलगा माहेरावदेखील वारला. अशा दुःखद स्थितीत असताना मागचा पुढचा विचार न करता राघोबा भरारीने इंदूरचा दिवाण चंद्रचूडच्या मदतीने होळकर राज्यावर चाल केली. गायकवाड आणि भोसले यांचे सहकार्य घेऊन राघोबास अहिल्याबाईंनी परास्त केले. यानंतर तिने तुळाजी आणि महादजी यांना एकदम आव्हान करून युद्धनीती आणि राज्यकारभाराच्या चातुर्याचे प्रत्यंतर आणून दिले. अहिल्याबाई राज्यकारभारात तरबेज तर होतीच; पण तिचे राजकीय अर्थकारणदेखील वाखाणण्याजोगे होते. अहिल्याबाईंना मालोजीकडून सुख मिळाले नाही. या दुःखाचे माहेराकडून झालेल्या त्रासाचे सविस्तर वर्णन लेखकाने केले आहे. पुढे जावईदेखील वारला. मुलगी सती गेली. बहीण-भाऊही समक्षच वारले. ही सर्व वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून अहिल्याबाईंनी आपल्या रयतेचा सांभाळ पुत्रवत् केला. पुढे काही दिवस आजारी पडून १३ ऑगस्ट १७९५ रोजी वयाच्या सत्तराव्या वर्षी अहिल्याबाई निवर्तल्या. अहिल्याबाईंनी अनंत फंदीला सन्मार्गाला लावले. धर्माच्या बाबतीत अतिदक्ष असलेल्या अहिल्याबाई परधर्मसहिष्णू होत्या. सोमनाथाच्या भग्न मूर्तीची पुनःस्थापना, अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार, कोलकात्यापासून ते काशीपर्यंतचा मोठा रस्ता, धर्मशाळा, अन्नछत्रे, घाट आदी लोकोपयोगी कार्य केल्याने मोरोपंत आणि मालकम यांनी अहिल्याबाईच्या कामगिरीची प्रशंसा केली आहे.

थोडक्यात, मराठवाड्याची कन्या बुद्धिमान, चौकस, धोरणी असल्याचे स्पष्ट करून लेखकाने अहिल्याबाई विनम्र परधर्म सहिष्णू अनियंत्रित सत्ता रयतेसाठी असल्याची भूमिका घेऊन कार्यरत असल्याचे चित्रण या चरित्रात केले आहे. हे चरित्र अत्यंत साक्षेपी, उठावदार असल्याने वाचकांना भावल्यावाचून रहात नाही.

**खंडो बल्लाळ**

छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि शाहूराजांची

एकनिष्ठपणे सेवा करणारे आणि आयुष्यात कुणाचे मिंधे नसणारे निस्वार्थी व्यक्तिमत्त्व असलेले खंडो बल्लाळ हे शिवाजी महाराजांच्या चिटणीस (बाळाजी आवजी)चे चिरंजीव आहेत. खंडो बल्लाळ हे तीन पिढ्या छत्रपतींच्या गादीशी ईमान राखून होते. वडील बाळाजी आवजी आणि सावत्रभाऊ आवजीला छत्रपती संभाजी महाराज यांनी हत्तीच्या पायी देऊन ठार केले होते. अंतःकरणातील या दुःखाला विसरून खंडो बल्लाळ यांनी संभाजी महाराज, राजाराम महाराज, शाहू आदींची मनोभावे सेवा केली.

खंडो बल्लाळचा जन्म इ.स. १६६८ सालचा. वडील आणि सावत्र भाऊ यांच्या हत्येनंतर संभाजीराजांचा दीवाण कलुषा कबजीने खंडो बल्लाळ आणि निळो बल्लाळ यास वाघाच्या तोंडी द्यावयाचे ठरवले. मात्र संभाजी महाराजांची कानउघडणी महाराणी येसूबाईंनी केल्याने खंडो बल्लाळ बचावले. अशा रीतीने एकनिष्ठ सेवक स्वराज्याला लाभला. वयाच्या अवघ्या १३ व्या-१४ व्या वर्षी खंडो बल्लाळ संभाजी महाराजांचे चिटणीस झाले. ही चिटणीशी लेखणी त्यांनी अत्यंत कष्टाने पेलली. गोव्याच्या युद्धातही संभाजी महाराजांसमवेत समशीर गाजवली. यासमवेत संभाजी महाराज संगमेश्वरी असताना राणी येसूबाई संगमेश्वराकडे निघाली. मोगल सरदारांनी येसूबाईस पकडण्याचा घाट घातला. या स्वामीनिष्ठ सेवकाने स्वतःच्या मावस बहिणीला राणी येसूबाईंच्या जागेवर बसवले. अर्थातच, संतूबाईंनी मोगलांचा छापा पडण्याअगोदरच हिरकणी खाऊन कैद होताच इहलोकीची यात्रा संपवली.

संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्यावर जी संकटे कोसळली या संकटांत म्हणजे जिंजीच्या सात वर्षांच्या वेढ्यातही खंडो बल्लाळ यांनी पराक्रमाची शर्त करून राजाराम महाराजाला मोठ्या शौर्याने साथ केली. यावेळी खंडो बल्लाळास मोगल लोकांनी पकडले. अनेक दिवस यमयातना दिल्या तरी स्वामीनिष्ठ चिटणीस मोगलांना बधला नाही. चंदी येथे राजारामास येऊन मिळाले. जगप्रसिद्ध जिंजीच्या या अभूतपूर्व वेढ्यात गणोजी शिर्के यांनी राजारामाला वाट करून दिली. मात्र किल्ल्याच्या कोटावरून उडी मारताना खंडो बल्लाळास एक पाय गमवावा लागला. मुलाला मोगलांनी पकडले. त्याला कैद केले. मुलगाही गेला आणि पायसुद्धा गमवावा लागला. शाहू औरंगजेबाच्या कैदेतून सुटल्यावर खंडो बल्लाळ यांनी त्यांची चाकरी

उत्तमप्रकारे केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दोन–तीन पिढ्यांशी खंडो बल्लाळ यांचे वर्तन राजनिष्ठ राहिले, स्वामीनिष्ठ राहिले. स्वराज्यद्रोह खंडो बल्लाळाच्या अंतकरणालाही स्पर्श करता आला नाही. या अस्सल राजनिष्ठेचे बहारदार वर्णन लेखकाने केले आहे. प्रसंगांना मात्र लेखकाने महत्त्व दिले. सनावळ्याकडे फारसे लक्ष दिले नाही. हे चरित्र ऐतिहासिक आहे. मात्र मनोरंजकतेकडे झुकलेले आहे.

**नानक**

शीख धर्म संस्थापक गुरुदेव नानक साहेबांचे ‘नानक’ शीर्षकाखाली संक्षिप्त चरित्र आहे. या ग्रंथातील बहुतांश चरित्रे राजसत्तेशी निगडित आहेत. परंतु गुरूनानक देवांचे चरित्र मात्र निखळ शीख धर्माशी संबंधित अर्थात धार्मिक आहे, राजकीय नाही.

आरंभी लेखकाच्या लेखनशैलीत गुरू नानकदेवांचा जन्मवृत्तांत आहे. तद्नंतर नेहमीच्या पद्धतीने नानकांच्या मोठेपणीच्या भविष्य एका जोशाकडून वदविण्यात येऊन हा निर्गुण देवाचा भक्त बनेल असे भविष्यकथन सुचविण्यात आले आहे. या बालकास हिंदू–मुस्लिम दोन्ही धर्माचे शिष्य असतील असेही भविष्य वर्तविण्याचा उल्लेख आहे. लाहोर जिल्ह्यातील तलवंडी नानकाच्या बालपणीच्या क्रीडास्थळं, तलावाचा, सरोवराचा उल्लेख आहे. कुमारवयीन (सात वर्षाच्या)नानकदेव तत्त्वज्ञान बोलू लागतात. एकेश्वरवाद, निर्गुणदेव, निराकाराची भक्ती मानवधर्मपर, भक्तीपर रचना, पद, कवनं करतात. अशा वाचनांचा संग्रह ‘गुरूग्रंथसाहेब’मध्ये संग्रहित असल्याचे लेखकाने म्हटले आहे. शालेय जीवनात स्वतःच्या शिक्षकास ब्रह्मज्ञान चर्चा करून चकित केले. शिक्षकाच्या आवाक्याबाहेरचं तत्त्वज्ञान नानक सांगू लागल्याने शिक्षकाने नानकासमोर शस्त्र टाकून दिल्याने नानकाची शाळा सुटली. शिक्षण घ्यायचं कामच पडलं नाही. मात्र पुढे पर्शियन, फारसी आदि भाषा अवगत केल्या. बालपणीच्या चमत्कारांचे वर्णन लेखकाने केले आहे.

रायबूलरच्या शेतातील पीक नानक सांभाळीत असलेल्या जनावरांनी उद्‌ध्वस्त केले. त्यावेळी नानक ईश्वरचिंतनात लीन होते. तक्रार रायबूलरपर्यंत पोहोचल्यावर पडताळणीस्तव पुनश्च शेतावर पाहणी केली असता पीक जसेच्या तसे आढळून आले. मुलाला अनेक प्रकारांनी गुंतवू

पहाणाऱ्या बापाने शेवटी नानकाचे लग्न लावून टाकले. लग्नानंतरही गुरंढोरं सांभाळण्याचे काम नानकाला देऊन पाहिले पण त्यांची दिव्य लक्षणं शेतकरी बाप समजू शकला नाही. उपनयन संस्काराच्यावेळीदेखील गुरूनानकाने त्याची वैयर्थता समप्रमाण सिद्ध करून तो संस्कार अस्वीकार केला. व्यापार उदीमासाठी दिलेली सच्चा सौद्याची रक्कम (भांडवल) साधूसेवेत खर्च करून हाच खरा सौदा वास्तविक लाभ असल्याचा अनुभव दिल्यानंतर तत्कालीन शासकाच्या भंडारण सेवा सांभाळणारास मोदी म्हणत. तर या मोदीखान्याच्या (भांडारगृह) नोकरीतील बचत गरीब, दीन–दुबळ्यांच्या उत्थानार्थ खर्च करू लागले. कथनी–करणी एकसमान राखून धर्मनिष्ठ राहून सर्वांवर प्रेम करण्याचे तत्त्व प्रतिपादन करू लागले. मोदीखाना (भांडारगृह) सोडून एकतेच्या धर्माचा प्रसार प्रचारार्थ सर्वदूर प्रवासाला त्यांनी सुरुवात केली. समाजातील सर्व स्थरातील लोक त्यांना शिष्य म्हणून लाभले. गुरु नानकदेवांनी काशी, गया, प्रयाग, मक्का, मदिना, श्रीलंकादी देश पायदळी तुडवले. मोगल बादशहा, बाबराशीही गाठ पडली. धर्मप्रसार, प्रचारातच १५३८ साली त्यांचे देहावसान झाले.

चमत्कारांनी ओतप्रोत गुरूनानकदेवांच्या चरित्राचा उपसंहार करताना शीख धर्माची त्रिसूत्री लेखकाने उद्‌धृत केली आहे. मराठमोळ्या वाचकांशी संवाद साधताना नानकदेवांच्या जीवनातील चमत्कारांची संगती मराठी संताशी साधण्याची लेखकाची शैली वाखाणण्याजोगी आहे.

**अहमदशाह अबदाली**

भारतातील हरियाणा राज्यातील पानिपत या गावी इसवी सन १५२६, इ.स. १५३० आणि १७६९ साली परदेशियासमवेत तीन घनघोर संग्राम झाले. या तिन्ही संग्रामांत भारतीयांचा दारूण पराभव झाला. यापैकी पहिल्या दोन संग्रामांनी बाहेरच्या मोगलांची सत्ता भारतात अथवा हिंदुस्थानात स्थापन झाली. मोगल इथं स्थायिक आहेत. इथलेच होऊन बसायचे मात्र तिसऱ्या पानिपतच्या युद्धात परदेशस्थ अहमदशहा अब्दाली (दुर्राणी)च्यासमोर मराठे होते. १४ जानेवारी १७६१ रोजी मराठ्यांचा अब्दालीकडून दारूण पराभव झाला. त्याचे परिणाम दूरगामी झाले.

कंदहारच्या या अहमदशहा अब्दालीच्या पराक्रमाची गाथा म्हणजे प्रस्तुत चरित्र होय. दुसऱ्या बाजूने पराभूत सदाशिवराव भाऊंची प्रासंगिक

दारूण कहाणी या चरित्रात आहे. चरित्रकथनाच्या परंपरेने चरित्रनायकाच्या पूर्वसुरीच्या वंशजांची नामावली देऊन लेखकाने अहमदशहा अब्दालीचा जन्म १७२४ च्या सुमारास झाला असावा असे नमूद केले आहे. नादिरशहाच्या खुनानंतर अहमदशहाने प्रारंभी कंदहार काबीज केले. नंतर गझनी घेतले. त्यानंतर हिंदुस्थानावर अनेकदा स्वाऱ्या केल्या. दरम्यान, दिल्ली काबीज करताना त्याचा पराभव झाला. पुढील आक्रमणात त्याने विशेषतः पंजाब परिसरात प्रचंड लूट केली. त्याने तिसऱ्या स्वारीत मीर मन्नूचा पराभव केला. या प्रसंगीचा अब्दाली व मीरमन्नू दरम्यानचा संवाद वाचून सिकंदर-पोरस संवादातील दिलदारपणाचेही साधर्म्य लक्षात येते. इ.स. १७५७ ला तो पुन्हा आला. त्याच्या लढाईस लेखकाने राक्षसी संबोधले आहे. यानंतर त्याच्या युद्धाच्या प्रसंगाची ही भूमी सर्वांगाने सुपीक वाटल्याने अहमदशहा वारंवार हिंदुस्थानावर स्वाऱ्या करू लागला. या त्याच्या त्रासाला कंटाळून दिल्लीच्या बादशहाने मराठ्यांचा आश्रय घेण्याचे ठरवले. मराठ्यांनी बादशहाला आश्रय दिला. फौजी कौशल्यापुढे अहमदशहा त्यांना हल देऊन कंदाहरला निघून जात असे. यानंतर पेशव्यांनी सदाशिवराव भाऊंच्या नेतृत्वाखाली निर्णाय लढाईसाठी मराठी फौजांना पाठवले. मराठी फौजांनी पानिपतावर तळ ठोकला. दोन-सव्वादोन महिन्यांनी १४ जानेवारी १७६१ रोजी मराठे आणि अब्दालीतील युद्ध झाले. या युद्धात अटकेपार झेंडे लावणारे मराठे पराभूत झाले.

शेवटी वयाच्या पन्नासाव्या वर्षी पायाला नासूर झाल्याने इ.स. १७७३ मध्ये मधनी इथे अहमदशहा अब्दालीचे निधन झाले. अहमदशहा अब्दाली सुशिक्षित, धर्मपारायण, विद्वानांचा चाहता, आश्रयदाता, पोशिंदा राजा होता. तो युद्धकला निपुण होता.

पानिपतचं तिसरं युद्ध निर्णायक होतं. या युद्धाचा हिंदुस्तानावर, विशेषतः मराठ्यांच्या आणि एकूणच भारतीय राजकारणावर दूरगामी परिणाम झाला. अशा महत्त्वपूर्ण युद्धाला लेखकाने एकाच पानात गुंडाळले. वास्तविक, १७६१ च्या युद्धाचे सविस्तर वर्णन हवे होते.

**रामशास्त्री**

शीख धर्म संस्थापक गुरू नानकदेवजी आणि न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे यांचे या ग्रंथातील चरित्र वगळता सगळी चरित्र राजकीय सत्ताधीशांची

आहेत. रामशास्त्री प्रभुणे हे साताऱ्याकडील माहुलीचे मूळनिवासी आहे. प्रभुणे यांचे हे चरित्र प्रामुख्याने न्यायनिष्ठुरतेचे आहे. त्यामुळे नजरेत भरते. रामशास्त्रीचे बालपण सर्वसाधारण मुलासारखेच गेले. बालसुलभ उनाडकीत गेले. मात्र वयाच्या विसाव्या वर्षी ऐतखाऊ शागिर्द रामशास्त्रीस एका सावकाराने झिडकारल्याने काशीला जाऊन बाळभट शास्त्री (पायगुडे) शाळेत दाखल होऊन पुढे विद्यार्जन करून प्रख्यात धर्मराज झाला. त्यांचा शाळकरी मित्र अनंत भटही नामांकित विद्वान झाला.

थोरल्या माधवराव पेशव्यांनी रामशास्त्री प्रभुणे यांना इसवी सन १७६४ मध्ये मुख्य न्यायाधीशांनी जागी नियुक्त केले. ते रामशास्त्रीचा प्रचंड आदर करीत. त्यांच्या ठायी असलेली न्यायनिष्ठुरता प्रभुणेमुळेच होती. न्यायाधीश रामशास्त्री प्रभूणे यांच्या न्यायनिष्ठ निवाड्याची मराठ्यांचा इतिहास लिहिणाऱ्या ग्रैण्ड डफनेही प्रशंसा केली आहे. रामशास्त्री प्रभुण्यांच्या निवाड्याची पारदर्शकता नारायणराव पेशव्याच्या (१९७२ ते ७३) खून प्रकरणी स्पष्ट जाणवली. नारायणराव पेशव्याच्या म्हणजे गंगाबाईच्या नवऱ्याच्या खुनाचा तपास रामशास्त्री यांनी सखोल केला. या खून प्रकरणातील आरोपी राघोबा दादा होते. त्यांच्यावर नारायणराव पेशव्यांच्या खूनाचा आरोप होता. 'ध'चा 'मा' केल्याचे पत्र शोधून हा निर्णय निर्भय निष्ठुर न्यायनिवाडा दिला. आरोपी तो आरोपीच. मग तो अगदी राजघराण्याशी संबंधित का असेना त्याला माफ करू नये. रामशास्त्रींनी चिठ्ठीचा तपास घेऊन त्यात 'ध'रून आणण्याच्या ओळीतील 'ध'ला 'मा' करून मारून असा बदल केल्याची खाडाखोड झाल्याची खात्री करून घेऊन रामशास्त्रींनी तेच केले अशा समयी निर्भय निश्चयीपणे न्याय देऊन माहुलीस निघून गेले. त्यांच्या या ऐतिहासिक निस्पृह-निर्भय न्यायाने सवाई माधवरावांनी (१७७४-१७९५) त्यांना पुन: प्रतिष्ठेने न्यायमूर्तींच्या सिंहासनावर विराजमान केले. हा ऐतिहासिक न्यायनिवाडा आजही मार्गदर्शक आहे.

न्यायमूर्ती रामशास्त्री पुरोगामी विचारांचे होते. प्रागतिक विचारांच्या या न्यायाधीशाने त्या काळातील प्रतिगामी पुण्यात परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या बयाबाई नावाच्या सात वर्षाच्या विधवेचा पुनर्विवाह करण्यास संमती दिली. तसेच कायस्थ चांदप्रभुच्या ग्रामण्यातही त्यांनी प्रभूकडून निकाल दिला. रामशास्त्रींनी पेशव्याच्या दरबारात चाळीस वर्षे नोकरी केली. काळावेळाचा

विचार न करता त्यांचे वेतनही फारसे मोठे नसल्याची लेखकाने रुपयांची आकडेवारी देऊन नमूद केले आहे. अशा निस्पृह नि:स्वार्थ न्यायनिपुण न्यायमूर्तीवर देखील लाच घेतल्याचा आरोप झाला. अशा न्यायातील आदर्श न्यायमूर्तीचा २५ ऑक्टोबर १७८९ रोजी मृत्यू झाला.

**भास्करराम**

भास्करराम 'भास्करपंता'वर कधीकधी भास्कर अशी नामाभिधानाने उल्लेख झालेला आढळतो. भास्करपंत कोल्हटकर हे नागपूरकर भोसले यांच्या पदरी असलेले कुशल सेनानी होते. एका अर्थाने ते भारतीय नेपोलियन बोनापार्ट असल्याचे लेखकाने म्हटले आहे. मात्र युद्धनीतीतील अत्यंत कुशल असलेल्या या चित्तपावन निष्णात कारभाराबद्दल तत्कालीन पेशव्यांना फारसा आदर नव्हता. भास्करपंत निवर्तल्यावर त्यांच्या वंशजाला पेशव्यांनी मोठ्या युक्तीने कारभारातून बाजूला केले. इ.स. १७४२ ते इ.स. १७४४ दरम्यान भास्करपंताच्या नेतृत्वाखाली बंगालच्या यशस्वी मोहिमेचे टोकदार वर्णन लेखकाने केले आहे. पश्चिम बंगालचा नवाब अलविदाखानास भास्करपंताचा नेहमीच घोर पडत असे. इतकंच नव्हे, तर कोलकात्यातील इंग्रजसेना ही भास्करपंतांना चांगले वचकून होते. मात्र युद्धनीतीच्या दृष्टीने हार जात नाहीत हे लक्षात आल्यावर कूटनीतीचा डाव टाकला. भास्करपंतास तहासाठी वाटाघाटीसाठी बोलावले. निवडक निवडक अशा वीस सदस्यांची भेट ठरली. भास्करपंत तंबूत येताच नवाबांनी कपटकारस्थानाने भास्करपंतांची हत्या केली. पुढे या कपट नीतीचा चार वर्षांनी रघोजी भोसले यांचे चिरंजीव जाणोजी भोसले यांनी शिरच्छेदाबद्दल २५ लाखाचा दंड नवाबाकडून भोसल्यांनी वसूल केला.

**मुजफफरखान गारदी**

मध्यकालीन भारतातील युद्धतंत्राची सुरुवातीलाच चर्चा या चरित्रात आहे. गनीमी युद्धतंत्र आणि कवायती युद्धतंत्राची माहिती देऊन कुळवाणीभूषण शिवाजीराजांनी गनीमी युद्धतंत्राचा वापर केला, तर फ्रेंच सेनानी बुसीने कवायती तंत्राचा उपयोग केला. अशाच निष्णात सेनानी मुजफ्फर खान होता. बुसीने काढून टाकल्यावर तो नानासाहेब पेशव्यांच्या पदरी आला. नानासाहेब पेशव्यांनी निजामावर केलेल्या स्वारीत मुजफ्फरखानही होता. मुजफ्फरखान हा द्रव्यलोभी, नमकहराम व चढेल होता म्हणून पुढे चालून

सावनूरच्या नवाबाच्या पदरी गेला. सावनूरच्या नवाबाकडून पुन्हा नोकरीसाठी पेशव्याकडे आला. सदाशिवराव भाऊंनी त्याला पदरी ठेवून घेण्यास विरोध करूनही बाबासाहेबांनी त्याला आपल्या पदरी ठेवले. मुजफफरखानाने सदाशिवरावभाऊ गारपीरावर डेऱ्यात असताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. यात भाऊ बचावले. मात्र या हल्ल्यानंतर नानासाहेब पेशव्यांनी फारशी चौकशी न करता मुजफ्फरखान व त्याच्या जावयाचा शिरच्छेद केला. दरम्यान सदाशिवरावभाऊवरील हमल्याच्या संदर्भात लेखकाने तर्कवितर्कासाठी दोन पानं खर्ची घातले आहेत. यामध्ये प्रकरणात नानासाहेब पेशव्यांची पत्नी गोपिकाबाईकडे संशयाची सुई लेखकाने वळविली आहे.

**तुळाजी आंगरे**

अठराव्या शतकात तुळाजी आंग्रे संकपाळ हे आरमारी सैन्यदलातील प्रमुख होते. बाणकोटपासून सावंतवाडीपर्यंतचा मुलूख त्यांच्याकडे होता. तुळाजी आंगरे हे नानासाहेब पेशवेकालीन होते. तुळाजी आंग्रे याचा दरारा इंग्रज आरमारावरही होता. अशा निष्णात मराठी आरमारी दलाचा पुढे नानासाहेब पेशव्याच्या धोरणामुळे मृत्यूपंथास लागण्याची नोंद सुरुवातीला केली आहे.

कोकणातील आंगरवाडीचे राहणारे असल्याने त्यांचे आडनाव आंगरे पडले. कान्होजींचा मुलगा तुळाजी होता. ही आंग्रे मंडळी छत्रपती घराण्याशी घनिष्ठ असल्याने ते पेशव्यांना मान देत नसत. अजिंक्यराणी ताराबाईंना सहकार्य केल्याने नानासाहेब पेशव्यांची दर्याबंद तुळाजीवर इतराजी झाली.

तुळाजी आंग्रे निमगोरा आणि देखणा होता. या रुबाबदार आंग्रे यांच्या पश्चिम किनाऱ्यावर दरारा होता. तरीही आरमारी क्षेत्राचा अनुभव नसताना पेशव्यांनी आंग्रे यांना प्रचंड छळले तसेच तुळाजीने ही खंडणी मागण्यास आलेल्या पेशव्यांच्या वकीलांची नाकं कापली. या प्रकाराचा सूड घेताना पेशवे संधीची वाट पाहात होते. दरम्यान इंग्रज मनाजी आंगरे आणि पेशवे एकत्र आले. या अगोदर इंग्रजांची पेशव्यांशी २९ मार्च १७५५ रोजी तुळाजीशी चकमक झाली. या चकमकीत तुळाजी पळून गेला. पेशव्यांनी तुळाजीचे आरमार नष्ट केले. सुवर्णदुर्ग काबीज झाल्याने तुळाजीने विजयदुर्ग जवळ केला.

विजयदुर्गावरही इंग्रजांनी चढाई केली. येथूनही तुळाजी निसटला.

तो पेशव्याच्या आश्रयास गेला. नानासाहेब पेशव्यांनी आश्रिताला कैदेत टाकले. १७८७ साली यातच त्याचे निधन झाले. शिवाजी महाराजांनी अत्यंत चातुर्याने उभारलेले मराठ्याचे आरमार अत्यंत रसातळाला गेले ते असे. या अवनतीला नानासाहेब पेशवे जबाबदार असल्याच्या निष्कर्षाप्रत लेखक पोहोचले आहेत. हा आत्मघातकी प्रकार नानासाहेबांनी इंग्रजांची मदत घेऊन केल्याचे लेखकाने वारंवार नमूद केले आहे.

**रंगोबापूजी : १८०८-१८३९**

कुळवाडीभूषण शिवाजीराजे यांच्याशी स्वामीनिष्ठा जतन केलेले चांद्रसेनी कायस्थ प्रभूंचे पुढील वंशज रंगो बापूजी रोहिडखोरेकर-गुप्ते देशपांडे हेही महाराजांचे एक वंशज सातार्‍याचे महाराज प्रतापसिंह महाराज छत्रपतीशी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत विलायततेही स्वामीनिष्ठ राहिले. चौदा वर्षे लंडनला वास्तव्य करून पदच्युत सातारकर महाराज प्रतापसिंह यांच्यावरील अन्याय लंडनच्या पार्लमेंटसमोर मांडण्याचा खटाटोप त्यांनी केला. या प्रकल्पासाठी त्यांनी मोडीतून इ.स. १८४७ मध्ये २२५ पृष्ठांचे शिळामुद्रणात सी मूडी लंडन यांच्याकडून एक ग्रंथ छापून घेतला. लेखकाने या ग्रंथाचे बाह्यांग-अंतरंग आणि अंतरंगाचे सविस्तर वर्णन केले आहे. प्रस्तुत वर्णन प्रामुख्याने म्हणजे, रंगोजी बापूजी होय. (सत्यासाठी आत्माहूती देणारा मराठा राजपुरुष)

सातार्‍याच्या छत्रपती महाराजांचे एक वंशज प्रतापसिंह महाराज यांना शेवटचा बाजीराव अथवा दुसऱ्या बाजीरावांनी कैद केले. चतुर मुत्सद्दी व राजकारणी असलेल्या प्रतापसिंहानी इंग्रजांच्या सहकार्याने साताऱ्याची पुन्हा गादी काबीज केली. इ.स. १८२२ मध्ये त्यांना अधिकार बहाल करण्यात आले. मात्र पुढे नागपूरच्या पदच्युत भोसले यांस पत्रव्यवहार करणे. बंडासाठी फितवणे. गोव्याच्या गव्हर्नरांशी पत्रव्यवहार करणे आदि कारणावरून इंग्रजांनी राजद्रोहाच्या आरोपाखाली गुप्तपणे चौकशी करून ५ सप्टेंबर १८३९ पदच्युत करून काशीला हलविले. इ.स. १८१८ मध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्यानेही असेच पदच्युत करून ब्रह्मावर्तास इंग्रजांनी हलविले होते. मात्र १८१८ मध्ये पदच्युत केलेल्या बाजीरावास इंग्रजांनी सालीना आठ लाखांची पेन्शन देऊ केली, तर १९३९ साली पदच्युत केलेल्या प्रतापसिंहांना अवघी एक लाख वीस हजार पेन्शन दिली.

इंग्रजांची ही हातचलाखी बळवंतराव सेनापती, बळवंतराव चिटणीस आणि प्रतापसिंहाचे वकील रंगोबापूजींच्याही लक्षात आली. त्यांनी या अपमानाचा बदला घेण्यासाठी लंडनला प्रयाण केले.

यातच चांद्रसेनी कायस्थ प्रभूंचे वेदोक्त प्रकरण याप्रसंगी पुढे आले. तत्कालीन शंकराचार्यांनी प्रभूंना वेदोक्ताचे अधिकार दिले. प्रतापसिंहांनी प्रभूचा पक्ष घेतला. राज्य पदच्युतीस हे प्रकरण काहीसे कारणीभूत ठरले.

रामचंद्रबाबा सुखटणकर, रामदासपंत, चंगीजखान, अहिल्याबाई, खंडोबल्लाळ, नानक, अहमदशहा अबदाली, रामशास्त्री, भास्करराम, मुजफ्फरखान गारदी, तुळाजी आंगरे, रंगो बापूजी, इबराहीमखान गारदी व सखाराम हरि या सर्व चरित्रातील रामशास्त्री प्रभुणे, अहिल्याबाई, गुरुनानक देवजी, चंगीजखान फक्त वाचनात आलेली होती. बाकी सगळी चरित्रं अैकून जरी माहीत असली तरी तशी इतिहासात दुर्लक्षितच, त्यांच्यावर गो. स. सरदेसाई यांच्या मराठी रियासतीशिवाय पर्याय नव्हता. विनायक सदाशिव वाकसकरांनी या सर्व दुर्लक्षित उपेक्षित चरित्रावर पाठ्यपुस्तकाच्या शब्द मर्यादेमुळे संक्षिप्त का असेना लिहून या चरित्रांच्या कामगिरीला उजेडात आणण्याचा प्रयत्न केला. त्यावर गो. स. सरदेसाई यांच्या मराठी रियासतीच्या आधारे भर घालण्याचा हा चंचू प्रयत्न आहे. गुरुनानक आणि चंगीज खानाच्या सामग्रीचा मात्र मराठी साहित्यात दुष्काळ जाणवला. स्थानिक औरंगाबाद, नांदेड गुरुद्वाऱ्यात गुरुमुखी लिपित भरपूर साहित्य होतं. पण देवनागरीत चंडीगडहून सामग्री मिळवली. तिला साररुपाने संक्षिप्त परंतु भरपूर भर घालता आली याच खूप समाधान मला वाटलं.

अशाप्रकारे साहित्य शोधकार्यात रणवीरसिंग 'विकी' (चंडीगड) प्रा. पुष्पा गायकवाड, होमशिखा 'भक्ती', बाबा भांड, भाईसाहब खडकसिंगजी (गुरुद्वारा, औरंगाबाद) दिशा क्रीएशनचे कृष्णा कोल्हे यांच्या अक्षर विन्यास सेवेबद्दल ऋणनिर्देश करणे अगत्याचे आहे.

**– अरुण घोडे**
(गोषेगावकर)

# अनुक्रमणिका

## चरित्र


०१. रामचंद्र बाबा सुखटणकर २५
०२. रामदासपंत ३८
०३. चंगीजखान ४७
०४. अहल्याबाई ५२
०५. खंडो बल्लाळ ७०
०६. नानक ८०
०७. अहमदशहा अबदाली ९४
०८. रामशास्त्री ११४
०९. भास्करराम १२४
१०. मुजफरखान गारदी १३१
११. तुळाजी आंगरे १४३
१२. रंगो बापूजी १५५
१३. इबराहिमखान गारदी १८०
१४. सखाराम हरि १९४

# रामचंद्रबाबा सुखटणकर

मृत्यू ता. ४–१०–१७५४

***धृत्तराष्ट्रासि रुचेसी सांगे अत्युग्र नीति तो कणिक।***
***वणिक ग्राहकहस्तीं देतो विषसर्पिशर्कराकणिक।। मोरोपंत.***

पूर्व संकल्पानुसार आज श्री. रामचंद्रबाबा शेणवी या मुत्सद्याचे चरित्र वाचकांस सादर करावयाचे आहे. रामचंद्रबाबा हा सारस्वतजातीचा असून जुन्या कागदपत्रांतून यास 'रामचंद्रबाबा शेणवी' या संज्ञेने संबोधिलेले आहे. रामचंद्रबाबाचे सबंध नाव रामचंद्र मल्हार सुखटणकर असे आहे. हा मूळचा कोकणातील आरवली गावचा कुळकर्णी असून तेथचा राहणारा होता. परंतु कालमानानुसार नुसत्या कुळकर्णावर उदरनिर्वाह होईना म्हणून म्हणा, अगर मोठ्यामोठ्या राज्यांच्या घडामोडी करण्याचे बुद्धीत सामर्थ्य असल्याने, आरवलीसारख्या भिकार गावात कुळकर्णासारखा बुद्धिहीनतेचा धंदा करण्याचा साहजिकच कंटाळा आल्याने म्हणा, हा आपली जन्मभूमी सोडून साताऱ्यास आला. यावेळी शाहूमहाराज राज्य करीत

असून, बाळाजी विश्वनाथ हा त्यांचा पेशवा होता. राजगुरु कचेश्वरबाबा ओतुरकर हा त्यावेळी साताऱ्यास फार प्रसिद्ध असून त्याने रामचंद्रबाबास प्रथम आश्रय दिला. इतकेच नव्हें, पण बाळाजी विश्वनाथाशी त्याची ओळखही करुन दिली. कारण राजगुरुसारख्या इसमांस ही गोष्ट काही अशक्य नव्हती.

२. ज्याप्रमाणे जोमदार वेलीला ऊंच चढण्याला एखाद्या झाडाचा आधार लागत असतो, त्याचप्रमाणे हुषार व तरतरीत मनुष्यालाही पुढे येण्यास कोणी तरी कारणीभूत व्हावा लागतो. मनुष्य कितीही हुशार असला तरी त्याची हुशारी लक्षात घेऊन तिचे चीज करणारा जर कोणी नसला, तर तो मनुष्य मागेच राहतो. रामचंद्रबाबा साताऱ्यास आल्यावर कचेश्वरबाबाने त्यास हाताशी धरुन मुख्य प्रधान बाळाजी विश्वनाथाने हळूहळू त्याला एकापेक्षा एक अधिक महत्त्वाची कामे सांगण्यास प्रारंभ केला. अनेक भरवशाची कामे व राज्यकारभाराचे महत्त्वाचे प्रश्न जो जो रामचंद्रबाबा कुशलतेने पार पाडू लागला, तो तो त्याचे कर्तृत्व विशेषच दृग्गोचर होऊ लागले. बाजीरावाने माळवा प्रांत काबीज केल्यावर पेशवा, शिंदे, होळकर आणि पवार या चौघांमध्ये माळव्याची वाटणी समाधानकारक रीतीने करण्याचे काम फार बिकट होते. ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणे व प्रांत हस्तगत करण्यात गाजविलेल्या पराक्रमाप्रमाणे त्या प्रांताची वाटणी होणे इष्ट होते. हे चौघेही फौजबंद सरदार असल्यामुळे एकानेही नाखूष होता कामा नये अशाप्रकारची वाटणी रामचंद्रबाबाने मोठ्या कुशलतेने केली व चौघेही सरदार खूष झाले. ही वाटणी सन १७३४ च्या सुमारास झाली असावी.[1]

३. नानासाहेब, सदाशिवराव, रघुनाथराव इत्यादी प्रसिद्ध पुरुषांचे बाळपणींचे शिक्षण रामचंद्रबाबाच्या देखरेखीखाली झाले. बाजीरावाच्या पश्चात पेशवाईचा बोजा सहन करण्यास नानासाहेबांस जी हिंमत प्राप्त झाली होती, ती विशेषत: रामचंद्रबाबाचेच साहाय्यावर होय. पेशवाईची

---

*1. चिमाजी अप्पाची स्वारी १७३२ – उज्जैन, इंदूर, धार, देवास या ज्या मराठ्यांच्या राजधान्या हळूहळू निर्माण झाल्या, त्यांचा पहिला पाया दीपसिंग, जयसिंग या सरदारांनी मुख्यतः रामचंद्रबाबांच्या सल्ल्याने घातला.*

मराठी रियासत खंड 3, पान– 455

सुव्यवस्था लाविण्यास रामचंद्रबाबाचे साहाय्य नानासाहेबांस फारच झाले होते यात संशय नाही. शिंदे-होळकरांच्या पराक्रमाने मराठ्यांची सत्ता परमुलखात म्हणजे उत्तरेकडे दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालली, त्यामुळे तिकडील प्रांताची व्यवस्था लाविण्यास कोणातरी मुत्सद्याची जरुरी भासू लागली. यावेळी पेशव्यांनी रामचंद्रबाबास शिंद्याबरोबर पाठविले.[2]

बाजीरावापासनूच साधारणत: रामचंद्रबाबा लढाईत व मुलुखगिरीत हजर राहू लागला होता. लढाईचा परिणाम तहात होतो; व तहाच्यावेळी चाणाक्ष मुत्सद्दी जर तह ठरविण्यास नसले तर विजयी पक्षाचा पराक्रम व त्याची मनुष्यहानी पराजित पक्ष बुद्धीच्या जोरावर कवडीमोल ठरवित असतो; म्हणून तह ठरवितांना अत्यंत बुद्धिमान व दूरदर्शी माणसे दोन्ही पक्षाकडून पुढे येतात. बाबा जरी तलवारबहादूर नसला तरी बौद्धिक झगड्यात तो कोणासही हार जाणारा नव्हता, आणि म्हणूनच पेशवे त्यास मुलुखगिरीचे वेळी जवळ ठेवत असत. उत्तरेकडे कार्यक्षेत्र वाढू लागताच नानासाहेबाने बाबास राणोजी शिंद्याबरोबर तिकडे पाठविले व राणोजीच्या अखेरीपर्यंत तो शिंद्याकडे कारभारी या नात्याने होता.[3,4]

४. राणोजी शिंदे हा शूर, परंतु भोळा होता; मल्हाररावाप्रमाणे धूर्त नव्हता. त्यामुळे उत्तरेकडील कारभारात मल्हाररावाप्रमाणे राणोजी श्रीमंत न होता कफल्लकच राहिला; परंतु राणोजीचा कारभारी रामचंद्र मल्हार मात्र फारच श्रीमंत झाला. द्रव्याच्या बाबतीत मल्हारराव होळकर व रामचंद्र

---

*2. चैत्र वद्य ३० ता. २२ एप्रिल, सन १७३४ रोजी सूर्यग्रहणसमयी राणोजी सिंदे, रामचंद्रबाबा व मल्हारराव होळकर यांनी एकदम बूंदीवर हल्ला चढवून ते स्थल काबीज केले. बूंदीच्या राणीने मल्हाररावास बंधू मानून सत्कारपूर्वक त्यास राखी बांधीली. पण होळकरांची पाठ वळताच जयसिंगाने फौज पाठवून बूंदीचा ताबा घेतला आणि मराठ्यांचा प्रतिकार करण्याच्या हेतूने त्याने राजपूत संस्थानिकांचे ऐक्य घडवून आणण्यासाठी त्याचे एक बडे संमेलन भरविले तो प्रकार अन्यत्र सांगितला आहे. बूंदीचे प्रकरण पुष्कळ वर्षे चिघळत गेले. सन १७३६ च्या माघमासी बाजीराव जयसिंग यांची भेट झाली, तेव्हा मल्हाररावास बाजीरावाने भेटीस नेले नाही. दिल्लीच्या मोठ्या राजकारणाचा बिघाड होऊ नये, म्हणून बाजीरावाने होळकरास दूर ठेवून जयसिंगाचा संतोष राखिला.*
मराठी रियासत खंड 3, पान- 459

मल्हार आपसात समजत असत, व मुलुखगिरीच्या वेळी मल्हाररावाबरोबर राणोजी तलवार गाजवीत असे. याचा साहजिकच असा परिणाम झाला की, रामचंद्रबाबा लक्षावधी रुपयांचा धनी झाला इतकेच नव्हे, पण मल्हाररावाच्याच तंत्रांने शिंद्यांचा कारभार तो करु लागला. राणोजीच्या हयातीपर्यंत हा प्रकार चालू होता; परंतु राणोजीच्या पश्चात त्याचा मुलगा जयाप्पा यास हे रामचंद्रबाबाचे सांपत्तिक वर्चस्व सहन झाले नाही.

५. जयपूरचा राजा सवाई जयसिंग यास ईश्वरसिंग व माधवसिंग असे दोन मुलगे होते. या दोघां भावात जयपूरच्या गादी संबंधी तंटा लागला. तेव्हा पहिल्या प्रथम नानासाहेबांच्या आज्ञेप्रमाणे शिंदे-होळकरांनी ईश्वरसिंगास सहाय्य केले व त्यास जयपूरच्या गादीवर बसविले; परंतु पुढे काही दिवसांनी मल्हारराव होळकराने माधवसिंगास हाताशी धरुन

---

*3. पेशवे निकराने चालून येतात असे दिसताच राजपूत राजे वगैरे भयभीत झाले. ''प्रस्तुत महादेव भट हिंगणे राणाजीकडे आले होते. त्यांजबरोबर राजामल सहवर्तमान राणाजींनी पाच लाखांचा ऐवज पाठविला असे. प्रधानपंतांसही त्वरेने बोलाविले आहे. खानडौरांजवळ हुजूर दादोभीमसेन आहेत, राणोजी सिंदे व रामचंद्र बाबा यांचे मार्फतीने जाबसाल चालू आहेत. वीस लाख रुपये नक्त, चाळीस लक्षांची जागीर माळव्यात आणि भोपाळकरांचे मुलखात तनखा द्यावा असा तह बादशहापाशी जाला आहे.*

मराठी रियासत खंड 3, पान -477

*4. बाजीरावाच्या मृत्यूने उत्तरेत एक प्रकारची चलबिचल उडून माळवा बुंदेलखंडच्या सनदा पदरात पाडून घेण्याची निकड उत्पन्न झाली. नादिरशहाच्या स्वारीमुळे बादशहाच्या दरबारात नवीन प्रकार काय बनले आणि मराठ्यांचे उद्योग पुढे कोणत्या धोरणाने चालवावे याचा विचार ठरविण्याकरिता नानासाहेबांचे महादेवभट हिंगणे यास त्वरेने भेटीस बोलाविले. ता. २० ऑगस्ट रोजी हिंगणे नाशकास आला, नंतर पुण्यास येऊन त्याने पेशव्याची भेट घेतली.1 राणोजी सिंदे वसईच्या मोहिमेत दक्षिणेत आला तो इकडेच होता, पण त्याचा कारभारी रामचंद्रबाबा व होळकर यांसही नानासाहेबाने यावेळी दक्षिणेत बोलाविले. पिलाजी जाधव व आवजी कवडे हेही सरदार बुंदेलखंडातून परत आले.*

मराठी रियासत खंड 4, पान - 31

त्याचे तर्फेने ईश्वरसिंगावर चाल केली व त्यास इतका त्रास दिला की, अखेरीस ईश्वरसिंगाने मल्हाररावाच्या जाचास कंटाळून आत्महत्या केली.[5] या भानगडीत मल्हाररावास अर्थातच माधवसिंगाकडून पुष्कळच द्रव्यप्राप्ती झाली असली पाहिजे; हे मल्हाररावांचे कृत्य जयाप्पा शिंद्यास अगदीच आवडले नाही. त्याचे म्हणणे असे होते की, एकदा आपण जो पक्ष स्वीकारला तोच अखेरीपर्यंत धरून राहणे हे आपले कर्तव्य आहे. मल्हाररावांचे म्हणणे, जिकडून पैसा मिळेल तिकडेच मदत करावी, असे पडले. उत्तरेकडील सर्व कारभार नानासाहेब रामचंद्रबाबाच्या सल्ल्याने उरकीत असे; व या प्रकरणात नानासाहेबाने मल्हाररावास यत्किंचितही ठपका दिला नाही. इतकेच नव्हे तर त्याचेच करणे योग्य होते, असे पर्यायाने जयाप्पास दर्शविल्याने जयाप्पास रामचंद्रबाबाबद्दल वैषम्य वाटू लागले व हाच कलिपुरुष असून द्रव्यप्राप्तीसाठी असली अपमानकारक लफडी उत्पन्न करितो, अशी त्याची दृढ समजूत झाली. नानासाहेब पेशवा फार मोठा मुसद्दी होता हे खरे आहे, पण तो तितकाच द्रव्यलोभीही होता. द्रव्यासाठी तो वाटेल तेव्हा वाटेल त्याची कुमक करीत असे. वस्तुत: द्रव्यापेक्षा शब्दांची किंमत अधिक आहे; पण हे तत्त्व नानासाहेबाने पाळलेले दिसत नाही. किंबहुना थोरल्या माधवरावाशिवाय इतर कोणत्याच पेशव्यास आपल्या शब्दाची किंमत मुळीच वाटत नसे. रजपूत लोकांची मने मराठ्यांविषयी कलुषित होण्यास या असल्या अनिश्चित व धरसोडीच्या कारभारापासूनच प्रारंभ झाला, असे म्हणावयास हरकत नाही; व याच द्रव्यलालसेचा घोर परिणाम पानपतावर मराठ्यांच्या मदतीस एकही रजपूत

---

*5. जयसिंगाचे पश्चात ईश्वरसिंगाने गादी घेतल्याबरोबर मेवाडच्या जगत्सिंगाने फौज जमवून माधवसिंगासह जयपूरकडे चाल केली. तिकडून ईश्वरसिंगही चालून आला. सन १७४३ चे अखेरीस दीड महिना उभय दले जहाजपुरजवळ सामना करून होती. काही काळ परस्पर वाटाघाटी चालल्या, त्यात ईश्वरसिंगाने काही जास्त प्रदेश माधवसिंगास दिला. तेवढ्याने त्याचे समाधान न होता तो अर्धे राज्य मागू लागला. ता. १ मार्च १७४७ रोजी लढाईस तोंड लागून दोन दिवस भयंकर संग्राम झाला. ''ईश्वरसिंगाची फत्ते झाली. माधवसिंगाकडील पुष्कळ लूट यात आली. राणोजीची फौज पळाली. उभयपक्षी बहुत लोक मारले गेले.''*

मराठी रियासत खंड – 4, पान –130

राजा आला नाही असा झाला.

६. रामचंद्रबाबाने पुण्यास एक विस्तृत जागा खरेदी करून तेथे सात मजली वाडा बांधिला. हा वाडा पुढे स. १७६३ मध्ये इतर वाड्यांबरोबर आग लागून जळाला. बाबाने उत्तर हिंदुस्थानात कित्येक देवस्थाने व घाटही बांधले. याशिवाय दानधर्मही अतोनात केला. बाबाचा हा एकंदर बडेजाव जयाप्पास सहन झाला नाही व ही एवढी संपत्ति बाबाने अन्यायानेच मिळवली असली पाहिजे, अशी त्याची खात्री होऊन त्याने आपल्या कारभारांतून बाबास मोठ्या प्रयासाने पेशव्यांकडून दूर करविले. शिंद्याच्या कारभारांतून बाबास काढू नये, असे मल्हाररावाने परोपरीने पेशव्यास कळविले, पण मल्हारराव जो जो आग्रह करी तो तो जयाप्पास बाबाच्या सचोटीबद्दल अधिकाधिक संशय येऊ लागला व त्याने हट्टास पेटून अखेरीस बाबास आपल्या कारभारातून दूर केले. जयाप्पाचे हे कृत्य मल्हारराव होळकरास मुळीच रुचले नाही व शिंदे होळकरांच्या वैरांत बाबाच्या बडतर्फीने एक नवीनच अधिक भर पडली. परंतु याबद्दल नातू आपल्या महादजीच्या चरित्रात पृष्ठ २० वर असे म्हणतात. ''जयाप्पाचे कारकीर्दीत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे रामचंद्रबाबा शेणवी यास शिंद्याचे दिवाणगिरीवरून पेशव्याने दूर केले ही होय. हा गृहस्थ जयाप्पास आवडत नव्हता व त्याला दूर करावे अशी मल्हारराव होळकराचीही मसलत पडल्यावरून पेशव्याने त्यास दूर केले. याला बाजीरावाने राणोजीपाशी नेमिले होते. रामचंद्रबाबाने पेशव्याचा चुलतभाऊ सदाशिवराव याला पुढे करून लाखो रुपये नजर देऊन आपले पद पुन: मिळविण्याविषयी खटपट केली; परंतु ती व्यर्थ झाल्यामुळे अभिमानास पेटून सदाशिवरावाने बाबास आपला दिवाण नेमिले, ही गोष्ट जरी वस्तुत: महत्त्वाची नव्हती तरी पुढे पेशव्याचे घरात जे बखेडे झाले व मल्हारराव व सदाशिवराव यांचे जे वैमनस्य पडले ते या बाबाच्या कारणामुळे पडले. रामचंद्रबाबा हा मोठा कारस्थानी कारकून होता.'' असो. [6]

७. रामचंद्रबाबासारख्या कर्त्या पुरुषास नुसते बसून राहून कसे चैन पडणार! त्याने थोडक्याच दिवसात सदाशिवरावभाऊस वश करून घेतले, व त्याचे मार्फतीने पेशव्यास द्रव्याची मदत करून तो पुन: पेशव्यांच्या कारभारात शिरला. याच सुमाराला नानासाहेब व भाऊसाहेब यांच्यात

काही घरगुती कारणांमुळे गैरसमज उत्पन्न झालेला होता, या गैरसमजाचा फायदा घेऊन रामचंद्रबाबाने भाऊसाहेबास कोल्हापूरची पेशवेगिरी मिळवून देण्याची खटपट केली. ही हकीकत नानासाहेबास कळताच तो मोठ्या विचारात पडला; परंतु लवकरच त्याने आपला कारभारी महादोबा पुरंदरे यास युक्तीने घरी बसवून त्याचे काम भाऊसाहेबास सोपिले. महादेवानेही पेशव्यांच्या घरात फूट पडू नये, म्हणून आनंदाने घरी बसण्याचे कबूल केले.[7]

८. रामराजाचे कारकीर्दीत बहुतेक सरदार डोईजड झाले होते; कारण

---

*6. रामचंद्रबावा सदाशिवरावास हाती घेऊन कारभार उरकू लागला, त्यात सांगोल्याचे प्रकरणी सदाशिवरावाचे वजन वाढले. चऱ्होलीच्या माळावर पेशवा व उमाबाई यांच्या भेटी झाल्या त्यावेळी हे वैयक्तिक हेवेदावे व्यक्त होऊ लागले. निमी गुजरात आपली ही पेशव्यांची भावना अवलपासून होती, तिला उमाबाई कबूल होईना, तेव्हा महादोबाने पेशव्यास समजाविले, काही मोठी रोख रक्कम घेऊन तुम्ही गुजरातची वाटणी सोडून द्या. ही गोष्ट पेशव्याने मानली नाही, म्हणूनच पुढे दाभाडे-गायकवाड प्रकरण चिडीस गेले आणि ताराबाईंच्या विरोधास जोर आला.*

मराठी रियासत खंड - 4, पान -251

*7.निजामाची भेट आटोपून पेशवा लगोलग पुढे सवाई जयसिंगाचे भेटीस गेला. ता. ७ मार्च रोजी नर्मदापार होऊन सिंदे-होळकरांसह माळवा बुंदेलखंडांतून चालला असता नारोशंकर लिहितो, ''सांप्रत-आम्ही यजमानासमागमें माळवे प्रांतास आलो. आप्पांची वार्ता ऐकोन इकडील सरदारांच्या नजरा विच्छिन्न झाल्या. आम्ही लोक परम निराश्रित झालो. प्रस्तुत नानासाहेबांचे पायांशी आमचा दंडक नाही, याजकरिता चित्त उद्विग्न आहे. उभयता श्रीमंत असते तरी आमचा गौरव करते. राणोजी सिंदे, रामचंद्र बावा व मल्हारबा यांसी आमचेविशी शिफारसपत्रे पाठवावी. खामसा उपराळा करून श्रीमंताकडून पदरी घेवविणे.'' यावरून सरदारांची आपसात दांडगाई वाढत चाललेली पेशव्याच्या नजरेस आली, ती त्याने दक्षतेने तात्काळ मिटवून बुंदेलखंडचा कारभार नारोशंकरासच सांगितला; आणि सर्व व्यवहारांवर नजर ठेवीत तो पुढील उद्योगास लागला.*

मराठी रियासत खंड -4, पान 42

रामराजांत कर्तृत्व येताचेच हाते; त्याची आजी ताराबाई निष्कारण राज्यकारभारात ढवळाढवळ करून पेशव्यास त्रास देत होती. सरदारांनी आपल्याच तंत्राने वागावे व रामराजास अगर पेशव्यास त्यांनी मुळीच मानू नये, अशी तिची सरदारास फूस व शिकवणी असे, असे म्हणतात. अशा डोईजड सरदारापैकीच प्रतिनिधी हा होता. प्रतिनिधीचा कारभारी यमाजी शिवदेव या नावाचा एक कारस्थानी पुरुष होता. पेशव्याने हळूहळू सर्व सरदारांची रग जिरवली. या प्रतिनिधीची मस्ती जिरविण्यासाठी सदाशिवरावभाऊ व रामचंद्रबाबा रामराजास बरोबर घेऊन पेशव्यांचे संमतीनेच निघाले. यांनी प्रतिनिधीच्या सांगोले नामक ठाण्यावर चाल केली व यमाजी शिवदेवास हतवीर्य करून सांगोले आपल्या कब्जात घेतले. यामुळे प्रतिनिधी शरण आला व रामचंद्रबाबा आणि सदाशिवरावभाऊ यांनी रामराजाच्या संमतीने तेथेच म्हणजे सांगोल्यासच राज्याची काही व्यवस्था ठरविली. ही व्यवस्था ठरवितांना नानासाहेब तेथे नव्हता. बहुधा त्याच्या सल्ल्यावाचूनच ही व्यवस्था ठरवली गेली असावी. सातारच्या राज्याची व्यवस्था सांगोल्यासच ठरविण्याचे कारण असे होते की, साताऱ्यास अशी व्यवस्था ठरविल्यास मुख्य अडथळा ताराबाईकडूनच झाला असता. सांगोल्यास ताराबाई मुळीच नसल्याने ही तिची अडचण तेथे नव्हती. शिवाय जी नवीन व्यवस्था ठरविली तिच्यायोगे निम्मी गुजराथ पेशव्यास मिळावयाची असून इतरही बाबतीत त्याचा बराच फायदा होणार होता. परंतु काहीही असले, तरी हा आपणास न विचारितां परभारेच झालेला प्रकार नानासाहेबास मुळीच रुचला नाही;[8] व याप्रकाराचे मुळाशी बाबाचाच वरचढपणा असला पाहिजे, असे त्यांच्या मनाने घेतले. [9]

---

*8. पुढे रामराजाचे कारकीर्दीत छत्रपतीची मुखत्यारी नाहीशी झाल्यावर मुतालिकाचेही प्रयोजन राहिले नाही, फक्त कारभाऱ्याची जरूर राहिली. नानासाहेबाचे कारभारी येणेप्रमाणे झाले. सन १७४०-५० महादजी पुरंदरे; १७५०-५३ रामचंद्र बाबा व सदाशिवराव; १७५०-६० सदाशिवराव; १७६०-६१ नीलकंठ म. पुरंदरे. पेशवाईची वस्त्रे दिल्यावर शाहूने नवीन पेशव्यास मुकासे गाव एकंदर ३० बाहेर ठिकठिकाणी नेमून दिले. हे गाव निरनिराळ्या सरदारांच्या ताब्यातले होते.*

मराठी रियासत खंड -4, पान- 22

९. रामचंद्रबाबाने सदाशिवरावास छत्तीस लक्ष रुपये नजर म्हणा, भेट म्हणा, अगर लाच म्हणा दिले; परंतु पुढे पेशव्यास त्याचेपासून द्रव्यप्राप्ती मुळीच होईना. द्रव्यप्राप्तीची साधने मात्र तो पेशव्यास अचूक दाखवित असे.[10] पुण्यातील सरदारांवर पट्टी बसवून रक्कम वसूल करावी, अशीही एक प्राप्ती किंवा अधिक नफ्यावर करासारखी युक्ति बाबाने पेशव्यास सुचविली होती. सारांश, दुसऱ्यापासून पैसे कसे वसूल करावेत, हे पेशवे बाबापासूनच शिकले; परंतु यायोगे त्यांचा फार बदलौकिक झाला.[11]

---

*9. खुद्द पेशव्याने ता. २० सप्टेंबर रोजी रामचंद्रबावास कळविले, ''या प्रांतींच्या मामलतदारांकडून कोणाचा ऐवज कसा उगवला, पुढे कोणापासून काय रसद घेतली पाहिजे, त्याचा आजमास आषाढापासून मागितला असता दसरा समीप आला तरी हिशेब आला नाही. तरी ताबडतोब पाठविणे. फौजेचा खर्चा तुम्ही जाणतच आहात. बाबूजी नाईक पेशव्याचा विरोधी असून रघूजीच्या तंत्राने चाले. पेशवा माळवा बुंदेलखंडांत गेलेला पाहून सन १७४२ च्या उन्हाळ्यात बाबूजी नाईकाने गुजरातेत जाऊन दमाजी गायकवाडास सामील करून रघूजीस साह्य करण्यासाठी गुजरातेतून माळव्यावर चाल केली. अशा रीतीने हे त्रिकूट पेशव्यास पायबंद देण्यास उद्युक्त झाले. पेशवा सावध होता. पवार व होळकर यांस पाठवून त्याने दमाजीस माळव्यांत उतरू दिले नाही; आणि ही आगळीक शाहूच्या कानावर घातली.*

मराठी रियासत खंड -4, पान -62

*10. कर्जाचा जाच व राण्यांच्या भानगडी अशा स्थितीत एकटा नानासाहेबच काय तो शाहूचा आधार होता. निदान नानाच एकटा हरएक प्रसंग निभावून नेणारा आहे, दुसरा तसा इसम आपले जवळ नाही, अशी शाहूची त्यावेळी पूर्ण भावना झाली होती. वरील पत्रानंतर दोन महिन्यांनी दुसरे पत्र नानासा.ने रामचंद्रबाबास लिहिले. स. १७४६ ता. २५ नोव्हेंबर रोजी श्रीपतराव प्रतिनिधी सातार्‍यास मरण पावला. त्याजवर शाहूचा लोभ विशेष होता आणि आपला जुना व फार दिवसांचा घरोब्याचा सोबती गेल्यामुळे शाहूस पराकाष्ठेचे दुःख होऊन आपलीही आता इहलोकची यात्रा संपली असे वाटू लागले. प्रतिनिधीची स्त्री राधाबाई परमपतिव्रता होती, तिने सहगमन केले.*

मराठी रियासत खंड -4, पान -143

रजपुतान्यातील मराठ्यांची अब्रू या पैशामुळेच कवडीमोल झाली व इतरही अनेक ठिकाणी मराठ्यांस उघडपणे ''द्रव्यलोभी'' हे विशेषण मिळू लागले. [12]

१०. रामचंद्रबाबास पेशव्याने लवकरच कारभारातून दूर केले, कारण पेशव्यास अशी भीती पडली की, हा सदाशिवरावास हाताशी धरून आपले वजन कारभारातून नाहीसे करील. शिवाय आता बाबाकडून द्रव्यप्राप्तीचीही आशा उरली नव्हती. बाबाने पेशव्यांचा कारभार सुमारे तीन वर्षे केला असावा. कारभारातून कमी झाल्यावर बाबा घरीच बसला होता.[13] रामचंद्रबाबा याने काही तीर्थाटणेही केली असावीत असे वाटते. पंढरपूराहून तो पुण्यास आला व नवज्वराचे आजाराने आजारी झाला. पहिले तीन-चार दिवस आजारात तो सावध होता, पण पुढे बेशुद्ध झाला; व आजाराच्या सातवे दिवशी म्हणजे तारीख ४ ऑक्टोबर १७५४

---

*11. सांगोतल्यावर दसऱ्याचे सीमोल्लंघन ता. २९ सप्टेंबर स. १७५० रोजी मोठ्या थाटाचे झाले. राज्यकारभाराचा बंदोबस्त, पदे, मुलूख महालदेखील सदाशिव चिमणाजी यांनी रामचंद्रबावा व गोविंदराव चिटणीस यांचे विचारे कायम केला आणि रामराजाच्या आज्ञेने सर्वत्र हुकूम सोडले, यामुळे सदाशिवरावासंबंधाने पेशव्याचे मनात थोडेसे वैषम्य उत्पन्न झाले. रामचंद्रबावा व महादोबा पुरंदरे यांच्यात तेढ होती, सदाशिवरावाने संभाजीचे पेशवेपद आपणास मिळेल अशी खटपट केली. महादोबा पुरंदरे काही काळ पेशव्याशी रुसून काम सोडून घरी बसला.*

मराठी रियासत खंड -4, पान -250

*12. रामचंद्रबाबा व गंगोबातात्या बुंदेलखंडात होते त्यास खुद्द काशीबाई लिहिते, ''मला संकट पडले आहे, माझ्या चित्तात काशीत दोनचार महिने राहावे, परंतु हे उभयंता मला बळेच ओढून काढितात. तरी माझे जाणे काशीस होय ते गोष्ट करणे.'' कृष्णराव चासकर पेशव्यास लिहितो, ''मातु:श्रीताईचें शरीर बहुत सूक्ष्म जाले आहे.'' शेवटी ता. २८ मार्च, स. १७४७ चे काशीबाईचे पत्र सिरोजहून आले. त्यात मजकूर, ''उदईक स्वार होऊन नर्मदातीरी येतो.'' ''मातु:श्रीस पायाच्या व्यथेने बरे वाटत नाही,'' असा मजकूर दुसऱ्या पत्रात आहे. ही पायाची व्यथा फार दिवस चालली. पुष्कळ ठिकाणचे वैद्यही बोलावण्यात आले. ही बाई ता. १८ आक्टोबर, सन १७५३ रोजी सासवेच्या पश्चात सहा महिन्यांनी पुण्यास मृत्यू पावली. असा या काशीताईच्या यात्रेचा प्रपंच अनेक पत्रांत विखुरलेला आढळतो.*

मराठी रियासत खंड - 4, पान -102

रोजी रात्री सुमारे १० वाजता मृत्यू पावला. त्याची पत्नी द्वारकाबाई हिने सहगमन केले. बायास औरस संतती नव्हती. त्याने एक मुलगा मांडीवर घेतला होता, तोच सदाशिव रामचंद्र होय. यासच मत्स्याहारी म्हणून पत्रांतून संबोधिले आहे.

११. कोणताही राज्यकारभार अत्यंत यशस्वी होण्यास त्यातील जमाखर्चावर योग्य देखरेख ठेवण्याची चोख व्यवस्था असावी लागते. नानासाहेब पेशव्याचा कारभार जो इतका सुव्यवस्थित झाला त्याला मुख्य कारण त्याच्या राज्यांत आयव्ययावर फार चांगली देखरेख होती हे होय.[14] ही जमाखर्चाची पद्धती नानासाहेबाच्या कारकीर्दीत प्रथम स. १७५० मध्ये उत्पन्न झाली असून, तिचा मुख्य उत्पादक रामचंद्रबाबाच होय. या रामचंद्रबाबाजवळच पुढे सदाशिवराव भाऊ, महादोबा पुरंदरे, नाना पुरंदरे

---

*13. कितीतरी माणसे पेशव्यांनी उत्तरेच्या कामगिरीत ठेविली, पण संधी सापडताच रामचंद्रबावाचे कल्पक डोकेच मुख्यत: कामास आले. तो समंजस, गमखाऊ व हिशेबी मनुष्य होता. दूरदृष्टी पोचवून व अंती नफानुकसान कशात आहे हे अचूक ओळखून सर्वांकडून सामोपचारांनी त्याने कामे करविली आणि मराठ्यांच्या अंमलास दृढता आणिली. जो प्रकार त्याने उत्तरेत निर्माण केला, तोच पुढे पुण्याच्या कारभारात त्याने सिद्ध करून नानासाहेब व भाऊसाहेब यांच्या द्वारा अनेक राज्योपयोगी गोष्टी सिद्धीस नेल्या. त्याच्याच तोडीचा होळकराजवळ पेशव्यांनी नेमलेला कारभारी गंगाधर यशवंत होय. पण रामचंद्रबावाची सर गंगाधर यशवंतास आली नाही. मात्र गंगाधर यशवंताच्या ठिकाणी रणांगणावरील युद्धचातुर्य होते ते रामचंद्रबावास नव्हते. दोघेही पेशव्यांनी नेमून दिलेले कारभारी म्हणजे एक प्रकारे ते पेशव्याच्या हातातले लगाम होत. सरदार स्वार्थाचे किंवा हेकटपणाचे पायी कार्यनाश करू लागते तर त्यांस आळा घालून मर्यादेत ठेवण्याचे काम हे पेशव्यांनी नेमलेले कारभारी करीत. रामचंद्रबावाचाच शिष्य सखाराम बापू म्हणता येईल. सखाराम बापू म्हणजे रघुनाथराव घातलेला लगाम. रामचंद्रबावाचा दुसरा चेला भाऊसाहेब. राणोजी व रामचंद्रबावा यांचं प्रेम व सख्य होते, ते पुढे जयाप्पाच्या वेळी बिघडले आणि कार्यनाश होतोसे वाटताच पेशव्याने उभयंतास पुण्यास बोलावून त्यांची समजूत घातली.*

मराठी रियासत खंड – 4, पान– 90

इत्यादी माणसे तयारी झाली. यापुढील पिढी सखाराम बापू, रामाजी अनंत, गंगाधर यशवंत, नाना फडणवीस ही होय. या मंडळींनीसुद्धा रामचंद्रबाबाचाच कित्ता गिरविला होता. फड म्हणजे हिशेबी कचेरी, ही कचेरी पुण्यास असून तिचा जो मुख्य तो फडणवीस होय. नानास आपल्या बापाचा दरख मिळाला असून, तो सदाशिवरावाजवळ हिशेबाचे काम शिकला. सर्व हिशेबाचे एकीकरण पुण्यास होत असे व इतर ठिकाणी कारकुनी पेशाचे लोक याच फडातून पुरविले जात. नाना फडणविसास मुत्सद्दी म्हणण्यापेक्षा उत्तम कारकून म्हणणे वस्तुस्थितीला अधिक धरून होईल. असो. सारांश, फडणिशीची मुख्य स्थापना पेशवाईमध्ये रामचंद्रबाबानेच केली.

---

*14. त्यात प्रतिस्पर्ध्यांनी भर घातली आणि निदान काही दिवस बाळाजीस बाजूस ठेवून दुसऱ्या कोणाकडून कारभारात जास्त सुधारणा होते की काय, हा प्रयोग शाहूने एक वार करून पाहिला. त्याने रघूजी भोसल्यास साताऱ्यास बोलावून आणिले, पण रघूजीने राज्य सांभाळण्याचे नाकारल्याने शाहूने पुन: नानासाहेबास रूजू केले. या एकंदर भानगडीत बाळाजीचे दोन तीन महिने मोठ्या विवंचनेत फुकट गेले. शाहूची व त्याची भेट होत नव्हती आणि दुसरी काही व्यवस्थाही अंमलात येईना, अशा संदिग्धावस्थेत व फिकीरीत नानासाहेबाचे काही दिवस गेले. 'दरबारचा मजकूर तर का कालपर्यंत आमचा उलगडा झाला नाही. मोठा बखेडा थोरले महालाचा आहे. तो गुंता कळेल त्या रीतीने उरकावा या प्रयत्नात आहो. प्रसंग अनिवार फार, यास्तव गुंता आहे,' असे पेशवा रामचंद्रबाबास लिहितो. मुख्य बाबत शाहूच्या कर्जाची होती. आपण कर्जमुक्त होऊन मग मरावे, दुसऱ्याचे ऋणात राहिल्यास पुढील जन्मी यातना होतात अशी शाहूची भावना होती. बाळाजीने उत्तर हिंदुस्थानात वगैरे स्वाऱ्या करून पैसा जमविण्याची शिकस्त केली पण कर्ज वारण्याइतकी निपज झाली नाही. या कर्जाशी दोन्ही राण्यांचाही संबंध असावा आणि पेशव्याच्या हातून कर्ज वारत नाही, उगाच वायदे करून व पोकळ गप्पा सांगून पेशवा वेळ मारून नेत आहे, अशी दोन्ही राण्यांनी शाहूची समजूत करून दिली. आपला काळ समीप येत चालला, सावकार दाराशी धरणे धरून बसले, आता पुढे निभाव कसा लागणार, याची विवंचना शाहूस लागली.*

मराठी रियासत खंड -4, पान- 152

१२. रामचंद्रबाबा सक्तीच्या खुषीने राज्यकारभारातून निवृत्त झाल्यावर वारंवार पंढरपुरास जात असावा असे दिसते. मरणापूर्वीही तो असाच पंढरपुरास गेल्याचे वर आलेच आहे. तेथे बाबाच्या नोकराची व एका गृहस्थाची काही कारणाने बाचाबाची झाली तेव्हा त्या गृहस्थाने नोकराच्या तोंडावर बाबासही शिव्यागाळी केल्या असे बाबास समजताच बाबाने संतापून माणसे जमवून त्यांच्याकडून त्या गृहस्थास चांगला चोप देवविला. यावरून बाबाच्या तापट स्वभावाबरोबरच आपल्या चाकरमाणसांविषयीही प्रखर अभिमान बाळगण्याचा स्वभाव देखील दृग्गोचर होतो.

१३. रामचंद्र मल्हार हा आरंभी य:कश्चित एक कुळकर्णी असून स्वत:च्या कर्तृत्वाच्या जोरावर पेशवाईची व्यवस्था बघण्यास समर्थ झाला. हा त्याच्या बुद्धीचा तर प्रभाव खराच, पण त्यावेळच्या स्वराज्याचाही हा परिणाम होय. स्वराज्यामध्ये बुद्धिमान व कर्तृत्वशाली माणसे हटकून जशी पुढे येतात तसा प्रकार पारतंत्र्यात होणे शक्य नसते, हे लक्षात ठेविले पाहिजे. याप्रमाणे रामचंद्रबाबाचे हे अल्प चरित्र वाचकास सादर केले आहे.

# २.रामदासपंत

**मृत्यू ता. ७-४-१७५२**

***सत्यानृताचच परुषा प्रियवादिनीच***
***हिंस्त्रा दयालुरपि चार्थपरा वदान्या।***
***नित्यव्यया प्रचुरनित्यधनागमाचच***
***वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा।।*** *भर्तृहरि.*

अठराव्या शतकामध्ये दोन शक्ती एकमेकाविरुद्ध प्रयत्न करीत होत्या. दोन्ही शक्ती काही कालापर्यंत तुल्य बलाच्या व तुल्य कर्तृत्वाच्या होत्या. पण पुढे कालवशात एकीचा जोर दुसरीपेक्षा अधिक होऊन दुसरी हतप्रभ झाली व नामशेष होण्याच्या पंथाला लागली. या दोन शक्ती म्हणजे एक मराठे व दुसरी निजाम ह्या होत. शाहूकालीन निजाम म्हणजे कमरुद्दीनखान हा होय. याचा जन्म तारीख ११-८-१६७१ रोजी झाला असून, तारीख २१-५-१७४८ रोजी हा आपल्या वयाच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी मरण पावला. सतत अनेक पिढ्या पराक्रमी निघाल्याची जी थोडी उदाहरणे हिंदुस्थानात आहेत, त्यापैकी निजामांचे एक होय. हा निजाम फार मोठा मुत्सद्दी व पराक्रमीही होता. औरंगजेबानेच हे घराणे पुढे आणले, असे

म्हणण्यास हरकत नाही.

२. पहिला बाजीराव एवढा पराक्रमी असून व त्याने निजामाला दांती तृण धरावयास लाविले असून निजामशाही त्याने का बुडवून टाकली नाही, असा एक प्रश्न वारंवार विचारण्यात येतो. बाजीरावाने मनात आणले असते तर खरोखरच निजामशाही त्याने बुडविली असती, अशी कित्येकांची समजूत आहे हीच मुळी चुकीची आहे. एकादे राज्य जिंकणे ही गोष्ट ते राज्य नामशेष करणे या गोष्टीहून फार भिन्न आहे. निजामाचा पाठीराखा दिल्लीचा बादशहा असून तो शाहूच्या वेळी पुष्कळच बलिष्ठ होता. बाजीराव कितीही पराक्रमी असला तरी दिल्लीच्या बादशहाशीं सामना करण्याची काही त्याची तयारी नव्हती. शिवाय आपल्याला वाटते तेवढा बाजीराव स्वतंत्रही नव्हता. त्याला शाहूच्या तंत्राने सर्वस्वी चालावे लागे. बाजीराव हा शूर होता, मुत्सद्दी नव्हता म्हणून त्याला ब्रह्मेंद्रासारखी काही संधानेही ठेवावी लागत. बाजीराव नेहमीच कर्जबाजारी असे. 'आपण कर्जाने गांजलो आहोत, मृत्यू येईल तर बरे होईल' इत्यादी वाक्ये त्याच्या पत्रव्यवहारात इतस्तत: वापरलेली दिसतात. शिवाय शाहूचा विश्वासही बाजीरावावर बेताचाच होता. त्यामुळे कोणतेही काम त्याला स्वत:च्या जबाबदारीवर उरकणे शक्य नव्हते आणि म्हणून बाजीरावाने निजामाला नेस्तनाबूद करणे शक्य नव्हते, हे आपण विसरता कामा नये.

३. आता यावर असा प्रश्न उत्पन्न होईल की, शाहूने तरी निजामाची ब्याद दक्षिणेत का राहू दिली? ही जळत शेगडी छातीवर ठेवण्याचा शाहूचा तरी काय शहाणपणा होता? होय, यात शाहूचा शहाणपणा नव्हता. परंतु शाहू दक्षिणेत आल्यावर बरीच वर्षे इकडेस मराठी साम्राज्याच्या अधिपत्याबद्दल यादवी माजून राहिली होती आणि तिचा बीमोड करण्यातच शाहूला सर्वस्वी आपले बळ खर्च करणे अपरिहार्य होते. शिवाय शाहू झाला तरी त्यालासुद्धा औरंगजेबाच्या पश्चातही बादशाही फौजेशी झुंजण्याचे सामर्थ्य नव्हते आणि शाहूला बादशाहीबद्दल आपलेपणा वाटत असे. कारण औरंगजेबाच्या सन्निध शाहूने आपले वीस वर्षाचे आयुष्य घालविले होते व तो दक्षिणेस परत आल्यावरसुद्धा आपण बादशहाचे मांडलिक आहोत, आपण स्वतंत्र राजे नाही, या गोष्टीची त्याला पूर्ण जाणीव असे व दिल्लीच्या बादशाहीबद्दल त्याला एक प्रकारचा

अभिमान वाटत असे. अर्थात शिवाजीची महाराष्ट्र राज्यसंस्थापनेची भावना शाहूच्या ठिकाणी नव्हती. दिल्लीहून येताना शाहूने ज्या झेबुन्निसा बेगमने त्याचा प्रतिपाळ केला तिच्या स्मरणार्थ म्हणून मुसलमानी खतीब व पंजे साताऱ्यास आणले होते व त्यांचा तो कच्चा खर्च चालवी. तात्पर्य, मराठे लोक हे मोगलाप्रमाणे नसून स्वभावतःच कृतज्ञ असल्याने शाहूच्या ठिकाणी त्यांच्या बादशाहीबद्दल पूर्णपणे आदर वसत असे. अशा दिल्लीच्या पादशाहीचा प्रतिनिधी म्हणून निजाम दक्षिणेत वावरत होता. सारांश बाजीरावाने व शाहूनेही निजामशाही न बुडविण्याची कारणे याप्रमाणे असून ती विचारणीयही आहेत.

४. शाहूच्या पश्चात मराठ्यांची सर्व सत्ता नानासाहेब पेशव्याच्या हातात आली व बाजीरावाच्या वेळची अनेक अर्धवट रखडत पडलेली प्रकरणे त्याने भराभर निकालास लावली. त्या अनेक प्रकरणापैकीच निजामाचे एक प्रकरण होय. जेव्हा निजामाचे प्रकरण नानासाहेबाने हातात घेतले तेव्हा निजामशाहीत एक विलक्षण मनुष्य कारभारावर होता. तोच रामदासपंत होय. नानासाहेबासारख्या चाणाक्ष व राजकारणकुशल मत्सुद्दी सुद्धा या रामदासपंताने कित्येक दिवस नुसत्या थापावर झुलविले. यावरुनच त्याच्या धूर्ततेची परीक्षा होते. या रामदासपंताचे चरित्र आता सांगावयाचे आहे.

५. रामदासपंत हा शिकाकोलचा ब्राह्मण असून प्रथम नासिरजंगाजवळ नोकरीत होता. नासिरजंगाने कर्नाटकावर जेव्हा चाल केली, तेव्हा रामदासपंत त्याचे बरोबर होता. नासिरजंगाची तयारी पाहून फ्रेंचांचा मुख्य जो डुप्ले तो घाबरला. त्याने पाश्चात्य पद्धतीप्रमाणे नासिरजंगाला एकदम नाहीसे करुन टाकण्याचा घाट घातला, पौरस्त्य पद्धतीप्रमाणे हा रामदासपंत डुप्लेच्या त्या कारस्थानास सामील झाला. असो. याप्रमाणे हा नासिरजंग नाहीसा झाल्यावर डुप्लेने या विश्वासघातकी रामदासपंतास मुज्जफरजंगाची

---

*1. निजाम हयात असताच सन १७४७ आरंभी नासिरजंग व रामदासपंत पेशव्याचे मुलखावर चालून आले.* (मराठी रियासत खंड -4, पान-303)

*2. उलट पक्षी सलाबतजंगाचे आसन स्थिर करण्याची निवड बूसीला होती, तेव्हा त्याने व रामदासपंतान सतरा लाख भरून पेशव्यांची समजूत काढली.*

मराठी रियासत खंड -4, पान - 311

दिवाणगिरी देऊन 'राजा रघुनाथदास' ही पदवीही दिली. रामदासपंताची पूर्वपीठिका याप्रमाणे आहे. बी.ए. ची परीक्षा पास झाल्यावर ज्याप्रमाणे मनुष्य एकदा प्रसिद्ध झाला म्हणजे त्याचे पूर्वचरित्र मुद्दामच लोक विसरुन जातात. किंबहुना लोकांनी असे पूर्वचरित्र विसरुन जावे म्हणूनच 'नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ, कोणी शोधू नये,' अशी म्हण प्रचारात आली असावी.

६. शाहूच्या मृत्यूनंतर जी स्थिती मराठशाहीची झाली, तीच स्थिती निजामाच्या मृत्यूनंतर निजामशाहीची झाली. मराठशाहीवर कर्तृत्वशून्य असा रामराजा आला, तरी सर्व सत्ता नानासाहेबांकडेस असल्याने तिचा बोजवारा उडाला नाही. निजामशाहीत नानासाहेबासारखा कर्ता पुरुष कोणीही पुढे न आल्यने फ्रेंचांना आपला हात निजामशाहीत शिरकविण्याची उत्तम संधी प्राप्त झाली. शाहूच्या मरणानंतर नानासाहेबाने मराठशाहीचा पुढाकार घेतला नसता तर त्याचवेळी परकीयांचा हात मराठ्यांच्या राज्यकारभारात शिरला असता, असे म्हणण्यास हरकत वाटत नाही.

७. निजामाच्या राज्यात फ्रेंचांचा बूसी हाच निजामकर्ता (king maker) होता. हिंदुस्थानात आल्यावर बूसीची मिजास फारच वाढली होती. सेइरे मुताखरीनकर बूसीचे वर्णन पुढीलप्रमाणे करतो :

''बुसीच्या अंगावर नेहमी भरजरी उंची पोशाख असून डोक्यावरची विलायती टोपीसुद्धा जरीच्या बुट्टीने मढविलेली असे. त्याचा राहता तंबू तीस फूट उंचीच्या भव्य ओट्यावर उभारलेला असून, आत सहाशे माणसे मावतील एवढा विस्तीर्ण होता. या तंबूच्या एका टोकास उंच व्यासपीठावर भरजरी मखमलीचा गालीचा आंथरुन त्यावर सिंहासनाकार

---

*3. अर्थात पेशव्याला आता बूसी व रामदासपंत हे दोन नवीन विरोधक निर्माण झाले. यापैकी रामदासपंत हा शिकाकोलचा ब्राह्मण मुत्सद्दी नासिर जंगाचे नोकरीत होता. त्यास डुप्लेने वश करून नासिरजंगाची प्रधानकी देवविली.*

*(पेशवे निजामांचा बेबनाव)*

*त्या ठिकाणी प्रमुख माणसे तीन, सय्यद लष्करखान, सहानवाज खान व रामदासपंत*

मराठी रियासत खंड -4, पान- 310- 312

राजचिन्हांकित भव्य हातखुर्ची ठेवून त्यावर बूसीची स्वारी विराजमान होत असे. खुर्चीच्या मागे व उजवे-डावे बाजूस इतर दरबारी मंडळी खुर्च्यावर बसे. समोर फ्रेंच स्वारांचा व मागे तुर्की शिपायांचा पहारा त्या तंबूत खडा असे. भोजनास चांदीची भांडी व नानाप्रकारच्या पक्कान्नांची चंगळ असे. बुसीची स्वारी पालखीत अगर घोड्यावर बसून बाहेर जाई, तेव्हा पुढे चोपदार ललकारत व भाटलोक त्याचे गुणानुवाद गात.''

सारांश, बूसी हिंदुस्थानात बादशाही इतमानानं राहू लागला होता.

रामदासपंत व बूसी हे एकत्र होऊन त्यांनी नासिरजंगाच्या पश्चात मुज्जफरजंगला निजामाचे गादीवर बसविले; परंतु तो लवकरच मृत्यू पावल्याने या उभयतांनी सलाबतजंगास निजामी दिली.

यावेळी सलाबतजंग कर्नाटकात होता. तो फ्रेंचाच्या साहाय्याने दक्षिणेत येण्यास निघाला. हा निजामशाहीतील खेळखंडोबा पाहून, स्वारी करण्यास ही संधी उत्तम आहे असे ठरवून, नानासाहेबाने एकदम निजामावर स्वारी करण्याचा विचार केला.

नानासाहेबाच्या या बेताची कुणकुण रामदासपंतास लागताच, त्याने पेशव्याच्या वकीलास गोडगोड भाषणाने खूप करुन आपल्याविषयी पेशव्याचा ग्रह चांगला व्हावा अशी युक्ती केली. 'रामदासपंत फार उदार आहेत, आपला व त्यांचा अकृत्रिम स्नेह आहे.' अशी भावना पेशव्यांची वकीलाची झाली. इतकेच नव्हे, पण ती त्याने नानासाहेबास लिहूनही पाठवली. ही रामदासपंताची हुषारी पाहून पेशव्यांच्या तोंडात पाणी सुटले व त्याला वाटले की, असला कर्ता पुरुष आपल्या नोकरीत असावा. त्या हेतुप्रमाणे नानासाहेबांने दीक्षिताच्या मार्फत काही खटपटही केली पण स्वराज्याला रामदासपंताचा उपयोग होण्याचा योगायोग नव्हता असे दिसते.

८. नानासाहेब हा कर्जाने गांगरुन गेला असून द्रव्यलोभीही विशेष आहे. ही गोष्ट रामदासपंताच्या तेव्हाच ध्यानी आली. त्याने लागलीच जानोजी निंबाळकर या नावाचा एक गृहस्थ आपल्यातर्फे पेशव्यांकडे

---

*: निजामाचा कोंडमारा, भालकीचा तह*

*पेशवा म्हणतो, त्रिंबक किल्ला आम्ही न दिला यासाठी रामदासपंताचा निकर, सबब किल्ला देणेंही पडेल. मोठा लबाड, दगाबाज आहे.*

मराठी रियासत खंड -4, पान- 316

पाठविला व त्यास असे कळविले की, तुमचे सगळे कर्ज मी वारतो. कर्जाची तुम्ही यत्किंचतही काळजी करु नये. तुमच्या हातून कर्ज निवारण झाल्यावर मोहरांची दक्षिणा ब्राह्मणास द्यावी. हा निरोप ऐकून नानासाहेब थक्कच झाला व निजामाविरुद्ध चालू केलेले मनसबे त्याने मागे टाकले व आपला तारक प्रभु काय तो रामदासपंतच असे नानासाहेबास वाटू लागले. जानोजी निंबाळकराला रामदास पंताने कायमचेच पुण्यास पेशव्यांकडे ठेवून दिले होते. या जानोजीने वारंवार पेशव्यांची रामदासपंताच्या सच्चेपणाबद्दल खात्री करावी, असा रामदासपंतांनी संकेत ठरविला होता.

नानासाहेबांसारखा धूर्त पेशवा जेथे चकला तेथे जाणोजीसारख्याची काय कथा! जाणोजी हा रामदासपंताचे कपटांत अनुकूल होता असे म्हणण्यापेक्षा, रामदासपंताने जाणोजीच्या भोळसरपणाचाच फायदा विशेष घेऊन त्याच्यामार्फत नानासाहेबास आपल्या नादी लावले, असे म्हणणे अधिक योग्य होईल.

९. रामदासपंताबद्दल नानासाहेबास विशेष भरवसा वाटण्यास एक कारण झाले होते ते असे, शाहूंच्या पश्चात ताराबाई आणि पेशवा यांच्यामध्ये वैमनस्य उत्पन्न झाले होते. ताराबाईच्या मनातून राजसत्ता आपल्या स्वाधीन असावी असे होते व बाळाजी बाजीरावास ती स्वत:कडे घेण्याची महत्त्वाकांक्षा होती. ताराबाईने साताऱ्यावरुन बाळाजीच्या पारिपत्यासाठी गुजरातेतून दमाजी गायकवाडास बोलावले होते. आरंभी दमाजी गायकवाडास पेशव्याच्या बळाची तितकीशी कल्पना नसल्याने तो ताराबाईच्या आज्ञेप्रमाणे पेशव्यावर एकदम चालून आला. पेशव्याची व गायकवाडाची लढाई सन १७५१ मध्ये झाली. यावेळी रामदासपंताने फौज पाठवून पेशव्यास सहाय्य केले होते. या लढाईत पेशव्यास विजय मिळाल्याने त्याला रामदासपंताबद्दल आदर वाटणे साहजिकच होते. रामदासपंत आपणास असेच वेळोवेळी सहाय्य करील असे पेशव्यास निष्ठापूर्वक वाटू लागले. परंतु रामदासपंताने यानंतर पेशव्यास नुसत्या थापा मारुन शेवटपर्यंत चाळवाचाळवी केली व अखेर सपशेल फसविले.

१०. याप्रमाणे काही दिवस गेले. एकदा मामूल वहिवाटीप्रमाणे पेशव्यांचा खजिना उत्तरेकडून पुण्यास येत असताना, तो रस्त्यात निजामाच्या सरदारांनी लुटला. खजिना सुमारे पाच लक्षांचा होता. एकट्या निजामाची

किंवा निजामाच्या सरदारांची पेशव्यांचा खजिना लुटण्याची छाती नव्हती. परंतु बूसीने नवीन पद्धतीने शिकवलेल्या गार्द्यांच्या पलटणीचे सहाय्य आपणास पूर्णपणे आहे, अशी रामदासाची खात्री असल्याने हा खजिना लुटविला आणि विशेष हुशारी अशी केली की, हा खजिना लुटण्यात आपले स्वत:चे अंग मुळीच नाही, असे पेशव्यास परोपरीने भासविले. जेव्हा पेशव्याच्या वकिलाने या खजिन्याबद्दलची तक्रार रामदासपंताजवळ नेली, तेव्हा मानवभावीपणाने त्याने असा काही आव आणिला की, त्यायोग्य पेशव्याच्या वकिलास रामदासपंताच्या निर्दोषीपणाबद्दल खात्रीच पटली. वकिलापेक्षा नानासाहेब पेशवा फारच अधिक चाणाक्ष व मुत्सद्दी आहे, हे रामदासपंत ओळखून असल्याने नानासाहेबासही चकविण्यासाठी त्याने लुटलेल्या पाच लक्षाच्या खजिन्यापैकी तीन लाख रुपये पेशव्यास परत देतो असे तत्काळ कळिवले व 'बाकीची रक्कम लवकरच परत करुन टाकू, श्रीमंतांनी अगदी बेफिकीर असावे, पाच लक्षांची ती बिशात काय? एवढ्यासाठी श्रीमंतांनी संशय मानण्याचे कारण नाही,' असे नानासाहेबास त्याने वकिलामार्फत कळविले. रामदासपंतांचा हा एकंदर उडवाउडवीचा प्रकार पाहून वाचकास 'सोके भये साठ, आधे गये नाठ; दस देइंगे, दस दिलाइंगे और दस का देना क्या है?' या म्हणीची आठवण झाल्यावाचून राहणार नाही. पण रामदासपंतांची हातचलाखी फार दिवस निभली नाही.

११. रामदासपंतांची ही उडवाउडवी पेशव्यांच्या वकिलाच्या आता कुठे ध्यानात आली आणि त्याने पेशव्यास कळविले की, 'रामदासपंत खजिना देऊन म्हणतात, परंतु अद्यापही देत मात्र नाही काहीच. इतकेच नाही पण आतून लढाईची तयारी जोराने करतात. फिरंग्याची पलटणे जमविण्याचे काम चालू आहे. रामदासपंताने आपला खजिना लुटल्यामुळे आपली फारच नाचक्की झाली आहे. हल्ली हैदराबादेहून निजामाचा खजिना रवाना झाला आहे; तो जर आपण लुटला तर पेशव्यांची जरब निजामास बसून गेलेल्या अब्रूची काही तरी भरपाई होईल. निजामाचा दररोजाचा लाख रुपये खर्च असल्याने तो पुरा पाडणे रामदासपंताच्या शक्तीबाहेर गेले आहे व म्हणून तो आता इकडे सर्वत्रास अप्रिय झाला आहे.' अशा आशयाचे पत्र पाहताच नानासाहेबांचे डोळे चक्क उघडले. आणि त्याने

लढाईची तयारी केली. यापुढे नानासाहेबाला थापावर झुलविणे शक्य नाही, हे जाणून रामदासपंताने बूसीच्या सहाय्याने उघडपणे पेशव्यावर चाल केली आणि पेशवे व निजाम यांचे युद्ध ता. २१-११-१७५१ रोजी कुकडी नदीवर झाले. कुकडी नगर जिल्ह्यातून वाहत येऊन शिरुरजवळ घोडनदीस मिळते. या लढाईत पेशव्यांचा पराजय झाला, परंतु नुकसान काही फारसे झाले नाही, याच लढाईत पेशव्यास पश्चात युद्धकलेची, गार्द्यांच्या पलटणीची व फिरंगी तोफखानेही ओळख प्रथम पटली. या लढाईत पेशव्यांचा पराजय होण्यास आणखी एक कारण झाले, ते नमूद करुन ठेवण्यासारखे आहे. लढाई चालू असता चंद्रग्रहण आले म्हणून, ग्रहणात रात्री पेशव्यांकडील मंडळी नहान्यास नदीवर गेली. ही बातमी रामदासपंताने ठेवून एकदम पेशव्यावर मारा केला. या धामधुमीत पेशव्यांची पूजेची चांदी-सोन्याची उपकरणे वगैरे लुटले गेले. भलत्यावेळी भलते करण्याची दुर्बुद्धी आठवणे हेच मुख्यत: सर्वनाशाचे लक्षण होय. असो. या लढाईनंतर निजामांचा व पेशव्यांचा तह झाला, पण त्यायोगे पेशव्यांचे काही समाधान झाले नाही. कारण या लढाईत व तहातही रामदासपंतांचा वरचष्माच राहिला. कसेही करुन रामदासपंतांची खोड मोडून त्याला धुळीस मिळवावे असा पेशव्यांचा निश्चय झाला होता. त्याकामासाठी त्याने उत्तरेकडून शिंदे, होळकरांना जय्यत तयारीनिशी बोलाविले. रामदासपंताला मोडण्यासाठी अगोदरही शिंदे, होळकरांशी त्याने बोलाविले होते. पण ते येऊन पोहोचले नाहीत. म्हणून त्यावेळी नानासाहेबांने त्यांना फार आग्रहाचे पत्र पाठविले होते. रामदासपंताने आपणास पूर्णपणे फसविले असल्याने कसेही करुन एकदा त्याला मोडावाच अशी प्रतिज्ञाच नानासाहेबाने केली होती. नानासाहेब म्हणतो, 'सर्वस्व वेचू पण एकदा रामदासपंताची खबर घेऊ' यालाच म्हणतात पुरुषार्थ. 'अमर्षोह्येष पौरुषं' असे दुर्योधनाचे वचन आहे ते विचारणीय आहे. विचारणीय असून अशाच प्रसंगाला उद्देशून आहे.

१२. नानासाहेब याप्रमाणे तयारी करीत होता. तेव्हा रामदासपंतही काही माशा मारीत बसला नव्हता. त्याने गार्द्यांच्या पलटणी वाढविण्याचा क्रम सुरु केला होता. गायकवाड, ताराबाई, प्रतिनिधी, रघुजी, बाबूजी इत्यादी सर्वांच्या भानगडी नानासाहेबाने आता निरविल्या असल्यामुळे

रामदासपंताविरुद्ध तयारी करण्यास त्यास पूर्ण अवसर सापडला होता. शिंदे, होळकरही त्याच्या मदतीला धावून येण्यास सिद्ध झाले होते. इकडे निजामाच्या दरबारी बूसीचे वजन अतोनात वाढले होते. रामदासपंत बूसीच्या जोरावर उड्या मारीत होता. परंतु यावेळी निजामाच्या फौजेस पगार न मिळाल्याने ती असंतुष्ट झाली होती व भालकी येथे ता. ७ एप्रिल सन १७५२ रोजी तिने रामदासपंतांचा एकाएकी खून केला. त्यामुळे लढाईचे पुढील अनर्थ टळले. साडेतीन शहाण्यात प्रसिद्ध असलेला विठ्ठलसुंदर हा या रामदासपंतांचाच पट्टशिष्य असून यानेच त्यास प्रथम नोकरीस घेतले.

१३. रामदासपंतासारख्या मुत्सद्दी व महत्त्वाकांक्षी पुरुषाचा वरप्रमाणे आकस्मिक रीतीने शेवट झाला. असला पुरुष नानासाहेबास मिळाला असता तर मराठी साम्राज्याचे इतिहासास काही निराळ्या प्रकारचेच स्वरुप झाले असते. 'ईश्वर इच्छा बलीयसी' हेच खरे.

# ३. चंगीझखान

**जन्म इ.स. ११६३. मृत्यु इ. स. १२२७.**

**म्हणाति मनुष्य नव्हे हा राक्षस की काळ हा खवळला हो।**
**की आमुची कराया मूर्त प्रलयाग्नि राख वळला हो।। मोरोपंत.**

आपल्या हिंदुलोकात ज्याप्रमाणे चार वर्ण आहेत, त्याचप्रमाणे मुसलमानांतही सय्यद, शेख, मोगल, पठाण असे चार वर्ण आहेत. आता यातही पुष्कळ पोटभेद आहेत. तथापि आपण या सर्वांनाच मुसलमान म्हणून संबोधितो आणि म्हणूनच जुन्याकाळच्या मुसलमानांविषयी आपला बराच गैरसमज होतो. जगाच्या ओळखीचे पहिले मुसलमान म्हणजे अरब होत. कारण यांनीच आपला धर्म व आपले राज्य पृथ्वीवर चोहोंकडे वाढविले. तथापि पहिल्या सिंधप्रांताच्या स्वारीशिवाय हे अरब हिंदुस्थानात आलेच नाही. हिंदुस्थानावर वारंवार स्वाऱ्या करुन लुटालूट करणारे ते हे अरब नसून मुख्यत्वेकरुन तुर्कलोक होत. सीथियन्स, यवन, हूण, तुर्क, मोगल, पठाण इत्यादी जातींनी मध्यआशियातील प्रदेश व्यापिलेला असल्यामुळे तेथे लोकसंख्येची वाढ झाली की, एकादा धाडसी पुढारी अग्रेसरत्व पतकरुन इकडे हिंदुस्थानाकडे किंवा तिकडे युरोपकडे लुटालूट करण्यास

प्रारंभ करी. अशा पुढाऱ्यांपैकीच चंगीझखान हा एक मोगल पुढारी होता. याचा जन्म सन ११६३ मध्ये झाला. हा अत्यंत पराक्रमी निघाल्यामुळे मोगलांचा खरा इतिहास याचेपासूनच सुरु झाला आहे. याच्या जन्मापूर्वी म्हणजे सुमारे दहाव्या शतकापर्यंत मोगल हे नाव सुद्धा कोणास ठाऊक नव्हते. एव्हापर्यंत हे लोक चीनची प्रजा म्हणून राहत असत. यांचा पहिला सरदार चीनपासून स्वतंत्र होऊन सन ११७५ मध्ये मरण पावला. त्यावेळी त्याचा तेमुजीन नावाचा मुलगा फक्त तेरा वर्षाचा होता. परंतु हाच मुलगा फार पराक्रमी निघाल्यावर त्याने सन १२०६ मध्ये मोगलांची प्रचंड सभा भरवून चंगीझखान हे मोठे नाव धारण केले व तोच आला चरित्रनायक होय. आरंभी आरंभी याने तार्तार लोकांच्या निरनिराळ्या टोळ्यास जिंकून आपले बळ वाढविले व मग फार मोठी फौज तयार करुन तिला कवायत वगैरे शिकवली आणि पुढे या फौजेच्या जोरावर तो भराभर देश जिंकीत चालला. सन १२१० पर्यंत पूर्वेस पूर्वसमूद्र, पश्चिमेस कास्पियन समुद्र व उत्तरेस व्होलगा नदी, इतका प्रदेश त्याने सहज जिंकिला आणि नंतर त्याची दृष्टी दक्षिणेकडेस वळली व लागलीच बुखारा, काबूल, कंदहार, खुरासान हे तिकडील प्रांत त्याने सर केले. यानंतर त्याने आपला मोर्चा इराणाकडे वळविला व तो देशही हस्तगत केला. त्यावेळी चंगीझखानाशी टक्कर देण्याचे सामर्थ्य काय ते चीनलाच होते, म्हणून एकदा चीनवर स्वारी करण्याचे मनात आणून चंगीझखान चीनची प्रचंड भिंत ओलांडून आपल्या फौजेसह चीनांत एकदम शिरला व त्याने पेकिन राजधानी काबीज केली आणि चीनचा उत्तर भाग आपले राज्यास जोडून दिला. तिकडे यूरोप खंडातही जमिनीवर जितके दूरपर्यंत जाता येईल तितके दूरपर्यंत चंगीझखानाचे सैन्य मुलूख काबीज करीत गेले. अफगाणिस्तानात खारिजम प्रांतावर सेल्जुक सुलतान मुहम्मद हा राज्य करीत होता. याच्या ताब्यात अरबस्तान, तुर्कस्तान, ईराण हे देश मोडत असत. तत्कालीन पद्धतीप्रमाणे याचे राज्य बरेच सुधारलेले असल्यामुळे चंगीझखानाच्या रानटी टोळधाडीचा आपणास उपद्रव होण्याची त्यास मुळीच भीति वाटत नव्हती व म्हणून त्याने चंगीझखानाच्या लोकांस आपल्या राज्यात थारा देण्याचे नाकारले. त्यावरुन चंगीझखानाने आपले वकील सेल्जुक सुलतान महंमदाकडे पाठविले व नुकसान भरपाईची मागणी केली. सेल्जुकने उलट

त्या वकीलांचाच शिरच्छेद केला व चंगीझखानाशी लढण्यास आपली फौज एक लाखपर्यंत वाढवून जय्यत तयारी ठेविली. चंगीझखानास ही बातमी समजताच त्याने सात मुलास बरोबर घेऊन सात लाख फौजेसह सेल्जुकवर स्वारी केली व त्याशी भयंकर युद्ध करुन त्याचा पूर्णपणे पराजय केला.

२. चंगीझखान हा अत्यंत शूर, धाडसी आणि महत्त्वाकांक्षी होता. याच्याइतका बलाढ्य, क्रूर व निर्दय मनुष्य कोणीच झाला नसेल. तो एक मूर्तिमंत राक्षसच होता, असे म्हटले तरी चालेल. याच्या लष्कराएवढे मोठे लष्कर पृथ्वीवरील कोणाही एका राजाच्या ताब्यात आजपर्यंत नव्हते. या लष्कराच्या जोरावर त्याने जवळजवळ सगळे जग जिंकले. त्याच्या राज्याची लांबी साडेपाच हजार मैल व रुंदी तीन हजार मैल होती; म्हणजे त्याच्या राज्यात आपल्या हिंदुस्थानासारखे पाच देश सहज सामावतील. चंगीझखान इतका अडाणी होता की, तो विद्येची व धर्माची चेष्टा करी. आशिया खंडातील अत्युत्तम पुस्तकालयातील पुस्तकांचा उपयोग त्याने आपल्या घोड्यांकरिता मऊ बिछाने करण्याकडे केला. एकदा त्याने बायबलांची होळी केली. बुखाऱ्याच्या मशीदीत कुराणही त्याने घोड्याकडून तुडविले. 'अग्निप्रलय परवडला पण चंगीझखानाची धाड नको.' असे लोकांना झाले होते. हिंदुस्थानावर मात्र चंगीझखानाने स्वारी केली नाही; कारण त्याला तशी सवडच मिळाली नाही.

३. चंगीझखान १२२७ त कास्पियन समुद्राचे काठी मरण पावला. तो मेल्यानंतर त्याच्या आत्म्याच्या सेवेला कोणी तरी पाहिजे म्हणून त्यावेळी चाळीस कुमारिकांना बळी देण्यात आले! असे सांगतात की, आपल्या आयुष्याच्या शेवटच्या वीस वर्षात त्याने एकंदर एक कोटी चाळीस लक्ष माणसांची कत्तल केली. चंगीझखानाने मरणसमयी आपले राज्य ओक्ताईखान, तुलुईखान, जुजीखान आणि झगताईखान अशा आपल्या चारही मुलांस वाटून दिले. चंगीझखानाच्या मृत्यूनंतर बरोबर तीनशे वर्षांनी पानीपतच्या लढाईत विजयी होऊन हिंदुस्थानावर मोगलांचे राज्य स्थापन करणारा बाबर हा बापाकडून तैमूरलंगाचा व आईकडून याच चंगीझखानाचा वंशज होता, म्हणून त्याच्या राज्यास मोगली राज्य म्हणतात.

चंगेजखानाचे जीवनवृत्त

चंगीजखानाचा जन्म इसवी सनाच्या ११६२ च्या आसपास आधुनिक मंगोलियाच्या उत्तर भागात ओनोन नदीतीरी झाला होता. त्याचे मूळ नाव तेमूजिन होते त्याच्या पित्याचे नाव येसूजेई होते. कियात तांड्याचा तो मुखिया होता. बोरजिगिद नामक समूहातील परिवाराशी तैमूजिनचा संबंध होता. येसूजेईची अल्पवयातच हत्या करण्यात आली होती. चंगीजखानाची आई ओलूइके हिने चंगीजखानाच्या सावत्रभावंडासह समस्त परिवाराचं कठीण परिस्थितीत पालनपोषण केलं होतं. ११७० चं दशक विपर्यासानी भरलेलं होतं. तैमूजिनचं अपहरण करून त्याच्यावर दास्यत्त्व लादण्यात आलं होतं. आपल्या पत्नीच्या सुटकेसाठी तेमूजिनला लढा द्यावा लागला होता. अशा प्रतिकूल विपत्तीकाळातही लोकसंग्रहादि मित्र संपादन करण्यात तो यशस्वी झाला होता.बोघूरचु नावाचा तरुण त्याचा पहिला मित्र होता. हा बोघूरचू एका विश्वस्त साथीदाराच्या रुपात सदैव सोबत राहिला त्याचा सख्खा भाऊ(आण्डा) जमूका देखील त्याचा विश्वस्त मित्र होता. तेमूजिनने कैराइट शासक आणि आपल्या वडलांचे सख्खे भाऊ तुगरील ऊर्फ ओंग खान यांच्याशी असलेल्या पुनरुज्जीवन केले.

जमूका पूर्वीश्रमीचा मित्र असूनही नंतर तो शत्रु बनला. ११८० ते ११९० च्या दशकात ओंग खान तेमूजिनचा मित्र होता. जमूका सारख्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्याला निष्प्रभावित करण्यासाठी तेमूजिनच्या ताकदीचा व मित्रत्त्वाचा वापर करुन घेतला. जमूकाला पराभूत केल्यानंतर तेमूजीनचा आत्मविश्वास वाढला म्हणून त्याने इतर टोळ्याविरुद्ध युद्ध मोहीम आरंभिली. त्यात त्याच्या पित्याची हत्या करणारे शक्तीशाली तातार कैराईट आणि ओंगखान स्वतः सामील होता. याच्या विरुद्ध १२०३ साली युद्ध पुकारलं. १२०६ मध्ये शक्तीशाली जमूका आणि नेमन लोकांना निर्णायक रुपाने पराभूत केल्यानंतर स्टेपीक्षेक्षीत्रीय राजनीती सर्वात प्रभावशाली व्यक्तीच्या रुपात उदयास आला. मंगोलियन लोकांच्या संभेस बरीलताई म्हणत. तेमूजिनच्या या कर्तबगारीला सर्व सरदारांनी मान्यता दिली. परिणामी त्याला समुद्री खान आशयाची उपाधी चंगीजखान अर्थात सार्वभौम शासक सहित मंगोलियन लोकांचा महानायक म्हणून घोषित केला गेला.

इसवीसन १२०६ करीलताईकृत मान्यता लाभण्याआधी चंगीजखानाने मंगोलियन लोकांची सशक्त अनुशासित सैन्यशक्तीची उभारणी केली होती. (चौकार पट्टा) ज्यामुळे भविष्यातील सैन्य अभियानाची चाहूल एक प्रकारे लागली चीनविजय ही त्याची पहिली मनीषा होती. त्याकाळात तीन राज्यात विभागलेला होता. उत्तरचीनचं राज्य करणारे जर चेन राजवंशीय. दक्षिण चीनवर अधिपत्य असणारे शुंग राजंवशीय. १२०९ मध्ये सी आ पराभूत झाले. १२१३ मध्ये चीनच्या जागतिक कीर्तीचिया भिंतीवर अतिक्रमण झाले. १२१५ मध्ये पेकिंग लुटले गेले. चीन वंशाविरुद्ध १२३४ पर्यंत दीर्घ लढाया झाल्या. अभियानातील प्रगतीवर चंगीजखान फार खूष होता. म्हणून आधीनस्थ सैन्याच्या देखरेखीत सैन्य बळ सोडून १२१६ मध्ये मंगोलिया-मातृभूमीस तो परतला.

इस. १२१८ मध्ये चीनच्या उत्तर पश्चिमी पहाडीवर ताबा असलेल्या कराखिताच्या पराभवानंतर मंगोलिचे साम्राज्य अमु दरिया, तरान, ख्वारजम. राज्यापर्यंत पसरल. मंगोल दूताच्या वधामुळे ख्वारजमचा सुल्तान चंगीजखानाच कोपभाजक बनला. १२१९ दरम्यान गुरगंज मर्व निशापुर व हैरात, बुखारा,समरकंद, बल्ख, गुरगंज, मर्व निशापूर व हैरात सारख्या मोठ्या नगरातील लोकांनी मंगोल सेनेसमोर नांगी टाकली, शरण आले. ज्या नगरांचा विध्वंस केला. निशापूरला वेढा दिल्यानंतर एका मंगोल राजकुमाराची हत्या झाली तेव्हा चंगीजखानाने आदेश दिला की, या नगराचा असा विध्वंस करा की ज्याच्यावर नांगर चालवता आला पाहिजे. आपल्या राजकुमाराच्या हत्येच्या प्रतिशोधाला सुद्धा उग्ररुप देण्यासाठी असा संहार करा की कुत्रं-मांजर सुद्धा शिल्लक ठेवू नका. मंगोल सेना सुल्तान मोंहमदाचा पाठलाग करतांना अजर बैजान पर्यंत आली आणि कीमियामध्ये रशियन सेनेला पराभूत करीतकरीत त्यांनी कैस्पियन समुद्राला घेरलं. सेनेच्या दुसऱ्या तुकडीने सुल्तानपुत्र जलालुद्दीनचा अफगानिस्तान आणि सिंध प्रांता पर्यंत पाठलाग केला. सिंधुतीरी चंगीजखानाने उत्तरभारत -आसाम मार्गे मंगोलियाला परतण्याचा विचार केला परंतु असह्य गरमी व नैसर्गिक निवाऱ्याच्या अडचणीमुळे शमनार्थ दिलेल्या अशुभ संकेताच्या आभासाने त्याला मनोदय बदलण्यास भाग पाडले. आपल्या जीवनाचा अधिकांश काळ युद्धातच घातल्यानंतर १२२७ ला चंगीजखान वारला. पण त्याचीसैनिकी उपलब्धी विस्मित करणारी होती.

स्टेपीक्षेत्रीय युद्धशैलीतील डावपेचांना आवश्यकतेनुसार प्रसंगी बदल सुधारणा करून दिला. प्रभावशाली रणनीतीनं रूप दिल्याचा हा परिपाक होता. मंगोलियन व तुर्की लोकांवा घोडेस्वारीतील तरबेजपणाने सैन्याला फार गती मिळाली. घोड्यावरून धनुष्यबाण चालवण्याचं कौशल्य अदभुत होतं. हे कौशल्य त्याच्या दैनंदिन जीवनातील शिकारीमुळे अवगत होतं. स्टेपीक्षेत्रीय घोडेस्वार सदैव स्फुर्तीमुळे गतिमान असायचे त्यामुळे अभ्यास होता. यामुळेच त्यांना कल्पनातीत काम करण्याची क्षमता लाभली. कडाक्याच्या थंडीत युद्ध अभियान आरंभल्यावर नगरा नगरात -शिविरा-शिविरात प्रवेश करतांना पडलेल्या बर्फच्या नदीचा वर्तर राजमार्गा सारखा केला. तसं पाहता नगर आरक्षित शिविरात बस्तान

बसवण्यात यायावर निपुण नव्हते. पण चंगीजखानाने घेराव यंत्र-नेपूथा-दारुगोळ्याचं महत्त्व लवकरच अवगत केल.शत्रुवर चालून जाण्याच्या मोहीमेत उपयोगी पडेल अशी (Light portable equipment) बनवली ज्याचा युद्धात घातक प्रभाव पडायचा.

मंगोलीनी केलेल्या विनाशाचे आकलन

चंगीजखानाच्या विश्वविजयी अभियानासंबंधी प्राप्त समस्त विवरणं खालील आकड्यावर एकमत सहमत आहे. ज्याच्या नगरांनी चंगीजखानच्या प्रभुत्त्वाचा स्वीकार केला नाही त्यांच्या वर प्रभुत्त्व मिळवण्यासाठी तिथ राहणाऱ्या लोकांना यमसदनी पाठवलं. ही संख्या अत्यंत धक्कादायक आहे. १२२० मध्ये निशापूर वर ताबा घेतांना १७ लक्ष ४७ हजार, १२२२ मध्ये हिरावचा ताबा घेतांना १६ लक्ष, बगदादवर ताबा मिळवण्यासाठी ८ लक्ष लोकांना मारलं. नास्त मध्ये ७० हजार, बैदाक जिल्ह्यात ७० हजार, कुहीस्थान प्रांतातील 'तून' नगरात १२ हजार लोक मारले गेले. मध्यकालीन इतिहासकांनी मृतकांच्या संख्येचं अनुमान कसं लावलं?

इलखानाचा फारसी इतिहासकार जुवैनी म्हणतो, मर्व मध्ये १३ लाख लोकांना मारलं. दैनंदिन शव संख्येचा दर एक लक्ष प्रतिदिन होता. त्यावरुन तेरा दिवस युद्ध चाललं की तेरा लक्ष.

११६२ तेमूजिनचा जन्म. ११६० ते ११७० चं दशक म्हणजे दास्यत्त्वाविरुद्ध संघर्ष होता. ११८० ते ११९० दशक संधी-तडजोड-तहाचा काळ होता. १२०३ ते १२२७ विस्तार विजय.

१२०६ तेमूजिन चा 'चंगीजखान' सार्वभौम शासक म्हणून मंगोलियन सरदारांनी घोषित केलं

१२२७ चंगीजखानचा मृत्यू

१२२७ ते १२४१ चंगीजखानपुत्र ओगोदेईचा शासनकाल.

१२२७ ते १२६० तीन महारखानाचे शासन, मंगोल एकतेची स्थापना

१२३६ ते १२४२ रशिया, हंगेरी, पोलंड, ऑस्ट्रियावर आक्रमण

बाटू हा चंगीजखान ज्येष्ठपुत्र जोचीचा मुलगा. बाटूचं हे साम्राज्य होत.

१२४६-४९ ओगोदेई पुत्र ' गुयुक'चा काळ

१२५१-६० चंगीजखान-पौत्र मोंके आणि तुलूचा शासन काल.

१२५३-५५ मोंकेच्या इराण-चीन वर आक्रमण.

१२५७-६७ बाटू पुत्र 'बर्क' चा काळ.

सोनेरी टोळी (golden horde) चा नेस्तोरिअन इस्लाम धर्मप्रवृत्त झाला. १३५० च्या दशकात त्याचा इस्लाम धर्मात निश्चय पूर्वक प्रवेश झाला. इलेखान विरुद्ध गोल्डनझेर्डी तर मिश्र देशाच्या मैत्रीखा प्रारंभ.

१२५८ बगदाद काबीज, अब्बासींवर विरोध समाप्त. मोंकेचा धाकटा भाऊ हुलेगूच्या इरामध्ये इलखानी राज्याची स्थापना. जोचिंद आणि इलखानात संघर्ष सुरु.

१२५८ पेकिंगमध्ये महानखानाच्या रुपात कुबलईखानचं राज्यारोहण. चंगीजखान उत्तराधिकारी जनात संघर्ष मोगल साम्राज्य अनेक वंशात वाटलं गेलं. तोलूई चघताई आणि जोची (ओगोदेईवंश) पराजित झाल्याने तोतूविद मध्ये सामील झाले.

तोलूयिद : चीनचा यूआन वंश आणि इराणचे इलखानी राज्य

चघताई : तूरान व तुर्कस्थान रशियन स्टेपीक्षेत्रात जोंची वंश होते त्यांना पर्यवेक्षक गोल्डन होर्डी नावाने ओळखायचे.

१२९५ ते १३०४ इराणमध्ये इलखानी शासक मजनखानाचा शासनकाल. बौद्धधर्मातून इस्लाम प्रवेश नंतर क्रमाक्रमाने इलखानी सरदाराचं देखील धर्मांतरण होऊ लागलं.

१३६८ चीनमधल्या यूआन वंशाचा अंत.

१३७० ते १४०५ तैमूरचं राज्य, बरलास तुर्क असूनही त्यांने चघताई वंशाच्या आधाराने चंगीजखानाचा वंशज म्हणून घोषित केले. त्याने स्टेपी साम्राज्याची स्थापना केली. चीन सोडून चघताई जोची राज्यातील काही भाग मिळून स्टेपोक्षेत्रात आपल्या साम्राज्याची स्थापना केली गुरेगेन अर्थात शाही-जावई या उपाधिने स्वतःला विभषित केले. आणि चंगीजखानाच्या वंशातील राजकुमारीशी लग्न केलं.

१४९५-१५३० जहीरुद्दीन बाबर जो तैमूर आणि चंगीजखानचा वंशज होता. तो फरगना, समरकंद च्या तैमूरी क्षेत्राचा उत्तराधिकारी बनला. तिथून हाकलला गेला. काबूल काबीज केलं. १३२६ मध्ये दिल्ली आगऱ्यावर विजय मिळविला. भारतात मोगल साम्राज्याचा पाया घातला.

१५०० जोचीचा धाकटा मुलगा शिबानचा वंशज शयबानीखानाचं तुरान वर अधिपत्य.

शयबानीनां उजबेग सुद्धा म्हणायचे ज्यावरून वंशजांना अुजबेकिस्तान नाव पडलं. शयबानी सत्तेचं दृढीकरण. यामधूनच बाबर आणि तैमूरच्या वंशजांना घालवलं.

१७५९ चीनच्या मंचूओंना मंगोलिया काबीज केलं.

१९२१ मंगोलिया गणराज्य झाले.

# ४. अहिल्याबाई

**जन्म इ. स. १७२५. मृत्यू तारीख १३-८-१७९५**

***देवी अहिल्याबाई जालीस जगत्त्रयांत तू धन्या।***
***न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजी ऐकिली कन्या।। मोरोपंत.***

देवी अहिल्याबाई या साध्वीचे नाव उच्चारितांच प्रत्येकांच्या मनात पूज्यबुद्धी उत्पन्न होते. कधीही मनुष्याची स्तुती करावयाची नाही अशी ज्या मयूरकवीची प्रतिज्ञा होती, त्याने सुद्धा या बाई 'देवी' असे उपपद प्रथम लावून तिची सात आठ आर्यांत स्तुती केली आहे. या बाईचे चरित्र आपणास सादर करावयाचे आहे. परंतु त्यापूर्वी ज्या होळकर घराण्यात ती नावारुपास आली त्याची अल्प माहिती प्रथम देतो. कारण होळकर घराण्याची अशी संक्षिप्त माहिती येथेच दिल्याने अहिल्याबाईच्या कारकीर्दीची चिकित्सा वाचकांस सुलभतेने करता येईल व तसे झाले म्हणजे अहिल्याबाईची थोरवी सहजच लक्षात येईल.

२. होळकरांच्या वंशावळी या नावाचा एक लेख रा. राजवाडे यानी शके १८२७ च्या ज्येष्ठ महिन्याच्या सरस्वती मंदिरात लिहिला आहे. त्याचा कारणापुरता उतारा टीपेत दिले आहे, त्यावरुन हे घराणे कोठील व कोठे आले याची छानदार माहिती मिळते. होळकरांचे मूळ आडनाव

वीरकर असून गोत्र जयबसी होय. वीरवाल्हे, चितोडगड, मुंगीपैठण, वीरवोहोळ, वोहोळमुरुम, वाफगाव, कातराबाद, चांदवड, महेश्वर व इंदूर अशा दहा निरनिराळ्या ठिकाणी या कुळातील पुरुषांनी वेळोवेळी वसती करुन काही ठिकाणी पाटिलक्याही संपादन केल्या होत्या. इंदूर हे यांच्या शेवटच्या वसतीचे ठिकाण होय. राजवाड्यांनी वंशावळीची जी यादी दिली आहे ती वृक्षाच्या रुपांत बसवून या लेखाच्या शेवटी दिली आहे. त्या यादीत या घराण्याचा आजपर्यंत कोणकोणत्या घराण्याशी संबंध झालेला आहे हेही दिसते. या घराण्यात मल्हारराव हा कर्ता पुरुष होय. आजचे होळकरांचे वैभव याच पुरुषांने संपादिलेले आहे.

३. मल्हारराव होळकर तारीख २०-५-१७६६ रोजी मृत्यू पावला. मल्हाररावाचा जन्म ४-४-१६९३ रोजी झाला असल्याने मरणसमयी त्याचे वय ७३ वर्षाचे होते असे दिसते. त्याच्याबरोबर द्वारकाबाई व बजाबाई या दोघी स्त्रिया सती गेल्या. येथे गौतमाबाईच्या नावाचा उल्लेख नाही.

यावरुन मल्हाररावापूर्वीच गौतमाबाई मृत्यू पावली असावी असे वाटते. कारण ही सर्वात वडील स्त्री असून ती जर सती न जाती तर बरे दिसले नसते. या तिघींशिवाय मल्हाररावास हरकूबाई या नावाची एक

---

✻ ''श्रीकुळस्वामी देव खंडेराव व म्हाळसाबाई व बानाबाई, गड जेजुरी. जानाबाई, तळकोकण. धरमपुरी भवानी. तुकाई तुळजापूरची, तिसरी यमाई कवट्याची. चौथी, राजाबाई कवड्या डोंगराची. वीरोबा म्हाळोबा दोडीदाणुरीचा. बहिरोबा सोनेरीचा. बहिरजी नायकजी चिंगयादेव तळकोकणचा. वोहोळमुरमाची सटवाई, वाफगावची उदेगिरी सटवाई, माणकेश्वराची सटवाई, आहायरानी महारानी देव खंडेरावाचे गोंधळात कुंभारांनी ढाहग वाजवावी. कुळ, वीरकर, वीरवाल्ह्याचा वीरकर, दुसरे आडनाव होळकर. कुळ गोत्र जयवसी देवरुसी, कपिला गोकुळ मथुरा. दुसरी वसती, चितोडगड. तिसरी वसती मुंगीपैठण, चौथी वीरवोहोळ. पाचवी वसती वोहोळमुरुम, मोगलाई आहे. सहावी वसती, वाफगाव, पाटीलकी आहे. सातवी वसती कातराबाद मांडवगण, पाटीलकी आहे. आठवी वसती, चांदवड. नववी वसती महेश्वर नर्मदाकाठी, दहावी वसती इंदूर.''

खांडाराणी होती. मल्हाररावास खंडेरावाशिवाय उदाबाई व सीताबाई अशा दोघी मुली होत्या. होळकरांच्या कुळांत मल्हाररावापर्यंत एकाही पुरुषास एकाहून अधिक स्त्रिया नाहीत. मल्हाररावापासूनच अनेक राण्या दिसतात. यावरून 'बहुधनिकत्वात् बहुपत्नीकत्वम्' हे कालिदासांचे सूत्र अक्षरश: खरे असावे असे वाटते. असो. आताच सांगितलेला मल्हाररावांचा मुलगा खंडेराव हाच अहिल्याबाईचा पती होय. अहिल्याबाईचा जन्म कधी झाला हे खात्रीलायक सांगता येत नाही; परंतु सन १७८१ च्या एका पत्रात 'आपण पंचावन वर्षाच्या वृद्ध आहोत' असे बाई स्वत: म्हणते, त्यावरुन या बाईचा जन्म सन १७२५ मध्ये झाला हे सिद्ध आहे. इच्या जन्मासंबंधाने यापेक्षा विशेष तपशीलवार असे काहीच वाङ्मय उपलब्ध नाही. माणकोजी शिंदे या नावाचा एक धनगर जातीचा गृहस्थ औरंगाबाद जिल्ह्यातील बीड तालुक्यात चौंढेगावी पाटीलकी करून राहत असे. त्याच्या पोटी अहिल्याबाई सन १७२५ मध्ये जन्मास आली, असे आपण गृहित धरुन चालू. ही बाई रुपाने अगदीच साधारण अशी होती. हिला दोन भाऊ व एक बहीण होती, असे दिसते. परंतु ते सर्व तिच्या हयातीत निवर्तले. खंडेरावाचा जन्म तारीख २८-९-१७२३ रोजी झाला. त्याच्याशी अहिल्याबाईचे लग्न तारखी १४ मे १७३८ रोजी झाले. त्यावेळी तिचे वय चांगले तेरा वर्षाचे होते. खंडेरावास आणखी बायका होत्या व तो बराच व्यसनी होता. अहिल्याबाईस सन १७४५ मध्ये देपाळपुरास मालेराव नावाचा एक मुलगा व सन १७४८ मध्ये मुक्ताबाई नावाची एक मुलगी अशी दोनच अपत्ये झाली. पुढे तिचा पती खंडेराव कुंभेरीच्या वेढ्यात ता. १७-३-१७५४ रोजी गोळा लागून मरण पावला, तेव्हा बाईचे संसार सुख संपले. अहिल्याबाई जात्याच बुद्धिमती, चौकस व धोरणी असल्याने मल्हारराव होळकरावर तिचे मोठे वजन बसले. मल्हाररावाच्या हयातीतच बहुतेक कारभार तीच करीत असे. अहिल्याबाईवर सर्व व्यवहार सोपवून मल्हारराव निर्धास्तपणे मुलुखगिरीत गुंतलेला असे. सन १७६६ मध्ये मल्हारराव निर्वतल्यावर साहजिकपणेच होळकरशाहीची जबाबदारी या बाईवर आली. [1] तिचा मुलगा मालेराव हा वेडसर असून तोही मल्हाररावानंतर एकच वर्षाने ता. २७-३-१७६७ रोजी इंदूर येथे वेडाच्या लहरीत आरोळ्या मारुन मारुन मृत्यू पावला.

[2] त्याच्या मृत्यूची हकीकत प्रसंगानुसार पुढे येणारच आहे. त्यासमागे त्याच्या दोघी स्त्रिया सती गेल्या. पुढे अहिल्याबाईची ही दुःखद व असहाय स्थिती पाहून होळकराचा दिवाण चंद्रचूड याच्या सल्ल्याने राघोबाने बाईवर एकदम चाल केली; परंतु बाईने एकदम गायकवाड, भोसले वगैरेचे सहाय्य तुकोजीस मिळवून देऊन राघोबास परत फिरविले व एव्हापासूनच बाईच्या स्वतंत्र कर्तृत्वास सुरुवात झाली. यावेळी बाई चांगली चाळीस बेचाळीस वर्षाची असल्याने व तिने मराठेशाहीचा अंतर्बाह्य कारभार पंचवीस तीस वर्ष पाहिलेला असल्यामुळे तिच्यावर सहजासहजी कोणाचीही छाप बसणे शक्य नव्हते.[3]

४. मालेरावाचा मृत्यू होताच दहा पंधरा दिवसांतच ही राघोबाच्या स्वारीची धामधूम झाली. यावेळी बाई खरोखरी दुःखात अगदी चूर झालेली होती, पण अशा वेळीही तिने आपले दुःख बाजूला सारुन होळकरांचे राज्य बसविण्याचे कर्तव्य केले, हे पाहिले म्हणजे तिच्या कर्तव्य-क्षमतेची तारीफच करावीशी वाटते. इतके झाले तरी आनंदीबाई १७७४ मध्ये धारेच्या किल्ल्यात येऊन राहिली तेव्हा तिला अहिल्याबाईने शक्य ती मदतच केली. राघोबांने स्वारी केली त्यावेळचा राग त्याच्या पत्नीवर काढणे बाईस मुळीच आठवले नाही, यातच तिचे साधुत्व दिसते. यानंतर अहिल्याबाईने तुकोजीस जरी मांडीवर घेतले नाही तरी एकंदर स्वाऱ्या त्याने कराव्यात व राज्यव्यवस्था बाईने पहावी असे ठरले. परंतु पुढे तुकोजीस हे पारतंत्र्य न खपून त्याने अहिल्याबाईस जहागिरी देऊन स्वस्थ बसविण्याचा बराच प्रयत्न केला, पण बाई

---

*1. सन १७६६ त मल्हारराव होळकर मरण पावला, तेव्हा त्याचा कारभार माधवराव पेशव्याने मल्हाररावाची सून अहल्याबाई हिला सांगून बाहेर मोहिमा करण्यासाठी तुकोजी होळकराची नेमणूक केली. हा द्विमुखी कारभार बिलकूल यशस्वी झाला नाही. तुकोजीचें व अहल्याबाईचं तीस वर्षात कधींच पटले नाही.*

मराठी रियासत खंड -7 पान-16 ते 19

*2. ता. २१-८-१७६७ रोजी तुकोजीने माधवरावाकडून करार करून घेतला. या वेळी पेशवे चुलते-पुतण्यांची तेढ विकोपास चालली असून दोघेही तुकोजीस आपापल्या बाजूस वळवीत होते.*

मराठी रियासत खंड-7 पान- 16 ते 19

त्याच्या बारशाला जेवलेली. तिने त्यास मुळीस दाद दिली नाही. तिने महेश्वर हे आपले कायमचे राहण्याचे ठिकाण करुन तेथील किल्ला दुरुस्त केला व त्यावर दारु गोळ्यांची तजवीज करुन मोठ्या बंदोबस्ताने राहू लागली. या व्यवस्थेने तिला पुढे इतका आत्मविश्वास वाटू लागला की, एकदा तिने तुकोजी व महादजी या दोघांनाही युद्धास आव्हान केले व 'उभयंता चालून आले तरी आपण काही बांगड्या भरल्या नाहीत' असे खऱ्या वीरस्त्रीस शोभतील असे उद्गार स्त्री असून काढले. [4] थोरल्या माधवरावानंतरचा म्हणजे नाना फडणवीसाचा राज्यकारभार तिला फारसा पसंत नव्हता व नानाने हुजरात कमी केली ही मोठी चूक केली असे ती स्पष्टच बोलून दाखवित असे. परंतु नानाच्या राजनिष्ठेबद्दल ती धन्योद्गार काढीत असे व एकंदर पेशव्याच्या गादीबद्दल तिला फार आदर वाटत असे. तुकोजीच्या कारभारी नारो गणेश हा बाईचा द्वेष करी. कारण सैन्याच्या खर्चासाठी म्हणून बाईकडून येणाऱ्या रकमेचा हा खोटानाटा हिशेब तुकोजीस समजावून पैसे मधल्यामधे लांबवीत असे व पुन: वर बाई पैसे वेळेवर पाठवीत नाही अशी तक्रार करीत असे. ही त्याची तक्रार किती खोटी होती हे आपले सर्व हिशेब बाईने महादजीच्या एका इसमास दाखवून महादजी शिंद्याची खात्री केली. तेव्हापासून महादजीचे बाईविषयी फारच चांगले मत झाले. सारांश, बाई हिशेबात फार चोख होती व तिने

---

*3. पुढे ता. १२-४-१७६८ रोजी माधवरावाने चुलत्याशी लढून त्यास कैद केले, आणि तुकोजी चुलत्यास सामील आहे, असे कळल्यावरून ता. ८/६/१७६८ रोजी तुकोजी होळकर शिलेदार याजकडील दरोबस्त सरंजाम एकदम जप्त केला. त्यावरून पुढे दहाच दिवसांनी म्हणाले ता. १८-०६-१७६८ रोजी माधवरावाने गंगाधर यशवंताची जप्ती करून तुकोजी जप्ती उठविली. माधवरावाचा ओढा पहिल्यापसून अहल्याबाईकडे होताच. त्यांतून चुलत्याच्या वरील भानगडीमुळे आता तो दृढ झाला, आणि इत्तर संस्थानाच्या देवघेवीचा व्यवहार तुकोजीशी न करितां माधवरावाने अहल्याबाईशीच चालविला, (तह व करारमदार पृ. १६१) ही याद अहल्याबाईच्या नावाने लिहिलेली असून तीत तिसांचम सैन पासून तिसासितैनपावेतोंच्या (स.१७५८-६८ च्या) दहा वर्षाचा येणे असलेला ऐवज तिच्याकडे माधवरावाने मागितला आहे.*

मराठी रियासत खंड -7 वा, पान -16 ते 19

हा चोखपणा नाना फडणवीसासही पटवून दिला होता. त्याचा प्रकार असा; सवाई माधवरावाच्या लग्नपटीचे दोन लाख रुपये बाईने मागील बाकी पेटे द्यावेत असे तुकोजीने बाईस कळविले. तत्काळ बाईने 'मागील बाकी कोणती' असा उलट सवाल केला व मागील घेणे एक कवडी निघाली तर त्याच्या पाच कवड्या देईन असे बजाविले. पुढे तुकोजीने आपले म्हणणे परत घेतले व मग बाईने नानास रक्कम पाठविली.[6]

बाईच्या दानधर्माबद्दल निराळे सांगण्याची आवश्यकताच नाही. पण असे होते तरी राजकारणात तिने कोणाही साधुसंताची सल्ला ऐकिली नाही अगर घेतलीही नाही. समर्थांच्या शिष्य परंपरेतील परशरामदादा राजवाडकर हे मोठे साक्षात्कारी साधुपुरुष अहिल्याबाईच्या वेळी हयात होते. त्यांनी एकदा स्वत: बाईकडेस नारोगणेशाबद्दल रदबदली केली, पण बाईने ती ऐकली नाही. परंतु तुकोजीने नारोगणेशाची पुढे जेव्हा छळणूक केली, तेव्हा बाईसच त्याची दया येऊन तिचे कोमल अंत:करण पिळवटून गेले. अहिल्याबाई सर्वांचा विचार घेत असे, परंतु कोणाच्याच तंत्राने चालत नसे. कामकाजही ती निरलसपणे रात्रीच्यारात्री जागून करीत असे. घाशीराम कोतवालासारख्यांची प्रकरणे नाना फडणवीसाच्या कारकीर्दीत उपस्थित झालेली प्रसिद्ध आहेत. परंतु बाईच्या मर्जीतील म्हणून कोणीही प्रसिद्ध नाही व कोणाचा तसा जुलूमही आढळत नाही.[5] तुकोजीचे व बाईचे पुढे फारच बिनसले, तेव्हा सन १७७९ मध्ये तिने पेशव्यास पंचवीस लक्ष रुपये नजराणा देण्याचे कबूल करुन आपल्या मुलीचा मुलगा नथ्याबा यास दत्तक घेण्याची परवानगी घेऊन ठेवली होती. परंतु दत्तक घेतल्याचा कोठे उल्लेख नाही. कदाचित तुकोजीला दहशत म्हणूनही हे केले असावे.

---

*4. पुढे अप्टनने इंग्रजांचे युद्ध थांबविले, तेव्हा तीं दोघें फिरून धारेस गेली. तेथे बाईने फौज ठेवून भेलसा वगैरे महालांत दंगे फार केले, ते विसाजी गोविंद आठवले व खंडोराव यांनी जाऊन मोडले आणि अप्टनचा तह झाल्यावर बाईस पकडण्यासाठी धारेस वेढा घातला. स. १७७६ च्या जुलाईपासून नोव्हेंबरापर्यंत बाईनें मोठ्या शौर्याने लढून कांही काळ टिकाव धरिला. दादास हकीकत मुंबईस कळली. लढणे अगर बोलणे आम्हासी करावे, बायकामुलास तसदी द्यावी हे योग्य की काय? असे दादा अप्टनास लिहितो.*

मराठी रियासत खंड – 7 वा, पान– 16 ते 19

हा नथ्याबा पुढे सन १७९० मध्ये निवर्तला. सन १७९२ मध्ये बाईचा जामात निवर्तल्याने तिची मुलगी मुक्ताबाई सती गेली, तेव्हा 'आमचे दैवी तर दु:खेच पहावी' असे मोठे हृदयद्रावक उद्गार बाईच्या तोंडून निघाले आहेत. बाई आपल्या राजकीय हक्कास फार जपत असे. ठरावापेक्षा अधिक खंडणी तिने कधी पेशव्यास दिली नाही व महादजीच्याही मदतीसाठी म्हणून अधिक फौज पाठविली नाही. परंतु ती सर्वांचा परामर्श यथायोग्य घेत असे. आप्त, स्वकीय व शास्त्रीपंडित यास जरुर ती मदत वारंवार बाई करीत असे. मल्हाररावाच्या मृत्यूच्यावेळी त्याजवळ चाळीसकोट रुपये शिल्लक होते असे म्हणतात. ते बाईस एकदम मिळाले व त्यांच्याच लोभाने राघोबाने बाईवर स्वारी केली होती. हे सर्व द्रव्य तिने धर्मादायात खर्च केले असे दिसते. बाईचा खासगीचा खर्च सालीना फक्त दोन लक्ष रुपयांचाच होता. तुकोजी पुढे अर्धांग वायूने अपंगही झाला व व्यसनीही बनला होता हे पाहून, होळकरांच्या दौलतीची आपल्या पश्चात वाताहात होईल असे बाईस वाटत असे व त्यामुळे ती फार कष्टी असे. तुकोजीचा मुलगा मल्हारराव तरी आपल्या आज्ञेत सन्मार्गाने वागेल असे वाटून तिने त्यास आपल्या जवळ ठेवून त्याचे लग्न वगैरे केले. पण तो तर दुर्व्यसनात 'बापसे बेटा सवाई' असा निघाला. यामुळे बाईस किती वाईट वाटत असेल याची कल्पनाच करावी. अहिल्याबाईचे लग्नापूर्वीचे वय किती सुखात गेले हे कळण्यास आपणाजवळ काही साधन नाही. पण त्यानंतरचे तिचे आयुष्य आरशासारखे आपणांपुढे आहे. एका दुर्व्यसनी व लहरी पुरुषांशी तिचे लग्न झाले, एकदोन मुले होताच ऐन तारुण्यात तिला वैधव्य प्राप्त झाले, मुलगा होता पण तोही वेडाच होता. आपल्या वाड्यातील एका कुणबिणीशी गावातील एका शिंप्याचा काही वाईट संबंध आहे अशा नुसत्या संशयाने त्या शिंप्यास त्याने ठार मारुन टाकिले. पण पुढे हे कृत्य फार वाईट झाले असे त्यास वाटून तो आजारी पडला व वायूच्या लहरीत मोठमोठ्याने आरोळ्या मारु लागला व म्हणू लागला, 'मी तुझा भयंकर रीतीने सूड घेईन.' हे शब्द मरून गेलेल्या शिंप्याच्या तोंडचेच असावेत व तो शिंपी समंध होऊन आपल्या पुत्रास छळतो, असे वाटून बाईने त्यास परोपरीने समजाविले. पण तो स्पष्ट म्हणे, ''मी निरपराधी असताना मला तुझ्या मुलाने का मारिले? मला आता दूसरे काही एक

नको. मी जिवास जीव बळी घेईन तेव्हा तृप्त होईन!'' व शेवटी तारीख २७ मार्च सन १७६७ रोजी तो निवर्तला. बरे हा मुलगा जिवंत असताना याच्यापासून बाईस सुख होते म्हणावे तर तसेही नाही. हा असा अर्धवटच असल्याने सर्वांसच फार छळीत असे. ज्या ब्राह्मणास अहिल्याबाई पूज्य मानीत असे व दानधर्म करीत असे त्यासच तो नानाप्रकारे त्रास देत असे. 'तो ब्राह्मणास वस्त्रे, जोडे, भांडी इत्यादी जिन्नस दान घ्यावयास मोठ्या अगत्याने बोलावी, पण ती दाने त्यास देण्यापूर्वी तो त्यात विंचवासारखे विषारी प्राणी घाली. मग लोभी ब्राह्मणांनी ही दान घेतली व दंश झालेले ह्या स्वारीने पाहिले की, त्यास वाटे, झाले! आपले काम सोळा आणे फत्ते झाले! मग त्यास आनंदाच्या उकळ्या फुटत......' हे पुत्राचे चाळे पाहून अहिल्याबाईचे कपाळ उठे. यापासून तिला अतोनात दुःख होई. या प्रकारात तिचे दुहेरी दुःख असे. एक तर प्रजेचा विनाकारण छळ होत असे व दूसरे, स्वतःच्या मुलाचे वेडाचार. असे प्रकार झालेले ऐकले की, तिने कपाळास हात लावून म्हणावे, 'माझेच मुळी नशीब खोटे! नाही तर असला कुलदीपक माझ्या पोटी कशाला जन्मास येता!' असे मुलांचे वर्णन पुरुषोत्तमाने आपल्या अहिल्याबाईनेच चरित्रात केले आहे. हा मुलगा असा दुष्ट असल्याने अहिल्याबाईनेच त्याला हत्तीच्या पायी देऊन मारुन टाकिले, असा एक लोकप्रवाद प्रचलित आहे, पण तो सर्वस्वी खोटा आहे. तो मुलगा आपल्या मृत्यूनेच मरण पावला हे वर दिलेल्या हकीकतीवरुन उघडच होत आहे. मुलगा निवर्तल्यानंतर बाईस राजकारणाची चिंता रात्रंदिवस वहावी लागली. पुढे तिचा जावई निवर्तला व मुलगी मुक्ताबाई सती गेली. तिचे भाऊ व बहिणीही तिच्या देखतच हा लोक सोडून गेले. सारांश, विवाह झाल्यानंतर पुढील सर्व आयुष्य तिने दुःखातच काढिले, तथापि आपले कर्तव्य कधीही बाजूस सारिले नाही. अठराव्या शतकाचे शेवटले दशक या हिंदुस्थानात फार भयंकर गेले. प्रसिद्ध कवि मोरोपंत, हरिपंत, फडके, महादजी शिंदे, सवाई माधवराव, अहिल्याबाई, तुकोजी होळकर, नाना फडणवीस ही सगळी कमीअधिक प्रमाणाने कर्ती माणसे याच दशकात निवर्तली व यांचे जागी आलेले माणसे अगदीच निराळ्या प्रकृतीची होती. असो. अहिल्याबाई शेवटी काही दिवस आजारी पडून तारीख १३ ऑगस्ट सन

१७९५ रोजी आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षी निवर्तली. बाईने आपल्या हयातीत अनंतफंदीला सन्मार्गाला लावले. राघोबाला रणांगणातून परत फिरविले, प्रजेला आपल्या मुलाप्रमाणे वागविले. धर्मराजाप्रमाणे सर्वांस सारखा न्याय दिला व प्रभासपट्टण येथे १७२४ मध्ये नाश पावलेल्या सोमनाथाच्या मूर्तीची पुनःस्थापना केली. अहिल्याबाईने लोकांच्या सोयीसाठी जागोजाग अन्नछत्रे, धर्मशाळा, तळी, विहिरी व रस्ते बांधले आहेत. तीने काशीविश्वेश्वरांचे मंदिर व गया येथील विष्णुपदाचे मंदिर यांचे जीर्णोद्धार केले आणि कलकत्यापासून तो काशीपर्यंत भला बांधिला. अहिल्याबाईच्या औदार्याचा मासला तिच्या संस्थानांतच पहावयास मिळतो असे नाही, तर तो सर्व हिंदुस्थानात मिळतो. या सर्व ठिकाणी तिची अन्नछत्रे अजून आहेत. तिने बांधलेल्या देवळांपैकी काही काही तर प्रेक्षणीय आहेत. हर्दा हंडियाजवळ नेमाबरांत तिने जे एक देऊळ बांधले आहे, त्याची रचना अत्यंत नेत्रमनोहर असून, ते बाईचा इंग्रजी चरित्रकार जो मालकमसाहेब यास तर फारच आवडले होते. असो. आपल्या हिंदुस्थानात अलीकडेस ज्या पुण्यशालिनी स्त्रिया होऊन गेल्या त्यांत अहिल्याबाईचे नाव अग्रस्थानी नेहमी घालण्यात येते, ते किती योग्य आहे हे तिच्या या संक्षिप्त चरित्रावरुन सहज कळेल. अहिल्याबाईबद्दल मालकम असे म्हणतो, ‘बाईंचे चरित्र अत्यंत अलौकिक आहे.

ती स्त्री असून असून तिच्यात अहंमन्यता मुळीच नव्हती. तिला धर्माचे वेड विलक्षण होते. पण असे असूनही तिच्या ठायी परधर्मसहिष्णुता तितकीच होती. तिच्या देवभोळेपणाची शिकस्त झाली होती; तथापि आपल्या हाताखालील लोकांस जेणेकरुन सुख होईल या शिवाय इतर विचार तिनें मनास शिवू दिले नाहीत. तिने अनियंत्रित अधिकाराचा उपयोग फारच दक्षतेने व काळजीपूर्वक केला. ह्या कामी तिची नम्रवृत्ती कायम असून मनुष्यांने आपल्या सदसद्विवेकबुद्धीचे आदेश पाळणे जितके शक्य होते तितके तिने पाळले. तिचे स्वत:चे आचरण इतके जाज्वल्य होते, पण ते स्वत: पुरतेच असून ती दुसऱ्याच्या दोषांबद्दल क्षमावृत्तीच धारण करीत असे.

5. पुढे वंश नाही असे जाणून अहल्याबाईंनी जाणोजी बावाच्या मुलगा तुकोजी याजला ओटींत घेऊन गादीवर बसविले, असे वाक्य सरस्वती मंदिरांतील होळकर वंशावळीत आहे.

होळकरशाहींत उलाढाली करणारी तुकोजीची बायको रखमाबाई होय. तिचाच मुलगा मल्हारराव, सुभेदारांचे पत्र रखमाबाईस आले की, तुम्ही इंदूरास न राहतां, महेश्वरी मातुश्रीपासी असावे, त्यावरून ती थोडे दिवस महेश्वरी गेली; पण अहल्याबाईशी तिचे पटेना, तेव्हा परत इंदूरास आली. केसो भिकाजी तिचे भेटी गेला, त्याजला रखमाबाई म्हणाली, ‘ आम्हावर इतराजी सुभेदारांची निमित्य की, नारो गणेशाची सुटका करावी, म्हणोन आम्ही पत्रें श्रीमंतास (पेशव्यांस) लिहिली, पण हा आरोप लटका आहे. पुढे ता. ३/११/ १८९१ रोजी अहल्याबाईचा जावई वारला. तेव्हा रखमाबाईने संताजी होळकरास पाठवून तिला मना केले. भेटीस येऊ दिले नाही. रखमाबाई राज्यांत ढवळाढवळ करी, इंदूरास राहून देपालपूर, रातपूरा येथे कमाविसदारांस उपद्रव दिला. त्यांनी अहल्याबाईकडे तक्रार नेली की, तुम्ही ऐवज घेतला, आता आम्ही यांस कोठमन द्यावा, सन १७९४ च्या जुलाईत रखमाबाई मरण पावली. तिच्या अस्थि प्रयागास पोचवून गोत्रज गयावर्जन करून आला. असा उल्लेख १२/०८/१७९४ चा आहे.

मराठी रियासत खंड -7 वा, पान -16 ते 19

6. इंग्रजांच्या आक्रमणशक्तीची मार्मिक व्याख्या अहल्याबाईनें केली आहे. ती म्हणजे, “इंग्रजांची प्रबळता हिंदुस्थानांत फार जाली. इंग्रज सर होणे दुरापास्त आहे. त्यासं सर करण्यास सहाय एक श्रीमंत रावसाहेब पुण्याप्रताप ते केवळ अवतारीपुरूष. त्यांच्या कृपावीक्षणें मात्र मसलत सिद्धीस पावेल. वरकड व्याघ्रादिक श्रापदें बळ व युक्तीप्रयुक्तीने मारतील; परंतु आस्वलाचे मारणे फार कठीन आहे. सुरत धरून मारले तरच मारले नाही तर आस्वलाचे चपेटीत कोणी सांपडला तर गुदगुल्या करूनच आस्वल त्यास मारील. तद्धत् ही इंग्रजांची लढाई आहे. पाहता यांचे मारणे कठिण.

मराठी रियासत खंड - 6 वा, पान -132

7 (१७७९). तहाचे पूर्ततेसाठी हैदरानें महादजीचे निभावणीपत्र मागितले ते आणण्यासाठी नारो शिवदेव यास मुद्दाम नानाने महादजीकडे पाठविले. यावेळी दर्यातूनही पेशव्यांचे व इंग्रजांचे आरमाराची लढाई

*सारखी चालू होती. प्रथम हैदराने दिरंगाई चालविली, त्याजबद्दल वकिलामार्फत नानाने त्यांस फारच निकड लाविली आणि दादाचा मिलाफी बाजीराव बर्वे हैदराचे नोकरीत होता. त्यास दूर करविले, तेव्हा बर्वे हैदराचे अहल्याबाईचे आश्रयास गेला.*

*मराठी रियासत खंड -6 वा, पान- 166*

*8.1 सन १७८० च्या सुमारास सिंदेहोळकर माळव्यांत गेल्यावर गुलजारखान बीजागडच्या डोंगरांत भिल्लांचा जमाव करून राहिला. त्याने अहल्याबाईस पत्रें लिहिली, की, 'श्रीमंतानी कृपा करून बापरोटी विभागून द्यावी, आणि मजला चाकरी सांगावी.' त्याप्रमाणे बाईने पुण्यास लिहून पाठविले, ते जुळले नाही तेव्हा अहल्याबाईंने त्याजवर फौज पाठविले. आनंदीबाईने माळव्यांत असता,त्या बाजूच्या समस्त जमाव भिल्ल मवाली लोकांस आपलेसे करून ठेविले होते. त्यांचा जमाव आतां गुलजारखानाजवळ झाला. त्यास दादाकडून अभयपत्रे आली. पुढे त्याजवर नंदूरबार कडून गणेशपंत बेहरे व उत्तरेकडून अहल्याबाई फौज चालून आली. सुलतानपूरावर लढाई झाली. पुढे गणेशपंताचा पराभव झाला. नंतर गणेशपंत व होळकराची फौज एकत्र झाली.*

*मराठी रियासत खंड - 6, पान -179-180*

*8.2 चैत्र व ।। ११ स (३-५-१७८०) इंग्रजांची गांठ होळकराचे फौजेशी पडली. स्वतः तुकोजी हजर होते. लढाई चांगली झाली. काही लोक पडले. सहा धडकांनी पाटीलबावांकडील तोफा व सरंजाम आला. एक लढाई उत्तम प्रकारे इंग्रजांशी करावी, मग छावणीस फिरावे असे सरदारांचे मानस आहे. वरील लढाईसंबंधी अहल्याबाई म्हणाली, आम्हांकडील लोकांची कामे चांगली होतात. परंतु, उजेडात आणणार कोणी नाही. न होत्याचे उजेडास येते, दिवसच असे आहेत. नानास आलेल्या निरनिराळ्या इसमांच्या बातमीपत्रांतील हे उतारे आहेत.*

*मराठी रियासत खंड - 6, पान -194*

*8.3 इंग्रजांच्या या आक्रमणाले महादजी खचून गेला नाही. होळकरांचे घरांत अत्यवस्था होती. अहल्याबाई व तुकोजी यांचा बेबनाव होता. तो स्वतः भेटून दूर करावा अशी सूचना नानाने महादजीस केली. तदानुसार त्याने इंदूरास जाऊन कलह थोडाबहूत मिटविला आणि तुकोजी पुण्याच्या*

*कामगिरीवर रवाना केले.* मराठी रियासत खंड -6, पान- 206

*8.4 स १७८० च्या पावसाळ्यांत तुकोली गुजरातेतून इंदूरास आला तो महेश्वरास जाऊन बाईस भेटला नव्हता. ता. ९ नोव्हेंबर रोजी महादजी लिहितो, - होळकर इंदूराहून निघाले, बाईंची त्यांची समजूत पडली नाही. महेश्वरास जातात, की, खानदेशास परभारे जातात पाहावें, बाईस संशय आला की, बंदोबस्त करावा, परंतु, बाई सर्व, प्रथम चाकरीवर रूजू व्हावे, असे जरो बाई म्हणाली, तरी तुकोजी तिला भेटल्याशिवाय परभारें निघून गेल्याबद्दल तिला वैषम्य वाटून तिने पुण्यास तक्रार लिहून पाटविली.* मराठी रियासत खंड -7, पान -25

*8.5 पुढे नानाने हैदराशी तह केला, तेव्हा बाजीरावास हैदराने स. 1780 च्या मे महिन्यांत आपल्याजवळून काढून लाविले. तेव्हा तो पुनरपि दादाजवळ सूरतेस गेला. तेथून स. १७८१ चे आरंभी दादाने त्यास महेश्वर येथे अहल्याबाईचे आश्रयास पाठविले. महेश्वरी आल्यावर बाईने त्यास कांही दिवस सन्मानाने वागविले. परंतु तेथे त्याची घोडी, जवाहीर वगैरे जळून वाताहत झाली. त्यामुळे फौज बाळगण्याची सोय राहिली नाही. बर्वे महेश्वरास आल्याचे नानास समजताच त्याने बाईकडे माणसे पाठवून बर्व्यास पुण्यास पाठविण्याबद्दल तगादा लाविला. तेव्हा बर्व्याने बाईस विनंती केली की, आम्हास पुण्यास पाठवूं नका. एक वर्षभर आमची निष्ठा पाहून विदा करावे, प्रथम बाईने त्यास बरेच ताणले, पण मागाहून तो गयावया करू लागल्यावर एक दोन वर्षे तिने त्यास पुण्यास आश्रणांजवळ बंदोबस्ताने ठेविले. एक वेळ बाईने त्यास पुण्यास जाण्याची निकड केली, परंतु, बर्वे ऐकेनात, आपण जिवंत जाणार नाही, प्रेत रेवेपार कराल असे उत्तर केले.*

*१७ एप्रिल स. १७८२ रोजी पागेस आग लागून घोडी पळून गेल्यास, कापड व जवाहीर होते तेहीं जळाले, बर्वे पुनः पळून गेल्यास तुम्हास जबाबदार धरू, असे नानाने बाईंस दरडावून लिहून पाठविल्यावर, त्याजवर पहारा बसविला, म्हणून बर्वे उपोषण कंरू लागला, पुढे सालबाईचा तह पुरा होऊन दादाची उमेद सर्व संपली, तेव्हा बर्वेही उघडा पडला. फंदाफितूर करण्याची त्यास ताकद राहिली नाही. अहल्याबाईने नानाकडे मध्यस्थी करून तीनचार हजार रूपयांचा गांव द्यावयास करार ठरवून*

त्यास आदराने निरोप देऊन पुण्यास पाठविले. दादा कोपरगावास आला. त्यानंतर बर्वे सप्टेंबर १७८३ मध्ये बाईचा निरोप घेऊन पुण्यास गेला.
मराठी रियासत खंड -7, पान -287

8.6 ग्वाल्हेर हातची जाऊन महादजीवर एकामागून एक इंग्रज सेनापती चढाई करून येऊ लागले. तेव्हा त्याने दक्षिणेंत फौज घेऊन यावे म्हणून जो नानास आग्रह चालू होता. तो अर्थात बंद पडला. सदाशिव दिनकर नानास लिहितो, पातशहा व नजफखान यांनी इंग्रजांचा वकील काढून दिला. मोहिमचे तर्तुदेंत आहेत. शिप्रीस इंग्रज पलटणे आली, त्यांजवर अंबूजी इंगळे पाठविले, सिरोजेंही इंग्रजाचा दाब पडला.महेश्वरीहून अहल्याबाईंनी अंबूजी इंगळे याचा बाप त्रिंबकजी इंगळे यास दीड हजार फौजेनिशी रवाना केले. मागाहून सदाशिव मल्हार बक्षी बावांनी रवाना केले.
मराठी रियासत खंड -6, पान-219

8.7 महेश्वर येथे दादानें नर्मदेस घाट पूर्वीच बांधला होता. आणि देऊळ बांधावयास चौथरा घातला होता. त्यावर अहल्याबाईंनी देऊळ बांधण्याचे काम लावले( २-३-१७८३) म. रि. खंड 6 वा, पृ. क्र. 280

9. येथवर वर्णिलेला होळकरांचा गृहकलह मराठेशाहीच्या अवनतीचा एक उत्कृष्ट नमूना आहे. तो बंद करण्याचा उपाय एकच होता. तो हा की, यांच्या जाग्यावर दुसरे सरदार उभे करून राज्याचे काम चालविणे, परंतु हा जालीम उपाय करण्यास कोणी समर्थ झाला नाही. अहल्याबाईस हा सर्व शोचनीय प्रकार दिसत होता, तर तिनेच राज्याच्या हिताकरितां अशी सूचना का केली नाही? हिंगण्याने सुचविलेले उपाय नाना फडणिसाच्या आटोक्याबाहेरचे होते. अहल्याबाई, रामशास्त्री, हरिपंत, नाना व महादजी या सर्वास मराठशाहीतले हे गैर प्रकार स्पष्ट दिसत होते, पण दुरूस्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्यांत नव्हते. मराठी रियासत खंड -7, पान- 46

10. पैसा भरपूर मिळविला मल्हारराव होळकराने आणि तो अहल्याबाईच्या हवाली केला. मनांत आणले असते तर ती या अडचणीच्या प्रसंगी एक कोट रूपया सहज काढून देतो, पण तसें तिने केले नाही. म्हणूनच राज्यकार्याची उपेक्षा केल्याचा दोष तिच्याकडे येतो.
मराठी रियासत खंड -7, पान -124

11. होळकरशाहीचे शहाणपण आणि शौर्य या दोन गुणांत अनुक्रमे

*अहल्याबाई व तुकोजी यांची बरोबरी करणाऱ्या दुसऱ्या व्यक्ती महाराष्ट्रांत क्वचितच निपजल्या असतील असे समजतात, पैकी अहल्याबाईंचे ह्या राष्ट्रीय संकटास कसे तोंड दिले पहा. अखेरपर्यंत बाईंने स्वतंत्र असे काहीच साहित्य महादजीचे केले नाही.*

*मराठी रियासत खंड -7, पान - 134*

*12. पुढे महादजीनें तुकोजीची परवा न ठेवतां लष्कराच्या व हिमतीच्या जोरावर सर्व राजपुतांचा कारभार रगडून उरकला, याबद्दल बाईंने एकदाही त्याचे अभिनंदन केले नाही. उलट चित्तोडगड महादजीने सहज हस्तगत केल्याचे ऐकून तिला वैषम्यच वाटले. वर्तमान बाईस कळल्यावर संतोष असंतोष, संस्थान होळकरांकडील यांचे मार्फतीने तेथील जाबसाल धडावा तें न धडले. त्यामुळे असंतोष किल्ला घेतल्याचे पत्र महादजीचे आले नाही, व बाईंनीही त्यास लिहिले नाही.*

*मराठी रियासत खंड -7, पान - 242*

*13. **लाखेरीवर होळकराचा संहार (११ जून १७९३)***

*सिंदे होळकरांचे वैमनस्य हेंच मराठ्यांच्या राज्यनाशाचे मुख्य कारण असून ते सारखे वाढतच चालले होते. महादजीला उत्तरेच्या कारभारांत होळकराचा विरोध होऊन त्याचा संताप आला. पुण्यांत नाना फडणिसाने त्याचा इलाज केला नाही. महादजी पुण्यास आला, मागे तुकोजी उत्तरेतं राहिला. तेथे इरादा केला की, सिंद्याचा पाडाव करण्याचा हा समय आहे. अशा समयाची तयारी तुकोजी अहल्याबाई वगैरेंनी वर्ष दोन वर्षे सारखी चालविली असून पुण्यास येतांना महादजीने आपल्या सर्व हस्तकांस या धोक्याची सूचना निक्षून दिली  होती.*

*मराठी रियासत खंड -7, पान - 378*

## *होळकरांचा वंशवृक्ष*

१. मळिबाxभागाबाई रायज्याची मुलगी

2. गोविंदा स्त्री गंगाबाई कातरकरांची. — गोपाळाxराधाबाई पाडे याची

3. भवानी स्त्री भवानीबाई ज्याडकरांची.

4. खंडूजी स्त्री गंगाबाई बारगळाची.

5. महादबा स्त्री रमाबाई वणव्याची.

6. भिकाजी स्त्री राहीबाई लांबहात्याची. — लक्ष्मीबाई

7. संतूजी स्त्री सताऊ भिवयाची.

8. काशीबा स्त्री कोंडाऊ सिंद्याची — यमूबाई

9. मल्हारी स्त्री बाळाबाई वैदाची — मुक्ताबाई

10. बापूजी स्त्री बगाऊ सेळक्याची. — सकूबाई

11. तुकोजी स्त्री ताराबाई वाऱ्याची — यमूबाई — भागाबाई

12. बजाजी ऊर्फ मालजी स्त्री रमाबाई शिकऱ्याची. — गंगाजी — यमुनाबाई

12. बजाजी

13. महादबा स्त्री गंगाबाई. चांभारगोदे व मुंगीपयठणास गेले.

गोविंदा स्त्री गजराबाई भागवताची. हे कातरबाद व मांडवगणास राहण्यास गेले.

संतूजी ऊर्फ देंगूजी स्त्री द्वारकाबाई बुध्याची. हा वीर वाल्ह्यास राहिला वोहोळ मुरुम वाफगांवासी.

मुक्ता

भवानी

14. खंडूजी स्त्री गंगाबाई उर्फ जिऊबाई गवळ्याची वाफगांवी.

काशीबा कातराबाद मांडवगणास.

मालजी गोंद्यास

जिवाजी वाफगांव

राहीबाई

15. मल्हाराव स्त्री 1. गौतमाबाई, 2. बनाबाई, 3. द्वारकाबाई, 4. हरकूबाई खांडाराणी

16. खंडेराव स्त्री 1. अहिल्याबाई शिंद्याची. 2. पाराबाई वाघाची, 3. प्रीताबाई. 4. सुरताबाई, 5. खांडाराणी पोपाबाई.

उदाबाई

सीताबाई.

17. मालेराव स्त्री मयनाबाई बहाडाची. 2. प्रीताबाई वाघाची

मुक्ताबाई.

18. तुकोजी (जानोजीचा मुलगा अहिल्याबाईने ओटीत घेतला.) स्त्री रखमाबाई शिकऱ्याची.
2. रखमबाई मदकराची, 3. कृष्णाबाई. 4. राधाबाई लांबहात्याची. 5. देऊबाई मेंदल्याची. 6. यमूबाई.

18. तुकोजी स्त्री रखमाबाई शिकऱ्याची.

काशीरावी स्त्री 1. अनपुरनाबाई, 2. आनंदीबाई रावज्याची, भागाबाई.
3. अनाईबाई दगड्याची, 4. लक्ष्मीबाई बुध्याची.

18. तुकोजी स्त्री 2. रखमाबाई.

मल्हारराव स्त्री जिज्याबाई रावळ्याची.

18. तुकोजी स्त्री 3 कृष्णाबाई

19. विठोबा स्त्री नरवदाबाई, 2. रेवाबाई रावळ्यांची, 3. रमाबाई यशवंतराव चिमाबाई

20. हरिराव (दत्तक) स्त्री गहिनाबाई भागवताची 2. चिमाबाई ऊर्फ मैनाबाई
गहेनाबाई गिरण्याची, 3. हिरकाबाई.

21. खंडेराव (दत्तक) स्त्री देऊबाई रावळ्याची. 2. कडाबाई रावळ्याची. सकुबाई.
3. लाडाई फणशाची. 4. तुळसाबाई. 5. मासाहेबा.

मल्हारराव स्त्री जिजाबाई गांवड्याची, 2 लक्ष्मीबाई भीमाबाई
खांडाराणी अम्हेडकराची 3. गौतमाबाई गाढव्याची 22 तुकोजी

21. खंडेराव

22. तुकोजी ज्ञानेश्वर भाऊसाहेबांचा पुत्र (मासाहेबांनी ओटीत घेतला.)
स्त्री रखमाबाई गिरण्याची, 2. लक्ष्मीबाई खांडाराणी अम्हेडकरांची, 3. म्हाळसाबाई गुंडाची.
4. भागीरथीबाई फणशाची. 5. राधाबाई खिकऱ्याची. 6. पार्वतीबाई गुंडाची.

यशवंतराव

23. शिवाजीराव स्त्री वाराणसीबाई मतकराची.

सीताबाई सावित्रीबाई भीमाबाई ठकूबाई

23. शिवाजीराव स्त्री 2 गिरजाबाई बनसुड्याची

लीलाबाई

23. शिवाजीराव स्त्री सरस्वतीबाई गांवड्याची.

सुंदराबाई

24. तुकोजी महाराज स्त्री चंद्रावती महाराणी साहेब गावडे याची.
2. इंदिराबाई छोट्या महाराणी इंजिनियर यांची. वर्तमान 1925

# ५. खंडो बल्लाळ.

**जन्म इ.स. १६६८. मृत्यू, तारीख १९-९-१७२६.**

***दाता, वक्ता, योद्धा, तेजस्वी, मानधन, असामान्य।***
***अतुळे पितृप्रसादे मंडित देवव्रता असा मान्य।। मोरोपंत***

१. शिवाजीमहाराजांचा सर्वप्रसिद्ध चिटणीस बाळाजी आवजी ह्यास दुसऱ्या बायकोपासून दोन मुलगे झाले. त्यापैकी वडील मुलांचे नाव

खंडोबा असून दुसऱ्यास निळोबा म्हणत असत. बाळाजी आवजीस पहिल्या बायकोपासून आवजी नावाचा मुलगा झाला होता. संभाजीने बाळाजी आवजीबरोबर हत्तीच्या पायी दिलेला बाळाजीचा हाच मुलगा होय. खंडोबा नावाचा एक काका होता. तोही हबशाच्या रागास असाच बळी पडला. बाळाजीने ह्या आपल्या काकाचेच नाव आपल्या एका मुलास ठेविले होते व तोच आपला चरित्रनायक होय. मराठी साम्राज्याच्या इतिहासात खंडोबल्लाळाची कामगिरी अनुपमेय अशी आहे म्हणून तिचे वर्णन या चरित्रात यावयाचे आहे.

२. खंडो बल्लाळाचा जन्म इ.स. १६६८ मध्ये झाला. संभाजीचा प्रसिद्ध दिवाण कलुषा ह्यांच्या मनातून बाळाजीचा निर्वंश करावा असे होते. थोरल्या मुलासह त्याने बाळाजीस मारविल्यानंतर खंडोबल्लाळ व निळो बल्लाळ यांस वाघाच्या तोंडी द्यावयाचे ठरविले होते, परंतु मराठी साम्राज्याच्या सुदैवाने कलुषाचा हा दुष्ट बेत सिद्धीस गेला नाही. ह्याला मुख्य कारण संभाजीची पत्नी येसूबाई होय. कारण तिने ह्या बाबतीत आपल्या पतीची चांगलीच कानउघाडणी केली. ती म्हणाली, 'बाळाजीला मारविले हे आपण खरोखरीच ह्या राज्याचे नुकसान केले.[1] राज्याच्या अभिवृद्धीला जे पुरुष कारणीभूत झाले त्यांना निभवून घेण्यातच भूषण असते. त्यांना मारुन टाकल्याने जिवावर उदार होऊन राज्याची नोकरी करण्यास दुसरे लोक पुढे येत नाहीत.' येसूबाईच्या उपदेशाने संभाजीला कृतकर्माचा पश्चाताप झाला.

---

*1 : रायगडावर संभाजींने सन १६८१ च्या पावसाळ्यात सोयराबाईच्या कटामुळे जुन्या अनुभवी मंडळीचा वध केला, त्या संबंधाने तिने नवऱ्याला चार हिताच्या गोष्टी सांगून त्याला शांत केले. बाळाजी आवजीचा मुलगा खंडो बल्लाळ यास तिनेंच पुन: वडीलांच्या पदावर दाखल करविले.*

मराठी रियासत खंड - 2, पान-121

*2. येसूबाई शिवछत्रपतीची राणी सकवारबाई इत्यादींचा ताराबाईकडे अंतरस्य संदर्भ कैक वर्षे सारखा चालू होता. सभाजीपुत्र मदनसिंग व जोत्याजी केसरकर हे तर दोन पक्षांमध्ये सदा येरझारा करीत होते. खंडो बल्लाळ वगैरे निकटवर्ती गृहस्थ त्या कारभारांत प्रत्यक्ष भाग घेत होते. एवढ्या मोठ्या युद्धाचा मुख्य उद्देश शिवाजीच्या या नातवास सोडवून राज्यावर आणणे हा असून समस्त महाराष्ट्राचा ओढा त्याजकडे होता.*

मराठी रियासत खंड -3, पान - 43

मद्याच्या धुंदीत संभाजीच्या हातून बरेच अत्याचार होत असत. परंतु ती धुंदी उतरुन गेल्यावर येसूबाईच्या उपदेशाचा तात्पुरता तरी त्याच्या मनावर परिणाम होत असे.[2] बाळाजीला मारले हे आपण बरे केले नाही, असे वाटून त्याने खंडो बल्लाळांची मुक्तता केली व बापाचा चिटणीशीचा दरख त्यास दिला, इतकेच नव्हे, परंतु चिटणिसांच्या घरावरील जप्ती उठवून ते पुन्हा खंडोबाच्या स्वाधीन करुन दिले व तेव्हापासून खंडोबापासून चिटणिशींचे काम घेण्याची सुरुवात झाली.[3] ह्या वेळी खंडोबाचे वय अवघे १३-१४ वर्षाचेच होते. खंडोबाकडून चिटणिशीचे काम विशेषतः येसूबाईच घेत असे. राजमहालातसुद्धा खंडोबास फार जपून वागावे लागे, कारण संभाजीचा स्वभाव अत्यंत क्रूर होता हे त्याला ठाऊक होते. राजमहालामध्ये खंडोबा कधी वर मान करीत नसे. आपली दृष्टी आपल्या पायाकडेच ठेवून राजमहालात तो वागत असे. कारण त्याला नेहमी वाटत असे की, इकडे पाहिले तिकडे पाहिले एवढ्याच निमित्ताने कदाचित आपणांस प्राणास मुकावे लागेल. राजमहालातून जाऊन घरी आल्यावर

---

*3. आश्विन वद्य पक्षांत बहुधा धनत्रयोदशी म्हणजे ता. १२ ऑक्टोबर सुमारास खेड येथे लढाई होऊन शाहूस जय मिळाला लढाईचे वर्णन चिटणिसी बखरीत दाखल असलेले यथायोग्य दिसतें. "महाराज लढाईस सिद्ध जाले. धनाजी जाधव व प्रतिनिधी चाल करून आले परसीजी भोसले व चिमणाजी दामोदर यांनी घोडे चालवून लढाई केली. महाराजांनी चालून घेतले. प्रतिनिधी वगैरे मोड होऊन पळून गेले. त्याचे दहा पाच हजार स्वार सापडले. सेनापतींनी आपले विचारांतील सर्वास घेऊन घोड्यावरून उतरोन मुजरे करून भेटले. महारांजानी खेडच्या मैदानी मुकाम केला. लोकांनी सेनापतीच्या पदाची वस्त्रे बहुमान दिला. खंडो बल्लाळ यांसही चिटणिसी वस्त्रे दिली. "खंडो बल्लाळाने लढाईपूर्वी शाहूस गुप्तरूपें भेटून धनाजी व सरदार यांची खातरजमा करून सर्वांस महाराजांचे लक्षांत आणिले. भेट करून कपटयुद्ध करविलें, लढाई झाली, प्रतिनिधी पळून गेले. असा मजकूर चिटणिसास दिलेल्या सनदेत आहे.*

मराठी रियासत खंड -3, पान -48

*4. खंडोबल्लाळ यांचे मामा लिंगोशंकर व विसाजी शंकर राजापुरास सावकारी करुन राहत होते, त्यांची तारवेंही होती.*

मराठी रियासत खंड -2, पान -196

आपला पुनर्जन्म झाला असेच प्रत्येकवेळी त्यास वाटे. सारांश, असि-धाराव्रत म्हणून ज्याला म्हणतात, त्या व्रताच्या आचरणातच खंडोबा लहानचा मोठा झाला होता. संभाजीची स्वारी नित्य शिकारीस जाई. त्याच्याबरोबर खंडोबास कमरेला कमलदान लावून व बगलेत दहापाच कोरे कागद घेऊन चिटणिशीचा दरख संभाळण्यासाठी धावावे लागे. ह्यावेळी जरी खंडोबा चिटणिशीचा दरख होता तरी चिटणिशीचे सर्व उत्पन्न त्यास मिळत नव्हते; तथापि त्याचा मामा विसाजी शंकर याने खंडोबाचे कोणत्याही प्रकारे कमी पडू दिले नाही.[4] एकदा संभाजीची स्वारी फिरतीवर निघाली असताना नित्याप्रमाणे खंडोबा त्याचे बरोबर होता. इतक्यात रस्त्यातच जासुदाने काही पत्रे महाराजांस आणून दिली. त्यांचा जबाब तत्काळ लिहिण्यास संभाजीने खंडोबास आज्ञा केली व आपण पुढे चालता झाला. पत्रांचा जाब वगैरे लिहून पत्र रवाना करण्यास अर्थातच काही वेळ लागला, परंतु तेवढ्या वेळात स्वारी दोन तीन मैल पुढे निघून गेली. त्यामुळे खंडोबास धावत जाऊन पालखी गाठावी लागली. परंतु ह्या श्रमाने खंडोबास लागलीच रक्ताची उलटी झाली. हे पाहून संभाजीने त्यास स्वारीत फिरण्यासाठी घोड्याची आसामी करुन दिली.[5] त्यानंतर थोड्याच दिवसांनी संभाजीने गोव्यावर स्वारी केली. त्यावेळी इतरांबरोबर खंडोबानेसुद्धा मोठ्या बहादरीने समशेर गाजविली. ह्या स्वारीच्यावेळी सर्वांसच असे स्पष्ट दिसून आले की, चिटणिशी करीत असताना जितक्या सफाईने खंडोबा लेखणी चालत असे, तितक्याच सफाईने युद्धाच्या गर्दीमध्ये तो तलवारही चालवू शकत असे. ह्याप्रमाणे खंडोबा दिवसेंदिवस आपली हुशारी दाखवित थोर पदास चढू लागला. एकदा संभाजीची स्वारी संगमेश्वरी असता त्याची पत्नी येसूबाई तिकडे

---

*5. विशेषत: धनाजी व खंडोबल्लाळ यांचे अंत:करण निसंशय शाहूकडे होते. संभाजीच्या वधापासूनच त्याच्या या पुत्रास बचाव होण्यासाठी इतक्या वर्ष खटाटोप चालला होता.*

मराठी रियासत खंड -3, पान-44

*6. राजाराम जिंजीस पोहोचल्यावर मागाहून रस्त्यात फुटलेली सर्व मंडळी हलके-हलके येऊन त्यास मिळाली. याचे मुख्य श्रेय प्रल्हाद मिराजी व खंडोबल्लाळ यास आहे.*

मराठी रियासत खंड -2, पान-180

जाण्यास निघाली, इतक्यात रस्त्यात मोगल सरदाराने त्यांच्यावर छापा घालून त्यांना पकडण्याचा घाट घातला. ही हकीकत खंडोबास कळताच तो मोठ्या विचारात पडला. परंतु लागलीच खंडोबाने आपली मावस बहीण संतूबाई हिला येसूबाईच्या ऐवजी पालखीत बसवून पालखी रवाना करण्याची तयारी केली. इतक्यात मोगलांचा हल्ला आलाच व ते संतूबाईस येसूबाई समजून घेऊन गेले. येसूबाईच्या ऐवजी बसतांना संतूबाईने हिरकणी खाल्ली असल्यामुळे तिची अब्रू वाचली.[6] सारांश, खंडोबाने अशा प्रकाराने स्वराज्याची सेवा उत्तरोत्तर चढत्या प्रमाणावरच केली आहे.

३. संभाजीच्या पश्चात स्वराज्यावर फारच मोठे अरिष्ट कोसळले होते. सर्वांच्या अनुमतीने राजारामाची स्वारी जिजीकडे जाण्यास निघाली. त्यावेळी जी थोडी विश्वासातील मंडळी राजारामाबरोबर होती, त्यात खंडोबा हा एक होता.[7] विशाळगडावरुन सर्वांसच गुप्तपणे जावयाचे असल्याने सर्वांनी लिंगायत कापडकऱ्यांचा वेष घेतला होता. ह्यावेळी राजारामाबरोबर खंडो बल्लाळ, निळो येसाजी, प्रल्हाद निराजी, संताजी

---

*7. राजारामास जिंजी येथे पुत्र झाला तेव्हा खंडो बल्लाळ याजकडे चिटणिशी कायम केली, निलो बल्लाळ यास राजारामाने आपल्या नाटकशाळेचा पुत्र कर्णराज उर्फ कर्ण याजकडे कारभार दिला.*

मराठी रियासत खंड -2, पान-183

*8. सन १६९६ त. संताजी व धनाजी यांचा तंटा विकोपास गेला ते त्यांचे भांडण राजारामास आपसात मिटविता आले नाही हे दुर्भाग्य होय. प्रह्लाद निराजी जवळ असेपर्यंत राजारामाची व्यवस्था सुरळित चालली होती, पण तो सन १६९४ त जिंजी येथे मरण पावला तेव्हापासून राजारामाचा कारभार बिघडत गेला. पुढे जून १६९७ त संताजीचा वध झाल्यानं औरंगजेबास संतोष होऊन त्यानें जिजी हस्तगत करण्याविषयी जुल्फिकारखानास विशेष निकड लाविली. रामचंद्रपंताला ही सर्व अनुसंधाने अंतस्थ रीतीने कळत असून त्याने राजारामास जिजींतून निघून महाराष्ट्रांत येण्याविषयी आग्रह चालविला. त्या कामी शिकर्याचा उपयोग करावा अशी मसलत खंडो बल्लाळाने ठरविली. शिवाजीचा जावई गणोजी शिर्के व समस्त कुटुंब संभाजीच्या छळामुळे मोगलास जाऊन मिळाले होते हे संभाजीचे वधाचे वेळी सांगितलेच आहे.*

मराठी रियासत खंड -2, पान-215

घोरपडे, धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, सकाजी गायकवाड व रंगाजी भोसले इतकीच निवडक मंडळी होती, ह्या सर्वांनी वेषांतर करुन निरनिराळ्या रस्त्यांनी पहाटेस रस्ता चालावयास लागून रात्री ठरलेल्या ठिकाणी जमून दिवसभराचा आपला कार्यक्रम सांगावा, असा दररोजचा संकेत ठरलेला होता.[४] राजारामाच्या शोधासाठी मोगलही आपली शिकस्त करीत होते. अशा या धावपळीत व लपालपीत, एकदा एकदा राजारामास मोगलांनी ओळखले व त्यास पकडण्याचा घाट घातला. त्याला कारण असे झाले की, एकदा रात्रीच्या वेळी राजाराम शौचास जाऊन आल्यावर धनाजी जाधवाने त्याच्या पायावर पाणी घातले. पाणी घालणारा इसम नोकर असला पाहिजे व तो धनी म्हणजे राजारामच होय, असा राजारामाच्या पाळतीवर असलेल्या लोकांनी तर्क केला आणि आपसात कुजबुज चालवली. ही गोष्ट खंडोबाच्या लागलीच लक्षात आली व त्या संकटातून राजारामाचा बचाव असा करावा, ह्या विचारात तो मग्न झाला. इकडे कुजबुज करणारे लोक राजारामास पकडण्याची तजवीज करण्यासाठी तेथील यवन अंमलदाराकडे गेले. हे पाहून खंडोबाने राजारामाची तत्काळ रवानगी करुन दिली व पुढील संकटाला तोंड देण्यासाठी स्वतः सज्ज होऊन बसला.

त्यावेळी निळो येसाजी त्याच्या बरोबर असून बाकीची मंडळी निघून गेली होती. इतक्यात मोगलांचे धरणे आले व त्यांनी राजाराम तेथे नाही हे पाहून खंडोबल्लाळास व निळो येसाजीस यथेच्छ लाथा बुक्या मारीत पकडून नेले व अंधारकोठडीत पाच दिवसपर्यंत कोंडून ठेविले. ह्या पाच दिवसात या उभयतांना अन्नपाणी मुळीच मिळाले नाही, इतकेच नव्हे परंतु दुसरेही अनेक हाल सोसावे लागले. खंडोबल्लाळासारखे उपवास काढणे अथवा जिवावर बेतली असतानाही न डगमगता एक निश्चयाने वागणे हे तर राहूद्या एकीकडे पण एखादे दिवशी दोन घास कमी झाले किंवा एकादशी झाली की आमची कोण धांदल उडून जाते! मग कोठला धनी, कोठले स्वराज्य आणि कोठले काय! जोपर्यंत पदराला खार लागला नाही किंवा आपल्यापर्यंत आले नाही तोपर्यंत स्वदेशसेवा, देशबंधू, आत्मयज्ञ, स्वार्थत्याग, सत्यप्रियता, स्वदेशाभिमान, कर्तव्यजागृती, स्वराज्य प्रेम इत्यादी गोडगोड व चित्ताकर्षक शब्दांची बोलण्यात व लिहिण्यात मारे

रेलचेल उडवून देण्यात येते. पण किंचित्  कळ सोसण्याची का वेळ आली तर ह्या साऱ्या शब्दांचे कोशातल्या कोशात कसे विसर्जन होते याचाही मासला पुष्कळ वेळा पाहण्यास सापडतो. असो. खंडोबल्लाळादि मंडळींना यावेळी राखेचे तोबरे सुद्धा दिले पण आपण निव्वळ जंगम कापडी आहोत हे आपले म्हणणे त्यांनी अखेरपर्यंत सोडले नाही. शेवटी त्यांना छळणारासच असे वाटू लागले की, हे लोक खरोखरीच कापडी असले पाहिजेत. कारण यांचा आता प्राणच घेणे बाकी राहिले आहे. उलटे टांगून मारणे, डोक्यावर घोडे देणे, तोंडास गरम राखेचे तोबरे लाविणे ह्या सर्व शिक्षा आपण यास देऊन चुकलो, म्हणून आता यांच्या नादी लागून वेळ गमविण्यात काही अर्थ नाही, असा विचार करुन त्यांनी या मंडळीस सोडून दिले. याप्रमाणे यांची सुटका झाल्यावर हे राजारामास चंदीस येऊन मिळाले. पुढे थोड्याच दिवसांनी खंडोबाच्या मामाने खाशामास्त्रियांबरोबर खंडोबाच्या कुटुंबासही मोठ्या बंदोबस्ताने चंदीस रवाना केले. परंतु चंदीस आल्यावर खंडोबाची पत्नी म्हाळसाबाई लवकरच निवर्तली. त्यानंतर खंडोबांनी दोन लग्ने केली व दोघीही स्त्रियांसह आनंदाने संसार केला. खंडोबल्लाळाची एक मुलगी मुरारबाजीच्या पुतण्यास दिली होती. राजारामाने खंडोबाच्या या जावयास राज्यातील पोतनिशी दिली. त्यांचेच वंशज हल्लीचे पुण्याचे पोतनीस होत. राजारामाची स्वारी जिंजीस गेल्यावर झुल्फिकार खानाने जिंजीस वेढा दिला. जगाच्या इतिहासात जे पांच सात वेढे आहेत त्यापैकीच हा जिंजीचा वेढा होय. हा वेढा सात वर्ष होता. वेढा चालू असताना साताऱ्यास रामचंद्रपंत अमात्याकडेस काही

---

*9. तेथून महाराजांकडेस खानाने संधान केले की, फौजाची गांठ पडली असता बेशक लढाई करावी पण तुम्ही आमच्या गळां पडू नये, आम्ही तुमच्या गळां पडत नाही. पाठलाग कोणीहीं करू नये, तुम्हाकडील फौजेनें आम्हांशी लांडग तोड करीत असावे. असे संधान जिंजीवर खानाकडून आले. यांसह अवश्य कर्तव्य जाणोन यांनी आपला पुत्र राजा कर्ण व खंडो बल्लाळ यांजला खानाकडे पाठविले, ता. २-८-१६९७ रोजी कर्ण व खान यांची भेट वांदिवारा येथे झाली, आणि खानाला राजा कर्णांने पूर्ण वंश करून घेतले, म्हणूनच पुढे राजारामाला जिंजीतून सुरक्षितपणे बाहेर जाता आले.*

मराठी रियासत खंड -2, पान-214

महत्त्वाच्या राजकारणासाठी राजारामाने खंडोबास रवाना केले. यावेळी त्याचा वडील मुलगा बहिरवखंडो हा होता.[9,10] तेथून परत येताना त्रिवेदी अरुणाचल परगण्यात तारबियतखान नावाच्या मुसलमान अंमलदाराने खंडोबास एकट्यासच कैद केले. कारण बहिरव यावेळी तेथे नव्हता. जिंजीस जाण्याची अत्यंत उत्कंठा असल्याने या स्थितीत तो मोठ्या विचारात पडला. यावेळी कर्मधर्मसंयोगाने खंडोबावरील पहारेकरी हिंदू होता. त्यास खंडोबाने मोठ्या युक्तीने आपल्याकडे वळवून घेतले, तो खंडोबास सोडण्यास तयार झाला. परंतु खंडोबाच्या ऐवजी तेथे दुसरा कोणी तरी नगास नगर म्हणून पाहिजे असे त्याचे म्हणणे पडले. खंडोबाने त्या पाहरेकऱ्याकडूनच ही एकंदर स्थिती आपला मुलगा बहिरव यास कळवून त्यानेच आपल्या जागी बसावे अशी योजना केली व ती सिद्धीस गेली. मात्र यावेळी खंडोबाने कारागृहातून पळून जाताना कोटावरुन उडी मारल्यामुळे त्याच्या पायास मोठी इजा झाली व तो पुढे कायमचा लंगडाच राहिला. इकडे त्याचा मुलगा बहिरव यास मोगलाच्या अमलदारांनी मुसलमान केले. या मुलाचे पुढे काय झाले हे कळत नाही. कोणी म्हणतात या मुलाने पुढे मुसलमान होताच जीव दिला. कसेही असो, खंडोबाने राजकारस्थानात एक मुलगा आणि स्वतःचा पाय अशा दोन वस्तू कायमच्या गमावल्या. असो.

जिंजीचा किल्ला मराठ्यांनी सात वर्षे लढविला. परंतु मोगल काही परत फिरेनात. शेवटी तो सोडून निघून जाण्याखेरीज राजारामास दुसरा मार्ग दिसेना. यावेळी ज्या बाजूस शिर्क्यांचा नायनाट करण्याचा प्रयत्न केल्याने शिर्क्यांचे काही वंशज मुसलमानास जाऊन मिळाले होते व भोसल्यांचा नायनाट करण्याचा त्यांचा निश्चय होता. तात्पर्य, भोसले आणि शिर्के यांचे संबंध अशा प्रकारचे होते आणि अशा परिस्थितीमध्ये गणोजी शिर्क्यांचे मन वळविण्यास खंडोबाची योजना केली. खंडोबाने हे काम मोठ्या आनंदाने पत्करले. योजना धूर्तपणाची होती यात शंकाच नाही. कारण दुसरा कोणी त्याच्या जागी असता तर शिर्क्यांनी त्याला

*10. पंताना दहशत बसेल अशी सजा करण्याचे शाहूने मनात आणिले. खंडो बल्लाळास वर्तमान समजताच तो धावत महाराजांकडे गेला व अशा अविचारी क्रूर कृत्याने आपल्याच पक्षाची शक्ती कमी होईल*

मराठी रियासत खंड -3, पान -103

तेव्हाच धुडकावूनही लावले असते. पण संभाजीने ज्याप्रमाणे शिर्क्यांच्या काही पुरुषांचा वध केला होता त्याचप्रमाणे खंडोबाच्या बापाचा आणि भावाचाही बळी त्याने घेतला होता. म्हणून शिर्के झाले तरी खंडोबास काय बोलू शकणार होते. असा हा मोठ्या मौजेचा पेच होता व तो बिनतोड लागू झाला. खंडोबा रात्रीच्या वेळी शिर्के बंधूस त्यांच्या गोटात जाऊन भेटला व राजारामास वाट देण्यासाठी त्याचे मन त्याने वळविले. ज्याप्रमाणे सर्पाला आस्तिकाची द्वाही त्याप्रमाणे शिर्क्यासारख्या स्वराज्यद्रोह्यांना खंडोबल्लाळाची द्वाही मोठी रामबाण असे. राजारामास शिर्क्यांनी वाट तर दिली परंतु तिचा मोबदला म्हणून त्यांनी खंडोबाजवळून त्याचे दाभोळचे वतन आपल्या नावे करुन घेतले व खंडोबानेही ते मोठ्या आनंदाने दिले. सर्वस्वावर पाणी सोडण्यास तयार व्हावे तेव्हा स्वराज्याचे सुख मिळत असते. हे तत्त्व खंडोबाच्या रोमरोमी अगदी भिनून गेले होते. असो. यावेळी जिंजीवरुन राजाराम काही निवडक लोकांसह निघून साताऱ्यास आला. जनानखाना सुद्धा यावेळी बरोबर आणला नाही. जिंजीवरुन राजाराम निघून जाताच झुल्फिकार खानाने आपल्या बाहूटा येथे लाविला व मराठ्यांच्या कबिला कैद केला. यांत खंडोबल्लाळाची मंडळीही कैद झाली. मोगलामध्ये सुद्धा काही माणसे थोर मनाची होऊन गेली त्यापैकीच झुल्फिकार खान हा एक होता. खंडोबल्लाळाबद्दल त्यांचे मन फारच अनुकूल होते म्हणून त्याने खंडोबाच्या मंडळीस कैदी या नात्याने सुद्धा चांगल्याप्रकारे वागवले. खानाच्या बेगमचे नाव सरसाबाई असे होते. खानास मूलबाळ काहीच नव्हते. खंडोबास यावेळी एक मुलगी दीड दोन वर्षाची होती तिला सरसाबाई आपल्या डेऱ्यावर रोज खेळण्यास घेऊन जात असे. पुढे सरसाबाईला त्या मुलीचा फार लळा लागला व या मुलीस द्याल तर तुमची कैदेतून सुटका होईल असा निरोप खानाने खंडोबास पाठविला. निरुपाय म्हणून खंडोबाच्या मंडळींनी खानाची ही मागणी मान्य केली व जिंजीवरुन आपली सुटका करुन घेतली.

परंतु पुढे लवकरच म्हणजे इ.स. १६९९ मध्ये राजाराम निर्वतला व ताराबाईच्या तंत्राने राज्यकारभार सुरु झाला. पुढे औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत म्हणण्यासारखे असे विशेष काही झाले नाही. परंतु औरंगजेब मरण पावताच शाहूची कैदेतून सुटका होऊन तो दक्षिणेत आला. त्यास

सातारची गादी मिळविण्यास बराच त्रास पडला.

पण यावेळी सुद्धा खंडोबल्लाळनेच शाहूस उत्कृष्ट सहाय्य केले. याजबद्दलचा उल्लेख शाहून खंडोबल्लाळाचे चिरंजीव जिवाजीखंडो यास दिलेल्या सनदेत स्पष्टपणे केला आहे. त्यात असे म्हटले आहे की, ''आम्ही साताऱ्यास यावयास निघालो असता ताराबाईंनी आम्हावर फौजा देऊन सेनापती व परशराम त्रिंबक प्रतिनिधी रवाना केले. त्याबरोबर खंडोबास दिल्हे असता स्वामीस (म्हणजे शाहूस) गुप्तरुपे भेटून, सेनापती व सरदार यांच्या खातरजमा करुन, सर्वांना स्वामीचे लक्षी आणले.' याप्रमाणे खंडोबल्लाळाने आमरण स्वामीसेवा एक निष्ठेने केली. शाहू खेमसावंतांशी लढत असताना एकदा उतरडी वरुन घोड्यासह खाली घसरला. मागे खंडोबल्लाळ होता त्याने यावेळी मोठे प्रसंगावधान राखून घोड्याचा तोल संभाळिला व शाहूच्या जिवावरील संकट टाळले. परंतु एवढी राष्ट्रसेवा करणाऱ्या पुरुषास शेवटी फार हालात दिवस कंठावे लागले. कारण याची वतने आंगऱ्यांनी लाटून घेतली ती काही परत दिली नाहीत.[11]

खंडोबल्लाळ आपल्या वयाच्या पासष्टाव्या वर्षी म्हणजे स.न. १७२६ मध्ये निर्वतला. त्यांच्याबद्दल रियासतकार सरदेसाई हे असे लिहितात की 'एवढी राष्ट्रसेवा करणाऱ्या पुरुषाची अखेरीस दैन्यवस्था कायम राहिल्याबद्दल खेद वाटल्याशिवाय राहत नाही. संसार वाढला, प्राप्ती नाही तसेच दिवस कंठित होते. आपला वृद्धापकाळ, वतनपत्रे आंगऱ्याजवळून सोडवण्यास कुलाब्यास गेले. वर्षभर राहून मोठ्या खुशामतीने आगऱ्यांची वतनपत्रे घेऊन साताऱ्यास आले. पण कबूल केल्याप्रमाणे वतनाचा अंमल आगऱ्यांनी चालविला नाही. दहा हजार रुपये देणे झाले, त्याच दिवसात आयुष्य सरले. काळ झाला. कोणाचे मिंधे झाले नाहीत किंवा स्वार्थ पाहिला नाही, म्हणून दैन्य राहिले. पण हातून देशसेवा घडली. असाही बखरीतून उल्लेख आहे. याप्रमाणे या थोर राष्ट्रपुरुषाचे हे संक्षिप्त चरित्र आहे.

---

*11. बाळाजींने ही हकीकत महाराजांस कळविण्याकरिता अंबाजी पुरंदर याजला पांडवगडाहून साताऱ्यास पाठविले. अंबाजी व खंडो बल्लाळ यांचा स्नेह होता.*

मराठी रियासत खंड -3, पान-77

# ६. नानक

**जन्म इ.स.1469 मृत्यू इ.स. 22 सप्टेंबर 1539**

***।। सत्पुरूषकथा अद्‌भुत रसदा इजलाच म्हणती सुरभी मी,।। मोरोपंत.***

1. पंजाब प्रांतातील लाहोर जिल्ह्यात नानकाना म्हणून एक खेडेगाव होते. याच खेड्यास हल्ली तलवंडी असे म्हणतात. या तलवंडी गावी इसवी सन. 1469 च्या वैशाख वद्य तृतीयेस पहाटेच्यावेळी गुरू नानकाचा जन्म झाला. असे शीख ग्रंथावरून दिसते. गुरुच्या पित्याचे नाव काळूचंद व मातुश्रींचे नाव तृप्ता असे होते. काळू हा तलवंडी गावी अकाऊंट हिशोबी कारकून होता. हा जातीने क्षत्रिय होता. नानकाचा जन्म जरी वैशाखात झालेला आहे, तरी त्याचा जन्मोत्सव किंवा जयंती वैशाखात न करिता कार्तिक शुध्द पोर्णिमेस करतात. नानकाच्या जन्माच्या वेळची हकीकत शक्य तेवढ्या विस्ताराने शीख ग्रंथांत लिहून ठेवलेली आहे. त्याच्या जन्मकाळी दौलतान नावाची एक सुईण हजर होती. दुसरे दिवशी हरदयाळ नावाचा जोशी या नूतन अर्भकाचे ग्रह वर्तविण्यास आला. तेव्हा रीतीप्रमाणे त्याने मुलाच्या जन्मकाळी घडलेल्या गोष्टींची चौकशी केली. त्यावेळी त्याला दौलताना सुइणीने असे सांगितले की, हा मुलगा जन्मल्याबरोबर मोठ्याने हसला.

एकदा शहाणा मनुष्य विद्वानांचे सभेत विजयोत्साहाने जसे हास्य करितो व त्या हास्याचा ध्वनी जसा असतो, तसाच या बालकाच्या हास्याचाही होता, हे ऐकून मुलास पाहण्याची इच्छा त्या जोशास झाली व त्याने मोठ्या आग्रहाने त्यास चालकास बाहेर आणवून त्याचे निरीक्षण केले. नंतर तो म्हणाला, हा मुलगा छत्रधर होईल. या मृत्यूलोकांत व स्वर्गातही याच्या कीर्तीचा डंका वाजेल. फक्त हिंदूच नव्हेत, पण मुसलमानही यांचे शिष्यत्व पत्करून मोठ्या आवडीने यास पूज्य मानतील. हा निराकार देवाचा भक्त म्हणून प्रसिध्द होईल, परंतु अतिशय दु:खाची गोष्ट ही की, याची कीर्ती ऐकण्यास मी जिवंत असणार नाही. इतके सांगून हरदयाळ जोश्याने त्या बालकाचे मोठ्या आवडीने दर्शन घेतले व त्याचे नाव नानक ठेवावे, असे सांगितले. हाच बालक, म्हणजे नानक, पुढे शीख धर्माचा आद्य संस्थापक झाला व त्याने शेकडो अनुयायी मिळवले.

2. गोकुळ– वृंदावनाची ज्यांनी यात्रा केली असेल, त्यास हे ठाऊकच असेल की, तेथे कृष्ण लहानपपणी खेळला कोठे? कृष्ण बसला कोठे? तो निजला कोठे? तो जेवला कुठे? वगैरेबद्दलही माहिती तेथील क्षेत्रस्थ ब्राह्मण यात्रेकरूस सांगतात व काही स्थळेंही दाखवितात. तीच स्थिती नानकाना अथवा तलवंडी गावीही दिसते. नानकाच्या बालक्रीडांची स्थाने तेथेही दाखवितात येतात. गुरू नानकशाह लहानपणी जेथे खेळत असे व परमेश्वराची भक्ती करीत असे, त्या जागी राय बूलर नावाच्या जमीनदाराने नानकाच्या स्मरणार्थ म्हणून एक तलाव खोदविला होता. लाहोरचा सुभेदार झिकारखान हा होता व त्याचे हाताखाली कौडामल नावाचा एक मनुष्य होता. त्या कौडामलाने तळे पुढे फारच मोठे खोदवून बांधून काढले. त्याच कौडामलाने शीख धर्माच्या प्रसारार्थ पुष्कळच मेहनत केली व त्याचा प्रसारही बराच केला.

3. नानक पाच वर्षाचा असतानाच तांत्रिक बोल बोलू लागला होता. पुढे सात वर्षाचा झाल्यावर त्याला रीतीप्रमाणे शाळेत घातले, परंतु त्याची बुध्दी, धारणशक्ती, तर्क वगैरे पाहून त्याचा शिक्षक फारच खूष झाला. शिक्षकाने काही शब्द वगैरे लिहिण्यास सांगितले तर तो तत्काळ ते सर्व लिहून, प्रत्येक शब्दाची आद्याक्षरे घेऊन त्यांची उपदेशपर अशी एक कविता करीत असे. त्या कवितेंचे तात्पर्य असे असे की, परमेश्वर एक आहे व त्याचीच एकट्याची

भक्ती करणे हा आपल्या मानवाचा धर्म आहे. नानकाने या वयात केलेली काव्येही शीखांचा पूज्य ग्रंथ जो ग्रंथसाहेब त्यात सापडतात. याप्रमाणे कित्येक दिवस नानक शाळेत जात असे. एके दिवशी नानक अभ्यासाकडेस लक्ष देत नाही, दुर्लक्ष करितो, असे पाहून त्याचा शिक्षक रागावला तेव्हा नानकाने असे काही ब्रह्मज्ञान सांगितले की, ते ऐकून शिक्षक थक्क झाला व तुझ्यापेक्षा अधिक निदान मला तरी काही येत नाही, असे त्याने त्यास स्पष्ट सांगितले व लागलीच नानकानेही शाळेस रामराम ठोकला. यानंतर पुष्कळ वर्षे त्याने विचार करण्यात घालविली.

नानकाच्या बापास अभिवचन दिले होते व नुसत्या एकांतांत बसून किंवा जंगलात फिरून अगर निरनिराळ्या फकिरांशी वादविवाद करून अथवा नुसता विचार करून काही आपल्या मुलांचे पोट भरणार नाही, हे नानकाच्या बाप जो काळू त्याच्या पूर्णपणे लक्षात येऊन चुकले होते. म्हणून राय बूलरच्या सल्ल्याप्रमाणे काळूने नानकास पर्शियन शाळेत घालते, परंतु हिंदी शाळेत जो प्रकार घडला. पर्शियन शाळेत घालते, परंतु हिंदी शाळेत जो प्रकार घडला म्हणून मी आताच सांगितले. तोच व तसाच प्रकार  या नवीन पर्शियन भाषेतच काही काव्यें केली व ती ग्रंथसाहेबांत नमूद आहेत. पर्शियन शाळामास्तरानेही या मुलापुढे जेव्हा हात टेकले, तेव्हा अर्थातच त्याने वाटू लागले की, आपला मुलगा वेडसर आहे. या समजूतीने तर त्याला फारच दुःख झाले. नानकाचा नित्यक्रम म्हणजे दोन चारही वेळा बापाच्या मांडीशी ठोकून जेवावे व सर्व दिवसभर विचार करीत बसावे, असा चालू झाला. मुलगा निरुपयोगी घरी बसून राहतो हे पाहून बापाने एक धंदा त्याचेसाठी शोधून काढला. तो असा की, त्याने घरची ढोरे रानांत चारण्यास न्यावीत. दुसरे दिवसापासून त्याचा हा क्रम सुरू झाला. दिवसभर ढोरांनी वाटेल तेथे चरावे व यांने मात्र एका झाडाखाली बसून विचार करावा, नानकास जे पाहिजे होते ते या प्रमाणे अनायासेच प्राप्त झाल्याने त्यास फारच आनंद झाला असेल  या संशय नाही. परंतु दुर्दैवाने हे सुख नानकास फार दिवस लाभले नाही. एके दिवशी गुरांनी शेजाऱ्यांचे शेत् खाऊन फस्त केल्याची तक्रार शेजाऱ्याने नानकाच्या बापाजवळ आणिली व पुढे ती क्रमाने रायबूलर याजकडेस गेली. रायबूलरने नानकास सांगितले बोलाविले आणि हकीकत  विचारली. तेव्हा  फिर्यादी म्हणाला, महाराज, हा सकाळी आपल्या ढोराबरोबर रानांत येतो खरा, परंतु

ढोराकडेस मुळीच लक्ष देत नाही व एका झाडाखाली मात्र डोळे मिटून सर्व दिवसभर बसतो. या याच्या अशा दुर्लक्षामुळेच याच्या जनावरांनी माझे शेत खाऊन टाकिले. तरी याचा योग्य न्याय व्हावा. रायबूलरने नानकास त्याचे म्हणणे या बाबतीत काय आहे, असे विचारले, तेव्हा तो म्हणाला, फिर्यादीचे शेत माझ्या जनावरांनी खाऊन टाकिल्याचे अगदी खोटे आहे. परमेश्वराच्या कृपेने याचे शेत जसेच्या तसेच आहे. या म्हणण्याच्या सत्यतेसाठी रायबूलरने आपली माणसे ते शेत पाहण्यास पाठविले व आश्चर्य हे की, ते शेत अगदी जसेच्या तसेच पिकाने झाकून गेलेले असे सर्वांस दिसले. तलवंडीचे हे शेत असूनही दाखविण्यात येते व त्याला क्यारासाहेब असे म्हणतात. नानकाच्या आयुष्यातील हा पहिलाच चमत्कार होय.

४. आपला चरित्रनायक नऊ वर्षांचा झाल्यावर रीतीप्रमाणे त्याचा व्रतबंध करण्याची वाटाघाट सुरू झाली व पुढे यज्ञोपवीत धारणापर्यंतचे विधीही हरदयाळ नावाच्या उपाध्यायाने उरकून घेतले परंतु मुख्य जे यज्ञोपवीतधारणाचे कर्म ते काही नानक उरकू देईना. जानवे घातल्याशिवाय द्विज हा द्विजत्व पावत नाही, कारण तो जन्मतः शूद्र असतो, इत्यादी, पुष्कळ वैदिक व पौराणिक प्रमाणे तेथे उपाध्यायाने सांगितली, परंतु नानकास काही ती पटेनात, तो म्हणाला, शरीराने वाटेल ती पापे करावीत, चोऱ्या कराव्यात, लुच्चेगिरी करावी, खोटे बोलावे, परंतु जर शरीरावरील जाणवे तेथे काहीच त्यास आड येत नाही, तरर मग ते लुटुपुटूचे घालावे व पुण्यशील मनुष्यानेही ते घालावे, हे ढोंग आहे तरी काय?त्यापेक्षा दया हाच कापूस, शांतीचा दोरा, प्रसन्नचित्ताची ब्रह्मगांठ आणि सत्याचे पदर यांनी युक्त असे जाणवे तयार करून आत्म्यास ते घालावे, हेच हजारपटीने श्रेष्ठ होय. गुरू नानकाच्या या ब्रह्मज्ञानापुढे हरदयाळाची घटपटादि खटपट सगळीच लटपटली व तो निरुपाय होऊन निघून गेला. अर्थात हा समारंभ असाच पुढे रखडला असे दिसते. कोणाचाही आग्रह या बाबतीत चालला नसावा. निव्वळ नऊ वर्षांचे मूल, परंतु त्याचा आत्मविश्वास किती दर्जाचा होता, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

५. नानकास नानकी नावाची एक बहीण होती. जयराम नावाच्या इसमाशी तिचे लग्न झाले होते. नानकाच्या वयाच्या चौदाव्या वर्षी नानकाचेही लग्न झाले होते. त्याच्या पत्नींचे नाव सुलक्षणी असे असून, तिचे माहेर गुरूदासपूर

जिल्ह्यातील बटाला गावी होते. हे लग्न नानकाचा मेहुणा जो जयराम याने जुळवून आणले, असे कित्येकाचे मत आहे. नानकाच्या गृहस्थाश्रमाची फारशी माहिती उपलब्ध नाही. फक्त त्यास या कुटुंबापासून झाल्यावर सुध्दा नानकास ढोरे वळण्याचे काम करावे लागत असे. एके दिवशी भर दोन प्रहरी तो जंगलात एका झाडांखाली निजला होता व काही वेळ थांबबून लक्षपूर्वक नानकाकडेस पाहू लागल. तेव्हा त्याला असे दिसून आले की, सृष्टीनियमाप्रमाणे इतर झाडांच्या पडछाया सूर्याच्या विरुध्द दिशेस असून ज्या झाडाखाली गुरूनानक हा निद्रिस्थ होता, त्या झाडाची सावली काही तशी नव्हती. नानकास ऊन लागू नये अशाच रीतीने त्याचे शरीरावर ती पडली. वस्तुतः हा ईश्वरी चमत्कारच होय. कारण, प्रकाशाच्या विरुध्द दिशेनेच छाया पडली पाहिजे हा त्रिकालाबाधित सिध्दांत परंतु नानकावरील झाडाची छाया याही सिध्दांतास अपवाद झाली. हे झाड अद्यापही दाखविण्यात येते व ते पूज्य समजून लोक तेथे दर्शनास जात असतात. रायबूलरने ही हकीकत काळूस म्हणजे नानकाच्या बापास सांगितली व त्याला बजाविले की, नानक ही कोणीतरी सिध्द कोटीतील व्यक्ती आहे. जगाविषयी जे त्याचे औदासीन्य आहे. व तो जो एवढा नि:स्पृहपणाने वागतो, तो खरोखरीच कोणी महात्मा आहे. तू अंत:करणात नानकासंबंधाने पूर्णपणे समाधान मानून घेतले पाहिजे,

६. नानकाच्या असा क्रम कित्येक दिवस चालला, परंतु उपजीविकेस उपयोगी पडेल असा एकही धंदा त्याचे हातून होईना त्यांच्या मातुश्रीने व तीर्थरूपांनी त्यास पुष्कळ प्रकारांनी सांगून पाहिले, पण व्यर्थ उलट तो आपलेच तत्त्वज्ञान त्यास सांगत असे. त्याचा एक मासला सांगतो. एकदा त्याच्या बापाने त्यास शेतकी करण्यास सांगतले, तेव्हा तो म्हणाला उगीच जमीन खोदण्यात काय अर्थ आहे वास्तविक शरीराचे करावे शेत, त्यात सत्कृत्याचे पेरावे बी, त्याला नामामृताचे घालावे पाणी आत्म्याला करावा शेतकरी मग परमेश्वर निर्वाणांचे फळ त्या झाडास देईल. इतर शेतकी क्षणभंगुर व नश्वर असल्याने अगदीच कुचकामी होय, म्हणून मला ती पसंत नाही, मी ज्या प्रकारची शेतकी म्हणतो त्या प्रकारची शेतकी मी हल्ली करीत आहे. व तिचे फळ मला मिळेलच याप्रमाणे आपल्या सर्व आप्तांना निरनिराळया धंद्यातील तात्विक विचार सांगून त्यांने ऐहिक सुखासाठी कोणताही धंदा करण्याचे नाकारिले. तो वेडा झाला असे समजून वैद्यासही त्याची प्रकृती

दाखविली, परंतु काही उपयोग झाला नाही.

७. नानकाने व्यापार करावा म्हणून त्याच्या बापाने काही रूपये एकदा त्याला दिले. ते घेऊन तो जात असता रस्त्यांत त्याला काही साधू भेटले. व त्यांनी त्याजवळ काही खाण्यास मागितले. लागलीच नानकाने जवळचे पैसे खर्चून त्यांच्या भोजनाची व्यवस्था केली. साधु फार खूष झाले, परंतु रूपये नाहीसे झाल्याने बाप मात्र अतिशय रागावला व त्याने त्याला घरांतून घालवून दिले. नानक तेथून जो निघाला तो आपला मेहुणा जयराम यास अवचित भेटला. नानकाची विद्वता त्याला ठाऊक होती, म्हणून त्याने मुख्य सुभेदार जो दौलतखान जवळ त्याची पंडित या नात्याने शिफारस केली. त्यानेही नानकास कोठाऱ्याची नोकरी दिली. नानकास जो पगार मिळत असे, त्यातून स्वत:चे उदरपोषण होऊन जी बचत राहत असे, ती तो गरीबांच्या पोषणाकडेस खर्च करीत असे. याच वेळी मर्दाना नावाचा एक इसम नानकाचा खाजगी नोकर म्हणून त्याजवळ राहिला व तोच पुढे त्याचा पट्टशिष्य झाला. आपल्या रामदास स्वामींचा जसा कल्याण, तसाच नानकाचा हा मर्दाना होय. हा नानकाजवळ बसून सतार वाजवित असे व नानक भक्तीपर अशी स्वकृत पदे म्हणत असे. नानक नेहमी वेन नदीवर स्नानास जात असे. एके दिवशी तो गुप्त झाला व तेव्हाच परमेश्वर त्याच्याशी बोलला, असे ग्रंथसाहेबांत लिहिले आहे. परमेश्वराने या वेळी नानकास अमृताचा पेला दिला व त्याला आपल्या मतांचा प्रसार करण्यास आपण स्वत: साहाय्य करण्याचे अभिवचन दिले. यानंतर नानक परत आपल्या घरी आला व एकासारखे आपल्या इष्ट देवतेचे भजन पूजन करू लागला.

८. नानकास वेड लागले, असे समजून एकादा त्याजवळ पुष्कळ लोक जमा झाले. तेव्हा गुरू नानक म्हणाला, मला एकही खरा हिंदू अगर एकही खरा मुसलमान दिसत नाही. यावरून हिंदू- मुस्लिमानांचा सध्या नायनाट झाला आहे, असे मला वाटते. नानकाच्या या बोलण्याचा पुष्कळात राग आला व त्यांनी दौलतखानापर्यंत ही तक्रार नेली. दौलतखानाने नानकास व एका मुसलमान काजीस कचेरीस बोलाविले. काझीने सर्वांसमक्ष नानकास विचारले की, हिंदु- मुस्लिमांचा नायनाट झाला आहे, असे जे तू म्हणतोस याला आधार काय? नानकाने सांगितले तू मुसलमान असल्याने तू आपला तुझ्यापुरताच प्रश्न कर व मीही मुसलमानांचा नायनाट कसा झाला एवढेच

तुला सांगतो, ऐक बाबा मुसलमान होणे काही सोपे नाही. सांधूनी जो धर्म उपदेशिला आहे, त्यावर प्रीती करणे व अभिमान टाकून देणे हेच खऱ्या मुसलमानाचे कर्तव्य आहे. मरणाची भीती त्याने टाकली पाहिजे. परमेश्वराच्या आज्ञा त्याने मानल्या पाहिजेत, व सर्वाभूती वाटेल तेवढ्या भोंदू दाढीवाल्यास तो मुसलमान म्हणणार नाही. या प्रमाणे त्याने अनेक गोष्टी सांगितल्या. इतक्यात काझीची निजामाजी वेळ झाल्याने तो उभा राहून व बसून निमाज पढू लागला. तेव्हा मध्येच नानक एकदा त्याजकडेस पाहून हसला. नमाज आटोपल्यावर भरदरबारात काझीचा असा अपमान केल्याबद्दल नानकास जाब विचारण्यात आला. तेव्हा तो म्हणाला, जेव्हा हा काझी निमाजाची तालीम करीत होता, तेव्हा याचे मनात निराळेच विचार चालले होते. हा तेथे येताना, याने नुकतेच झालले शिगरू मोकळे सोडिले होते ते परसातील विहिरीत आता पडेल काय? अशी याला काळजी उत्पन्न होऊन याचे लक्ष तिकडेसच वेधून राहिले होते म्हणून मला हसू आले. काझीने ही गोष्ट स्पष्टपणे कबूल केली व नानकाचा जयजयकार होऊन बरेच लोक त्याचे शिष्य झाले. तुकाराम महाराज व मोरया गोसावी यांचीही अशीच एक गोष्ट प्रसिध्द आहे, किंबहुना साधूसंतांच्या अशा गोष्टी पुष्कळच असतात.

९. पुढे नानकाचे दैवी बळ पाहून दौलतखानानेंही गुरू नानकास सर्वस्व अर्पण करून आपण त्याचा शिष्य झाला. नानकाने यावेळी आपली कोठाऱ्याची नोकरी सोडली व आपल्या मताच्या प्रसारार्थ पर्यटनास निघाला. त्याच्या बरोबर त्याचा पट्टशिष्य मर्दाना काय तो आपल्या सतारसिध्द होता. नानकाची स्वारी प्रथम सईदपुऱ्यास गेली व तेथे लालू नावाचा एका सुताराच्या घरी उतरली. मलिकभागू नावाच्या तेथील पठाण अधिकाऱ्यांने चातुर्यासाठी एक मेजवानी दिली. परंतु नानक काही तेथे गेला नाही. पुढे त्या अधिकाऱ्याने न येण्याचे कारण नानकास विचारले, तेव्हा तो म्हणाला, मी कोणत्याही जातीचा अगर नानकास विचारले, तेव्हा तो म्हणाला, मी कोणत्याही जातीचा अगर वर्णाचा नसल्याने भोजनास आलो नाही. दुसरे, अशुध्द अन्न मी खात नाही. फक्त शुध्द अन्नच खातो. नीच जातीचा असलेला जो लालू सुतार त्याचे अन्न शुध्द कसे व आपले अशुध्द कसे? असे भागूने विचारले, तेव्हा नानकाने दोघांकडूनही ताट वाढून आणले व ती

ताटे झाकून ठेवून थोड्या वेळाने उघडून सर्वास दाखविली. तो भागूकडील ताटांत रक्तमांस असल्याचे सर्वास दिसले व लालूकडील ताटांत दूध निघाले. नानकाने भागूस सांगितले, तू लांच रिशवत खाऊन व लोकांस दु.ख देऊन द्रव्य संपादन करतो. म्हणून इतर लोकांपेक्षा जरी द्रव्याने तू श्रीमान असलास, तरीही प्रामाणिकपणाचा तुजजवळ अभाव असल्याने तुझे अन्न अगदी निषिध्द आहे. ते तू आताच पाहिलेस. परलोकी तुला याचा जाब द्यावा लागेल. हे ऐकून भागूस पश्चाताप झाला व तो नानक गुरूचा शिष्य झाला.

१०. या प्रमाणे उत्तरेस नानकाची स्वारी आपल्या मतांचा प्रसार करीत व विरुध्द मतवाल्यांशी वादविवाद करीत हिमालयापर्यंत गेली. कोठे धाकाने तर कोठे नम्रतेने, कोठे वाद करून तर कोठे युक्तीप्रयुक्तीने, कोठे मानवी अधिकाराने तर कोठे लोकोत्तर चमत्काराने, नानकाने आपले म्हणणे, आपले धार्मिक मत, सिध्द करून ते लोकांस ग्रहण करावयास लावले.मोठमोठे मुल्ला, मोठमोठे काझी, मोठमोठे अट्टल चोर, गठीये, मोठमोठे नास्तिकही त्याचे शिष्य बनले. या सर्व प्रवासाचा वृत्तांत फारच मजेदार आहे, परंतु तो सगळा सांगण्यास काही स्थलावकाश नाही. एक दोन ठिकाणची चित्तवेधक हकीकत मात्र सांगतो. हरिद्वारास नानकाची स्वारी असताना एकदा सकाळी नदीवर स्नानास गेली. तो त्यास असे दिसून आहे की, शेकडो ब्राह्मण पूर्वेकडील ओंजळी भरूभरून पाणी फेकीत आहेत. नानकाने असे करण्याचे कारण त्यास विचारले तेव्हा त्यापैकी एकजण म्हणाला, आम्ही ब्रह्मयज्ञ करितो व आमच्या पूर्वजास हे पाणी देतो. नानक म्हणला, तुमचे पूर्वज कोठे आहेत? तेव्हा तो म्हणला, येथून शे दोनशे कोसांवर माझे एक शेत आहे. त्याला मी हे पाणी पाठवित आहे. हे उत्तर ऐकून तर लोक फारच हसू लागले व नानकास वेडा म्हणू लागले. ते म्हणाले, हा किती मूर्ख मनुष्य आहे पहा. कुठे शेत व कुठे पाणी, हे पाणी याच्या शेतात कसे पोचणार? हे ऐकून नानकाने सांगितले, जर शे दोनशे कोसावर हे पाणी पोचणार नाही, अशी तुमची खात्री आहे? तर कोट्यवधी कोसांवर कसे पोचेल? हे ऐकून नानकाने सांगितले, जर शे दोनशे कोसांवरील स्थानासाठी पाणी फेकणारा जर नुसता मूर्ख असे तुम्ही समजता, तर कोट्यवधी कोसांवरील स्थानासाठी पाणी फेकणारे तुम्ही लोक महामूर्ख किंवा पढतमूर्खच असला पाहिजेत. हे तुमच्याच मताने व युक्तिवादाने नाही का ठरत, मग मलाच काय म्हणून

हसता? ज्या उद्देशाने तुम्ही पाणी हाताने पाणी फेकण्याची क्रिया करीत असता मनाने भलतेच काहीतरी चिंतीत आहात व म्हणूनच हा तुमचा खटाटोप व्यर्थ आहे. अशाच प्रकारचा पुष्कळ उपदेश केल्यावर अर्थातच लोकांचे मत नानक गुरूविषयी अनुकूल झाले व ते त्याचे शिष्य बनले.

११. नानकाने, काशी, गया, प्रयाग, मक्का, मदीना इत्यादी काणच्या यात्रा केल्या होत्या. प्रथम सारखा बारा वर्षेपर्यंत त्याने प्रवास केला, व नंतर मर्दानाच्या आग्रहावरून तो आपल्या जन्मभूमीस आला होता. तेथेही फार दिवस न राहता मातापितरास भेटून तो पुन: धर्मप्रसारार्थ निघाला. सर्व हिंदुस्थानावर त्याने पायीच प्रवास केला होता. सीलोनमध्येही तो गेला होता. मुसलमान बादशहा बाबर याचीही भेट गुरू नानकाने घेतली होती. नानक मक्केस असताना एकदा एका मशीदींत रात्री निजला तो आतील कबरीकडेस पाय करून निजला. एका मुसलमानानास हे खपले नाही व तो फारच रागावला. तेव्हा नानकाने त्यास शांतपणे सांगितले की, तुला हे जर आवडत नसेल तर माझे पाय तू उचलून फिरवून ठेव म्हणजे झाले, त्यात एवढे रागास येण्याचे काही कारण नाही. मुसलमानाने त्याप्रमाणे केले, तो चमत्कार असा झाला की, ज्या बाजूला त्या मुसलमानाने पाय फिरवले, त्या बाजूला थडगेही फिरून पायथ्याशी आले. हे पाहून तो मुसलमान फारच खजिल झाला. असाच चमत्कार नामदेवाचा गुरू जो विसोबा खेचर यानेही नामदेवास दाखविल्याचे प्रसिध्द आहे असो.

१२. नानकाचा पट्टशिष्य जो मर्दाना तो नानकाचे पूर्वीच काही दिवस वारला होता. पुढे नानकाने मर्दानाची जागा त्याचा मुलगा जो शाहजादा त्याला दिली. खादूर नावाच्या गावी लहणा नावाचा एक मनुष्य दुर्गादेवीचा कट्टर उपासक होता. परंतु नानकाच्या उपदेशाने तो शीख झाला व हाच पुढे नानकाच्या मागून त्याच्या गादीवर बसला. नानकाने आपल्या मृत्यूची वर्दी आपल्या आप्तेष्टांस अशीच आगाऊ देऊन ठेवल्याचे रिसबूड यांनी त्यांचे चरित्रांत लिहून ठेवलेले आहे. असो नानकाने अशी आगाऊ बातमी दिल्यामुळे त्याच्या दर्शनास फार लोक जमा झाले होते. इ.स. १५३८ च्या आश्विन वद्य १० दशमीस नानकाचे देहावसान झाले. मृत्यू नंतर त्याचे शरीर हिंदूपध्दतीप्रमाणे जाळावे किंवा मुसलमानपध्दतीप्रमाणे पुरावे असा त्याच्या शिष्याने त्यास प्रश्न केला होता. तेव्हा तो म्हणाला की, माझ्या

शरीरावर उजव्या बाजूस हिंदूनी फुले ठेवावीत व डाव्या बाजूस मुसलमानांनी ठेवावीत व मग ते शव एक रात्र झाकून ठेवावे. पहाट होताच उघडून पहावे. ज्यांच्या बाजूची फुले ताजी दिसतील. त्यांच्या पध्दतीप्रमाणे माझा अंत्यविधी करावा. हिंदूकडील फुले ताजी राहिली, तर माझे शरीर जाळून टाकावे व मुसलमानाकडील फुले ताजी राहिली तर माझे शरीर पुरून टाकावे. या आज्ञेप्रमाणे त्याच्या शिष्यांनी व्यवस्था केली व सकाळी पाहताच तो तेथे नानकाचे शरीर मुळीच नसून, दोनही बाजूची फुले मात्र अगदी ताजी अशी दिसत होती. नानकाच्या आयुष्यांतील हा शेवटलाच त्याने दाखविलेला चमत्कार म्हणावयाचा. श्रीरामभक्त कबीरांनेही आपल्या मृत्यूसमयी असाच चमत्कार दाखविल्याचे प्रसिध्द आहे.

१५. नानकाची मुख्य मते अशी होती की, (१) जातीभेद असू नये, (२) मूर्तीपूजा करू नये, (सर्वांनी निर्गुणाची उपासना करून मोक्ष प्राप्त करून घ्यावा) यापैकी मूर्तीपूजा करू नये, ते तत्त्व काही शीख लोकांनी पाळलेले दिसत नाही. क्यारा साहेब, ग्रंथ, पंचा साहेब वगैरे मूर्तीपूजेची प्रत्यक्ष उदाहरणे आहेतच. परंतु एक तर अगदीच हिडीस, चमत्कारिक व किळसवाणे उदाहरण आहे ते सांगून हे चरित्र संपवितो. शीखांचा दहावा व शेवटला गुरू गोविंदसिंग हा होता. एकदा पंजाबांतील मुक्तीसरोवर नामक गांवी गेला असता तेथे एके ठिकाणी शौचविधीस गेला. या शौचविधीचे म्हणजे गुरूगोविंदसिंगाच्या विष्ठेचे प्रस्तुत त्या गांवी एवढे प्रस्थ माजले आहे की, दरसाल लोक तेथे यात्रेस जातात व त्याचे मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतात. हा शौचविधी उर्फ ही विष्टा लेंडीसाहेब या नावाचे प्रसिध्द आहे. मूर्तीपूजेच्या विरुध्द असलेल्या गुरू नानकाच्या भक्तांनी हल्ली कोणकोणत्या मूर्तीची पूजा चालविली आहे हे जर आता प्रत्यक्ष नानक येऊन पाहील, तर त्यास काय वाटेल बरं? नानकाच्या समकालीन आपल्याकडील नामदेव हा होय. नामदेवानेंही पुष्कळ प्रवास केला असून उत्तर हिंदुस्थानांत त्यांची देवळे आहेत. ग्रंथसाहेब या ग्रंथात नामदेवाचींही काही कवने सापडतात असे शोधकांचे म्हणणे आहे. असा या प्रमाणे गुरू नानकाचे संक्षिप्त चरित्र आहे.

*कमीत कमी शब्दांत जागेच्या मर्यादेत एखाद्याच्या महान जीवनाला शब्दबद्ध करणं म्हणजे सागराला घागरीत सामावण्याचा असफल प्रयत्न करण्यासारखं आहे. असंभव! या सगळ्या भगीरथ प्रयत्नात काही ओंजळीतून निसटून राहून जाणे वगैरे होणारच. त्यासाठी वाचक मला उदार अंत:करणाने क्षमा करतील अशी आशा बाळगतो.*

*गुरुनानकदेवांच्या जीवनचरित्रावर गुरुमुखी लिपीत उदंड लिखाण झालंय; परंतु देवनागरी लिपीत त्या मानाने वाणवाच जाणवली. मूळ ग्रंथसाहेब गुरुवाणी वाणी प्रकाशनाने अनुवादित केलेली प्रत माझ्या संग्रही आहे; पण त्यात वाणी प्रधान आहे. कबीरासारखी गुरुनानक देवांची वाणी अनगढ, अभिव्यक्तीच्या पातळीवर अस्सल असल्याने त्यात आणखी विद्वत्तेचं प्रदर्शन न करता नैसर्गिक, अकृत्रिम, दुरुस्तीसुलभ कृत्रीमत्त्व नाही. तो अभिनिवेश कायम राखलाय.*

*गुरुनानकदेवांच्या बालपणी पंडित गोपाल जोशी संवाद, उपनयन संस्कार, सच्चा सौदा, विवाह मोदीखान्यात नवाबाघरची नोकरी, मशीदीत नमाज अदा करण्याचा प्रसंग पाहता वाचकांना आणखी जाणून घेण्याची उत्सुकता जागल्याशिवाय राहत नाही. यात काही संवाद मौलिक आहेत.*

*गुरुनानकदेवांची पहिली यात्रा सुलतानपूर लोधीहून १४९७ साली सुरू होऊन १५०९ पर्यंत चालली. या यात्रेत उत्तरभारतातील पश्चिम टोकापासून पूर्वेत आसाम-चीनच्या शांघाय पर्वतांचा विशाल परिसर सामावलाय. मानचित्रावर नजर टाकल्यावर बरेच अनावश्यक प्रश्न मनात येतील; पण परब्रह्म परमेश्वराला काहीही अशक्य नाही. संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात,*

*देवकरी तर काय होई। दगडाचिये नई तरीजेल॥ सूर्यकिरणावरी मुंगियाच्या हारी। अग्नीच्या पाठारी पीक होय॥ ज्ञानदेव म्हणे अघटित घडे। गुरुकृपे जोडे परब्रह्म॥*

*भक्ताचा संबंध ह्रदयाशी आहे. ह्रदयाचा संबंध भावनेशी तर बुद्धीचा विचाराशी. बुद्धीला तर्क प्रमाण लागते तर ह्रदयाला याची गरज नाही. संत चोखामेळा यांचा अभंग ही बाब आणखी स्पष्ट करतो.*

*संतांचा अनुभव संतचि जाणती। येर ते हासती अभाविक॥१॥ नामाचा प्रताप प्रह्लादचि जाणे। जन्ममरण तेणे चुकविले॥२॥ सेवेचा प्रकार जाणे हनुमंत। तेणे सीताकांत सुखी केला॥३॥ सख्यत्त्वे पूर्णत: अर्जुना बाणली। ऐक्यरुपे चाली मिरविली॥४॥ चोखा म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार। तेथे मी पामर काय वाणू॥५॥*

*गुरुदेवांच्या काळातही कल्पनाच केलेली बरी. ब्रह्मज्ञानाअभावी जनसामान्य कर्मकांडात गुंतले होते. बाला आणि मरदाना या दोघा मित्रांना घेऊन अनेक तीर्थांवर गुरुनानकदेवजी गेले. हरिद्वारच्या कुंभमेळ्यातल्या सूर्याला अर्घ्य (पाणी) अर्पण करण्याच्या प्रसंगातून वास्तव उलगडून गुरुनानकदेवांनी भ्रम दूर केला. सुमेरू पर्वतावर जाऊन योगी सिद्धजनांशीदेखील त्यांनी ज्ञानचर्चा केली. कृती-कीरत करा, काम करा-इतरांना नैवेद्य (घालून) भरवून मगच स्वत: खा. तिसरे नामस्मरण. अशी त्रिसूत्री गुरुनानकदेवांनी प्रतिपादिली. ओरिसातील जगन्नाथपुरीला वास्तविक आरती काय असते याला उलगडा केला. 'गगन मे थालु रविचंद दीपक बने' अशी विशाल आरती केली. सिक्कीमला जाऊन तिथल्या बौद्धधर्मीय लामांशी संवाद साधला. त्यांना खऱ्या भक्तीचा मार्ग दाखवला. त्यांच्या समस्त शंकांचे निरसन करून तिबेटच्या ल्हासा भागात बौद्ध अनुयायांचे मन जिंकले. चीनच्या शांघाय भागात अफूच्या आहारी गेलेल्या लोकांना त्या व्यसनातून बाहेर काढले. अतिदुर्गम भागातून हा जीवनप्रवास असूनही तो कुठेही खटकत नाही.*

*गुरूनानकदेवांचं दुसरं प्रचार अभियान १५१० ते १५१६ पर्यंतच आहे. यात भारताच्या उत्तर पश्चिम भाग, तर दक्षिणेत भार पार कन्याकुमारी सिंगापूर जकातीपर्यंत हे प्रचार अभियान पोहोचलं. या काळातील मानचित्रावर दृष्टिक्षेप टाकल्यावर आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. या सहा वर्षात न जाणो किती भिन्न भिन्न परिवेशातील लोकांचा उद्धार केला. त्यांच्या या भक्तीरुप लीलांचं गूढ त्यांच्याकडेच आहे. ही आध्यात्मिक यात्रा राजस्थानच्या आबू पर्वत, गुजरात आदि भागात जैन साधूंशी ज्ञानचर्चा करून महाराष्ट्र, म्हैसूर करीत कोलम्बोपर्यंत पोहोचली. अश्वनाथ येथील लोकांना*

*हठयोगाचा जटील मार्गातून सोडवून ज्ञानमार्गावर आणलं. सुरतीमध्ये स्थित केलं.*

*गुरुनानकदेवांची तिसरी यात्रा उतरभारतापर्यंत सीमित होती. हा कालावधी १५१६ ते १५१८ चा आहे. यात अतिदुर्गम पर्वतरांगा, डोंगरकडे, किर्रर जंगल, निबिड वनराजी, घाटीतून ही प्रचारयात्रा मार्ग काढत गेली. हिमाचलमधील चंबा–नरेशांची दीक्षा अत्यंत महत्त्वपूर्ण घटना आहे. नितांत सुंदर निसर्गरम्य वातावरणात भक्तीप्रेमाचे अमृत त्यांनी वाटले. तिबेट स्थित ल्हासाहून लद्दाख–लेहमधील लाभांना देखील ज्ञानामृत दिलं. कश्मीरच्या नंदनवनातील संभ्रात भ्रमितांना मार्गावर आणलं. कंधारीचं गर्वहरण करून उपदेश दिला. भक्तीच्या नावावर सगळं करताय; पण जगनिर्मात्याच्या सर्वश्रेष्ठ कलाकृती माणसाला दोन घोट पाणी पाजू शकत नाही? भाई लहणाजींशी भेट होते. कालांतराने भाई लहणाजी ब्रह्मज्ञान प्रगटीकरण अधिकारासहीत गुरु अंगददेवांच्या रुपात प्रगट होतात.*

*शेवटी एवढंच म्हणू शकतो की, गुरुनानकदेवजीचं जीवन पूर्ण संघर्ष व रोचक घटनांनी ओतप्रोत आहे. दोन्हींच्या मध्यात गुरुबाणी आणि आध्यात्मिक संवादासारखी ज्ञानवर्धक सामग्री आहे. या सामग्रीचा लाभ करून घेऊन सामान्य माणूस सत्यमार्गावर येऊ शकतो. कौडामधील सज्जनसारखे लोक आजही समाजात खूप आहेत. जे समाजाचं शोषण करत आहेत. अशाप्रकारे सियाल कोटला हमजा गौस पीराला अमृतमयी वाणीने शांत केलं. मरण खरं, जगणं खोटं शिकवलं.*

*गुरुनानकदेवांची चौथी प्रचारयात्रा १५१८ ते १५२१ दरम्यान पश्चिम प्रांतातील अरबदेशात गेली. हिंगलाजहून निघून तानमयानी बंदरापासून अदन (अरब) पर्यंत पोहोचणं देखील चमत्कार आहे. मक्काशरीफमधील जीवन नावाच्या मौलवीला सर्वत्रव्याप्त देवाचं घर दाखवल्यामुळे तिथला मुख्य मौलवी रुकनुद्दीन स्वतःच्या दर्शनार्थ चालून येणं अत्यंत अशक्यप्राय घटना होती. बगदादचा पीर दस्तगीर आणि त्याचा मुलगा 'पाताला पाताल लख आगासा'चं प्रत्यंतर–साक्षात्कार घडवला. अशाप्रकारे तेहरान, ताश्कंद, समरकंद, कंदहार, पेशावर करीत गुरुनानकदेव, अमीनाबाद पंजाबला पोहोचले. त्यावेळी बाबरचं आक्रमण झालं होतं. बाबर आणि गुरुनानकदेवजींचा संवाद म्हणजे पर्वणी आहे. उच्चकोटीच्या पीर फकीरांशी ज्ञानचर्चा म्हणजे चौथ्या प्रचारयात्रेची उपलब्धी होती.*

*शेवटच्या कालखंडात जनसामान्याला गुरु नानकदेवांनी केलेला उपदेश, कत्थू नंगलचे शेतकरी भाई सुग्धाजींचा मुलगा बाबा बुडढाजींशी गाठ पडण्याचा प्रसंग फारच रोचक आहे. अशाप्रकारे याच प्रचार टप्प्यात आला आहे.*

गुरुनानकदेवांच्या जीवनपटाचा शीर्षक आलेख

पंजाबच्या माध्यमिक, उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सरदार पालसिंह कृत पाचशे वर्षांच्या सर्वमान्य सनावळीनुसार गुरुनानकदेवजींच्या जीवनपटावर एक दृष्टीक्षेप

गुरुनानकदेवजींचा जन्म १५ एप्रिल १४६९,

तत्कालीन शिक्षक गोपालदासजी १४७५,

ब्रजलालजी १४७८,

मौलवी कुतबुद्दीन यांच्याकडे अरबीफारसी १४८२,

विवाह १४८७,

सुलतानपूर लोधी १४९०,

मुकलावा गौना १४९१,

थोरला मुलगा श्रीचंदचा जन्म १४९६,

प्रथम प्रचार यात्रा (उदासी) काळ १४९७,

करतारपूर भूमि खरेदी १५१०,

दुसरी प्रचारयात्रा (उदासी) १५११,

तिसरी प्रचार यात्रा १५१६,

चौथी व अंतिम प्रचारयात्रा १५१८,

करतारपूर वसवण्याचा कालावधी १५२२,

परमज्योतीत विलीन १५३९,

गुरुनानकदेवजींचा संक्षिप्त जीवनक्रम

पहिला टप्पा :

(१) जन्मकहाणी (२) बालपण (३) विद्याध्ययन (४) उपनयन संस्कार (५) नवीन मार्ग (सिद्धांत) (६) शेतीकाम (७) वास्तविक लाभ अर्थात सच्चा सौदा (८) विवाह (९) कीर्तन विरह वेदना (१०) सुल्तानपूर लोधीकडे प्रस्थान (११) सरकारी नोकरी (१२) तेरा नव्हे, तेरा तेरा (१३)

गौना (१४) भाई भगीरथ (१५) मनसुख नावाचा व्यापारी (१६) दाम्पत्य जीवन सुलभ, रुसवे फुगवे व त्यांचे निवारण, (१७) थोरला मुलगा श्रीचंदचा जन्म (१८) लक्ष्मीदासचा जन्म, घर सोडून प्रचाराला निघण्याचा मानस (१९) भविष्यातील योजना, (२०) मशीदीत नमाज

**पहिला प्रचार दौरा (उदासी)**

(१) भाई लालोजी (सैदपूर, पंजाब),
(२) हाकिम जालिमखान (सैदपूर, पंजाब),
(३) राय बूलरचे बोलावणे (तलवंडी, पंजाब),
(४) पशूवध (लाहौर, पंजाब),
(५) दूनीचंद (लाहौर, पंजाब),
(६) भाई मरदानाला बोध (उपल, पंजाब),
(७) भाई मरदानाचे शिक्षण (उपल, पंजाब),
(८) कुंभमेळा (हरिद्वार, उत्तरप्रदेश),
(९) वैष्णव साधूचं खंडन (हरिद्वार, उत्तरप्रदेश),
(१०) राजा विजय प्रकाश (गढवाल, उत्तरप्रदेश),
(११) अवतारवादाचे खंडन (कोटद्वार, उत्तरप्रदेश),
(१२) बद्रीनाथ मंदिर (चमाली, उत्तरप्रदेश),
(१३) सिद्धजनांशी संवाद (गुरुदेव सिमरु पर्वत कैलास तिबेट),
(१४) चंडीदेवीचं खंडन (अलमोडा, उत्तरप्रदेश),
(१५) तपोवनास भेट (नैनीताल घाटी),
(१६) गोरखमता - नानकमता (नैनीताल, तराईक्षेत्र
(१७) ऋण अदायगी (टांडा, उत्तरप्रदेश),
(१८) दिवाळी पर्व (अयोध्या, उत्तरप्रदेश),
(१९) त्रिवेणी घाटात चतुरदास नामक पंडितांशी गाठ (प्रयाग, इलाहाबाद),
(२०) अक्षयवटवृक्ष (प्रयाग, इलाहाबाद),
(२१) जागीरदास हरिनाथ (बनारस, उत्तरप्रदेश),
(२२) स्थानिक विद्वज्जनांशी संवाद (बनारस, उप्र),
(२३) निसर्गाचं अनमोल वरदान (गंगा नदीतर, पाटणा बीहार),
(२४) सालसराय जोहरी (पाटणा, बिहार),
(२५) सैद शेख वजीद सूफी (हाजीपूर, बिहार),
(२६) पंड्यांना उपदेश (गया, बिहार),
(२७) भिक्षू देवगड (बुद्धगया, बिहार),
(२८) युवक पालीला आशीर्वाद (चाईबासाच्या वाटेवर),
(२९) बसुते रहोतथा उजड जाओ (चाईबासाच्या वाटेवर),
(३०) डाकूचा उद्धार (केंदूरझरगढ, उडीसा),
(३१) चैतन्य भारतीचा उद्धार (कटक, उडीसा),
(३२) जगन्नाथपुरी रथयात्रा, (पुरी, उडीसा),
(३३) (पुनरावृत्ती),
(३४) पाखंडी साधूची भेट (पुरी, उडीसा),
(३५) कलियुगातील पंडे (पुरी, उडीसा),
(३६) शाह सुजाह (हावडा, बंगाल),
(३७) बडी संगत छोटी संगत (कलकत्ता, बंगाल),
(३८) भाई भूमिया (जयसौर, बांगलादेश),
(३९) ढाकैश्वरी मंदिर (ढाका, बांगलादेश),
(४०) झंडा वाढी (बढई) चाटो बांगलादेश,
(४१) राजा देव लूत (नागा पर्व, नागालैण्ड),
(४२) पदमा नरशोड (गोलाघाटा तत्कालीन कामरूप),
(४३) कामाख्या मंदिर (गुवाहाटी, आसाम),
(४४) पुजारी शंकरदेव (घूबडी, आसाम),
(४५) पारो (भूतान),
(४६) गंगटोक (सिक्कीम),
(४७) चुंगूथांग (सिक्कीम),

(४८) ल्हासा (तिबेट),
(४९) शांघाय (चीन),
(५०) नानकिंग,
(५१) पशूप्रती मंदिर (काठमांडू),
(५२) बंधुआ मजूर मुक्ती (रुहेलखंड, कानपूर),
(५३) भाई जसी (आगरा, उत्तरप्रदेश),
(५४) केशवदेव मंदिर (मथुरा, उत्तरप्रदेश),
(५५) भंजन दरवेश (दिल्ली),
(५६) सम्राट इब्राहीम (दिल्ली),
(५७) शेख शरीफ (पानिपत, हरियाणा),
(५८) नारीजातीचा सन्मान (करनाल, हरियाणा),
(५९) सूर्यग्रहण (कुरुक्षेत्र, हरियाणा),
(६०) पंड्यांना शिक्षण (पहैवा, हरियाणा),
(६१) बहिणीशी पुनर्भेट (सुल्तानूपर, पंजाब),
(६२) कुटुंबाची पुनर्भेट (तलवडी, पक्खोंड, धावे),
(६३) सूफी फकिरांना मार्गदर्शन (सिरसा हरियाणा),

**गुरुनानक देवजींचा दुसरा प्रचार दौरा**

(१) शाह सुहागिन (दीपालपुर पश्चिम पंजाब),
(२) कुष्ठरोग्यावर उपचार (दीपालपूर, पंजाब),
(३) शेख ब्रह्म (पाक पटन, पंजाब),
(४) गुग्गाचं खंडन (बीकानेर, राजस्थान),
(५) दरगाह ख्वाजा मोईननूद्दीन चिश्ती (अजमेर),
(६) पुष्करतीर्थ (अजमेर, राजस्थान),
(७) भाई मरदाना आणि कंदमूळ (अजमेर-चितौडगढ),
(८) अवतारवादाचे खंडन (चितौडगढ, राजस्थान),
(९) नाथद्वार पंड्यांचे ऐश्वर्य (उदयपूर, राजस्थान),
(१०) जैनीसाधू (आबू पर्वत, राजस्थान),
(११) विकल्पस्थान गया (भीम उडयार, गुजरात),
(१२) दलदल क्षेत्राचं पुनर्वसन (लखपतनगर, गुजरात),
(१३) वाममार्गीयांचे पुनर्वसन (लखपतनगर, गुजरात),
(१४) आशापूर्णिनी देवी (मांडवी, गुजरात),
(१५) कृत्रिम चिह्नांचे खंडन (द्वारका, गुजरात),
(१६) मूर्तीचं विसर्जन (पोरबंदर, सुदामानगरी),
(१७) नरेसी भगतचे गाव (जूनागढ, गुजरात),
(१८) डंडी संन्यासी मंडळ (गिरनार पर्वत),
(१९) भ्याड प्रवृत्तीचं खंडन (सोमनाथ भक्तीसमोर),
(२०) जैनी साधू अनभी (पालीताना, गुजरात),
(२१) सत्संगाचे माहात्म्य (भावनगर, गुजरात),
(२२) नामस्मरणाची महिमा (साबरमती, अहमदाबाद),
(२३) महाजनाकडून शोषण (बडोदरा, गुजरात),
(२४) शोषणकर्ते जमीनदार (सूरत, गुजरात),
(२५) ढोंगी गुरू,
(२६) नारी जातीचा अपमान अमरनाथ, ठाणे,
(२७) ज्ञान हेच गुरू (पुणे, महाराष्ट्र),
(२८) अश्लील मूर्तीची निभर्त्सना (रंगपट्टणम, कर्नाटक),
(२९) भिक्षा, वडिलोपार्जित वारशाचा अपमान (पणजी, गोवा),
(३०) देवदासी पंथाची निभर्त्सना (म्हैसून, कर्नाटक),
(३१) संगीत माधुर्य - संगीताची थोरवी (बंगळुरू, कर्नाटक),
(३२) पशुबळीची निभर्त्सना (पालघाट),
(३३) समय (श्वासाच्या सदुपयावर भर (कालीकट, कर्नाटक),
(३४) अनैतिक यौनसंबंधावर प्रहार (कोचिन, केरळ),

(३५) ढोंगीसाधूंना मार्गावर आणले (तिरुअनंतपुरम),
(३६) निसर्गसौंदर्यावर फिदा (कुमारी, अंतरोप, कन्याकुमारी),
(३७) राजा शिवनाथ भेट (मात्यकलम, कोलंबो),
(३८) कार्तिकेय मंदिरास भेट (कत्तरगामा, श्रीलंका),
(३९) एकेश्वरवादाच्या अस्तित्वावर परिसंवाद (श्रीलंका, वटिकोलबा बंदर),
(४०) बौद्ध भिक्षूकाशी संवाद (त्रिकोमली, श्रीलंका),
(४१) प्रेम हीच पूजा (अनुराधापुरा, श्रीलंका),
(४२) दिव्य ज्योतीची उपासना सर्वोत्तम (रामेश्वर, तामिळनाडू),
(४३) ज्ञान व श्रद्धा दोन्ही अनिवार्य (तंजावर, तामिळनाडू)
(४४) कर्म हेच प्रधान आहे. (श्रीरंगपट्टनम, तिरुचिरापल्ली, तामिळनाडू),
(४५) विवेकबुद्धी दोन्ही अनिवार्य (तंजावूर, तामिळनाडू),
(४६) श्रमिकांच्या समस्येचे निवारण (नागापट्टणम बंदर, तामिळनाडू),
(४७) श्रमिकांचा आंतरजातीय विवाह (जकार्ता, इंडोनेशिया),
(४८) आदिवासी तांड्याचे उत्थान (सिंगापूर),
(४९) कल्याणकारी त्रिसूत्री (कुआलालंपूर, मलेशिया),
(५०) आडंबराने देव पावत नाही (कुभकोणम्, तामिळनाडू),
(५१) परमेश्वराचा कोणी प्रतिस्पर्धी नाही (करानूर),
(५२) निसर्गाचे दृढनियम (पॉण्डिचेरी),
(५३) उज्ज्वल आचरणाने आत्मकल्याण (कांचीपूरम),
(५४) विचार कसोटीने शुभकर्म (तिरुपती मंदिर),
(५५) शनिदेवता खंडन (कुडूप्पा, आंध्रप्रदेश),
(५६) कपिलमुनीचा आश्रम (गुंटूर, आंध्रप्रदेश),
(५७) अवडंबर-भपक्यावर प्रहार (विजयवाडा),
(५८) मसकीनी पहलवान (हैदराबाद, आंध्रप्रदेश),
(५९) जनहितार्थ जलसुविधा (बीदर, कर्नाटक),
(६०) सैय्यद शाह हुसैन पूक्कड (नांदेड, महाराष्ट्र),
(६१) पातिव्रत्याची शिकवण (दौलताबाद, महाराष्ट्र),
(६२) ओंकारेश्वर मंदिर (खंडवा, मध्यप्रदेश),
(६३) साधसंगतीची महिमा (इंदौर, मध्यप्रदेश),
(६४) हृदयाची पवित्रता स्वीकारार्ह (उज्जैन, मध्यप्रदेश),
(६५) आदिवासी भिल्ल सरदार कौडाराक्षस (भीलवाडा, राजस्थान),
(६६) राजपूत चौधरी धर्मसिंह (जयपूर, राजस्थान),
(६७) तीर्थांची भटकंती व्यर्थ (रेवाडा, हरियाणा),
(६८) संसाराचे मिथ्यत्व (हिस्सार, हरियाणा),
(६९) श्रमिकामध्ये आस्थेची चेतना (बठिण्डा, पंजाब),
(७०) दौलतखानाची पुनर्भेट, सुल्तानपूर (पंजाब),
(७१) बापलेकात सैद्धांतिक मतभेद (तलवंडी, पंजाब),
(७२) भाई दादा, पक्खोके रंधावे (गांव) पंजाब,

(१) जीवन सार्थक करण्याची युक्ती (चंबा, हिमाचल),
(२) निर्गुण निराकार भक्तांची फलश्रुती (कांगडा, हिमाचल),
(३) अंधविश्वासाचे खंडन (ज्वालामुखी मंदिर, हिमाचल),
(४) निर्विघ्न प्रीतीभोज (वैजनाथ नगर, हिमाचल),
(५) ज्योतीस्वरुप प्रभूची अनुभूती (कुलू, हिमाचल),
(६) मनरूपी हत्तीवर गुरूशब्दाचा अंकुश (मनीप्पुरम, हरियाणा),
(७) हरिनामाचं धन कमावण्याची प्रेरणा (मंडी, हिमाचल),
(८) रुपयौवनाचा अभिमान नको (खालसर, हिमाचल),
(९) काल्पनिक देवतांचे पूजन व्यर्थ (विलासपूर, हिमाचल),
(१०) गडरिये बूढनला आयुष्य (कीरतपूर, पंजाब),
(११) भूमि पंचायतला मिळाली (नालागढ, हिमाचल),

# ७. अहमदशहा अबदाली

**जन्म इ.स.१७२४, मृत्यू इ.स. १७७३**

***दाढीके रखनेवाले, काबूलकंदाहरवाले***
***खांडेसे लढनेवाले, जेगसे न हटनेवाले***
***सृं सूं सणणण बाणोंकी, बरसात बरसनेवाले***
***– द्वु. आ. तिवारी***

मराठ्यांच्या इतिहासामध्ये पानिपत प्रकरण अत्यंत महत्त्वाचे असल्याने ते सर्वत्रास परिचित असे आहे. सन १७६१ च्या जानेवारीच्या १४ व्या तारखेस पानपतावर मराठे आणि गिलचे यांचे शेवटचे युध्द होऊन मराठ्यांचा पराजय झाल्याची हकीकत इतिहासप्रसिध्द आहे. या युध्दामध्ये मराठ्यांच्यातर्फे मुख्य सेनापती सदाशिवराव भाऊ असून मुसलमानांच्या बाजूने कंदाहारचा बादशहा अहमदशहा हा होता. या अहमदशहाचे चरित्र आज वाचकास सादर करावयाचे आहे.

## *पूर्वचरित्र*

हयादखान, अब्दुल्लाह खान, झमानखान, अहमद, अशी ही परंपरा आहे. हयातखान हा १७१४ च्या सुमारास हिरातच्या असमंताद्भागी येऊन राहिला व त्याने तेथे लवकरच अबदाली या जातीच्या लोकांचे आधिपत्य स्वीकारले. या अबदाली लोकांची वसती हिरात जवळील डोंगरी मुलुखांत असे. अबदाली जातीमध्ये सद्दोझाई नावाची एक पोटजात आहे. या सद्दोझाई जातीस इतर लोक पूज्य मानतात. चरित्रनायक अहमदशहा हा या सद्दोझाई जातीचा होता व म्हणून याचा पूर्वज्ञ जो अब्दुल्लाखान यास आपल्या बापाच्या मागे लवकरच पुढे येण्यास वाव मिळाला, परंतु राजा होण्याच्या महत्त्वाकाक्षेमुळे अब्बासकुलीखान नावाच्या हिरातच्या सुभेदाराने अब्दुल्लाखानास कैदेत टाकिले. पुढे लवकरच कझलबाशी लोकांनी अब्बासकुलीखानास हिरातमधून हाकलून लावल्यामुळे अब्दुल्लाखानाची सहजच कैदेतून सुटका झाली. अब्बासकुलीखानानंतर जाफरखाना हा सुभा झाला परंतु अब्दुल्लाखानाने थोडेसे सैन्य जमवून जाफरखानाचा पराजय केला व त्यास कैदेत टाकून स्वत:च तेथील सुभा बनला: पुढे कित्येक वर्षांनी नादिरशहाने हिरात काबीज केल्यावर त्याला तेथे जुलफिकारखान अबदाली व अहमदखान अबदाली हे दोघे बंधू कैदेत असलेले आढळले. नादिरशहाने या उभयता बंधूस गिलजाइजांच्या  कैदेतून मुक्त करून मझिंदरत येथे जहागीर देऊन त्यांनी शांततेने राहावे, अशी तजवीज केली, परंतु त्यांच्यावर पूर्णपणे लक्ष ठेविले होते. अहमदखान हा लहानपासूनच शूर, चाणाक्ष व चतुर आहे, अशी नादिरशहाची खात्री झाल्याने अहमदखानाबद्दल नादिरशहाच्या मनात फार आदर वसत होता. नादिरशहाने हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हा अहमदखान त्याचे बरोबर होता. हाच अहमदखान पुढे अहमदशहा या नावाने प्रसिध्द झाला. याचा जन्म सन १७२४ चे सुमारास झाला असावा असा अंदाज आहे.

अहमदशह स्वतंत्र झाल्यावर त्याने आपली अब्दाली हे नाव बदलून दुर्राणी हे नवीन नाव घेतले, असे करण्यात विशेषत: काही धर्मभोळेपणा होता असे म्हणतात. म्हणजे अब्दाली हे नाव अपेक्षी असून दुर्राणी हे नाव विजयासाठी व यशस्वी आहे, अशी त्याची समजूत होती. या

अशा समजुती सर्व देशात सर्वच काळी असतात, तेव्हा त्याबद्दल कोणी कोणास नावे ठेवण्याचे कारण नाही. तारीख १९ जून १७४७ रोजी नादिरशहाचा खून झाल्यावर अहमदशहा स्वतंत्र झाला व लवकरच त्याने दिग्विजयास सुरूवात केली. प्रथम कंदाहार काबीज करून त्याने नादिरशहाची तीस लक्ष रुपयांची ठेव स्वाधीन करून घेतली. या स्वारीचे वेळी दुर्राणी, कझलबाशी, बलुची व हजार या जातींच्या लोकांनी अहमदशहास फार मदत झाली.

सन १७४७ चा हिवाळा त्याने कंदहार येथे राहून तेथील राज्यव्यवस्था सुरळितपणे चालू केली. नंतर सन १७४८ च्या वसंतऋतूंत बारा हजार दुर्राणी फौज बरोबर घेऊन तो कंदहारहून निघाला. त्याने प्रथम गझनीवर स्वारी करून नादिरशहाचा तेथील सुभा पिटाळून लावला. अहमदशहाची महत्त्वाकांक्षा हिंदुस्थान जिंकण्याची होती. हिंदुस्थान जिंकल्याने त्यास द्रव्य व कीर्ती अशा दोनही गोष्टींचा फायदा होणार होता. हे त्यानी नादिरशहाचे स्वारीचे वेळी प्रत्यक्ष हिंदुस्थान पाहून ठरविले होते, म्हणून त्याने मोठ्या पराक्रमाने काबूल पेशावर काबीज करून सिंधू नदी उतरून एकदम हिंदुस्थानात अटक येथे प्रवेश केल व ते काबीज केले. त्यानंतर तेथून तो लाहोरास आला. हे पाहून तेथील सुबा शहानवाजखान याने एकदम दिल्लीस पलायन केले. हे पाहून तेथील सुबा शहानवाजखान याने एकदम दिल्लीस पलायन केले. अहमदशहाने लाहोर सावकाशपणे लुटले. नंतर अहमदशहा सरहिंदपर्यंत आला, तेथे दिल्लीच्या बादशहाच्या सैन्याची व त्याची मोठी लढाई होऊन त्याचा पूर्णपणे पराजय झाला. यामुळे अब्दालीने हिंदुस्थानांत पुढे येण्याचा बेत रहीत करून एकदम तो स्वदेशास निघून गेला. यावेळी पंजाबात शिखांनी त्याच्या फौजेच्या पिछाडीवर हल्ले चढवून त्याला अगदी जर्जर करून टाकीले व पंजाब प्रांत त्याच्या हातून सोडविला. अहमदशहाची ही हिंदुस्थानावरील पहिली स्वारी होय.

अहमदशहा या प्रमाणे पहिल्या वेळी परत गेला, परंतु या प्रथमग्रासे मक्षिकापाताने तो हताश होणारा नव्हता. हिंदुस्थानातील अगणित संपत्ती त्याला हिंदुस्थानाचा नाद सोडू देईना. त्याने सन १७४८ च्या हिवाळ्यात पुन: हिंदुस्थानावर दुसरी स्वारी करण्याचा विचार करून तो कंदाहारहून

निघाला. यावेळी पूर्वी अबदालीचा पराजय करणारा मीरमन्नू हा लाहोरचा सुभा होता. त्याच्या अहमदशहाची थोड्याशा चकमकी झाल्यावर मीर मन्नूच्या लक्षात आपले दौर्बल्य आले व त्याने अहमदशहाशी तह करून पंजाबमधील काही प्रांतांची खंडणी त्यास देऊ करून परत लावून दिले. [1]

मीरमन्नूने या प्रमाणे लाहोरची सुभेदारी मिळविल्यावर तेथे कडक अंमल बसविला, इतकेच नव्हे तर अहमदशहास कबूल केलेली खंडणीही देण्याचे त्याने नाकारले. यामुळे १७५१-५२ मध्ये अहमदशहाने हिंदुस्थानावर तिसरी स्वारी केली.[2] अहमदशहा चिनाबच्या काठाकाठाने बराच पुढे आला व त्यान आपला वकील सुखजीवनमल दिवाण यास मीरमन्नूकडेस बोलणे करण्यासाठी पुढे रवाना केले. मीरमन्नूने वकीलास आपले स्वतंत्र असल्याबद्दल स्पष्टपणे कळवून अब्दालीस खंडणी देण्याचे नाकारले.[3] परंतु अहमदशहा ज्या अर्थी इतक्या दूर आलाच आहे, त्या अर्थी आपण त्यास काही तरी देऊ, पण यानंतर त्याने पुन: हिंदुस्थानांत येता कामा नये, अशी कबूली मागितली व लागलीच सैन्याची तयारी करून तो अबदालीच्या सामोरा झाला व रावी नदी उतरून

---

*1. ता. 3 मार्चपासून सरहिंद येथे बादशहा व अब्दाली यांची लढाई होऊन अब्दाली पराभव पावून परत गेला; पण वजीर कमरुद्दीनखान तोफेचा गोळा लागून मरण पावला. यानंतर पेशवा बादशहाच्या भेटीस दिल्लीस गेला. यावरून पेशवा-बादशहाची ही भेट फेब्रुवारीत झाली असली पाहिजे. अब्दाली चालून येतो अशी बातमी आल्यावरून शाहूने पेशव्यास बादशहाच्या साह्यास रवाना केले. पेशव्याच्या मदतीची जरूर बादशहास वाटली नाही आणि बादशहाने अब्दालीस पिटाळून लाविले, तेव्हा पेशवा दिल्लीहून परत जयपूरकडे आला आणि नेवाईस माधवसिंगाची भेट घेऊन परत फिरला. उत्तरेकडील व्यवहारांचा भार त्याने रामचंद्र बावावर टाकिला. बादशहा व पेशवा यांची ही एकच भेट इतिहासात नमूद आहे. पेशवा बादशहाच्या भेटीस गेल्यामुळे वृद्ध निजामाचे पोटात धास्ती उत्पन्न झाली. स. १७४८ च्या आरंभी त्याने सूरतेवर जाऊन गुजरात प्रांत काबीज करण्याची आवई घातली. पुढे ता. २१ मे सन १७४८ रोजी म्हणजे पेशवा उत्तरेस असता निजाम औरंगाबाद येथे मृत्यू पावला.*

मराठी रियासत खंड -4, पान -95

अलीकडेस आला. दुर्राणीनेही समोरच्याच बाजूस तळ दिला. लहान लहान चकमकी काही दिवस झाल्या, पण त्यापासून म्हणण्यासारखा मीरमन्नूचा काहीच फायदा झाला नाही. मात्र या अबाधित दुर्राणी फौजेने रावी आणि चिनाब या मधील प्रवेश अगदी लुटून तळपटपान करून टाकला.[4] शेवटी दुर्राणीने एकदम मीरमन्नूवर चाल केली, तेव्हा मीरमन्नू

*2. अब्दाली चालून येतो तर धावत बादशहाचे साह्यास जावे, नादिरशहासारखा प्रसंग पुन: बादशाहीवर येऊ नये, यासाठी रवानगी केली. पेशव्याच्या या स्वारीस नेवाईची स्वारी म्हणतात. ता. १० डिसेंबर रोजी पुण्याहून निघून पेशवा स्वारीत गेला, तो ९ जुलै सन १७४८ रोजी परत आला. एप्रिलात नेवाईजवळ पेशव्याने माधोसिंगाची भेट घेतली. हे पाहून ईश्वरसिंग तडजोडीस कबूल झाला आणि नेवाई वगैरे आपले चार महाल पेशव्यास देऊन त्याने त्याची मर्जी राखली. ता. २१ मे, स. १७४८ चे वर्तमान, ''श्रीमंत जयनगरप्रांती आहेत. माधवसिंग वगैरे संपूर्ण येऊन भेटले. फौज मातबर जमली आहे. ईश्वरसिंग अब्दालीचे झुंजातून पळून आला, त्याचा लौकिक फटकाळ जाहला. श्रीमंतासी विनीत होऊन वर्तावे लागले. श्रीमंतांचा पुण्यप्रताप आहे. श्रीमंत दिल्लीस जाऊन पोचले नाहीत. खासा पठाण पराभव पावून निघून गेला.''.*

मराठी रियासत खंड -4, पान-94

*3. दिल्लीच्या इतिहासात सन १७४८ हे वर्ष महत्त्वाचे आहे. त्या साली अहमदशहा अब्दालीची पहिली स्वारी हिंदुस्थानवर होऊन लगेच पुढे महंमदशहा मरण पावला. अहमदशहा अब्दालीचा जन्म सन १७२४ त होऊन तेराव्या वर्षी त्याने नादिरशहाचे पदरी नोकरी स्वीकारली. सन १७३९ त नादिरशहाने हिंदुस्थानवर स्वारी करून सिंधु नदीच्या पश्चिमेकडचा सर्व प्रदेश जो पूर्वी मोगल बादशाहीत मोडत होता, तो त्याने आपल्या राज्यास जोडिला. नादिरशहाबरोबर हा अहमदशहा त्या स्वारीत हिंदुस्थानात होता, त्यास इकडील प्रदेशाची व संपत्तीची पूर्ण माहिती मिळाली. नादीरशहाची त्याजवर बहाल मर्जी होती. त्याच्या अनेक स्वाऱ्यांत अहमदशहास युद्धकलेचा अनुभव मिळून शौर्य, साहस, योजकता वगैरे गुण प्राप्त झाले. याच अनुभवामुळे त्याजला पुढे मराठ्यांशी झगडता आले. ता. १९ जून, सन १७४७ रोजी नादिरशहाचा खून झाला, त्याबरोबर अहमदशहाने आपल्या नावाची द्वाही फिरवून काबूल येथे स्वतंत्र राज्य स्थापिले.*

मराठी रियासत खंड -4, पान-419

घाबरून मागे सरला व त्याने लाहोरचा आश्रय केला. परंतु सरतेशेवटी त्यांच्या सैन्यात भयंकर दुष्काळ पडला. अहमदशहाने सर्व बाजूंनी त्याला वेढून टाकले व बाहेरचा धान्याचा एक कणही आंत जाऊ न देण्याचा कडेकोट बंदोबस्त केला. अहमदशहाच्या या व्यवस्थेने मीरमन्नू अगदी मेटाकुटीस आला. सरतेशेवटी त्याच्या उपासमोर झालेल्या फौजेची व दुर्राणीच्या फौजेची तारीख १२ एप्रिल सन १७५२ रोजी जंगी लढाई झाली. तीत आरंभी काही वेळपर्यंत मीरमन्नूच्या फौजेचा जय होता, पण मीरमन्नूचा सेनापती कौरामल हा हत्तीवर बसून युध्दाच्या धामधूमीत असताना एकदम हत्तीचा पाय एका खड्डयात गेला व त्यामुळे ते जनावर एकदम खाली बसले. इतक्यात एका शिपायाने येऊन कौरामलाचे डोके कापून नेले. समरांगणावर भारतीय युध्दांत कर्जाचा रथ असाच खडड्यात पडल्याचे वाचकास या प्रसंगी स्मरण झाल्याशिवाय राहणार नाही. या प्रमाणे सेनापतीचा वध होताच भीरमन्नूच्या फौजेत पळापळी सुरू झाली व त्याचा पराजय झाला. यानंतर मीरमन्नूने अहमदशहास प्रत्यक्ष भेटून तह केला या प्रत्यक्ष भेटीत या उभयतांमध्ये जो संवाद झाला तो फार

---

*4. सन 1751 च्या फेब्रुवारी-मार्च मासांत बंगसाचा वेढा अलाहबादेस पडला. हे ठिकाण पठाणांनी घेतले की, वजिराचा कारभार आटोपला असा प्रसंग उद्भवला. स. 1750 च्या ऑगष्टांत वजिराची जी अधोगती सुरू झाली, ती उत्तरोत्तर वाढत जाऊन तो सदैव खाली मान घालून दु:ख करीत बसला. अहमदखानाने बादशहाकडे अर्ज गुदरला की, ''हा वजीर आपल्या नाशास टपला आहे. मराठ्यांस घरात आणून तुमचा घात करणार. मग आम्हा पठाणांसह आपण का न जवळ करावे. मी आपला बंदा सेवक चाकरीस हजर आहे. वजीर आमचा उच्छेद करतात म्हणून त्यांच्याशी आमचे वैर; पण आपल्या पायांशी आमची निष्ठा पूर्ण आहे.'' बादशहाने पठाणांस गुन्हा माफ केल्याचा जबाबही पाठविला आणि सफदरजंगास नाहीसा करण्यासाठी लाहोराहून मीर मन्नूस व दक्षिणेतून नासिरजंगास फौजा घेऊन दिल्लीस बोलाविले; पण याच सुमारास नासिरजंग मारला गेला आणि मीरमन्नू अब्दालीच्या धाकास्तव पंजाब प्रांत सोडू शकला नाही. यामुळे सफरजंगास पठाणांचा नि:पात करण्याची सवड मिळाली.*

मराठी रियासत खंड -4, पान-429

गंमतीचा आहे म्हणून येथे देतो.

अहमदशहा– मी तुझा धनी असून तू या पूर्वीच खंडणी देण्यासाठी आमचे पुढे का हजर झाला नाहीस?

मन्नू –मला दुसऱ्या धन्याची चाकरी करावयाची होती म्हणून येता आले नाही.

अहमद –मग तो मुझा दुसरा धनी तुला या संकटातून मुक्त करावयास का आला नाही?

मन्नू – आला चाकर स्वत:चे संरक्षण उत्तम प्रकारे करू शकेल अशी त्याची खात्री होती.

अहमद– या युध्दांत मी जर हारलो असतो व तुझ्या हातात सापडली असते तर तू मला कसे वागविले असते.

मन्नू – आपले डोके कापून ते मी माझ्या धन्याकडे नजराणा म्हणून पाठवून दिले असते.

अहमद – मग आता तू माझ्या हाती सापडला आहेस, मी तुझे काय करीन अशी तुझी अटकळ आहे?

मन्नू –जर आपण व्यापारी असाल तर माझी गुलाम म्हणून विक्री करा, जर आपण जुलमी राज्यकर्ते असाल तर माझे डोके कापून टाका, परंतु जर आपण खरोखरीच नृपती असाल तर मला राजासारखी दया दाखवा व माझा जीव वाचवा. अहमदाने मीरमन्नूचे हे समयसूचक, धीटपणाचे व उमद्या स्वभावाचे दर्शक असे जबाब ऐकून खूप होऊन त्याला फरजंदखान बहाद्दर रुस्तमे हिंद हा किताब दिला.[5] मीरमन्नूने अहमदशहास पन्नास लक्ष रुपये व हत्ती, घोडे वगैरे देऊन स्वदेशास रवाना केले.

पुढे सन १७५६ मध्ये मीरमन्नू घोड्यावरून पडून मरण पावला. तेव्हा मुराद बेगम नावाच्या त्याच्या बायकोने आपला तीन वर्षाचा मुलगा लाहोरचा सुभा करून स्वत: राज्यकारभार करू लागली. मुराद बेगम जरी या प्रमाणे सुभेगिरी गाजवू लागली, तरी तिला एवढा मोठा अधिकार चालविण्याची आचरण शक्ती नव्हती, हे तेव्हाच दिसून आले. तिच्या नवऱ्याच्या वेळच्या एकही उमरावावर तिचा विश्वास नव्हता. तिचा दरबारी मीर विकारखान नावाचा एक मोठा सरदार बेगमेचा कारभारी

होता व एक वेळी त्यावर तिची मर्जीही होती, परंतु एके प्रसंगी तिने या मीर विकारखानाला जनानखान्यामध्ये दासीकडून इतका कडक मार दिला की, त्या योगे तो लवकर प्राणास मुकला.[6] स्त्रीजातीने कधीही क्षमा न करण्यासारखा काही वैयक्तिक अपराध मीरच्या हातून झाला होता, असे म्हणतात. काहीही असो, बेगमेच्या या कृत्याने लाहोर दरबारचे अमीर उमराव फारच नाराज झाले व त्यांनी दिल्लीस ही तक्रार नेली. यावेळी गाझीउद्दीन हा दिल्लीच्या दरबारी सुभा होता व तो मुराद बेगमेचा भावी जामात होता, म्हणून त्याने आपला एक हस्तक लाहोरास व्यवस्थेसाठी पाठविला. परंतु त्याचे बेगमेपुढे काही चालेना व बेगमही त्याचे काही ऐकेना. या इसमास येथून दूर करावे अशीही तिने दिल्लीस मागणी केली इतकेच नव्हे, तर तिने परभारे अहमद शहाकडेस अशीही तक्रार केली की, दिल्ली दरबाराने लाहोरप्रांत गिळंकृत केला आहे, तरी तुझी ताबडतोब सैन्य घेऊन माझ्या मदतीस यावे. मुराद बेगमेंचे हे कारस्थान उमगल्यामुळे गाजीउद्दीन याने एकदम लाहोरवर चाल केली

---

*5. बादशहाचे तर्फेने वजीर सफदरजंग व पेशव्याचे तर्फेने सिंदे-होळकर यांच्या धार्मिक शपथांनी व स्वदस्तुरच्या सह्यांनी हा अहमदनामा किंवा करार ता. २३ एप्रिल, सन १७५२ रोजी कनोज येथे पुरा झाला. तो रा. खं. १ ले १, यात छापलेला आहे. ही तारीख नवीन क्रिस्ती कालगणनेची समजायची. या करारातील विशिष्ट कलमे अशी- १. पठाण राजपूत वगैरे देशांतील बंडखोर किंवा अब्दालीसारखे परदेशीय शत्रू यांजपासून पेशव्याने मोगल बादशाहीचा बचाव करावा. २. या मदतीबद्दल बादशहाने ५० लाख रुपये मराठ्यांस खर्चासाठी द्यावे. पैकी ३० लाख अब्दालीप्रीत्यर्थ व २० लाख पठाणांसारख्या अंतर्गत बंडखोरांप्रीत्यर्थ. ३. शिवाय बादशहाने पंजाब, सिंध व अंतर्वेद या प्रांतांत चौथाई वसूल करण्याची परवानगी मराठ्यांस द्यावी. ४. अजमेर व आग्रा या प्रांतांची सुभेगिरी पेशव्यास देण्यात आली. या सुभ्यांचा कारभार पूर्वापार चालत आलेल्या रिवाजांस अनुसरून मराठ्यांनी करावा. ५. पेशवा स्वत: येण्यास असमर्थ असेल तेव्हा त्याचे बदल्यात मराठा सरदारांनी बादशहाच्या तैनातीत राहून इतर मनसबदारांप्रमाणे बिनतक्रार नोकरी बजवावी. या करारानुसार मराठे सरदारांस बरोबर घेऊन वजीर सफरजंग दिल्लीस निघाला.*

मराठी रियासत खंड -4, पान-446

व मोठ्या युक्तीने बेगमेस कैद केले आणि लाहोरास अदनाबेगखान यास आपल्यातर्फे सुभा नेमले. मुरूद बेगमेस हे अर्थातच आवडले नाही व तिने दिल्लीच्या बादशाहीस सपाटून शिव्याशाप दिले. गाझीउद्दीन इतकेच करून थांबला नाही. त्याने बेगमेच्या मुलीशी आले लग्न तिच्या इच्छेविरुध्द केले व बेगमेस फारच वाईट रीतीने वागविले. इतक्यात ही बातमी अफगानीस्थानात अहमदशहा अबदालीस कळली व त्याने इ.स. १७५५-१७५६ च्या साली हिंदुस्थानावर चौथी स्वारी केली. त्याने एकदम सिंधुनदी उतरून अदिनाबेगखानाला लाहोराहून हांकलून लावले तो एकदम काहीही अडथळ्याशिवाय दिल्लीपर्यंत येऊन धडकला. दिल्लीस त्याने नादिरशहाच्या छळाची लोकांस पुन: आठवण करून दिली व मोठमोठ्या अमीर उमरावांस द्रव्यासाठी मनस्वी छळिले. अहमदशहा या वेळी दिल्लीस दोन महिने राहिला. परंतु इतक्या अवधीत त्याने दिल्लीतील तमाम मोठमोठे वाडे द्रव्याच्या तृष्णेने अगदी जमीनदोस्त केले.

या प्रमाणे दिल्लीतील उमरावांना कंगाल केल्यावर ही स्वारी बालमगड किल्यावर चालून गेली व तो हस्तगत होताच तेथून तो एकदम मथूरेस गेला. तेथेही त्याने भयंकर कत्तल केली व मोठमोठी मंदिरे मातीत मिळवून तेथील हजारो हिंदूंना गुलाम करून बरोबर घेऊन हा दुष्टकर्मा अहमदशहा आगऱ्यावर चालून गेला. परंतु तेथे त्याची दाळ न शिजल्यामुळे त्याने जाटाच्या मुलखात घुसून मोठा धुमाकूळ माजवून दिला. यानंतर तो पुन: दिल्लीस आला.त्याने दिल्लीच्या बादशहाच्या मुलीचे लग्न आपला

---

*6. ही ऊधमबाई पूर्वी एक हीन वृत्तीची नर्तकी असून तिच्यावर महंमदशहाची मर्जी बसली. उधळपट्टी करून तिने दरबारी लोकांस आपल्या मुठीत ठेविले आणि खुद्द बादशहाच तिच्या ओंजळीने पाणी पिऊ लागल्यामुळे ती करील ती पूर्व दिशा असा कारभार चालू लागला. नूरजहानप्रमाणे राज्यकारभारात आपण नाव कमावावे अशी तिची मोठी हाव होती. जाबेदखान म्हणून जनानखान्यातला एक खोजा तिला जोडीदार भेटला. त्या दोघांचे निकट रहस्य जमून बादशहा केवळ त्यांच्या तंत्राने वागू लागला. इकडे फौजेची पगाराविना उपासमार चालू असता ऊधमबाईने आपल्या वाढदिवसानिमित्त दोन कोटी रुपये सहज खर्च केले. हा वाढदिवस ता. 21 जानेवारी, सन 1754 रोजी साजरा झाला.*

मराठी रियासत खंड -4, पान-422

मुलगा तैमूरशहा याशी लावले व स्वतःचे लग्नही बादशहाच्या दुसऱ्या एका मुलीशी उरकून घेतले. यानंतर पुष्कळशी खंडणी घेऊन त्याने आलमगीर यास पुनः दिल्लीच्या तख्तावर बसविले व पंजाब आणि सिंध हे प्रांत आपला मुलगा जे तैमूरच्या नावे बादशहाकडून करवून घेतले. नादिरशहाने हिंदुस्थानच्या नाशास जो आरंभ केला होता तो, या प्रमाणे अहमदशहाने पूर्णतेस नेल्यावर, हा राक्षस सन १७५७ मध्ये परत स्वदेशास जाण्यास निघाला. यावेळी शीख लोकांनी अहमदशहाच्या फौजेस बराच त्रास दिला, पण त्याला तुर्कस्थानांत जाण्याची घाई असल्यामुळे तो तडक चालता झाला. त्याने सिंधूच्या काठचे प्रदेश व मुलतान, लाहोर वगैरे मिळविलेल्या प्रातांच्या संरक्षणासाठी आपला मुलगा तैमूरशहा व भरवशाचा शूर सेनापती जहानखान यास हिंदुस्थांत ठेवले व याच उभयतांना शीख लोकांचा समाचार घेण्याची आज्ञा केली. या उभयंताच्या हाताखाली दर्राणी व इराणी फौजा ठेवल्या होत्या, परंतु त्या काही फार महत्त्वाच्या नव्हत्या. याशिवाय त्याने हिंदुस्थानात आल्यावर काही फौज जमविली होतीच, तीही यांचे ताब्यात दिली होती, त्याचप्रमाणे सरहिंद, दुर्लभ वगैरे ठिकाणी त्याने आपली माणसे नेमली होती. या प्रमाणे बंदोबंस्त करून अहमदशहा स्वदेशात निघून गेला.

### अहमदशहा व मराठे

अहमदशहाचा या प्रमाणे दिल्लीच्या बादशाहीस वारंवार त्रास होऊ लागल्यामुळे बादशहाने कोणाचा तरी आश्रय घेणे प्राप्त झाले. यावेळी हिंदुस्थानांत मराठी फार बलाढ्य म्हणून प्रसिध्दीस आले होते. मराठ्यांनी सत्ता या सुमारास शिगेस लागली होती व त्यांची सूत्रे पुण्याहून नानासाहेब पेशवा मोठ्या कुशलतेने हालवीत होते. पेशव्यांचेतर्फे उत्तरेकडील शिंदे-होळकर मराठ्यांचे वर्चस्व स्थापन करण्याच्या प्रयत्नांत गुंतले होते. दिल्लीच्या बादशहाने यांच्याशीच करार केला. राजवाड्यांच्या पहिल्याच खंडात हा करार प्रारंभीच देऊन त्याखाली पुढीलप्रमाणे टीप दिली आहे.

हा एहदनामा(प्रतिज्ञापत्र) म्हणजे करारनामा दिल्लीचा पातशहा आणि मराठ्यांकडील सरदार मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांच्यामध्ये झाला, असे या करारनाम्यांत लिहिलेले आहे. हा करारनामा बहुश:

१७५० सालात झाला असावा. यावेळी दिल्लीचा पातशहा अहमदशहा तख्तावर होता.

पातशहाचा मुख्य बजीर सफदरजंग ह्याने रोहिल्यांचा व अहमदशहा अबदाली ह्यांचा दंगा मोडण्याकरिता मराठ्यांना मदतीस बोलाविले. मुलतान, पंजाब, सिंध, रजपुतांना व रोहिलखंड इतक्या विस्तीर्ण प्रदेशावर चौथ बसविण्याचा हक्क मराठ्यांना ह्याच करारनाम्याच्या जोरावर प्राप्त झाला व या हक्काच्या संरक्षणार्थ पुढे सहा वर्षे अबदालीशी, रोहिल्याशी व राजपुतांशी त्यांना झुंजावे लागले.

या प्रमाणे मराठे व रोहिले यांचा सामना सुरू झाला. अहमदशहाचे स्वारीचा रंग दिसू लागताच वजीराकडून मराठ्यांस मदतीसाठी पाचारण येताच रघुनाथरावास फौजेसह तिकडे जावे लागे. पण कर्मधर्मसंयोगाने अबदाली व रघुनाथराव यांचा प्रत्यक्ष सामना होण्याचा प्रसंगच आला नाही. रघुनाथरावांने एकदम अहमदशहावर चालून जाऊन त्यांच्याशी प्रत्यक्ष रणागणावर गाठ घालावी म्हणून पुण्याहून मुत्सद्यांची निडकची पत्रे जात. रघुनाथराव फौजेची जमवाजमव होताच आपण चालून जातो म्हणून उत्तर पाठवावी. या प्रसंगाचे रघुनाथरावांचे एक पत्र सुंदर असल्याने या खाली देतो.

आजी (ता.१६–२–१७५७) इंदुरास आली. होळकरांची भेट झाली. पुढे दर मजल दिल्लीस जात असो. अबदाली दिल्लीस आला, यास्तव चहुकडून राजे व जमीनदार व रांगडे लोकांच्या नजरा फिरल्या. सांप्रत एखादा मनसुबा करून मुलुख अथवा रुपये मिळवावयाची सोय दिसत नाही.[7] अबदालीचे पारिपत्य होईल. तेव्हाच वरकड दबतील. त्याचे पारिपत्य करावे तरी फौज अद्यापी जमा झाली नाही. आम्ही विठ्ठल शिवदेव, मल्हारबा, समशेरबहाद्दर अंताजी माणकेश्वर, नारो शंकर मिळून पंधरा सतरा हजार फौज आहे. जास्त फौज व आलीया जाता येत नाही. रुपये पाहण्यास दिवस लागले. महिना दीड महिन्यांत पोहोचतील. जर अबदाली दिल्लीस राहिला अथवा अलीकडे आला तर गाठ पडेल, तमाम राजे व सुजाउद्दौला वगैरे सर्वांची राजकारणे व्याजपाशी आहेत. जाठ तर झुंर्ज लागला. सांप्रत मनसुबा भारी आहे. फौजही त्याची भारी आहे. कजाब शिपाई आहे. पारपल्यास भारी सामान असावे वास्तव जर

दत्तबाची रवानगी इकडे लवकर जाहली तर जमाव लवकर पडेल.

१०. रघुनाथरावजी याप्रमाणे तयारी होताच तो कूच करी, परंतु याच सुमारास अहमदशहा स्वदेशास जावयास दिले. रघुनाथरावाच्या तयारीची बरोबर बातमी ठेवून ती आपल्यापेक्षा अधिक आहे, असे पाहूनही अहमदशहा निघून जात असेल. कारण अहमदशहाने पुष्कळ लढाया पाहिल्या असल्याने, सेनापती या नात्याने त्याची योग्यता रघुनाथरामाहून यत्किंचितही कमी नव्हती. असो. या प्रमाणे या उभयतांचे डावपेच चालू होते. अहमदशहा प्रत्येकवेळा घाईघाईने स्वदेशास निघून जाई व मागे योग्य व शक्य तो बंदोबस्त करून ठेवित असे. या प्रमाणे याही वेळी त्याने आपल्यामागे योग्य ती व्यवस्था करून मग स्वदेशी प्रयाण केले.

११.अहमदशहा निघून गेल्यानंतर मागे तैमूरशहाने पंजाबमध्ये शांतता

---

*7. तेलातुपाच्या सांसारिक विषयांत कालापव्यय होऊ लागला तर अहमदशहा अब्दाली, निजाम, डुप्ले, इंग्रज यांच्या कारवाया कोण उलगडणार! पेशवा व रघूजी या दोन कर्त्या अनुभवी पुरुषांनी सातार्‍याचा कारभार पुण्यास नेण्याचा विचार ठरविला तोच योग्य होता. रघूजीने पुढे अखेरपावेतो पेशव्यांचे साह्य केले, अल्प शब्दानेही कधी विरोध दाखविला नाही, ताराबाईची कारस्थाने व विनवण्या धुडकावून दिल्या. यावरून तय दोघांनी ठरविलेला इत्यर्थ त्या परिस्थितीत अपरिहार्य होता असेल म्हटले पाहिजे. यातच राज्याचा तरणोपाय होता, अपहार नव्हता. पुढे वजिराच्या वशिल्याने याहियाखान आपल्यावर चालून येईल त्याचा बंदोबस्त करण्यासाठी आदिनाबेगाने शहानवाजखानास अशी सल्ला दिली की, 'अब्दालीशहा पेशावरास आहे. त्याचे साह्य तुम्ही मागा म्हणजे वजिराचे हातून तुमचे काही वाकडे होणार नाही.' ही सूचना शहानवाजखानाने लगेच अंमलात आणिली आणि पेशावरास अब्दालीकडे माणसे पाठवून मदत मागितली. अब्दालीला हेच पाहिजे होते. सन 1748 च्या जानेवारीत तो पंजाबवर चालून आला. दरम्यान वजीर कमरुद्दीनखानाने शहानवाजखानाची चूक दाखवून त्यास अब्दालीशी लढण्यास प्रवृत्त केले. ता. 20 जानेवारी रोजी अब्दालीने शहानवाजखानाचा पराभव करून लाहोरचा कब्जा घेतला आणि एक महिन्यापर्यंत तेथे आपली व्यवस्था लावून पुढे दिल्लीकडे चाल केली.*

मराठी रियासत खंड -4, पान-242

प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. शीख लोकांस त्याने कडक शिक्षा करून पादाक्रांत केले व निरनिराळ्या लुटारू लोकांवरही वचक बसविला. हे पाहून अदिनाबेगखान याने शीख फौज जमवून दुराणी लोकांशी सामना देण्याचा घाट घालता. यावेळी रघुनाथरावास कूच करतील त्या दिवशी एक लाख रुपये व मुक्काम करतील त्या दिवशी पन्नास हजार रुपये या प्रमाणे देण्याचे कबूल करून आपल्या मदतीस बोलाविले. रघुनाथराव एकदम अदिनाबेगखानाच्या मदतीस गेला. मराठे व शीख यांच्या फौजा सतलज नदीच्या काठी एक होऊन त्यांनी पहिल्या धडाक्यासरशी अबदुल समदखानाच्या वीस हजार रोहिल्याचा पराभव करून सरहिंद काबीज केले. सरहिंद काबीज केल्यावर मराठ्यांनी एकदम लाहोरवर चाल केली. तैमूर शहा आणि त्याचा सरदार जहानखान हे दुर्राणी फौजेसह कछी सराई येथे तळ देऊन राहिले होते. त्यांचाही मराठ्यांनी पूर्णपणे पराभव केला व लाहोर शहर सावकाशपणे लुटले. या प्रमाणे शिवाजी महाराजांनी भविष्य केल्याप्रमाणे रघुनाथरावाने भीमथडीच्या तट्टांनी सिंधूनदीचे पाणी पाजून मराठ्यांचा भगवा झेंडा अटकेपार फडकाविला यात मुळीच संशय नाही. यावेळी रघुनाथरावाचा सरदार सखाराम हरी याने फारच शौर्य गाजविल्यामुळे त्यास दिल्लीच्या बादशहाकडून आंबेगाव हे जहागीर मिळाले व ते अद्यापही(१९२५) त्याच्या वंशजाकडेस चालत आहे. ही गोष्ट सन १७५८ च्या मे महिन्यांत झाली. अदिनावेगखानास रघुनाथरावाने पंजाबचा सुभा देऊन इतर ठिकाणी आपली माणसे ठेवले व मग हे मराठी सैन्य नानासाहेबांच्या निकडीच्या बोलाविण्यावरून दक्षिणेत रवाना झाले. यावेळेच रघुनाथरावाचे पत्रही वाचकांच्या सोयीसाठी पुढे देतो.

लाहोर मुलतान काश्मीर वगैरे सुभे अटके अलीकडे येथील बंदोबस्त करून अंमल बसवावा. त्यास काही झाला व काही होणे तोही लवकरच करतो. अहमदखान अबदाली याचा पुत्र तैमूरसुलतान व जहाखान याचा पाठलाग सरकारचे फौजेने करून त्याची फौज लुटून घेतली. काही थोडीशी फौज झडत पडत अटकेपर पेशावरास जहानखान तिकडून अबदालीचे फौजेवरून चालून येऊन हल्ला करून फौज लुटून घेतली. खासा अबदाली मात्र बारा चौदा हजार फौजेनिशी इस्पहानातून अलीकडे

कंदहारास आला. इराण्याची फौज याचा पाठलाग करीत आली आहे. अबरदरतखान व मुकरमखान वगैरे सरदार व जमीनदार त्या प्रांतीचे अब्दालीचे जबरदस्तीमुळे रुजू होते, तेही बदलोन हंगामा करीतात. हल्ली त्यांच्या अरजा रफीक होऊन सेवा करून दाखवून अबदालीस तंबी करून पेशा आल्या आहेत. चहूकडून अबदालीवरी हंगामा झाला आहे. याजमुळे त्याचा घर सुटला आहे. त्याचे साहित्य उपराळा कोणी करीत नाही. इकडून जोस पोहोचून सरकारचा अंमल अटकेपार करावा. अहमदखान अबदाली याचा पुतण्या अबदुल रहीमखान अबदालीचे दौलतीचा वारस स्वामीपासी आला. तो स्वामीनी आम्हाकडे पाठविला होता. त्यास अटके अलीकडे काही थोडीसी जागा बसावयास देऊन अटकपार काबूल पेशावरचा सुभा देऊ अबदालीची फौज अबदुल समदखान सरहिंदेत होता तो पाढाव सरकारात आहे. तो व आणखी या प्रांतेची फौज इराणी मोगल येऊन देऊन मशार निल्हेची रवानगी करतील. लाहोर प्रांती राजेश्री रेणको आणेजी व रायाजी सुखदेव असे ठेवले. गोपाळराव गणेश यांचाही पैगार आहे, तेही राहतील. पुढे स्वदस्तुर इराणचे बादशहाचे कादही आम्हास व मल्हाऱ्यास आले होते की, लवकर कंदहारास यावे आणि यांचे पारिपत्य करून अटकेची हद्द करावी, परंतु आम्ही तरी काबूल व कंदाहार हे अटकेपारचे सुभे हिंदुस्थानात अकबरापासून अमलागीर पर्यंत होते ते विलायतेत का द्यावे, आम्ही कंदाहार पावतो अंमल बसवून तूर्त गोडच जाब पाठविणार आहोत. तूर्त माघारी फिरावयाचा डौल स्वामींच्या आज्ञेवरून धरिला आहे. याजमुळे जे होते तेच करितो. तटी लावीत नाही. तूर्त या प्रती आदिनावेग मोगल मातबर व प्रामाणिक आहे. त्याजवर सारा यकतियावर दिला आहे. लाहोर त्यासच कामाविशेने दिले आहे. हे पत्र इतिहास संग्रहांत ऐतिहासिक स्फुट लेख ११ येथे असून त्याची तारीख ४ मे १७५८ ही आहे.

१२. यावेळी रघुनाथरावाने, आदिनावेगखानाने मराठ्यांस दरसाल पाऊण कोटी रुपये द्यावा, असे त्याच्यापासून करार करून घेतला, परंतु आदिनागबेगखान तारीख १५ सप्टेंबर १७५८ शुक्रवारी मरण पावला त्यामुळे पंजाबमध्ये फारच अव्यवस्था झाली.

१३. तैमूरशहाच्या पराजयाची वार्ता अहमदशहास कळताच त्याने

नुरूहिनखान नावाचा आपला सेनापती मोठ्या फौजेसह तैमूरशहाच्या मदतीस पुढे रवाना करून दिला व आपण स्वत: सन १७५९ च्या हिवाळ्यांत हिंदुस्थानात येण्यास निघाला. ही अहंमशहाची हिंदुस्थानावर पाचवी स्वारी होय. यावेळी अहमदशहा जो हिंदुस्थानांत आला तो सुमारो दोन वर्षे इकडेच राहिला. मराठ्यांना ज्याप्रमाणे त्याच्याशी गाठ घालण्याची खुमखुमी होती त्याचप्रमाणे त्यानेही यावेळी मराठ्यास सामना देण्याचा निश्चय केला होता असे दिसते. प्रथम शिंद्यांच्या सैन्याची व त्याची गाठ पडली. मल्हारराव स्वतः जरी शिंद्याच्या मदतीस आला नव्हता तरी त्याची काही फौज शिंद्याच्या फौजेस येऊन मिळाली होती. या झटापटीत मराठी हरले व पळू लागले. या प्रमाणे एक दोन वेळच्या अनुभवावरून दुर्राणीची खात्री झाली की, मराठे हे ठासून उभे राहून लढण्यात कच्चे आहेत, काही वेळ लढून दमताच पळ काढतात. दुर्राणीची या प्रमाणे खात्री होताच त्यांचा धीर वाढला व मराठ्यांचा धीर अर्थातच खचला. काव्याने आपण शत्रूस जेरीस आणू असे शिंदे होळकरांस वाटत होते पण शत्रू धाडण्यापूर्वी गनीमच थकून जाऊ लागले. दत्ताजी शिंदे व अहमदशहा यांची गाठ पडून दत्ताजी मारला गेला. तेव्हापासून शिंद्यांच्या फौजेस दुर्राणीची दहशत बसली. मोठमोठ्या मजला मारण्यात मराठ्यांची फार प्रसिध्दी होती. पण अहमदशहाच्या दुर्राणी फौजेपुढे मराठ्यांची दौड फिकी पडली. इकडे मल्हारराव व जनकोजी शिंदे यांनी कूच करून मारवाड प्रांतास गेले. तो दुर्राणीने पाठलाग केला. गिलचे तिकडे येताक्षणीच हे पानिपत कणोळकडे गेले. मोंगल तिकडे जाता गनीम दिल्लीस पोचले. अब्दुलअली तेथे येताच शिंदे, होळकर आगरियास आले. अविंध आगरियास येताच हे जयनगर प्रातांत गेले. तिकडे मोगलांची दौड पोचताच हे उदेपुरचे सुमारे गेले. गनीम केवळ सडे नदार, या प्रकारे गनीमी कावा करून गिलचा हारीस आणावा म्हणेन. उपाय केले, परंतु दुर्राणीची हिंमत यांजहून भारी, गनीमच पिटून दमास आणले. गनिमी काव्याच्या लढाईत याप्रमाणे मराठे अहमदशहावर कोणास पाठवावे, याबद्दल खल सुरू झाला. रघुनाथरावास पाठविण्याचे प्रथम ठरले. पण पडदूर मुक्कामी मोठी वाटाघाट होऊन अखेर सदाशिवराव भाऊस पाठविण्याचे मुकर्रर झाले.

उत्तरेकडील कामगिरी जशी रहावयास पाहिजे होती तशी रघुनाथरावाचे हातून होत असल्याने तो तिकडील मोहिमेस नालायक ठरविण्यात आला. विशेषत: उत्तरेडकील रोहिला नावाचा जो प्रख्यात कारस्थानी मुसलमान होता. त्याचा समाचार रघुनाथराव हा होळकराच्या भिडेमुळे घेईना म्हणून व इतरही अशाच बारीक कारणामुळे रघुनाथरावास यावेळी उत्तरेकडस न पाठविता सदाशिवरावास पाठविले. सदाशिवरावभाऊने यावेळी आपल्या बरोबर इबराहिमखान गारदी याचा उत्कृष्ट तोफखाना होता. गनीमी काव्याने अबदाली जेरीस येत नाही हे पाहून मुद्दामच हा तोफखाना बरोबर घेण्यात आला होता. या तोफखान्याने आरंभी कामगिरी चांगलीच केली. दिल्ली हस्तगत केल्यावर अबदालीशी गाठ घालण्याचा विचार होता. पण तो यमुनेच्या परतीरी असल्याने व यमुनेस पाणी फार आल्याने तिकडेस जाणे भाऊसाहेबांस अशक्य झाले. पाणी उतरुन जाईपर्यंत वाट पाहात बसवे भाऊसाहेबांस योग्य न वाटल्याने त्यांनी पुढे कुंजपुऱ्यावर चाल केली. भाऊसाहेब पुढे निघून गेल्यावर अबदालीने यमुना उतरून अलीकडच्या तीरी तळ दिला. ही हकीकत कुंजपुरा सर केल्यावर सदाशिवरावास कळली. तत्काळ मराठे सैन्य मागे फिरले व त्याने पानपतावर तळ दिला. अबदाली याप्रमाणे मध्येच ठाणे देऊन बसल्यामुळे मराठ्यांस रसद वगैरे पोचेनाशी झाली व दोन अडीच महिने तेथे दोनही सैन्य राहिल्यावर मराठे अन्नाच्या अभावी अगदी जर्जर होऊन गेले आणि शेवटी तारीख १४ जानेवारी १७६१ रोजी मराठे व गिलचे यांचे भयंकर युध्द होऊन अहमदशहास विजय मिळाला. या प्रमाणे या दीर्घसूत्री लढाईत जरी अहमदशहास जय मिळाला तरी त्याचा म्हणण्यासारखा फायदा झाला नाही. ही अहमदशहाची हिंदुस्थानावर पांचवी स्वारी होय. तिसऱ्या स्वारीच्या वेळी मीरमन्नूवर लाहोर येथे ज्या युक्तीने अहमदशहास जय मिळाला होता त्याच युक्तींने याही वेळी तो विजयी झाला. ती युक्ती म्हणजे शत्रूचा चोहो बाजूंनी कोंडमारा करणे ही होय. पानिपतचा घोर संग्राम झाल्यावर अहमदशहाने उत्तर हिंदुस्थानात बराच धुमाकूळ उडवून दिला व बरीचशी लूट घेऊन तो स्वदेशास निघून गेला. जातांना त्याने खाजा ओबेद यास लाहोरचा सुभा सोपिला होता.

## अहमदशहा व शीख

१४. अबदालीचा पाठबळाताच लाहोर, सरहिंद वगैरे ठिकाणी शिखांनी बंडाळी माजवून अहमदशहाचा अंमल उधळून लावला. ही हकीकत शहास कळताच त्याने पुन: नूरूद्दीनखानास सातहजार घोडेस्वारानिशी सन १७६२ च्या प्रारंभी हिंदुस्थानात पाठविले, परंतु शीख फौजांनी त्याचा पराभव केला व सरहिंद वगैरे प्रांत स्वतःच्या ताब्यात घेतले. ही हकीकत शहास कळताच तो सन १७६२ च्या नोव्हेंबरमध्ये हिंदुस्थानात येण्यास निघाला, ही त्याची हिंदुस्थानावर सहावी स्वारी होय.

१५. जंदिवालाच्या किल्यास शीख वेढा घालून बसले असताना एकदम शहा आपल्या फौजेनिशी त्याच्यासमोर येऊन धडकला. त्याला पाहताच ते एकदम वळून सरहिंद येथे गेले. त्यावेळी झेनखान हा सरहिंद येथे सुभेदार होता. त्याची व शीखांची लढाई चालूच होती. इतक्यात अहमदशहा एका रात्रीत लाहोराहून सरहिंद येथे झेनशहाच्या मदतीस धावून गेला. या वेळी दुर्राणी व शीख फौजांची फार मोठी लढाई होऊन सुमारे बारापासून तीस हजार शीख लोक यात कामास आले व शहास जय मिळाला.

१६. शीखांच्या बाजूने या वेळी अनेक प्रमुख सरदार लढत होते. त्यात पतियालाचा राजा अलांसिंग हा होता या लढाईत पराजय झाल्यावर अलासिंगास कैद करण्यात आले. पण शहावलीखान वझीराने मध्यस्थी करून चार लक्ष रुपये खंडणी अगर नजराणा देवून अलासिंगास मुक्त केले. शीखांच्या शौर्यांने अहमदशहा फार खूश झाला होता. त्याने अलासिंगाची मुक्तता करुन त्याचा फार मोठा सत्कार केला व त्यास राजा हा किताबही दिला. यानंतर त्याने पंजाबमधील कित्येक मोठमोठ्या जमीनदारांना बोलावून त्याचकडून पुष्कळसा नजराणा उकळण्याचा क्रम सुरू केला. अमृतसरला जाऊन तेथील शीख मंदिराला धुळीस मिळवून काश्मीर येथील बंडखोर सुभेदारास देहांत शासन करूनही स्वारी सन १७६२ च्या अखेरीस अफगाणिस्तानास परत गेली. यावेळी काबूलमध्ये काही बंडाळी उत्पन्न झाल्याचे त्यास कळाल्याने काबुलीमल नावाच्या एका हिंदुस त्याने यावेळी घाईघाईने लाहोरचा सुभा सांगून येथील काम एकदम आटोपते घेतले. अहमदशहाची पाठ वळताच शीखांनी पुन: बंडाळी उडवून दिली. त्यांनी कासूर लुटून पालेकोंटेलाही काबीज केले.

यानंतर त्यांनी सरहिंदवर चाल केली व तेथील सुभेदार झेनखान याचा पराजय करून त्यास युध्दास ठार मारले व सरहिंद कायमचे काबीज केले. त्यांनतर त्यांनी लाहोरवर चाल केली व तेथील हिंदू सुभेदारास शहरात कोंडून शहरातील गायीचा वध करणाऱ्या कसायांची मागणी केली. काबुलीमल यावेळी मोठ्या संकटात पडला. हिंदू असल्याने कसायांचे रक्षण करणे त्याला शक्य नव्हते व अबदल्लीचा हस्तक बनल्याने कसायांस शिखांच्या ताब्यात देणे त्यास कठीण वाटू लागले. अशा कातरीत तो यावेळी सापडला होता. शेवटी त्याने कसायाचं नाक, कान, कापून त्यास लाहोरमधून हाकलून देण्याचे कबूल केले. शिखांचे समाधान केले. यावेळी त्याचा अंमल लाहोरच्या चार भिंतीमध्येच काय तो कायम राहिला होता. ही आपल्या लोकांची दुर्दशा अफगाणिस्थानांत अहमदशहास कळली. तेव्हा तो एकदम तेथून निघून सन १७६४ च्या जानेवारीत लाहोरास येऊन दाखल झाला. ही त्याची हिंदुस्थानावर सातवी स्वारी होय. या स्वारीत त्याने शीख लोकांचा अतोनात छळ केला. त्यांची घरेदारे सुध्दा पाहून जमीनदोस्त केली. खेडीच्या खेडी उजाड करून गव्हांची उभी पिके त्यांने उपटून जाळून टाकली. आपला धाक बसिवण्यासाठी या प्रमाणे जाळपोळ करीत असता त्यास काबूलमध्ये काही बंडाळी उपस्थित झाल्याने कळले म्हणून शिखांचे पूर्ण परिपक्क करण्यापूर्वीच त्यास एकदम स्वदेशास जावे लागले. जातांना त्याने अलासिंग पंजाबचा सुभा नेमले व त्याने सालीना साडे तीन लक्ष रुपये खंडणी द्यावी, असे ठरविले. तो परत जात असता त्यास शीख लोकांनी मनस्वी त्रास दिला.

१७. अहमदशहा निघून गेल्यावर इकडे शीख लोकांनी पुन: उचल खाल्ली व अहमंदशहाने जिंकिलेला सर्व मुलूख आपल्या कब्जात घेतला. यावेळी शीख लोकांनी फार मोठी तयारी केली होती. परंतु आपल्या मुलूखाची अशी दुर्दशा झालेली शहास काबूल येथे कळताच त्याने सन १७६७ मध्ये हिंदुस्थानावर आठवी स्वारी केली. हिंदुस्थानात येताच त्यास अलासिंगाचा नातू अमरसिंग हा जाऊन भेटला. कोट्याचा राजपूत राजाही यावेळी अहमंदशहास जाऊन मिळाला. या प्रमाणे सामदामाने आपला अंमल बसविल्यावर अहमदशहा किंचित स्वस्थ झाला. यावेळी

अहमदशहास नासूर व्याधी झालेला असल्याने तो फार कष्टी होता. यावेळी त्याने युध्दापेक्षा शांततेवर अधिक भरवसा ठेविला होता व त्यामुळे त्याचा अंमल दिवसेंदिवस वाढतच चालला. या प्रसंगी अहमदशहाने जे दयाळूपणाचे वर्तन केले त्या योगे बरेच राजपूत राजे त्याचे स्नेही झाले, त्याचप्रमाणे अमरसिहांस पतियालाचे राज्यावर बसविल्याने मावळ्यांतील शीख लोकही फार संतुष्ट झाले. पुढे काश्मीरचा सुभा सर्फराजखान यास ऱ्होडस येथे आपले जवळ बोलावून अहमदशहा सरहिंद येथे गेला. तेथे येताच शीख लोकांनी सरहिंदाची धूळधाणी केलेली पाहून त्याचे मनास फार वाईट वाटले. त्यानंतर तो लाहोरास आला, तेथे आबेदुल्लाखान यास त्याने सुभा नेमले. याच सुमारास त्याची बारा हजार दुर्राणी फौज एकदम परत काबुलास जाण्यास निघाली. यामुळे त्याल आपले सर्व मनोरथ बाजूस ठेवून त्या फौजेबरोबर काबुलास परत जाणे भाग पडले. यावेळी सुध्दा त्याच्या फौजेस शीख लोकांनी हल्ल्यावर हल्ले चढवून जर्जर करण्यास मुळीच कमी केले नाही. अबदल्लीची पाठ फिरताच शीख लोकांनी लाहोर वगैरे अबदालीने काबीज केलेला सर्व मुलूख गनिमी काव्याच्या पध्दतीने आपल्या ताब्यात घेतला. या शीख लोकांमध्ये रणजीतसिंगाचा आजा चरकसिंग हा पुढारी होता.

### अहमदशहाचा शेवट

१८. काबुलमध्ये अहमदशह परत गेल्यावर फार दिवस जगला नाही. खुरासान येथील बंड मोडून तो कंदाहार येथे गेला. तेथे त्याचा नासूर हा रोग फार वाढला व शेवटी सन १७७३च्या जून महिन्यात मर्धान येथे हा शूर, साहसी, उद्योगी, विजयी व युध्दशास्त्राविशारद सेनापती आणि तत्कालीन यांच्यामध्ये  अग्रणी असा लौकिक असलेला अहमदशहा मरण पावला. यावेळी त्याचे वय पन्नास वर्षांचे होते.

१९. अहमदशहा हा आपल्या प्रतिपक्षांशी जरी अत्यंत क्रूरतेने वागत असे, तरी तत्कालीन इतर जेत्यांशी त्याची तुलना करिता तो बराच उदार व उदात्त असून स्वकीयांविषयी प्रेमळ व स्वत:च्या प्रजेशी न्यायी असा होता. गरीबांस दानधर्म करण्यात तो कधीही मागे पाहत नसे. आणि त्याच्या उपयोगी पडणारास तो भरपूर मोबदला देत नसे आणि त्याच्या उपयोगी पडणारास तो भरपूर मोबदला देत असे. खोरासांनापासून सरहिंदपर्यंत व

आक्ससपासून इराणी आखातापर्यंत त्याचा अंमल चालत होता. त्याचे नाव निघताच त्याच्या मित्रांना धीर येत असे व शत्रूंच्या हृदयात धडकी भरत असे. विद्वानांचा चाहता व पोशिंदा असून धर्मगुरूबद्दल त्याचे मनात आदर बसत असे, तसे स्वत: चांगला सुशिक्षित असून शक्य तेथे त्याचे शिक्षणास मदतही केली आहे. त्याने स्वत:ची राज्यतृष्णा तृप्त करण्यासाठी मनस्वी रक्तपात केला व उत्तरहिंदुस्थानावर स्वाऱ्यावर स्वाऱ्या करून तेथील लोकांस अत्यंत त्रास दिला हे जरी खरे असले तरी तत्कालीन पध्दतीकडे व आशिया खंडातील इतर जेत्यांकडे पाहिले म्हणजे अहमदशहा त्यांच्या पेक्षा पुष्कळपटीने श्रेष्ठ असा वाटतो. त्याचे शौर्य, त्याचा सतत उद्योग व त्याचे युध्दशास्त्रांतील नैपुण्य ही अवलोकन केली म्हणजे या त्याच्या गुणांबद्दल त्याची प्रशंसा केल्याशिवाय राहवत नाही.

# ८. रामशास्त्री

## जन्म स.१७२० मृत्यू ता. २५–१०–१७८९

***न्यायात पथ: प्रविचलन्ति पदं न धीर :***

१. रामशास्त्री या पुरूषांचे नाव आपण नेहमी ऐकतो परंतु त्याची विशेष माहिती अशी फारच थोड्यास असते. याचा जन्म कधी झाला हे समजण्यास मुळीच साधन नाही. याने पेशव्याच्या दरबारात सन १७५१ मध्ये नोकरी पत्करली असा उल्लेख आहे. हा माहुलीचा राहणारा होय.

२. याचे आईबाप लहानपणीच निवर्तले याचा काका गरीब भिक्षुक असे. याचे लहानपणी विद्या अशी मुळीच मिळवली नसल्याने हा वयात येईपर्यंत जवळ जवळ निरक्षरच राहिला होता, असे म्हणण्यास काही हरकत नाही. ब्राह्मण भोजनात जेवावे, खेळकर, मुलांत उनाडावे व कृष्णा नदीत पोहावे असे याचे लहानपणी विविध व्यासंग असत. चांगला पंधरा सोळा वर्षांचा झाल्यावर हा काही द्रव्यार्जन करीत नाही असे पाहून याच्या काकाने याला घरातून हाकलून दिले. त्यामुळे निराधार होऊन याने उदरभरणार्थ सातारच्या अनगळ सावकाराकडेस शागिर्दाची नोकरी धरिली. या नोकरीत असताना एके दिवशी पाय धुण्यास बसल्यावर

त्याच्या  पायावर रामा पाणी घालीत असता त्याचे लक्ष सावकाराच्या कानातील भिकबाळीकडे गेले, तेव्हा सहजच पाण्याची धार नीट पायावर न पडता बाजूस पडू लागली, तेव्हा सावकार म्हणाला, काय रे रामा, कुठे लक्ष आहे, हे ऐकताच रामा चटकन म्हणाला आपल्या कानातील भिकबाळीकडे माझे लक्ष गेल्याने पाणी टाकण्यात दुर्लक्ष झाले. यावर सावकारने अशी भिकबाळी तुला पाहिजे काय? अशी पृच्छा करीताच रामा होय म्हणून लागलीच म्हणाला, तेव्हा सावकार त्याला हिणवून म्हणाला, अरे असे सोन्यामोत्याचे दागिने श्रीमंत, विद्वान किंवा शूर पुरूष यांनाच शोभतात. तुझ्या सारख्या शागिर्दास ते कसे शोभतील? हे मर्मभेदक भाषण ऐकून रामास फार वाईट वाटले व त्याने काशीक्षेत्री जाऊन विद्याभ्यास करण्याचा निश्चय केला. अर्धातच यावेळी त्याचे वय चांगले वीस वर्षांचे झाले असावे.

३. रामा दाक्षिणात्य असूनही केवळ आरंभशूरच नव्हता. त्याने विद्यार्जनाचा आपला निश्चय ताबडतोब आपल्या यजमानास कळविला व यजमानानेही उदार बुध्दीने रामास साहाय्य करून त्याची काशीस रवानगी करून दिली.सातारचे अनगळ सावकार कोट्यधीश असून मोठे धर्मात्मेही होते. काशीपासून रामेश्वरापर्यंत अनेक ठिकाणी यांनी केलेल्या धर्मकृत्यांची थोरवी अद्यापही वर्णन करण्यात येते. कोठे घाट, कोठे धर्मशाळा, देवालये, कोठे निबिड अरण्यात विहिरी अशी अनेक लोकोपयोगी स्थळे त्यांनी बांधिली आहेत व अशा कित्येक स्थलांचे त्यांनी जीर्णोध्दारही केले आहेत. सारांश, अशा धर्मकृत्यांत त्यांनी लक्षावधी रुपये खर्चून आपले नाव चिरंजीव करून ठेविले आहे. माहुलीस कृष्णा व वेण्या यांच्या संगमावरील अनगळांचा घाट फार प्रसिध्द आहे. शेवटच्या रावबाजीच्या मनातून असा घाट आपण बांधावा असे फार होते. परंतु अनेक अडचणीमुळे हा त्याचा हेतू सिध्दीस जाईना. तेव्हा त्याने अनगळांच्या वंशजास एक लाख रुपये देऊन घाट बांधण्याचे पुण्योदक आपल्या हातावर घालण्यास सांगितले. यावेळी अनगळाचे घराणे अगदीच खालावले होते. तथापी अशाही विपत्तीमध्ये घाटों पुण्योदक त्यांनी बाजीरावाचे हातवर सोडण्याचे साफ नाकारले यातच त्याचा थोरपणा व्यक्त झाला, असो.

४. रामा जेव्हा काशीस गेला तेव्हा तेथे प्रख्यात वैय्याकरण बाळभट पायगुडे यांची पाठशाळा फार प्रसिध्द होती. रामाने बाळमभटास भेटून आपली सर्व हकीकत सांगितली व त्यांच्या पाठशाळेत तो प्रवीष्ट झाला. हा वीस वर्षाचा झाला असून अद्याप याला रुपावळीसमासचक्रही येत नाही हें पाहून पाठशाळेतील विद्यार्थ्यास फारच आश्चर्य वाटले. परंतु याचा दृढनिश्चय पाहून गुरुजींनी आपल्या घरी ठेवून घेतले. बाळभटजीच्या पाठशाळेचा सालीना खर्च सुमारे एक लाख रुपये असून तो जयपूर संस्थानाकडून पुरविला जात असे.

५. या पाठशाळेत रामा दाखल झाल्यावर त्याला त्याच्याच सारखा बाणेदार सहाय्याही तेथे मिळाला. त्याचे नाव अनंतभट्ट होय. हा अनंतभट्ट बाळभट्ट पायगुंड्यांचा भाचा असून बाळभट्टाने यास आपली मुलगी दिली असल्याने हा त्याचा जावईही होता. बाळभटाच्या घरी असा प्रघात असे की, त्याचे जे शिष्य चतु:शास्त्री असे नामांकित विद्वान असत त्यास रोज पंक्तीत चांदीची ताटे मांडीत असत व बाकीच्यास केळीची पानेच असत. अनंतभट फक्त जावईच होता, विद्वान नव्हता त्यासही वेळीचे पानावरच बसावे लागे. एके प्रसंगी हे जावईबुवा आपणास चांदीचे ताटच पाहिजे असा सासूबाईजवळ हट्ट घेऊन रुसून बसले. सर्व मंडळी आपआपल्या पात्रावर येऊन बसली, परंतु अनंतभट्ट न आल्याने खोळंबा झाला. म्हणून गुरूजीनी तपास केला, तेव्हा त्यास जावईबाबाच्या रागावण्याचे कारण समजले. आजचा सणाचा दिवस आहे. आज जावईबाबास चांदीचे ताटात वाढावे, अशी सासूबाईंनीही आतून शिफारस केली व त्यावर गुरूजी म्हणाले, ‘आमच्या पंक्तींत चांदीच्या ताटात मान जावयासाठी नाही. फक्त विद्वानासच आहे. तुमच्या जावयास चांदीच्या ताटातच वाढवयाचे असल्यास स्वयंपाक घरात चुलीजवळ खुशाल त्यांचे पान मांडा, आमची त्याचा मुळीच हरकत नाही. येथे विद्वानांच्या पंक्तीत मात्र त्यांना चांदीचे ताटात बसता येणार नाही. कारण ते स्वतः निरक्षर असल्याने त्यास चांदीचे ताट दिल्याने विद्वानांचा अपमान केल्यासारखे होईल.’ गुरुजींचे हे स्पष्ट व निश्चयात्मक भाषण ऐकताच अनंतभट्ट मुकाट्याने केळीच्या पानावर जेवावयास येऊन बसला. परंतु हा प्रकार त्यास फार लागला व तेव्हांपासून दृढ निश्चयाने व एकाग्रतेने

अभ्यास करण्यास त्याने आरंभ केला. अनगळांच्या घरचा रामा व हा अनंतभट्ट व या दोघांचाही स्वाभिमान अपमानाने जागृत झाला व जवळ जवळ ते समवयस्क असल्याने त्यांची गट्टी जमली व उभयतांनी आपला विद्याभ्यास पूर्ण होईपर्यंत पाठशाळा, गंगानदीव व काशीविश्वेराचे देऊळ या व्यतिरिक्त चौथ्या स्थळांचे दर्शन घेतले नाही.[1]

६. रामशास्त्री जसा प्रख्यात धर्मशास्त्री झाला तसाच अनंतभट्टही मोठा वेदांती म्हणून प्रसिद्धीस आला. विश्वगुणादर्श काव्याचा कर्ता व्यंकटाध्वरी हा द्वैतवादी असल्याने याच्या व अनंतभटाच्या वादाची एक दंतकथा प्रसिद्ध आहे. हा कवी पुण्यास काही दिवस राहत असताना मोठ्या थाटाने रोज संध्याकाळी फिरावयास जात असे. त्यावेळी मस्तकावर सुवर्ण कीरिट, बहुमोल, शाल असा एकंदर याचा ढौल असून याच्यापुढे सुवर्ण दंडधारी भालदार महाभाष्यखंडन कर्तार: असे ललकारात धावत असत. हा याच्या स्वारीचा बडेजाव दंभ एकदा रामशास्त्रीने प्रत्यक्ष पाहिला. तेव्हा त्या अत्यंत नि:स्पृह पुरुषास याचा फार राग आला व त्याने महाभाष्यांचे खंडन अनंतभट्टापुढे करण्यास व्यंकटाध्वरीस आम्हास केले. ठरविलेल्या पहिल्या दिवशी अनंतपट्ट एकाएकी आजारी झाल्याने वाद तहकूब राहिला. दुसऱ्या दिवशी मुकर्रर केला तेव्हा हा व्यंकटाध्वरी पळून गेला. ही जुनी ऐतिहासक गोष्ट भारत वर्षात दिली आहे. परंतु अनंतभट्ट हा अठराव्या शतकांतला असून व्यंकटाध्वरी सताराव्या शतकांतला आहे. तथापी यावरून इतके दिसतें की, कोणातरी तत्कालीन द्वैतवाद्यांशी

*1. ता. ७ मे १७६७ या वेळी मराठ्यांची " छावणी कर्नाटकांत होती तर मोठी कामें सहजांत झाली असती. हैदरनायकाने आजपावेतों दुराचरण केले त्याचे प्रायश्चित्त बरेवजेने व्हावे असा समय होता. परंतु देशाचा पायबंद जबरदस्त आहे, यामुळे छावणी होणे दुरापास्त" झाले. या वेळी निजामास कांही खंडणी हैदराने द्यावी असे ठरले होते. परंतु मराठ्यांस मिळालेली खंडणी, लूट व मुलूख यांचा निमा भाग, काहीही कामगिरी न करता निजामाला पाहिजे होता. त्या त्याच्या मागणीस मराठ्यांनी मान्यता दिली नाही. पुण्यास दादा बिघाड करणार असे वर्तमान आल्याने पेशव्याने कर्नाटकांत छावणी न करतां परत जाण्याचे ठरविले आणि ता. ७ मेला रामशास्त्री यास लिहिले.*

मराठी रियासत खंड -5, पान-91

अनंतभट्टाचा वाद होऊन त्याचा वरप्रमाणे प्रकार झाला असेल व त्या वाद्याचे व्यंकटाभ्यरीहेच कदाचित नाव असेल्र कसेही असो, अनंतभट्ट पुढे नामांकित विद्वान झाला असे या दंतकथेवरून दिसते.

७. शिक्षण संपादन केल्यावर रामशास्त्री सन १७५१ मध्ये पेशव्यांचे दरबारात धर्मखात्यात चाकरीस राहिला. नानासाहेब पेशव्यांच्या अंतापर्यंत त्याची विशेष प्रसिध्दी दिसत नाही. तथापि सन १६५९ मध्ये बाळ कृष्णशास्त्री निवर्तल्यावर यालाच न्यायाधीशाच्या जागी नेमिलें असे डफ म्हणतो. थोरल्या माधवरावाने मात्र त्याला सन १७६४ मध्ये मुख्य न्यायाधीश नेमीले यात शंकाच नाही.[2] त्याच्या न्यायैकशीलतेबद्दल इतकी प्रसिद्धी आहे की, तिचे वर्णन करण्याचे मुळीच कारण नाही. त्याचे निवाडे अद्यापही सर्वमान्य समजले जातात. डफने त्याची केलेली स्तुती योग्य आहे. इतकेच नव्हे पण खरंच सांगावयाचे तर ती थोडीच आहे, असे म्हटले तरी चालेल.

८. थोरल्या माधवराव पेशव्याचा दरारा सर्व प्रसिध्दीच आहे.[3] पण हा

---

*2. शिवाजी महाराजांना समर्थ रामदास परमार्थिक गुरु होते, त्याप्रमाणे माधवराव पेशव्यांना रामशास्त्री हे ऐहिक गुरु होते, असे नजरेस येऊन त्याच्याबद्दलचा आपला आदर द्विगुणित होतो.*

मराठी रियासत खंड -5, पान-270

*3. हैदरच्या चढाईच्या बातम्या ऐकून माधवरावाच्या जिवाचा तीळपापड होत असे. राक्षसभुवनच्या लढाईनंतर निजामाशी चाललेल्या लढाईचा शेवट होताच पेशव्याने सन १७६३ च्या अखेरीस पटवर्धनास पुढे रवाना करून सन १७६४ च्या फेब्रुवारीत मोठ्या फौजेसह पेशव्याने कृष्णानदी ओलांडून हैदरावर चाल केली. सन १७६३ च्या दसऱ्यासच स्वारी जमावाजमव चालू झाली. जातांना प्रथम कोल्हापुरास जाऊन तसे जिजाबाईस भेटला व तिचा जम नीट बसवून दिल्यावर ठिकठिकाणच्या खंडव्या वसूल करीत आपली जरब बसवीत पेशवा विकोडीमनोळीवर आला. जिजाबाईला वचन दिल्याप्रमाणे ही दोन्ही ठाणी पेशव्याने कृष्णाबाई शिंदे इच्या कबजातून काढून परत जिजाबाईस दिली. इतके होइपर्यंत चैत्रमास आला. जवळ स्वारीतील कच्ची हकीकत तो मातुश्री व रामशास्त्री ह्यांस लिहून कळवी.*

मराठी रियासत खंड -5, पान-78

पेशवासुद्धा रामशास्त्रास फार मानीत असे. स्वारींत असताना स्वारींतील प्रत्येक महत्त्वाची बाबत तो शास्त्रीबोवास नियमित कळवीत असे. हैदरावरील स्वारीत असताना माधवरावाची प्रकृती फार बिघडली, परंतु स्वारीपूर्ण केल्याशिवाय जेव्हा तो परतेना तेव्हा रामशास्त्र्याने त्याच्या प्रकृतीच्या अस्वास्थामुळे एकदम परत फिरावे असे लिहून पाठविले. हे पत्र येताच 'आपल्या आज्ञेबाहेर काय आहे,' असे कळवून तात्काळ सैन्यासह तो परत फिरला. अगदी थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आपल्या मातोश्रीच्या खालोखाल आदर माधवरावास रामशास्त्र्याबद्दल असे. माधवरावाने आपल्या राज्यांत ज्या सुधारणा केल्या त्यास रामशास्त्र्याची अनुमती असे आणि इतर कोणत्याही पेशव्यापेक्षा माधवरावाचा स्वभाव जो एवढा न्यायनिष्ठुर दिसतो त्याला रामशास्त्रीच कारण असावा असे वाटते.

९. थोरला माधवराव पेशवा ब्रह्मकर्मात फार वेळ घालवू लागला हे पाहून रामशास्त्राने त्याचा निषेधकरून प्राप्त कर्तव्याची त्याला जाणीव करून दिली. माधवराव पेशव्याची पत्नी रमाबाई हिने रामशास्त्राच्या कुटुंबास एकदा वस्त्राभरणांनी लेपवून घरी पाठविले असता ती वस्त्राभरणे रामशास्त्राने तत्काळ परत केली, इत्यादी रामशास्त्राच्या नि:स्पृहपणाच्या गोष्टी प्रसिद्ध आहेत.[4] पण सर्वांहून खडतर अशी त्याच्या नि:स्पृहपणाची

---

*4. यात रामराजांचे नाव न घालता त्याने मुद्दाम गतकालीन शाहूचे नाव घातले आणि कार्तिक शुद्धांत म्हणजे ऑक्टोबर अखेरीस आळेगाव येथे वस्त्रांचा स्वीकार केला. ह्याच ठिकाणी रामशास्त्री दादास भेटला असला पाहिजे.* मराठी रियासत खंड -5, पान-345

*5. खून करण्याची प्रवृत्ती मराठेशाहीत सहसा आढळत नाही आणि नारायणरावास तरी मारावे असा विचार दादाचे किंवा कटवाल्याचे मनांत आरंभी मुळीच नव्हता, पहिली कटाची रचना नारायणरावास अटक करून दादास कारभार द्यावा एवढीच होती आणि तसाच लेखी हुकूम दादाने. दिला होता. त्या हुकुमांत 'ध' चा 'मा' केला गेला ह्यांत संशय नाही. रामशास्त्री ह्याने तपास केला तेव्हा ही चिठ्ठी त्यास सांपडली,तीत 'ध' चा 'मा' केला होता. हे ध्यानांत ठेविले असतां कटाची मुख्य जबाबदारी दादावरच येते. रामशास्त्र्याचे तपासांत हेच सिद्ध झाले.*
मराठी रियासत खंड -5, पान-318-319

परीक्षा नारायणरावाच्या खुनाच्या वेळी झाली. नारायणरावाच्या खुनांत राघोबाचे अंग आहे, असे सप्रमाण सिध्द होईपर्यंत राघोबाच्या पेशवेपदाला रामशास्त्रीने सुध्दा हरकत घेतली नव्हती. परंतु खुनी इसमाचा तपास मात्र तो बारकाईने करीत होता.[5,6,7] खुनानंतर सुमारे सहा आठवड्यांनी त्याला पुरावा मिळताच तो ताबडतोब राघोबास जाऊन भेटला व त्याने या दोघाबद्दल राघोबास देहांतप्रायश्चित सांगितले इतकेच नव्हे परंतु राघोबा पेशवाईवर असेपर्यंत आपण पुण्यास पाणी पिण्यास सुध्दा थांबणार नाही, असे सांगून तो लागलीच माहुलीस निघून गेला. राघोबा पेशवेपदावर असताना हे रामशास्त्र्याचे वर्तन कोणीही लिहून ठेवण्यास अगर बाहेर पाठविण्यास धजला नाही.यामुळे ही हकीकत नारायणरावाच्या बखरीशिवाय इतर कोठेच लिहिलेली आढळत नाही. नाना फडणवीस, सखाराम बापू वगैरे मुत्सद्दी मंडळीही ज्यावेळी राघोबाला

---

*6. खून झालेला ऐकून त्यास कांही वेळ चित्तभ्रमच झाला आणि रामशास्त्र्याचे तपासानंतर दादाचे अंगी दोष लागू होतांच, त्याने विरुद्ध कारस्थान रचण्याचे प्रमुखपण स्वीकारिले, गुन्ह्याचा तपास करून राजरोसपणे गुन्हेगार उघडकीस आणण्याचे मुख्य काम एकट्या रामशास्त्र्याने केवळ आपल्या न्यायाधीशीच्या जोरावर केले. रामशास्त्र्यादि बाह्य उपकरणांपेक्षा न्यायशक्ती केवढी प्रभावशाली व निष्ठुर आहे, ह्याचा प्रत्यय ह्या शास्त्रीबोवाच्या कृतीत दिसतो. गंगाबाई गरोदर असल्याची खात्री झाल्यावर आणि आंनदीबाईकडून तिला मारण्याचें प्रयत्न उघडकीस आले तेव्हा आणि रामशास्त्र्याने दादाचे अंगी गुन्हा लागू केल्यावर मग म्हणजे खूनानंतर तीन चार महिन्यांनी बारभाईचे कारस्तान सिद्ध झाले; आणि जानेवारी सन १७७४ चे अखेरीस गंगाबाई पुरंदरी पोंचल्यावर तेथून नवीन कारभार सुरू झाला.*

मराठी रियासत खंड -5, पान-331-332

*7. प्रकरण उरकून गेल्यावरही गुन्हेगारांना डोक्यावर चढवून ठेवले आणि कर्त्या मंडळीवर वक्रदृष्टी धरिली, यामुळे त्याजबद्दलचा पूज्यभाव काही थोड्या स्वार्थी व्यक्तीखेरीज करुन सर्व जनतेच्या अंतकरणातून पार मावळला. पुढे महिना, दोन महिन्यात रामशास्त्र्याने तपास करुन न्यायदेवतेने ही पापे दादाचे माथी मारिली.*

म.रि. खंड-5, पृष्ठ क्रं. 350

थरथरा कापत होती. त्यावेळी रामशास्त्राने राघोबाच्या पदरी दोघांचे माप पुरेपूर टाकून स्वत: पुण्याहून माहुलीस ताबडतोब चालता झाला. राघोबा जनतेच्या मनातून निखालसपणे उतरण्यास व नानाबापूंना राघोबाविरुद्ध कारस्थान रचण्यास हा न्यायदेवतेचा खंबीर दोषारोपच मोठा आधार झाला. यारभाईंचे कारस्थान सिध्दीस गेल्यावर सवाई माधवरावाचा जन्म होऊन राज्यकारभार सुरळीत चालू लागताच रामशास्त्रास पुन:बोलावून पुण्यास न्यायाधीशीवर नेमण्यात आले व ते काम त्याने शेवटपर्यंत केले. रामशास्त्रासारख नि:स्पृह रामशास्त्रीच होय.

१०. परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या बयाबाई नावाच्या सात वर्षांच्या कन्येचा पुनर्विवाह करण्यास रामशास्त्रीने संमती दिली. तसेच प्रभूंच्या ग्रामण्याच्या बाबतीत त्याने प्रभूंच्यातर्फे निकाल दिला, या गोष्टी त्याच्या प्रागतिक मताची साक्ष देतात. पुनर्विवाहास संमती दिल्याबद्दल लेखी पुरावा अद्यापही सापडत नसल्याने ही दंतकथा अविश्वसनीय असावी असे कित्येकांचे म्हणणे आहे.परंतु रामशास्त्रा सारख्यांची संमती मिळवूनही ज्याअर्थी हा पुनर्विवाह घडवून आणण्यात परशुरामभाऊ आप्तेष्टांच्या भितीने धजला नाही. त्या अर्थी ही मिळवलेली संमती व एतत संबधी कादगपत्रे त्याने नष्ट करून टाकले असणे शक्य आहे.

११.रामशास्त्री एवढा नि:स्पृह व न्यायैकशील होता तथापी त्यावरही लाच खाल्याचा आरोप कित्येकांनी केल्याचा उल्लेख सापडतो. यावरून एवढेच सिध्द होते की, जग कोणलाही नावे ठेवल्याशिवास राहत नाही. जोशी व पाध्ये यांच्या वादातील रामशास्त्राने दिलेले निवडपत्र आता प्रसिध्द झाले आहे. त्यावरून वतनावर जोश्यांचा हक्क सिध्द झाला असून पाध्ये खोटे ठरले आहेत. या निवाड पत्रांत पाध्यांनी खोटी ताम्रपणे केल्याचाही आरोप रामशास्त्र्यांने पाध्यावर चालत असून त्यापूर्वी हे वतन आपणांकडेच चालत होते असे पाद्यांचे म्हणणे होते, परंतु तेही सिध्द झाले नाही. तथापी सिध्द झाले असे समजले तरीही तीस चाळीस वर्षाचा जोश्यांचा भोगवटा काढून टाकून ती वतने पाध्यास दिली नाहीत, याबद्दल रामशास्त्राला दोष देणे न्याय होणार नाही.

१२. सन १७५१ साली रामशास्त्री नोकरीत राहिला. त्यावेळी त्यास दीडमाही रुपये ४७ व त्याशिवाय तैनात, श्रावणमासची दक्षिण व कापड

या बाबती मिळून वर्षाचे अखेरीस रुपये १४४१ पावल्याचा उल्लेख आहे. म्हणजे दरमहा सरासरी एकशे वीस रुपये पगार असे दिसते व त्याच्या पगाराची हीच सरासरी शेवटपर्यंत कायम असलेली दिसते. कधी त्यास सालीना हजार तर कधी तीनशे साठापर्यंत हा पगाराचा आकडा खाली आलेला दिसतो. सन १७६४ साली मात्र त्याला पालखीची असामी दिली व तेव्हापासून सालीना दोन हजार रुपये त्याचे नावे खर्च पाडल्याचे नमूद आहेत. या शिवाय सन १७६६ साली त्याचे कर्ज वारण्यास पाच हजार रुपये दिल्याचाही दाखला आहे. सन १७६४ नंतर त्याच्या पगाराची रक्कमही तीन हजार पर्यंत वाढल्याचे दिसते. या शिवाय सन १७७९ साली शास्त्री यांची पत्नी निवर्तली तिचे उत्तरकार्यास रुपये १५०० व शास्त्राच्या दुसऱ्या लग्नास तीन हजार रुपये खर्च पडल्याचे हिशेबात नमूद आहेत. रामशास्त्र्याने आल्या बयाच्या सुमारे साठाच्या वर्षी दुसरे लग्न केले हा तत्कालीन धर्म समजूती शिवाय इतर कसलाही परिणाम नसावा.

ब्राह्मणाने सदोदित कोणत्या तरी आश्रमात राहिले पाहिजे ही धार्मिक समजूत व अनेक कारणांनी चतुर्थाश्रम घेणे आपणास अशक्य ही खात्री वाटून रामशास्त्रीयाने पुन: लग्न केले असले पाहिजे. असो या नंतर सन १७७५ साली कर्ज वापरण्यासाठी म्हणून पुन: रामशास्त्र्याला पंधरा हजार रुपये दिल्याचा उल्लेख असून सन १७८६ साली मुलाचे लग्नास सामान दिले असाही दाखला सापडतो. रामशास्त्री सन १७८९ हजार रुपये व त्याच्या गोपाळशास्त्री नामक मुलास वस्त्रे देऊन हजार रुपये सालाचा तनखा बांधून दिला व ही रक्कम पुढे तीन हजारपर्यंत वाढविली.

रामशास्त्राने पेशव्याच्या दरबारात सरासरी चाळीस वर्षे नोकरी केली व या चाळीस वर्षात त्याचे नावे पगार, कापड, पालखी, श्रावणमास दक्षिणा, तैनात, कर्जनिवारण पत्नीचे उत्तर कार्य अशा अनेक बाबती मिळून अवघे पंचावन हजार नऊशे अडुसष्ट खर्च पाडल्याचे पेशवे दप्तरात नमूद आहेत. म्हणजे सरासरी सालीना चौदाशे रुपये पडतात. या वरुन आरंभी त्याला दरमहा एकशे वीस रुपये पगार सन १७५१ मध्ये पडल्याचे जे लिहिले आहे तोच त्याचा दरमहा एकशे वीस रुपये पगार आमरण त्यास पावलेला दिसतो. माधवराव पेशव्याच्या वेळी राज्याचा एकंदर वसूल सुमारे अठरा कोटी व सवाई माधवरावाच्या कारकीर्दीच्या शेवट

भागी तीस कोटी होता हे लक्षात ठेवले आणि रामशास्त्री त्याचा मुख्य न्यायाशीश होता हे पाहिले म्हणजे त्या स्वराज्याच्या काळात स्वस्ताई असल्यामुळे किती थोड्या पगारावर कितीतरी मोठ्या योग्यतेची माणसे मिळत असत हे स्पष्ट दिसते.

---

*✲ 1776–1779 **बंडाचा तोतयाचा** महादजी सिंद्याने राणेखान व बाळराव गोंविद यांस रघूजी आंगऱ्याकडे पाठवून तोतयाचा ताबा घेतला. इंग्रजांनी आंगऱ्यावर हल्ला केल्यास त्याचे निवारण करण्याची हमी महादजीने घेतली. तोतया व त्याला सामील असलेले कित्येक गुन्हेगार यांस घेऊन महादजी पुण्यास आला.*

*मराठी रियासत खंड –6, पान–83*

*✲ **21 एप्रिल 1781** तळेगावावर मिळालेल्या विजयाचा आनंदोत्सव म्हणून नानाने बाल पेशव्यास पुण्यास समारंभाने आणून वैशाख शु. ५ ता. २१ एप्रिल रोजी पर्वतीवर त्याची मुंज मोठ्या समारंभाने केली व शनिवारवाड्यांत गृह–प्रवेश करविला मुंजीच्या मुहूर्ताची वाटाघाट रामशास्त्री याचे पत्रांत दिसते.*

*मराठी रियासत खंड –6, पान–152*

*✲ **( दादाचे प्रयश्चित व अखेर) –** याप्रमाणे प्रायश्चित श्रावण शुद्ध ६ सोमवारी ( ४/८/१७८३) गोदादारणांचे संगमी सांगवी येथे थोर ब्राह्मण समुदाय होम केले. नंतर दादाने मातुश्रीची भेट घेतली. या भेटीचे वर्णन मात्र कोठें कागदावर आढळत नाही. एवंच रामशास्त्री यांच्या तपस्वी वाणीने दादास सांगितलेली देहांत प्रायश्चिताची शिक्षा, तत्वार्थाने खरी झाली. त्याच्या देहान्तही लागोलाग झाला. पुण्याचे किंवा राज्याचे पुनःदर्शन त्यास घडले नाही.*

*मराठी रियासत खंड –6, पान–279*

# ९. भास्करराम

***मृत्यू स. १०४४***

बाळाजी विश्वनाथाच्या उदयानंतर जी चितपावन घराणी उदयास आली त्यापैकी कोल्हटकरांचे एक घराणे होय. रामाजी नारायण कोल्हटकर या नावाचा एक पुरूष निव्वळ साधुवृत्तीचा होता. त्यास भास्कर व कोन्हेर असे दोन मुलगे होते. यापैकी भास्कर हा शूर असून कोन्हेर हा मुत्सद्दी होता. हे उभयतांबंधू रघूजी भोसल्याच्या दरी होते व रघुजीचाही या घराण्यावर फार  लोभ असे. कारण रघुजींने लहानपणी भास्करपंताच्या मातोश्रींचे स्तनपान केले होते.

२. शाहूच्या पश्चात मराठी राज्यांची सूत्रे नानासाहेब पेशव्यांच्या हातात आली तेव्हा त्यास बाबूजी नाईक, दमाजी गायकवाड, तुळाजी आंगरे, रघूजी भोसले, प्रतिनिधी, ताराबाई वगैरेनी फार जोराचा विरोध केला या विरोधकांपैकी एकाच्या म्हणजे रघुजी भोसल्याच्या पदरी भास्करराम हा सेनापती असल्याने त्याच्याबद्दल नानासाहेब पेशव्यास कधीच आदर वाटला नाही. तथापि भट पटवर्धनाप्रमाणेच हे कोल्हटकराचे घराणेही तेव्हा शौर्यात नावाजलेले गेले होते यात शंका नाही.

३. रघूजी आणि पेशवा यांचा युध्दप्रसंग होऊन तह झाल्यावर रघुजीस

मुलुखगिरीसाठी फक्त बंगाल प्रांतच मोकळा राहिला होता. या बंगालातील स्वाऱ्यात भास्करराम आणि कोन्हेरराम यांनी रघुजीस फारच उत्कृष्टपणे सहाय्य केले. सन १७४२ पासून सन १७५१ पर्यंत रघुजींने बंगाल प्रांतात एकंदर चार साऱ्या केल्या. यावेळी अलीवर्दीखान हा बंगालचा नबाब होता.

४. सन १७४१ मध्ये अलीवर्दीखानाने बंगाल बिहार आणि ओरिसा उरसा ओढ्या प्रांत मिळविला. यावेळी मीर हबीब नावाचा एक मनुष्य ओरिसाचे कारभारावर होता. या इसमासा अलीवर्दीने हाकून देऊन तेथे आपला नातू सिराजउददौला यास ठेविले. नागपुराहून बंगालात जाताना रस्त्यावर हा ओरिसा प्रांत लागतो. याप्रमाणे मीर हबीब पदच्युत होताच त्याने रघुजी जवळ मदत मागितली. यावेळी रघुजी कर्नाटकांत असून भास्करराम हा वऱ्हाड नागपुराकडेस होता. रघुजींने लवकरच भास्कररामास ओरिसावर पाठविण्याची तजवीज केली.

५. इकडे सिराजउदौल्याने ओरिसामध्ये फार जुलमी वर्तन केल्यामुळे तेथील प्रजा बिथरुन गेली. अशा संधीत आपण स्वारी केली तर आपला कार्यभाग होईल, अशा हेतूने भास्कररामाने ओरिसाकडे कूच केले. परंतु भास्करराम तेथे जाऊन पोचण्यापूर्वीच अलीवर्दीखानाने ओरिसातील बंडे मोडून टाकिली. व तो परत जाण्यास निघाले, परंतू वाटेतच त्यास भास्कररामाच्या आगमनाची खबर मिळाली. भास्कररामाबरोबर अवघी दहा हजार फौज होती पण भास्करराम हा स्वत: उत्कृष्ट सेनापती असल्याने तो आपल्या फौजेची अशी काही व्यवस्था लावी की शत्रूसही फौज चाळीस पन्नास हजार आहे, असे वाटे. ज्या प्रमाणे एकटा नेपोलियन म्हणजे एक लाख सैन्य त्याचप्रमाणे एकटा भास्करराम म्हणजे चाळीस हजार फौज होय असे यावरून सिध्द होते.

भास्कररामाने पहिल्या धडाक्यांत पंचायत परगणा लुटून अलीवर्दीखानाच्या फौजेशी गाठ घालून तिचा फडशा उडविला. याप्रमाणे अलविदांचा पराभव होताच तो मोठ्या शिकस्तीने खटव्यापर्यंत मागे हटला. यावेळी या उभयतांमध्ये तहाची वाटाघाट चालूच होती. लढाई होण्यापूर्वी भास्कररामाने अलीवर्दीखानाजवळ ओरिसाच्या चौथाईबद्दल दहा लक्षांची मागणी केली, पण खानाने ती अमान्य केली. लढाई

हरल्यावर ही मागणी त्याने कबूल केली. पण यावेळी भास्करराम विजयी झाला असल्यामुळे त्याने आपली पूर्वीची मागणी एक कोटीपर्यंत वाढविली. ही मागणी खान कबूल करीना. त्यास भास्कररामाचा फार राग आला. त्याच्या पदरी अफगाण फौज होती. ती यावेळी बिथरली होती. पण खान मोठा मानी असल्याने त्याने भास्कररामास शरण जाण्याऐवजी फौजेचीच मनधरणी केली व कसाबसा जीव बचावीत खटल्यापर्यंत जाऊन त्याने तेथे मुक्काम केला. भास्करपंत त्याच्या पाठीवर होताच त्यास बर्धवान शहर रस्त्यांत लागले, ते त्याने मनसोक्त लुटले. या लुटीत भास्कररामास अगणित द्रव्य मिळाले. इतक्यात पावसाळा सुरू झाला. तेव्हा भास्कररामाने परत नागपुरास जाण्याचा बेत केला. परंतु ज्या मीर हबीबने भास्कररामास येथपर्यंत बोलाविले होते तो मीर हबीब त्यास असे अर्धेच काम टाकून परत जाऊ देईना. शिवाय मीर हबीबचा भाऊ अलीवर्दीच्या कैदेत त्याचीही सुटका अद्याप झाली नव्हती. निदान त्याची सुटका करून मग भास्कररामाने जावे असे मीरचे म्हणणे होते, मीरने आणखी असेही कळविले की, अलीवर्दीचा पराभव करुन मुर्शिदाबाद शहर लुटण्यास मिळाले तर अपार संपत्ती प्राप्त होईल.[1,2,3]

मीर हबीबने नुसते वरप्रमाणे सांगितले इतकेच नव्हे पण एकदम मुर्शिदाबरोबर एकट्याने चाल केली व आपल्या भावाची मुक्तता केली. यानंतर त्याने मुर्शिदाबादेतील प्रसिध्द सावकारास गाठून अडीच कोट रुपयांची लूट मिळवली व तो पुन: भास्कररामास येऊन मिळाला. भास्कररामाने हा मीर हबीबचा विजय पाहून तिकडेच पावसाळ्याची छावणी ठरविले. त्याने पुढे मिदनापुरपर्यंतची ठाणी काबीज केली. मध्ये हुगळी नदीस पूर आला असल्यामुळे अलीवर्दीखान भास्कररामाच्या

---

*1. चंद्रनगर व चिनसुरा ही इंग्रज, फ्रेंच व डच यांच्या व्यापारी वसाहतीची ठिकाणे होती, म्हणून त्यांजवर दहशत बसविण्यासाठी भास्करपंताने मीर हबीबच्या सत्याने हुगळी स्थल जुलैचे आरंभी काबीज केले.*

मराठी रियासत खंड -4, पान-58

*2. 1742-44 मध्ये भास्कररामाच्या नेतृत्वाखाली केलेल्या लष्करी मोहिमांची वर्णने आहेत.*

मराठी रियासत खंड -4, पान-78

तडाख्यातून सुटला. नाही तर भास्कररामाने याचवेळी त्याची चटणी उडवून दिली असती. अलीवर्दीखान याप्रमाणे निसटल्यावर उगीच स्वस्थ बसण्यापेक्षा काही तरी करावे या हेतूने मीर हबीबच्या स्वरुपाने भास्कररामने ताबडतोब हुगळी शहर हस्तगत केले. पुढे ओरिसांतील बालासोर बंदरही त्याने घेतले. गंगेच्या पूर्वतीरावरील प्रांत व मुर्शिदाबाद येथेच कायतो नवाबाचा अधिकार राहिला होता. मराठ्यांच्या पराक्रमाचा दरारा यावेळी भास्कररामाने बंगालवर फारच कडक बसविला. यावेळी भास्कररामाच्या हल्ल्यापासून आपले संरक्षण व्हावे म्हणून इंग्रजांनी कलकत्त्यास किल्ला बांधिला आणि त्या किल्ल्याभोवती एक फार मोठा खंदक खणण्यास सुरूवात केली. या खंदकास मराठा हीच अशी संज्ञा अद्यापही आहे. [4,5]

भास्करराम भराभर विजय मिळवत गेल्याने त्याला मागचा पुढचा फारसा पोच न राहून त्याच्या फौजची फारच पांगापांग झाली. बंगल्यांत नवरात्रामध्ये दुर्गापूजेचा फारच मोठा समारंभ करीत असतात. पावसाळा संपल्यावर भास्करपंताने विजयानंदात गर्क होऊन हा उत्सव फार मोठा

---

*3. भास्कररपंतानी मकसदाबादेस जाऊन कस्त मेहेनत केली आहे. त्याचे सार्थक इकडून फौज त्यांजकडे जाऊन पोंचली पाहिजे. लोकांमध्ये कोणी हयगय करील याज करिता फौजेचा गाह्य होय, कोणी असामी मागे न राहे असें करून तिळतुल्या दिरंग न करणे, यानंतर चार दिवसांनी पंताचर छापा पडला. खटवाच्या छावणीचा विध्वंस झाला. तरी भास्कररामने बिलकुल न उगमगतां धैर्याने धावपळीचे युद्ध खेळून नबाबचा जोर थोपवून धरिला आणि रघुजी व फौज येईपर्यंत निभावणूक केली. हल्ला येताच भास्करराम पंचेटच्या बाजूस पळून गेला. बर्धवान, हुगळी, हिजली ही स्थळे मराठ्यांनी सोडून दिली. राधानगर लुटून त्यांने एक टोळी कटकवर पाठविली. शेख मासूम म्हणून कटकया अधिकारी नबाबाच्या तफेचा होता. इकडे पंताचा माग काढीत अलिवर्दीखान त्याच्या पाठीवर आला. कटक कबजांत आणून आणि तेथील बंदोबस्त करून अलिवर्दीखान ता. ९ फेब्रुवारी १७४३ रोजी परत मुर्शिदाबादेस पोंचला. तदुप्रांत त्याजवर रघुजी व पेशवा चालून आले,ती हकीकत पुढे कळून येईल.*

मराठी रियासत खंड -4, पान-60

करण्याचे ठरविले व यासाठी मोठमोठ्या लोकांना त्याने आमंत्रणे दिली होती. भास्करराम या प्रमाणे चैनीत गर्क असलेला पाहून अलीवर्दीखनाने आपले सैन्य जवळच गंगेच्या पैलतीरावर आणून उभे केले. इतकेच नव्हे तर होड्यांचा पूल करून ते सैन्य मोठ्या बहादुरीने भास्कररामासमोर येऊन उभे राहिले व त्याने हल्लाही चढविला. उत्तरात्री अकस्मात या प्रमाणे हल्ला येताच भास्कररामच्या सैन्याची फार त्रेधा उडाली. परंतु मीर हबीबबने मोठ्या हिकमतीने मार्ग दाखवून मराठ्यांना या वेळी वाचविले. रघुजीने मदतीस फौज पाठवावी म्हणून भास्कररामाने मागणी केली होती व त्याप्रमाणे रघुजी तयारी करीत आहे तोच भास्करराम स्वत:च हार खाऊन नागपुरास परत आला. याचवेळी पेशवे आणि रघुजी यांची चुरस वाढली असून त्याचे युध्द झाले होते यामुळे रघुजीस बंगालकडेस लक्ष देण्यास सवड झाली नाही. पुढे सन १७४४ मध्ये रघुजींने फार मोठ्या फौजेनिशी भास्करपंतास बंगाल्यावर पाठविले. यावेळी मराठ्यांशी लढण्याचे आपले सामर्थ्य नाही, असे म्हणून अलीवर्दीखानाने कपटाने तहाची वाटावाट सुरू केली. ही वाटाघाट भास्करपंताच्या फौजेतील अलीभाई नावाच्या एका मुसलमान झालेल्या मराठ्याच्या मार्फत खानाने चालू केली होती. अलीवर्दीखानाने खटव्यास भास्करपंताचे जवळच आपला मुकाम ठेविला होता. या उभयांच्या भेटीचा दिवस मुक्रर होऊन भास्करपंत खानाच्या तंबूत त्यास भेटण्यास निवडक वीस मंडळीसह गेला. त्याचा तेथे फार मोठा आदरसत्कार झाला. आंत तंबूत जाऊन

---

*4. अल्पावकाशांत भास्करपंताने बंगालच्या नबाबास जर्जर करून मराठ्यांचा दरारा चहूकडे बसविला, हा त्याचा पराक्रम वाखाणण्याजोगा म्हटला.*

मराठी रियासत खंड -4, पान-59

*5. ता. ५ जुन १७४३ - यानंतर इकडील वर्तमान तारीख गतवर्षी राजश्री भास्कररामम फौजेसह वर्तमान मकसुदाबादेस जाऊन आलाबरदी खान यासो युद्धप्रसंग करून उप्रांत छावणी करून राहिला होता. त्याचे उपराळेयासी आम्ही फौजेसहवर्तमान मजल दरमजल श्रीगयेसंनिध गेले तो राजश्री बाळाजी पंडित प्रधान फौजसुधा तत्प्रांती आले. त्याजवरून सडी फौज राजश्री भास्करराम याजसमागमें देऊन माघारे रवाना केले आणि आम्ही फौजेसहवर्तमान बुलगेसुधां बेंडूचे घाटानजीक आलो.*

मराठी रियासत खंड -4, पान-67-68

बसताच खानाने भास्कर पंडित कोणते असा प्रश्न केला. तेव्हा मंडळींनी पंडिताकडेस अंगुलिनिर्देश केला, तो पाहताच खान एकदम 'काफिरकू मारो' असे मोठ्याने ओरडला. लागलीच मारेकरी धावून आले व त्यांनी भास्करपंताचा खून केला. तंबूच्या दोऱ्या कापून टाकिल्यामुळे एका ही सरदारास पळून जाता आले नाही. बरोबरच्या लोकांसह भास्कररामाचा खून होताच मराठ्याचे सैन्य लागलेच पळून गेले. या प्रमाणे अलीवर्दी खानास यावेळी यश मिळाले. ही बातमी रघुजी गायकवाड याने नागपुरकर भोसल्यास कळविली. या खुनाचा वचपा पुढे मराठ्यांस चार वर्षेपर्यंत घेता आला नाही. सन १७४८ मध्ये रघुजीचा मुलगा जनोजी याने मात्र या खुनाचा वचपा अगदी बरोबर घेऊन पाहिजे तसा तह अलीवर्दीखानापासून करवून घेतला. यावेळी भोसल्यांनी कटक, ओढिया वगैरे प्रांत हस्तगत करून अलीवर्दीखानाकडून भास्कररामाच्या खुनाबद्दल 'मुंडकटाई' म्हणून पंचवीस लाख रुपये रोख घेतले.

भास्कररामाच्या खुनाच्या वेळची अलीवर्दीखानाची एक आख्यायिका प्रसिध्द आहे. ती अशी की, खुनाच्या वेळी अलीवर्दीखान ही तंबूतच होता. तो त्या गडबडीत एकदम बाहेर पडला. त्यावेळी त्याच्या पायातील एक चर्म पादुका तंबूमध्ये राहिला. त्याप्रसंगी त्याने आपल्या हुजऱ्यात ती पादुका आणण्यास सांगितले. तेव्हा एक सरदार म्हणाला, खावंद जोडा पाहण्याची ही वेळ नाही. पण खानाने त्यास उत्तर दिले, 'छे मी जर या वेळी जोडा टाकून गेलो तर पुढे लोक असे म्हणतील की, नवाबसाहेब मोठ्या गर्दीने आपला जोडा टाकून पळून गेले,' असे म्हणून जोडा आल्यावर मग अलीवर्दीखान तेथून निघून गेला.

भास्करपंताचा खून झाला तेव्हा त्याची पत्नी ताईबाई ही गर्भिणी असून स्वारी बरोबरच होती. तिला एका पठाणच्या बायकोने गुप्त रीतीने काशीस पोचवून दिले. तेथे तिला एक मुलगा झाला तोच काशीराव भास्कर होय. वऱ्हाडातील सुमा रघुजीने या ताईबाईचेच नावे करून दिला होता.

रघुजीच्या बंगालमधील उद्योगाबद्दल व भास्कर पंताच्या पराक्रमाबद्दल नानासाहेब पेशव्याने अगदीच उदासीनता स्वीकारलेली दिसते. मराठी रियासत मध्यविभाग २ यात पृष्ठ ५०२ वर रा.रा. सरदेसाई पुढीलप्रमाणे

लिहित. किंबहुना भोसल्यांच्या पदरी राहणाऱ्या कोल्हटकरांची व पेशव्याची आरंभापासूनच पुष्कळशी चुरस व तेढ असावी, असा बळकट संशय येतो. इतर सर्व सरदारांत त्याच्या पराक्रमाबद्दल पेशव्यांकडून प्रोत्साहन व शाबासकी देण्यात येत असता, व भोसल्यांच्या पदरी कोल्हटकर घराण्यांतील पुरूष अलौकिक पराक्रम करीत असता व भास्करपंतासारखा मोहरा, खून होऊन गमावला असता त्यासंबंधाने पेशव्यांनी शब्दाने किंवा कृतीने यत्किंचितही बरावाईट अभिप्राय दाखविला नाही, जणू काय भोसल्यांचे राज्य व त्यांचा उद्योग हा मराठशाहीचा अंशच नव्हे...रघुजीस पेशव्यांचे पाठबळ असते, तर भास्कररामाच्या खुनाबद्दल सूड तेव्हाच घेता आला असता पराक्रमाच्या दृष्टीने पाहता पेशव्याच्या तोडीचेच कोल्हटकराचे घराणे होते. हा अभिप्राय फार मार्मिक व नि:पक्षपातीपणाचा आहे.

पुढे रघुजीच्या मृत्यूनंतर पेशव्यांनी या कोल्हटकरांस भोसल्यांच्या कारभारातून हळूच युक्तीने दूर सारून देवाजीपंत चोरघोड्यास पुढे आणले. असो कोल्हटकरांच्या घराण्याची व त्यातीत प्रसिध्द व कर्ता भास्करपंताची हकीकत वरप्रमाणे आहे.

# १०. मुजफरखान गारदी

## मृत्यू : १७ डिसेंबर १७९८

१. आपल्या हिंदुस्थानांत श्री शिवाजी महाराजांनी गनीमी काव्याची लढाई विशेष प्रसिध्दीस आणली. रात्री बेरात्री शत्रूवर छापा घालून लुटालूट करणे हे बाबू सावध होताच निसटून जाणे हे गनीमी काव्याच्या लढाईंचे मुख्य धोरण आहे. ज्याला लांब लांब मजला मारीत येतात, तो गनीमी काव्याच्या लढाईत कधीच पराभव पावत नाही. शिवाजी महाराजांच्या पश्चात या गनीमी काव्याच्या लढाईत विशेष तरबेज असे

---

*1. गारदी – गाडदी म्हणजे गाईस, कवाईत शिकलेले पायदळ शिपाई, हे लोक बहुतेक उत्तरेतील रोहिले, पठाण, हबशी, अरब, पुरभय्ये वगैरे जातींचे असून, त्यांत बहुधा मराठे कोणी नव्हते. महंमद इसफ, सुमेरसिंग व खरकसिंग हे त्याचे अंमलदार दहा पंधरा वर्षे पेशव्याचे नोकरींत मुजफ्फरखानाचे हाताखाली तयार झाले.*

मराठी रियासत खंड –5, पान–302

अनेक शूर पुरूष निर्माण झाले. त्यात सर्वांत शेवटला पुरूष म्हणजे रघुनाथराव पेशवाच होय व या त्याच्या गुणामुळेच त्यास राघो भरारी हे अन्वर्थक नाव मिळाले होते. आता त्याच्या शौर्याने राष्ट्राचे नुकसानच झाले हा भाग वेगळा आहे.

२. गनीमी काव्याच्या लढाईचा बीमोड कवायतीकंपूनी केला, हे जरी खरे असले तरी गनीमी कावा आणि कवायती कंपू या दोन युध्दपध्दतीत अमूक एक पध्दती दुसऱ्यांपेक्षा अधिक चांगले असे तज्ज्ञामध्ये सुध्दा अद्यापि निश्चितपणे ठरलेले नाही. अद्यापि त्यांच्यात तीव्र मतभेद आहे. आपल्या भारत रामायणामध्ये गनीमी काव्याच्या युध्दपध्दतीचा पूर्णपणे निषेध केलेला आहे व या पध्दतीस अधर्मयुध्द असे म्हटले आहे. शिवाजी महाराजांना, भारतरामायणापासून देशोध्दाराची स्फूर्ती झाली, असे कित्येक म्हणतात. त्यात कितपत तथ्य आहे, हे काही सांगता येत नाही, पण भारतरामायणात ज्या युध्दपध्दतीचा पूर्णपणे निषेध केला आहे व जी युध्दपध्दती भारतरामायणकारांनी पूर्णपणे त्याज्य व राक्षसी म्हणून ठरविली आहे. त्याच युध्द्पध्दतीचा शिवाजी महाराजांनी अवलंब केला होता यात मुळीच संशय नाही. सारांश भारतरामायणावरून शिवाजी महाराजास देशोन्नतीची स्फूर्ती झाली असली तरी त्यांनी युध्दपध्दती मात्र भारतरामायणातील त्याज्य असलेलीच स्वीकारली होती.

गनीमीकाव्यापेक्षा कवायती कंपू श्रेष्ठ होत अशी जी आपली समजूत झाली आहे तिला खरे कारण असे आहे की, कवायती युध्दप्रसंग निष्णात सेनापतीचा गनीमीकाव्याच्या अर्धकच्चा सेनापतीची युध्दप्रसंग होऊन त्यात अर्ध कच्चा सेनापतीचा पराभव झाला व त्यामुळेच गनीमी काव्याच्या पध्दतींविषयी आपला प्रतिकूल समज झालेला आहे. दोनही बाजूच्या निष्णात सेनापतीची गाठ सबंध महाराष्ट्राच्या इतिहासांत एकदाच पडली होती व तेव्हा कवायतीकंपूच्या सेनापतीस गनीमीकाव्याच्या सेनापती पुढे हात टेकावे लागले होते, हे आपण लक्षात ठेविले पाहिजे, तो प्रसंग कोणता हे प्रथम थोडक्यात सांगतो.

४. म्हैसूरात नंदराजा हा मुख्य प्रधान असताना त्याने हैदरनाईकास आपला सेनापती केला होता. हैदर नाईक हा कवायती पध्दतीमध्ये निष्णात असा सेनानी होता. कर्नाटकातून ठरलेली खंडणी पेशव्यास

न आल्यामुळे नानासाहेब पेशव्याने म्हैसूरावर गोपाळराव पटवर्धन व मल्हारराव रास्ते यांची रवानगी केली. शौर्यामध्ये पटवर्धनांचे घराणे फारच प्रसिध्द होते. त्यांच्या शौर्यांची कसोटी यावेळी उत्तम लागली. गोपाळराव पटवर्धन हा गनीमीकाव्याने लढणारा असल्यामुळे त्याजवळ तोपखाना मुळीच नव्हता. लांब लांब मजला मारून तो शत्रूस हैराण करीत असे. हैदरनाईकाची शिताफी काही वेगळाच असे एका मजबूत ठिकाणाहून कवाइती पायदळ व तोपखाना बरोबर घेऊन पहाटेच्या सुमारास प्रहरे गैरसावध असता तो गोपाळरावाच्या फौजेवर चालून येई. याप्रमाणे या उभयतां सेनापतीचा सामना सुरू झाला. गोपाळराव पौर्वस्त्य (म्हणजे गनीमी काव्याच्या) युद्ध पद्धतीत तरबेज असा होता. या प्रमाणे या दोघा सेनापतीच्या झटापती सन १७५९ मध्ये सुमारे तीन महिने सतत झाल्या व शेवटी गोपाळराव पटवर्धनाचे युध्द कौशल्य पाहून हैदर नाइकाने त्याच्यापुढे हात टेकले व रोख बक्षीस लक्ष रुपये त्यास देऊन तह केला. तात्पर्य यावेळी गनीमीकाव्याचा पूर्णपणे विजय झाला हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. कारण तसे नसते तर पेशव्यास बत्तीस लक्ष रुपयासारखी अगडबंब रक्कम हैदर नाईकासारखा पश्चात युध्दकलाविशारद सेनानी कधीही देण्यास तयार झाला नसता हे उघड आहे, असो.

५. कुकडी नदीवरील लढाईत नानासाहेबास प्रथम कवाईती कंपपूची माहिती झाली, हे मागे पृष्ठ १६ वर रामदासपंताच्या चरित्रात सांगितलेच आहे. तेव्हापासून नानासाहेब पेशव्यास कवायती पलटणीचे वर्चस्व पटून हिंदू पदपाद शाहीचे आपले मनोरथ सिध्दीस नेण्यात आपणही कवायती पलटण तयार करावी, असे वाटू लागले. हिंदुस्थानांत ही कवायती पलटणीची विद्या प्रथम आणणारा फ्रेंचांचा बूसी होय. म्हणून बूसीने तयार केलेल्या माणसांस आपल्या नोकरीत ठेवण्यापेक्षा खुद्द बूसीसच आपल्या

---

*2. त्यांना चहुकडून झपाट्याने मागण्या आल्या, पण त्यांत मुजफ्फरखानाची बरोबरी करणारा दुसरा कोणी आढळला नाही. तो जितका बुद्धिमान व आपल्या कसबांत निष्णात, तितकाच स्वार्थी, बेईमानी व खुनशी होता. त्याचे सर्वच चरित्र तत्कालीन राजकारणाशी निगडीत बनले. मुजफ्फरखान व इब्राहीमखान ही दोन नांवे सामान्यतः मराठी इतिहासांत परिचित आहेत.*

मराठी रियासत खंड -4, पान-335

तैनातीस ठेवावे, असा विचार महत्त्वाकांक्षी नानासाहेब पेशव्यास सुचला परंतु निजाम सलावत जंगाच्या पदरी बूसी हा असून त्याने सलाबतजगास पिंजऱ्यांतल्या पोपटाप्रमाणे पूर्ण परतंत्र केला होता हे पाहून नानासाहेबास बूसीची भीती वाटून आपण त्यास आपले पदरी ठेविल्यास तो आपलीही अशीच अवस्था करील, असे वाटू लागले व बूसीस आपल्या पदरी ठेविल्यास विचार त्यास रहित करावा लागला.[2]

६. बूसींने आपल्या तालमीत की माणसे तयार केली त्या पैकीच मुजफरखान हा एक होता पण पुढे खानाने व बूसींचे काही कारणावरून बिथरल्यामुळे बूसीने मुजफरखानास आपल्या नोकरीतून काढून दिले. पेशव्यांना याच वेळी कवायती तज्ज्ञांची आवश्यकता असल्याने त्यांनी मुजफरखानास एकदम आपल्या नोकरीत ठेवले[3] व त्याचे कबिले ठेविण्यासाठी म्हणून त्यास जुन्नर पेट्यातील वेल्हगाव पेशव्यांनी दिले. बूसी हा युरोपीयन आणि मुजफरखान हा हिंदी यामुळे बूसीपेक्षा मुजफरखानाच्या बद्दल जरी थोडा अधिक आपलेपणा असला तरी ही एकादे ब्राह्मण घराणे तोफखान्याच्या कामात तयार करावे या उद्देशाने धूर्त व दरदर्शी अशा नानासाहेब पेशव्यांने पानशांचे घराणे पुढे आणिले असावे असे वाटते पानसे हे देशस्थ ब्राह्मण असून पुरंदर तालुक्यात सोनेरी गांवचे राहणारे यांचा मूळ पुरूष यशवंतराव हा शाहूजवळ तोफखान्याचा दरोगा होता याचा मुलगा माधवराव यास नानासाहेबांने तोफखान्याचा अंमलदार नेमीले. या प्रमाणे या घराण्यास पुढे आणिले.[4] असो पुढे सन १७५४ तारीख २४ ऑक्टोबर पासून सन १७५५ तारीख १२ एप्रिल पावेतोच्या मुदतीत नानासाहेबांने निजामावर स्वारी केली होती, त्या

---

*3. पेशव्यास धास्ती होती की हे गार्दी उलट्या काळजाचे, केव्हा घात करतील त्याचा नेम नाही. इकडे पेशव्याची नोकरी स्वीकारून लगेच मुजफ्फरखानाने रामचंद्र जाधवाशी निराळा करार केला. निळो नरसिंह म्हणून पेशव्याचा वकील रामचंद्र जाधवाजवळ होता. त्याने कळविले, मुजफ्फरखान व त्याचा हस्तक लतीफखान यांस जाधवांनी नोकरीस ठेविले. १८ मार्च, सन १७५३ च्या रात्री खलबत होऊन विचार ठरला. तथापि जाधवरावाचा करार खानाने पाळला नाही. त्याने पेशव्याची तैनात स्वीकारली आणि अल्पावकाशांत धन्याकडून वाहवा मिळविली.*

मराठी रियासत खंड -4, पान-335

स्वारीत मुजफरखान तोफखान्यासह हजर होता.[5] या स्वारीत महादजी अंबाजी पुरंदरे ह मनुष्य होता. त्याचे व मुजफरखानाचे, हाताखालील लोकांच्या हजिरीवरून भांडण झाले. गारदी हे पहिल्यापासूनच चढेल असल्याने त्यांना कोणाच्याच ताब्यात वागणे आवडत नसे. बघा पुष्कळ लोकांची कागदावर हजेरी दाखवून प्रत्यक्ष नोकरीत कमी माणसे ठेवून पगार मात्र अगदी हजिरीप्रमाणे मिळाला पाहिजे, असे मुजफरखानाचे म्हणणे असावे. कारण मुजफरखान हा लोभी व लहरी असे. पुरंदऱ्याचे घराणे याच्या अगदी उलट असे, पुरंदरे हे कर्तव्यदक्ष, राजनिष्ठ व ईमानी असत. अर्थात या उभयतांचे पटणे केव्हाच शक्य नव्हते. पुरंदऱ्यांचे व मुजफरखानाचे वर सांगितल्याप्रमाणे भांडण झाल्यावर मुजफरखान लागलीच पेशव्याची नोकरी सोडून गेला, तो प्रथम श्रीरंगपट्टणम जाऊन राहिला व तेथून सावनूरच्या नवाबाच्या नोकरीत शिरला.

७. या प्रमाणे मुजफरखान सावनूरच्या नवाबाच्या नोकरीत राहिल्यावर त्याने तेथे नवीन तोफा ओतविल्या आणि पेशव्यांशी लढाई देण्याची तयारी चालविली. हे पाहून पेशव्यांनी सावनूरच्या नवाबाकडेच मुजफरखानाची मागणी केली. परंतु ती त्याने नाकारली कारण त्यावेळी त्याला मुजफरखानाचा चांगलाच पाठिंबा होता व आपल्या पाठीराख्याला गमाविण्यात शहाणपण नाही, असे त्यास वाटत होते. नानासाहेब पेशवा

---

*4. सन १७५० मध्ये मुजफ्फरजंग फ्रेचांची मदत घेऊन नासिरजंगावर चालून आला, त्या वेळी मुजफ्फरखान फ्रेंच फौजेंत जमादार होता. त्याला तंजावरची खंडणी वसूल करण्याची आज्ञा झाली. तंजावर जाऊन त्यांने तोफांचा मारा करतांच राजाने शरण येऊन मुजफ्फरखानामार्फत खंडणीची रक्कम ठरविली, त्यानंतर पेशव्याचा वकील शामराव यादव डुप्ले याचे भेटीस गेलेला परत येत असतां त्यास मुजफ्फरखान कर्नूल येथे भेटला. त्यावेळी तो बूसीच्या कामगिरीवर होता. शामराव यादवाने त्यास पेशव्याची इच्छा नोकरीत ठेवण्याची आहे असे कळविले.*

*सन १७५४ त रघुनाथरावाचे युद्ध कुंभारीवर जाठाशी झाले, त्या कामी मुजफ्फरखानास पाठविण्याचा विचार झाला, पण दुसऱ्या कारणांनी तो सिद्धीस गेला नाही. मात्र पैशाचे बोभाटे येऊ लागल्यावरून मुजफ्फरखानाने पानशांचे ताबेदारींत राहून कामगिरी करावी, असा हुकूम पेशव्याने केला.*
मराठी रियासत खंड -4, पान-335

एवढ्याने काही गप्प बसणारा पुरूष नव्हता. त्याने सावनूरच्या नवाबाची खोड मोडण्याचा निश्चय करून बूसीला आपल्या मदतीला बोलावून मोठ्या तयारीनिशी सावनूरवर चाल केली व मुजफरखानाचा पाडाव केला. पुढे सावनूरकरांचा व पेशव्याचा तह झाला. त्यात मुजफरखानास आपल्या ताब्यात द्यावे असे सुचविले. पण मुजफरखान तेथून सटकून गेला. सावनूरच्या नवाबाने पुनः मुजफरखानास नोकरीस ठेवू नये असे ठरले. काही दिवस इकडे तिकडे भटकून मुजफरखान पुण्यास आला व आपणास पुनःनोकरीत ठेवण्यासाठी पेशव्याची विनवणी करू लागला. मुजफरखानासारख्या नमकहरामास आपल्या नोकरीत ठेवू नये, असे सदाशिवरावभाऊने आग्रहाचे म्हणणे होते. पण नानासाहेबांने तिकडे दुर्लक्ष करून त्यास पुनः नोकरीवर ठेविले. यावरून नानासाहेब किती स्वतंत्र विचाराचा होता व सदाशिवरावभाऊचे सुध्दा न ऐकता स्वतःच्या मतास जे योग्य दिसले त्याप्रमाणे चालणारा होता हे उघड दिसते. कोणत्याही पुरूषाचा योग्य तो उपयोग करून घेणे ते राज्यकर्त्यांचे ध्येय असायला पाहिजे व ते तसे नानासाहेबांचे होते म्हणूनच त्यास फार हुशार व दूरदर्शी पेशवा असे म्हणतात.[6] असो सन १७५६ च्या पावसाळ्यात मुजफरखान

---

*सन१७५५ त पेशव्यानें कर्नाटकांत तिसरी स्वारी पाठविली, तिचा मुख्य चालक महादजी अंबाजी पुरंदरे असून त्याचे हाताखाली मुजफ्फरखानास देण्यात आले. बेदनुरावर फौजा असता एके दिवसी पुरंदऱ्याने सर्व लष्करची हजिरी घेतली, तींत मुफ्फरखानाच्या लोकांची संख्या सोडून चालता झाला. तो तसाच म्हैसूरच्या राजाकडे संधान बांधून चाकरीस राहिला. पेशव्याने त्याजकडे पत्र व माणसे पाठवून आर्जवाने बोलविले, पण तो आला नाही. पुढील वर्षी पेशव्याची स्वारी सावनूरवर होणार असे कळतांच तेथील नबाबाने मुजफ्फरखाननास आपल्या चाकरींत घेतले आणि त्याजकडून सावनूर बंदिस्त करवून पेशव्याशी निकराचा सामना केला. त्याच्याच मार्फत म्हैसूरवर व मुराराव घोरपडे नवाबाचे साह्यास आले. तेणेकरून पेशव्यास भारी पेंच उत्पन्न झाला. तेव्हा त्याने बूसी व सलाबतजंग यांस आपल्या साह्यास आणिले. मुजफ्फरखानाने अशी घमेंड जाहीर केली की पेशवा व बूसी या दोघांसही मी कसा झोडपून काढतो पाहा.*

मराठी रियासत खंड -4, पान-336

पुनः पेशव्याच्या नोकरीत शिरला सन १७५७ च्या शिंदखेडच्या मोहिमेत तो होता. सन १७५८ व त्याने जव्हार व त्रिंबक किल्ला हस्तगत केला. या प्रमाणे तो पेशव्यांच्या बहुतेक स्वाऱ्यात हजर असे. सन १७५९ मध्ये ता. २८ ऑक्टोबर रोजी त्याने सदाशिवराव भाऊ गारपिरावर ढेऱ्यात असताना मुजफरखानानें आपला जावई हैदरखान याचेकडून सदाशिवरावाचा खून करण्याच्या इराद्याने त्यावर हत्यार चालविले. त्यावेळी नागोजी गुजर नावांचा एक शिलेदार जवळ होता. त्याने सदाशिवरावाचा बचाव केला व खूनी हैदराखानास पकडले. या झटापटीत सदाशिवरायास कुशीत लहानशी जखम झाली. पुढे नानासाहेबांने फारशी चौकशी न करता हैदरखान व त्याचा सासरा मुजफरखान अशा दोघांचाही शिरच्छेद केला.

८. या प्रकरणासंबंधाने बऱ्याच गोष्टी मुग्ध असल्याने निश्चयकारक असा काही तर्क करिता येत नाही. सदाशिवाराव भाऊ हा नानासाहेब पेशव्याचा उजवा हात होता. किंबहुना सदाशिवराव भाऊचा वचक नानासाहेब पेशव्यासुध्दा होता. तेव्हा अशा सदाशिवराव भाऊचा खून करण्याचा प्रयत्न मुजफरखानाने का केला? मुजफरखानास नोकरीस ठेवू नये असे सदाशिवरावाचे म्हणणे होते. तेवढ्यात वरून मुजफरखानाने हा खुनाचा प्रयत्न केल असे असे म्हणावे तर एवढ्यासाठी त्याला तीन वर्षे का वाट पाहावी लागली? कारण मुजफरखानास नोकरीत ठेवू नये असे सदाशिवराव सन १७५६ च्या पावसाळ्यात म्हणाला व मुजफरखानाने सदाशिवरावाच्या खुनाचा प्रयत्न सन १७५९ च्या हिवाळ्यात केला. अर्थात तीन सव्वा तीन वर्षापर्यंत मुजफरखानासरखा तिरसट मनुष्य मुकाट्याने बसणे शक्य नव्हते. सन १७५९ मध्ये मुजफरखान हा सूरते

---

*6. ता. ८ फेब्रुवारी सन १७५६ रोजी, बाबा फडणीस लिहितो, "सावनूरचा नबाब, मुरारजी घोरपडे व मुजफ्फरखान यांनी एकत्र होऊन बखेडा केला, त्यांच्या पारिपत्यास फौजा चालून आल्या, सभोवती गराडा घालून आहेत, त्रिवर्ग घेरले आहेत. लौकरच पारिपत्य होईल" त्यानंतर ता. २४ मार्चचें पत्र मुजफ्फरखानास १९ मार्च रोजी दूर केले.*

*खरोड तारीख १ जुलै सन १७५६ रोजी लिहितो, मुजफ्फरखानाविशी दोन आज्ञापत्रे आली की मुद्दे न घालता निरभिमान होऊन आज्ञेप्रमाणे वर्तणूक करून येईल तर घेऊन येणे.*

मराठी रियासत, खंड– 4, पृष्ठ क्रं. 337

जवळील एका कोळी राजाचे पारिपत्यास गेला असता मागे सदाशिवरावाने मुजफरखानाचा एक आप्त इब्राहिमखान यास नोकरीस ठेवले. हे तो परत आल्यावर त्यास समजले तेव्हा एवढ्यावरून मुजफरखान चिडेल असे काव्येतिहास संग्रहकाराचे म्हणणे आहे पण असेही म्हणवत नाही. कारण इब्राहिमखान एक तर त्याचा आप्त होता व दुसरे हा इब्राहिमखान मुजफरखानाएवढा काही हुषार नव्हता. अर्थात इब्राहिमखानाचे तेज मुजफरखानापुढे पडणे शक्य नव्हते. नानासाहेब पेशव्याने या खुनाच्या कटाची यत्किंचितही चौकशी न करता मुजफरखान व त्याचा जावई हैदरखान या दोघांचा फक्त शिरच्छेद केला व रामचंद्र नारायण प्रभू या नावाचा एक इसम या कटात सामील असल्याच्या आरोपावरून त्यास मरेपर्यंत कैदेत ठेवले. एवढीच माहिती आज उपलब्ध आहे.

९. नानासाहेब पेशव्याची बायको गोपिकाबाई ही फार दुष्ट असून तिच्या मनातून सदाशिवरावभाऊ विषयी फार द्वेष होता. नानासाहेबांने या प्रकरणाची चौकशी केली नाही व गोपिकांबाईच्या मनातून सदाशिवराव आपल्याजवळ असू नये असे होते, त्याअर्थी हा कलह या बाईनेच केलं असावा व याच बाईने सदाशिवरावावर मारेकरी घातले असावेत असा ग्रांडफचा तर्क आहे. या एकंदर प्रकरणाचा बारकाईने विचार करिता व गोपिकाबाईचे एकंदर वर्तन पाहता हा डफचा तर्क खरा असावा असे वाटते, पण यास लेखी आधार काहीही अद्यापही प्रसिध्द झाला नाही.

१०. भाऊसाहेबांची कैफियत या नावाचे एक लहानसे पुस्तक हा खुनाचा प्रयत्न झाल्यानंतर सुमारे तीस बत्तीस वर्षांनी म्हणजे सन १७९१ मध्ये लिहिले आहे. त्यात पुढील आशयाची हकीकत आहे. एके दिवशी सदाशिवराव डेऱ्यात काही लिहित असताना एकदम हैदरखानाने त्यावर कट्यार चालविली पण ती चुकली. इतक्यात तेथे, महिपतराव चिंटणीस, शिदोजी कुंजर, बळवंतराव बाबा व सटवाजी राऊत ही मंडळी धावून आली व खुनी इसमास पकडले. त्याची चौकशी करता असे कळले की, निजामअलीने मुजफरखानास एक लक्ष रुपयाची जहागीर देण्याचे कबूल करवून हा खून घडवून आणण्याचे ठरविले. मुजफरखानाने आपली मुलगी या हैदरखनास देण्याचे ठरवून त्यास मारेकरी तयार केला, पण सुदैवाने वारच चुकला व सगळे पकडले गेले. चौकशीत मुजफरखनाने

आपण निरपराधी आहोत, असे पुष्कळ शपथा आणा बाहून सांगितले. व प्रथम आपली मुलगी या हैदरखानास देण्याचे ठरविले होते, परंतु मागाहून तो विचार बदलून दुसरे स्थळ पाहिल्याने हा हैदरखान आपल्यावर सूड उगवीत आहे, असे ही जाहीर केले. पण काही कागदपत्र त्याच्या पेटीत सापडल्यावरून त्यावर गुन्हा शाबीत केला व दोघांचाही शिरच्छेद केला. कैफियतीतील हकीकतीत खुनी इसमास पकडण्याच्या कामात दोन चार माणसें होती इतकाच विशेष आहे. असो, या प्रमाणे मुजफरखान गारद्याचे चरित्र आहे.

---

*✻ **1733 (खानडौऱ्याची फजिती) :** मोगल-मराठ्यांच्या झगड्यास आता चांगलेंच तोंड लागले. उभय पक्षांनी निकराच्या झगड्यासाठी आपापल्यापरी भरपूर सिद्धता केली. स.१७३३ त. पेशव्यांचे अंगावर जंजिऱ्याची मोहीम असल्यामुळे त्यांनी पिलाजी जाधवास माळवा बुंदेलचंडात पाठविले. स.१७३४ च्या आरंभी त्याने बुंदेलखंडात जाऊन बादशहाचे पोटात भयंकर धास्ती उत्पन्न केली. खानडौरा व त्याचा भाऊ मुजफ्फरखान मीरआतिश यांस त्याने ताबडतोंब रवाना केले. सिरोंजपर्यंत ते चालून आले. जयसिंग या वेळी बुंदीकोट्या भांडणात गुंतला होता. तिकडे मल्हारराव होळकराने त्याची त्रेधा उडवून दिली. पुढे उन्हाळा वाढत चालला, तसा पिलाजी जाधव दक्षिणेंत परत फिरला आणि मोगल फौजाही विशेष .ािंही न करिता दिल्लीस परत गेल्या.*

*मराठी रियासत खंड-3, पान 460*

*✻ **1756 :** येथून पुढे मुजफ्फरखानाची अत्यंत देन्यावस्था झाली. सर्वत्र अपकीर्ती, तोंड दाखविण्यास जागा नाही, जवळ कोणी उभा करीना, पदरी फौज पगाराविणे छळू लागली. मुकुंद श्रीपत पेशव्याचा वकील मुजफ्फरखानाजवळ होता तो, लिहितो (ता. ४ मे) मुजफ्फरखानाने फकीरी घेतली आहे. मुरारजी व सावनूरकर यांचे तोंड काय की नानासाहेबाशी लढाई करावी. मी मुजफ्फराने म्हणूनच केली.*

*मुरारराव व मुजफ्फरखान दोघेही सावनुरकारास सामील होऊन पेशव्याशी लढू लागले, त्यामुळे दोघांवरही पेशव्याचा रोष झाला.*

*मुजफ्फरखान नुसता कल्पक लढवय्या नव्हता. चहूकडची राजकारणे व अनुसंधाने जाणण्यांत मोठा हुशार होता. मुजफ्फरखानन गोवेकरांच्या*

मार्फत त्यांने इंग्लडांत राजकारण केले. तथापि पेशव्याला मुजफ्फरखानाची समजूत काढून परत नोकरीत आणण्याची मोठी उत्कंठा लागून राहिली होती. मुकुंद श्रीपत खानापाशी पराकाष्ठा करून राहिला होता. त्यावेळी सुमेरसिंग त्याजबरोबर होता. वकिलाने खानास लालूच व धाक सर्व कांही उपायांनी कळविले, "दिल्लीपासून रामेश्वर-पावेतों लिहिली गेली आहेत की, मुजफ्फरखानास कोणी चाकरीत न ठेवणे.

***** *1758 :* पेशवा नानासाहेब मुजफ्फरखानाच्या कर्तबगारीवर इतका भाळला होता की हजार युक्ती करून त्यास त्याने स. १७५६ च्या दसऱ्याच्या सुमारास पुनः पुण्यास आणून नोकरींत ठेविले. सदाशिवराव अत्यंत हिशेबी  व करारी, परंतु नानासाहेब तसा सरळ नसून मतलबाने कामे उलगडणारा होता हे अशा उदाहरणांवरून व्यक्त होते. याप्रमाणे मुजफ्फरखानाने पेशव्याचे नोकरीत  येऊन किल्ले घेण्याची वगैरे कित्येक बहादुरीची कामे करून दाखविली परंतु लष्करी जोराने वाटेल तसा पैसा उकळण्याची त्याची खोड उपजतच होती, म्हणून त्याजवर पेशव्याचे अंमलदार सदा रुष्ट असत. मल्हाररव होळकरांनेही त्याजबद्दल पेशव्याकडे तक्रार केली. पेशव्याने मुजफ्फरखानास कल्याण-वसईच्या कामगिरीवर पाठविले असता, मामलेदारांस बोलावून आणून खानाने तमाम लुटलबाडी केली. झाडून मुलकांत जप्ती पाठवून परभारांच वस्तभाव आणतात. आम्ही ताकीद करतो, ते मानीत नाहींत, अशा तक्रारी वारंवार पेशव्याकडे आल्या. राज्यांतील शिस्त बिघडत चालली. या गाडद्यांचा उपयोग युद्धांत कितीही असला तरी त्यांस धाकांत ठेवणे, अवघड होऊन ते इतके स्वेच्छाचारी व उपद्रवी बनले की, उपयोगापेक्षा त्यांचा जाचच अनिवार होऊ लागला. आन हातांत सामर्थ्य आहे तर आलेला लाग साधून घ्यावा एवढेच या गार्द्याचे ध्येय होते. सिंदखेडच्या मोहिमेंत भाऊसाहेबानें हा काय केव्हा घात करील याचा नेम नाही म्हणून मुजफ्फरखानासा बाजूला ठेविले. इब्राहीम मुजफ्फरखानाचा भाचा पण युद्धकसबांत त्याच्याइतका प्रवीण नव्हता. सलाबतजंग एका प्रसंगाने म्हणाला, बूसीने इब्राहीमखान काय फळ आहे. सन १७५८ मध्ये मुजफ्फरखानाने जव्हारप्रांत व गंभीरगड वगैरे किल्ले घेऊन उत्तर कोंकणाचा बंदोबस्त केला.

ता. ५ नोव्हेंबर रोजी इब्राहीमखानाशी भाऊसाहेबांची बोली झाल्याचा

*उल्लेख आढळतो. मिळून ऑक्टोबर सन १७५९ मध्ये इब्राहीमखान निजामाची नोकरी सोडून पेशव्याचे नोकरींत आला. हे सिद्ध आहे. यामुळे मुजफ्फरखान अत्यंत चिडून गेला. इब्राहिमखानास नोकरीत घेतले म्हणजे मुजफ्फरखानास काढून टाकले असें समजण्याचे कारण नव्हते; पण मुजफ्फरखानास तसें वाटले यांत नवल नाही.*

*मराठी रियासत खंड -4, पान-342*

*सिंदखेडावर मुजफ्फरखानाचा उपयोग झाला नाही. हा गृहस्थ केव्हा गळा कापील याचा कोणासच भरवसा नसल्यामुळे, युद्धा सारख्या महत्त्वाच्या कामांत आपले 'शस्त्र पूर्णपणे स्वतः च्या खात्रीचे असणे अत्यंत जरूर होय असें सदाशिवरावाने मनाज आणून इब्राहीमखानास आपल्यापाशीं घेतलें, हा प्रकार मुजफ्फरखानाचे अंतकरणास इतका झोंबला की, त्याबद्दल भयंकर सूड उगविण्याची बुद्धी त्याला निर्माण झाली. ता. २८ ऑक्टोबर १७५९ रविवारी पुणे येथे सदाशिवराव गारपिऱ्यावर डेऱ्यांत असतां मुजफ्फरखानाचा जावई हैदरखान याने डेऱ्यांत शिरून सदाशिवरावावर हत्यार चालविले. जवळच शिलेदार नागोजी गुजर होता, त्याने खूनी इसमाचा हात धरून सदाशिरावाचा बचाव केला. मात्र, बरचीच्या टोंकाची एक लहानशी जखम पाठींत झाली. हैदरखानास पकडून जरब दाखवितांच आपण हे कृत्य मुजफ्फरखानाचे सांगीवरून केले असे म्हणतांच मुजफ्फरखानास पकडिले. त्यानेही ते कबूल केले. तेव्हा विशेष तपास किंवा चर्चा न करता ता. ३० ऑक्टोबर कार्तिक शु. ९ रोजी दोघांचाही एकदम शिरच्छेद करण्यात आला. संध्याकाळसमयी मुजफ्फरखानाचा जावई भाऊचे डेऱ्यांत येऊन पाठीमागून हूल चालविली ते चुणी लागली. खूनी सापडला. त्यांनी नावे घेतली त्यांसुद्धा एकंदर आठ असामीची डोके मारिली. मुजफ्फरखानाचे डोकें मारिले. तपास फारसा केला नाही. रामचंद्र नारायण प्रभु म्हणून कोणी त्या मसलतीत होता, त्यासही धरुन आणून मरेपर्यंत एका कैद करावयास पाठविली, हस्तगत करून माल सरकारांत दाखल करुन बायका-मुले सिंहगडावर घातली.*

*दोन महिन्यानंतर मुजफ्फरखानाची माणसे सोडली असावी ता. १३ फेब्रुवारी स १७६० च्या पत्रांत मुजफ्फरखास लेक व भाचा लोहगडावर*

*अटकेंत होते. त्यांस पुण्यास आणल्याचा उल्लेख आहे. अशा प्रकारे मुजफ्फरखानाचे आख्यान संपले. हिंदी राजकारणांत गार्द्यांचा बोलबाला अल्पकाळ कसा आला व त्यांत इब्राहीमखानासारखे ईमानी व मुजफ्फरखापासारखे बेइमानी कसे निर्माण झाले हे प्रकार दृष्टिपुढे येतात.*

**** 1798 : सिंदे बायांचे युद्ध***

*हे वर्तमान बक्षीस कळतांच बक्षी उघडपणे फौजेसह निघून बायांकडे गेला. त्याजबरोबर देवजी गौवळी व मुजफ्फरखान पठाण हेही जाऊन बायांस मिळाले. पुरस्कर्ता मुजफ्फरखान पठाण ता. १७ डिसेंबर १७९८ रोजी मरण पावला.*

# ११. तुळाजी आंगरे

***श्रीशाहू नृप हर्पेंग सरखेल समुद्भवः।***
***तुलसिंहस्य मुद्रेयं सर्वोत्कर्षेण राजते।।***

१. मोठ्या लोकांच्या गुणांनी ज्याप्रमाणे देशास उन्नती प्राप्त होते त्याच प्रमाणे त्याच्या चुकांनी देश अधोगतीस जातो, हे विसरता कामा नये. चुकी होऊन गेल्यावर मागाहून तिची कबूली दिली म्हणजे त्या चुकीचे परिमार्जन होत नसते. एवढ्याचसाठी कोणतीही गोष्ट फार विचारपूर्वक आणि दूरदर्शित्त्वाने करणे हे राष्ट्राच्या नेत्याचे आद्य कर्तव्य होय. सेनापतीची अल्पशी नजर चुकी झाली तरी हजारो लोक तिकडे रणभूमीवर मारले जातात. तद्वतच नेत्याच्या चुकीने राष्टांतील कत्या पुरूषांची व तरुणांची दिशाभूल होऊन ते पुढे राष्ट्राच्या कार्यास नालायक बनतात. हा आजपर्यंतचा इतिहास असून त्याचा जर आपण उपयोग करून न घेतला तर आपल्याहून अधिक मूर्ख इतर कोणी असतील, असे मानण्याचे कारणच राहणार नाही. हे विचार आज सुचण्याचे कारण, अठराव्या शतकातील प्रसिध्द मुत्सद्दी व सार्थ राजकार्यधुरंधर अशा नानासाहेब पेशव्याच्या हातून एक विलक्षण चुकी झाली व तिच्यामुळे

एकंदर या देशाचे राजकीय चक्र फिरण्यास कशी मदत झाली हे पाहून मन थक्क होऊन गेले, हे होय.

२. अठराव्या शतकामध्ये हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीज व इंग्रज अशा उभयतांचा वापर होता पण १७३९ मध्ये चिमणाजी अप्पाने पोर्तुगीज सत्तेचा नायनाट केल्यावर सगळा पश्चिम किनारा इंग्रजास मोकळा झाला व अनायासानेच त्याचा एक शत्रू नाहीसा झाला पण समुद्रच्या बाजूने मराठी साम्राज्याचे रक्षण आंगरे हे करीत असून सन १७४२ पासून तुळाजी आंगरे हा ते काम प्रामुख्येकरून पाहत होता.[1]

तुळाजीचा दरारा फार विलक्षण असे. पश्चिम किनारा तुळाजीने सन १७५५ पर्यंत फारच उत्कृष्टपणे सांभाळिला होता. अर्थात इंग्रजांना तोपर्यंत तिकडेस काही गडबड करता आली नाही, म्हणून त्यांनी १७५५ पर्यंत पूर्व किनाऱ्यावर राहून फ्रेंचसत्तेचा नायनाट करण्याचा प्रयत्न केला. जोपर्यंत आंगऱ्यांच्या कुटुंबात एकी नांदत होती. तोपर्यंत त्यांचा इंग्रजास फार वचक असे. ती एकी नाहीशी होताच त्या घराण्याची दुर्दशा झाली, इतकेच नव्हे, पण मराठी साम्राज्याच्या बचावाचे साधन असंगत झाल्यामुळे ते साम्राज्यही मृत्यूपंथास लागले व याला मुख्य कारण नानासाहेब पेशवा झाला हे आज वाचकांस निवेदन करायचे आहे.

३. तुळाजी आंगरे हा कान्होजीच्या एका रखेलीचा मुलगा होय. संभाजी व मानाजी हे त्याचे भाऊच होत. आंगऱ्याचे मूळचे आडनाव संकपाळ. हे आंगरवाडीचे राहणार म्हणून आंगरे असे नाव त्यास मिळाले. आंगरे हे आपणास छत्रपतीचे अंकित म्हणवित असत, परंतु पेशव्यांची स्वतंत्र सत्ता ते मानीत नसत. विशेषत: कान्होजी आंगऱ्याचे मुलांत तंटे उपस्थित झाले, त्याचा निकाल न लागताच शाहू मरण पावला. त्यामुळे पेशवे जवळ जवळ स्वतंत्र झाले व त्याचे आणि आंगऱ्याचे वैर विकोपास गेले. शाहूच्या मृत्यूनंतर मराठेशाहीची राज्यसूत्रे नानासाहेबाच्या मंत्राने पुण्याहून हालू लागली, परंतु त्यास रघुजी भोसला, दमाजी गायकवाड यांच्याप्रमाणे तुळाजी आंगऱ्यानेही विरोध केला. इतकेच नव्हे पण पेशवे आणि ताराबाई यांच्यात भांडण उपस्थित झाले, तेव्हा तुळाजींने पेशव्याच्या विरुध्दच उचल केली. तो पेशव्यास जुमानीनासा झाला

*1. सन 1743 तुळाजीचा सरखेळ नावाने संबोधिलेले आढळते.*
मराठी रियासत खंड -4, पान-103

हे पाहून तुळाजीचे खोड मोडण्याचा नानासाहेबाने निश्चय केला, परंतु तुळाजी हा दर्यावर्दी फौजबंद असल्याने एकदा नानासाहेबास तुळाजीशी झगडण्याचे सामर्थ्य नव्हते.

४. एका इंग्रजी व्यापाऱ्याने तुळाजी आंगऱ्याचे वर्णन पुढे दिल्याप्रमाणे केले आहे, तुळाजी हा निमगोरा, परंतु देखणा असून उंच व भव्य होता. तो फार रुबाबदार दिसत असे. त्याला पाहिल्याबरोबर मूर्तिमंत शौर्यच आपणांपुढे उभे की काय, अशी कल्पना होत असे. त्याची कृतिही त्याच्या शौर्यास सजण्यासारखीच असे. पश्चिम किनाऱ्यावर कोणतेही जहाज सहसा त्याच्या तावडीतून निसटून जात असे. या प्रमाणे तुळाजीची कर्तबगारी व दरारा असल्यामुळे इंग्रज व्यापारी त्याला थरथरा कांपत असत. तुळाजीची शक्ती व तयारी अपूर्ण होती. त्याच्या ताब्यातील बंदरे भरभराटीत असून त्याची रयतही सुखी असे. तीस हजार फौज त्याच्यापाशी जय्यत तयार असे. त्याच्या तोफखान्यावर युरोपीयन कामगार असत. त्याच्या आरमारात सुमारे साठ लढाऊ जहाजे होती. याशिवाय दारूगोळाही त्याचपाशी भरपूर असे.

५. आंगरे आणि पेशवे यांचे वैर फार दिवसाचे होते. बाळाजी विश्वनाथ व कान्होजी यांचे सख्य होते पण तेव्हा कान्होजी बलिष्ठ असल्याने त्याचे सख्य संपादन करणे बाळाजी विश्वनाथास भाग पडले. कान्होजी आंगरे व शाहू यांचे मित्रत्व जुळवून दिले पण त्या कामी मागितलेला प्रदेश त्यास निमूटपणे देणे भाग पडले. कान्होजीने तो मुलुख देऊन त्यास जवळ जवळ स्वतंत्र होण्याची संधी बाळाजी विश्वनाथाने दिली व ती काही खुषीने दिली नव्हती. कान्होजी हा शूर व बलिष्ट असल्याने तशी संधी देणे बाळाजी विश्वनाथास भाग पडले. यावरून बाळाजी विश्वनाथाच्या मनात कान्होजी विषयी प्रेम म्हणजे सक्तीचा राम राम होता. कान्होजीच्या पश्चात बाजीरावाने आंगऱ्याच्या घरात कायमची फूट पाडून एकाला हाताशी धरून आंगऱ्यांच्या राज्याचे भाग पाडून ते दोघा बंधूस वाटून दिले. तुळाजीच्या व नानासाहेबाच्या वैराचा उल्लेख या प्रकरणात आलाच आहे. त्यावरून आंगरे व पेशवे यांचे वैर पिढीजात होते असे दिसते. दुसऱ्याचा उत्कर्ष पेशव्यास कधीच सहन होत नसे. बाळाजी विश्वनाथापासून सर्वच पेशवे परोत्कर्षसहिष्णु असत. बाळाजी

विश्वनाथ आणि कान्होजी आंगारे यांचे सख्य नव्हते. पुढे बाजीराव व मानाजी आंगरे यांच्यात तह ठरला, पण बाजीरावाचा मृत्यू होताच तो तह नानासाहेबाने मोडिला. पोर्तुगीझाच्या ताब्यातून वसई काबीज करण्यासाठी चिमाजी आप्पाने वसईवर स्वतंत्रपणे स्वाऱ्या केल्या पण आंगऱ्यास मदतीत बोलाविले नाही, असे करण्यात चिमाजीचा हेतू स्पष्टच दिसतो की, आंगऱ्याच्या मदतीशिवाय आपण पोर्तुगीझासारखा शत्रूही नामोहरम केला, हे आंगऱ्यांच्या व इतरांच्याही प्रत्ययास आणून द्यावे. पोर्तुगीझांचा पाडाव झाल्यानंतर पेशवे निष्कारण आंगऱ्यांच्या मागे हात धुऊन लागले. विशेषत: कोकणपट्टी सांभाळण्याचे काम दर्यावर्दी कामात प्रवीण असलेले आंगरे जितके उत्कृष्टपणे करीत होते तितक्या उत्कृष्टपणे ते दर्याबंदीपणात अनभिज्ञ असलेले पेशवे कधीच करू शकले नसते हे उघड आहे. पण आंगऱ्यांचा नि:पात करण्याच्या दुष्ट हेतूमुळे ही गोष्ट एकाही पेशव्याच्या लक्षात आली नाही. संभाजी, मानाजी, तुळाजी या आंगऱ्यांच्या पुरूषास पेशव्यांनी बरेच छळले. या सर्वांचे उसने तुळाजीने उगविले असे दिसते. तुळाजी जात्याच क्रूर असल्याने त्याने पेशव्यांचे हे सर्व अपराध स्मरुन त्यांच्याशी तसेच वर्तन ठेविण्याचा क्रम आरंभिला. तुळाजी, पेशव्याशीच असे क्रूरपणाचे वर्तन ठेवी असे नाही, तो आपल्या भावाशी सुध्दा वाईट रीतीनेच वागे. त्यांच्या बायकांमुलास कैदेत ठेवणे, त्यांचे द्रव्य लुटणे, त्यास पोटापाण्यासही न देणे, त्यांचा हिस्साही त्यास देण्याचे नाकारणे, इत्यादी अनन्वित प्रकार तो नेहमीच करीत असे. या बद्दल ब्रह्मेंद्र स्वामी एका पत्रात तुळाजीची कान उघाडणी करतो, ती अशी, तुझे सहस्त्र अन्याय झाले, तुजला पत्र न लिहितो, परंतु मानसिंगाची व तुमची गोडी व्हावी, सहकार्य सिध्दीस जावे याज करिता पत्र लिहिले आहे. तरी कबिले बायका जे तुम्हाकडे मानाजीची आहेत, ती रवाना करून द्यावी, तुम्ही आता लेकुरबुध्दी न करणे, दोघे भाऊ एक होऊन एखादे आभाळास हात घालणे, परंतु या पत्राचा काहीच उपयोग झाल्याचे दिसत नाही. तुळाजीच्या या अशा वर्तनात पेशव्याशी त्याचा पिढीजात असलेला वैरभाव अधिक भर टाकण्यास कारण झाला.

६. संभाजी आंगऱ्याच्या मृत्यूनंतर त्याना सावत्र भाऊ तुळाजी याने बाणकोटापासून सावंतवाडीपर्यंतच्या मुलूखात वहिवाट करण्यास प्रारंभ

केला. पेशवे ब्राह्मण असल्याने व पेशव्याशी त्याचे वैर असल्याने तो इतर ब्राह्मणांसही छळू लागला. खंडणीच्या स्वरुपाची दरसाल सरकारात भरावी लागणारी रक्कमही त्याने देण्याचे बंद केले. समुद्रावर तर त्याने आपली एकतंत्री सत्ता स्थापन केली. एकदा पेशव्याने खंडणी वसूल करण्यासाठी आपले काही वकील त्याकडे पाठविले होते. तेव्हा त्याने त्या वकीलांची नाके कापून त्यास आपल्या हद्दीतून हाकून दिले. याप्रमाणे तुळाजीच्या उद्दामपणाची अगदी सीमा झाली. तुळाजीच्या वर्तनाने नानासाहेबाच्या तळव्याची आग मस्तकास जाणे असंभवनीय नाही, पण नुसते रागावण्याने तुळाजीचे काहीही वाकडे होणे शक्य नव्हते, हे नानासाहेब जाणून होता, म्हणून तो तुळाजीचा सूड कसा उगवावा या विचारात होता, इतक्यात एक विलक्षण गोष्ट घडून आली, ती अशी.

७. रामाजी महादेव बिवलकर या नावाचा एक मनुष्य पेशव्याचा कोकणातील सुभेदार होता. हा रामजी महादेव पेशव्यांच्या विश्वासातील असून त्याला कोकणातील राज्यकारभाराची सर्व बिंगे ठाऊक होती. हा रामाजी कल्याणास राहत असे. ठाण्याचे हल्लीचे कौपीनेश्वराचे देवालय आणि जडजकोर्टाची इमारत या रामाजी महादेवानेच बांधिलेला आहे. या रामाजींचे व तुळाजी आंगऱ्याचे काय वैर होते, हे कळत नाही, पण इंग्रजांनी या रामजीस वश करून घेतले आणि आंगऱ्याची तळी भरण्याचे कारस्थान सुरू केले. रत्नागिरी आणि सुवर्णदुर्ग हे दोन किल्ले पेशव्यांनी तुळाजीकडेस मागितले.तुळाजीने अर्धातच ते देण्याचे नाकारले. मानाजी आंगऱ्याचा किल्ला रामाजी महादेवाने कपटाने घेतला होता. त्याबद्दल तक्रारी होऊन पेशव्यांनी मानाजीस किल्ल्याऐवजी दरसाल चाळीस हजार रुपये द्यावे असे ठरले होते. पण ही रक्कम मानाजीस कधीच मिळाली नाही. जंजिऱ्याचा सोदी आणि मानाजी यांच्या चकमकी चालूच होत्या. याप्रमाणे मानाजी अडचणीत सापडला असता त्याने तुळाजीची मदत मागितली पण तुळाजी अत्यंत उन्मत झाला असल्याने व आंगऱ्याच्या घराण्यात अलीकडेस बरीच वर्षे कलह सुरू असल्याने तुळाजीने मानाजीस मदत तर केली नाहीच पण उलट त्याची निर्भत्सना मात्र भरपूर केली. तुळाजीच्या या कृत्याने मानाजीस साहजिकच राग आला व त्याने रामाजी महादेवामार्फत पेशव्यांशी बोलणे सुरू केले. याच सुमारास इंग्रजांशी

केलेल कारस्थान अगदी परिपूर्ण झाले होते. म्हणजे इंग्रज, मानाजी आंगरे आणि पेशवे अशा तीन शक्ती तुळाजी विरुध्दा यावेळी एकत्र झाल्या. तत्कालीन परिस्थितीप्रमाणे तुळाजी समुद्रावर चाचेगिरी करीत असल्यामुळे इंग्रजांच्या मनातून तुळाजीचा कांटा नाहीसा करावयाचा होताच, परंतू एकट्या इंग्रजास ते सामर्थ्य नव्हते. कारण तुळाजीवर आपण स्वारी केली तर पेशवे कदाचित तुळाजीस मदत करतील ही भीती त्यास होती व स्वत: तुळाजीही एकट्या इंग्रजांस भीक घालील असा नव्हता. पेशव्याचे त्यास सहाय्य झाल्याबरोबर या उभयतांनी तुळाजीवर स्वारी करण्याचा निश्चय केला.[2,3]

८. सन १७५५-५६ मध्ये इंग्रज आणि पेशवे यांच्या जहाजांनी आंगऱ्यावर चाल केली. यावेळी इंग्रजांच्या जहाजांवर व फौजवर कमांडर जेम्स कर्नल क्लाइव्ह, ॲडमिरल वॉटसन वगैरे नामांकित अंमलदार होते. क्लाइव्ह हेस्टिंग्ज वगैरे मंडळी हिंदुस्थानांत अशा संधीची वाटच पाहत असता बूसीची माहिती मागे पृष्ठ १२ वर दिली आहे. काइव्ह संबंधाने सेईर मुताखरीनकार पुढे दिल्याप्रमाणे लिहितो.

क्लाइव्हचा पेशा सर्वथैव लष्करी असे. तो लष्करी पोषाखांत घोड्यावर बसून जाई. भोजनात पदार्थाची चंगळ असे, पण पक्कांन्ने वगैरे फारशी नसत रेशमी किंवा भरजरी पोशाख क्लाइव्ह सहसा वापरीत नसे. हेस्टिंग्ज तर अगदीच साधा इंग्रजी पोषाख करी. त्यास जर किंवा वेलबुट्टी बिलकुल पसंत नसे. हेस्टिंगचा लवाजमा बारा स्वाराहून कधी जास्त नसे. पुढे चोपदार चालत परंतु हे काय शब्द उच्चारतात हे समजून घेण्याची हेस्टिंग्जने कधी चौकशी केली नाही. त्याची बसण्याची खुर्ची साधी असून जवळ तशाच इतर मंडळीच्या खुर्च्या असत. हेस्टिंगचे खाणे अगदी साधे

---

*2. पुढे महाराजांनी तुळाजीस सरखेल पद देऊन फत्तेसिंग भोसल्याचे पथक व जिवाजी खंडेराव चिटणीस यांस फौज सामान व खजिना देऊन तुळाजीकडे रवाना केले.*

मराठी रियासत खंड -4, पान-104

*3. मुडागडावर तुळाजी आंगऱ्याशी प्रतिनिधी, सावंत वगैरेचे युद्ध झाले, त्यात तुळाजीची मदत करण्यास मुरारराावास संभाजीने भर घालती, पण तो भानगडीत पडला नाही.*

मराठी रियासत खंड -4, पान-159

व बेताचे असे. त्याच्या वर्तनात ऐट किंवा ताठा बिलकुल नसे. लोकांशी तो अगदी सलगीच्या व बरोबरीच्या नात्याने वागे.

पेशव्यांच्या आरमारावर नानापंत या नावाचा कोणी एक गृहस्थ होता. पहिली चकमक होताच तुळाजीला शत्रूच्या बळाची कल्पना झाली. गेल्या महायुध्दात इंग्रज व जर्मनी यांची जटलंड येथे समुद्रांत जी चकमक झाली. तसलीच चकमक आंगरे आणि इंग्रज यांची ता. २९ मार्च सन १७५५ रोजी होऊन जटलंडच्या युध्दांत ज्याप्रमाणे जर्मनी निसटला त्याचप्रमाणे तुळाजी या युध्दात पळून गेला. समुद्रावरचे युध्द जास्तीत जास्त आठ दहा तासापेक्षा अधिक वेळ टिकत नाही. तेवढ्यातच सोक्षमोक्ष लागून तह घडून येतो. समुद्रावरचे युध्द वर्षानुवर्षे कधीच चालत नाही. जमीनीवरील युध्दात मदत पाठविणे शक्य असते. पण समुद्रावरील युध्दात ते बहुधा अशक्यच असते. त्याचप्रमाणे जमीनीवरील युध्दात हरलेल्या पक्षास पळून जाता येते पण समुद्रावरील लढाईत ते शक्य नसते.[4,5]

तथापि जटलंडच्या लढाईत इंग्रजांना अधिक आरमाराची कुमक येते, असे पाहून जर्मनीचे आरमार पळून गेले, तेव्हा सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटले व आरमाराच्या युध्दात पळून जाण्याचा प्रयत्न यशस्वी झाल्याचे ते पहिलेच उदाहरण म्हणून मोठमोठे लेखकही त्यांचे कौतुक करू लागले. जर्मनीच्या आरमारावर त्यांची विमाने उडत असल्यामुळे त्यांनी इंग्रजांची कुमक येते हे पाहून वेळीच जर्मनीस सूचना दिली, त्यामुळे जर्मनीच्या आरमारास पळून जाणे शक्य झाले, असे मागाहून प्रसिध्द झाले. ही गोष्ट १९१८ सालातील होय. त्यापूर्वी सुमारे १६० वर्षे अगोदर विमानाचे वगैरे कसलेही सहाय्य नसतांना इंग्रज व पेशवे यांच्या संयुक्त आरमाराच्या

---

*4. लढाई संपल्यावर गणती करिता, जखमी व मेलेले मिळून विसांपेक्षा जास्त भरले नाहीत. इंग्रज किल्ल्यांत शिरले तेव्हा तुळाजी येथे नव्हता.*
मराठी रियासत खंड -4, पान-399

*5. विजयदुर्गचे बंदरात तुळाजींची साठ लढाऊ जहाजे जळून खाक झाली हे कृत्य इंग्रजांनी केले. तुळाजीस पकडून प्रतिबंधत ठेवण्याने आपण मराठी आरमार बुडवित आहो, अशी पेशव्यांची कल्पना नव्हती. राज्याच्या शिस्तीस उघड विरोध करणारा तुळाजी त्यास नको होता.*
मराठी रियासत खंड -4, पान-404

तडाख्यातून तुळाजींचे आरमार निसटून गेले. यावरूनच तुळाजी आंगरे हा दर्यावरील युध्दात किती प्रवीण होता, हे सहज दिसून येते. पुढे काय कारण झाले ते कळत नाही, सुवर्णदुर्ग किल्यातील दारूखाना एकाएकी पेटला व नंतर तुळाजीच्या आरमारातील दारूगोळाही एकदम भडकला. आता हा किल्ला व हे आरमार शत्रूच्या स्वाधीन होणार असे तुळाजीस वाटून त्यानेच त्या दारू गोळ्याला आग लाविली असण्याचा संभव आहे. असे करण्याचा हेतू उघडच दिसतो की, आपले आरमार व आपला दारूगोळा शत्रूच्या स्वाधीन झाल्यास शत्रू अधिक बलिष्ट होईल.[6,7]

व या युध्दापूर्वी तुळाजीचे आरमार आपआपसांत वाटून घेण्याचा पेशवे व इंग्रज यांनी करारही केला होता. जर्मनींने सुध्दा असेच आपले सर्व आरमार बुडवून टाकिले हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. तात्पर्य, तुळाजीची पडती एकदम आली. त्याने पेशव्यांची मदत मागितली.

पण त्या मागणीचा काही एक उपयोग झाला नाही. पेशव्यांनी आपले सर्व अधिकार रामाजीपंतास दिले होते, व रामाजीपंतास राष्ट्रीय दृष्टी मुळीच नसून तो एक धूर्त, कावेबाज व स्वार्थसाधू पुरूष होता. इंग्रजांच्या सहाय्याने तुळाजी आंगऱ्याचे अजिंक्य आरमार नाहीसे तर केले. पुढे मराठी साम्राज्याचे रक्षण समुद्राकडून कोण करील व मराठी साम्राज्याचे संरक्षण समुद्राकडून कोणीच न केले तर दर्यावर्दीपणा जे राष्ट बलिष्ट असेल, तेच हिंदुस्थानाचे स्वामित्व पटकावील ही दूरदृष्टी रामाजीपंतासारख्यास नव्हती यात आश्चर्य की, तत्कालीन मुत्सद्यात अग्रगण्य म्हणून नावाजलेला नानासाहेब पेशवा यासही ती दृष्टी नव्हती यात आश्चर्य? आणि म्हणूनच असे निश्चितपणे वाटते की, नानासाहेब पेशवा हा फार परोत्कर्षसहिष्णु होता.

---

*6. इतके असता जो आंगऱ्या तुळाजी कैदेमध्ये आहे. त्याने व इब्राहीमखान गारद्याचा भाचा चाकरीचे उमेदवारींमुळे सात आठ हजार गारद्यानिशी आला आहे त्याने, श्रीमंत यांचा काळ होतांच तू व आपण मिळून शहर लुटावे आणि गर्दी करावी, पैसा पैगाम केला होताच.*

मराठी रियासत खंड -4, पान-677

*7. तुळाजीला चांगल्या प्रकारे वागविण्याचे त्याचे अनेक हुकूम आहेत.*

मराठी रियासत खंड -4, पान-686

९. या संयुक्त आरमाराने सुवर्णदुर्ग काबीज केला. पण तुळाजी तेथून पळून विजयदुर्ग किल्ल्यावर गेला. कारण विजयदुर्ग अद्यापि तसाच होता. इंग्रजांस या किल्यापेक्षा स्वत:तुळाजींचे महत्त्व विशेष वाटत होते, व कसेही करून तुळाजीस पकडून मुंबईत आणून ठेवावे, असा त्यांचा प्रयत्न होता.[8]

इकडे आरमारांचे युध्द चालू असताना पेशवे यांच्या फौजेने तुळाजीच्या मुलुखांतही खंडोजी माणकाराच्या हाताखाली सारखा लुटालुटीचा सपाटा चालविला होता. तात्पर्य, तुळाजीला या प्रमाणे सगळीकडून पेशवे –इंग्रजांनी जर्जर करण्याचा सतत प्रयत्न केला व तुळाजीच्या दुर्दैवाने तो सिध्दीसही गेला. पुढे १७५६ च्या फेब्रुवारीत विजयदुर्ग किल्यावर समुद्रांतून वॉटसनने आणि जमिनीवरून क्लाइव्हने चाल केली. या किल्याची पाहणी करण्यास अगोदर एक जहाज आले होते. या जहाजाने सर्व पाहणी काळजीपूर्वक केली व तुळाजीने या जहाजास पकडण्यासाठी जेव्हा आपल्या लोकांस हुकूम केला तेव्हा ते जहाज त्यांच्या हातून निसटून गेले. ज्या तुळाजीच्या हातून मोठमोठी लढाऊ जहाजेंची निसटून जाणे दुरापास्त त्याच तुळाजीच्या तडाख्यातून हे य:कश्चित जहाज निसटून गेले यावरून त्याचे दैवच फिरले असे म्हटले पाहिजे. पुढे रीतीप्रमाणे युध्द होऊन तुळाजीचा पाडाव झाला व तो तेथूनही पळून गेला व त्याने पेशव्यांचा आश्रय केला. तुळाजीस दोन बायका व दोन मुले होती.[9]

त्यास त्याने किल्यांतच ठेविले होते. तुळाजी निघून गेल्यावर दोन दिवसांनी तो किल्ला शत्रूंच्या स्वाधीन झाला. अॅडमिरल वॉटसन याने त्या किल्यांत जेव्हा प्रवेश केला तेव्हा त्यास तेथे फारच हृदयद्रावक देखावा दिसला. त्यास पाहताच किल्यांतील तुळाजीची मंडळी ढळाढळा रडू

---

*8. धूळपास व आंगऱ्यास हुकूम गेले की, तुम्ही एकत्र होऊन मुंबईत उतरून शहर जाळून फस्त करणे, मेहेनत करून चाकरी करून चाकरी दाखववायाचे दिवस हेच आहेत.*

मराठी रियासत खंड –6, पान–48

*9. जंजिरेकरांशी लढाई, तुळाजी आंगऱ्याचे मुलांचा बंदोबस्त दारूगोळा तयार करणे, वगैरे बाबतीत विसाजीपंतास गेलेले माधवरावाचे हुकूम पाहता, तो मोठा इभ्रतदार असावा ह्यांत शंका नाही.*

मराठी रियासत खंड –5, पान–304

लागली, तेव्हा वॉटसन त्यास म्हणाला 'तुम्ही घाबरू नका', आता तुम्हास कोणतीही इजा पोहणार नाही. आमचा आश्रय तुम्हास आहे. हे ऐकताच त्या मंडळींनी वॉटसन यास वंदन केले. तुळाजीच्या आईसही फारच गहिवर झाला ती म्हणाली, आता आम्हास कसचा राजा आणि कसची मुले व या मुलास बाप तरी आता कसला आला आहे? तेव्हा वॉटसन पुन: म्हणाला, मीच आता तुम्हा सर्वांना संरक्षक आहे. त्याचबरोबर तुळाजीचा सहा वर्षाचा मुलगा होता तो वॉटसनचा हात धरून म्हणाला, तुम्ही तर आता माझे बाबा झाले. हे त्या मुलांचे शब्द ऐकून वॉटसनलाही गहिवर आला. या सर्व मंडळीस वॉटसनला मनातून मुंबईस घेऊन जावे असे फार होते. पण तुळोजी त्यास आपणांकडील बोलावून घेतले. असो इंग्रजांनी तो किल्ला यथास्थित लुटला. किल्यामध्ये आठ, इंग्रज , दोन स्कॉच आणि तीन उंच डच कैदेत होते, असे आढळले. यावेळी इंग्रजांनी विजयदुर्ग काबीज केला, तो पुढे फार प्रयासाने नानासाहेब पेशव्यास परत मिळाला. विजयदुर्ग ताब्यात घेताना पटलेले प्रयास पाहून नानासाहेबांची इंग्रजांच्या असत्य बचनाबद्दल या बलिष्टपणाबद्दलही खात्री झाली. आणि हे आंगऱ्यांचे आरमार बुडविण्यात आपली फार मोठी चुकी झाली, असे त्याता नि:संशय वाटू लागले असावे. पुढे, तुळाजी पेशव्यांच्या ताब्यात सापडला त्यास त्यांनी मरेपर्यंत कैदेत ठेवले. तो बहुधा १७८७ मध्ये मृत्यू पावला असावा, असे वाटते कैदेतून सुटून जाण्याचा त्याने बराच प्रयत्न केला, पण जो जो तो असा प्रयत्न करी तो तो त्याची कैद अधिक कडक होई. तात्पर्य, तुळाजीच्या बेफाट उन्मत्तपणामुळे व पेशव्याच्या अतिरिक्त स्वाभिमानामुळे शिवाजीने मोठ्या चातुर्यांने उभारलेले मराठ्यांचे आरमार रसातळास गेले व समुद्राच्या बाजूने मराठेशाहीची इमारत दुर्बळ झाली झाली. आता नानासाहेब पेशव्याने तुळाजीचे आरमार नाहीसें केले नसते तर इंग्रजांची सत्ता हिंदुस्थानात प्रस्थापित झाली नसती, असे मुळीच नाही. ते जरी खरे असले तरी तेवढ्याने नानासाहेबांच्या या अक्षम्य चुकीवर काही पांघरून  घालता येणार नाही. कारण तुळाजी सारखा मोहरा व्यर्थ गेल्याने फार मोठी राष्ट्रीयहानी झाली व या हानीस नानासाहेब जबाबदार होय. ही गोष्ट आपण विसरता कामा नये.

*✲ आंगऱ्यांचे हे आरमार नानासाहेब पेशव्याने इंग्रजांसारख्या शत्रुची मदत घेऊन तुडविले आणि शत्रुंना त्या किनाऱ्यावर आपली सत्ता बसविण्याची संधी दिली हा आत्मघातकी वाटणारा प्रकार आता सांगावयाचा आहे.*

*शाहूचे छत्र नाहींसे होतांच पेशव्याशी त्याचे वैर जुपले. त्यांज पेशव्याचा कोकणांतील सरसुभेदार रामाजी महादेव यांच्याशी तुळाजीचा उभा दावा, त्यामुळे प्रकरण वर्दळीस येत चालले.*

*मुंबईकर इंग्रजांच्या आक्रमणास आंगरे विरोध करीत म्हणून त्यांचा वैरभाव वाढत गेला. तुळाजीने तर इंग्रजांचा सारखा उच्छेद चालविला, तेव्हा त्याचा पाडाव करण्याची त्योची उत्कंठा वाढत गेली.*

*तुळाजीबद्दल पेशव्याचे मनांत जबरदस्त तेढ उत्पन्न होण्यास तशींच कारणे घडत गली. पोर्तुगीझांचा वसईडील प्रदेश पेशव्यांनी काबीज केला तो हरउपाय करून परत मिळवावा अशी खटपट पोर्तुगीझांनी सारखी चालू ठेविली*

*पेशव्यांचे तुळाजीशी फाटत चाललेले पाहून पोर्तुगीझांनी तुळाजीशी सख्य जोडले.*

*दरम्यान तुळाजी व इंग्रज यांचा वैरभाव तीव्र होत गेला. पेशव्यावर तर तुळाजीचा अत्यंत राग तेव्हा तुळाजीला नरम करण्यासाठी पेशव्यानें रामजी महादेवामार्फत इंग्रजांकडे शिष्टाई चालविली की तुम्ही पोर्तुगीझांस साह्य करूं नका, म्हणजे आम्ही तुम्हांस तुळाजीचा बंदोबस्त करून देतो. यांत मराठी आरमाराचा नाश करणें हा पेशव्याचा उद्देश बिलकुल नव्हता. तसा परिणाम होईल अशी धास्ती त्यास मुळींच नव्हती. तुळाजीचा कांटा काढणे एवढाच त्याचा मतलब. यास्तव ते तात्पुरते दोस्त बनले.*

*कुरापती काढव्यांत तुळाजीची बरोबरी फारच थोडे करूं शकतील. जर कोणी मर्जीविरूद्ध वर्तन केले किंवा कोणाची नुसती कागाळी आली की, आवेशाचे भरांत तुळाजी विचार अविचार पाहणारा नव्हता. पेशव्याची ज्याची गोडी त्याजवर तुळाजीवर रोष*

*सन १७५३ च्या आरंभी तुळाजी भली मोठी फौज घेऊन विशालगड किल्ल्यावर चालून गेला. हा किल्ला प्रतिनिधीचा असून त्याजकडून तुळाजीची कांहीएक आगळिक झाली नव्हती. या संबंधांत ताराबाईनेंच तुळाजीचा निषेध केला. ''तुम्ही विशाळगडाच्या घेण्यास येऊन उपसर्ग*

*करतां म्हणून हुजूर विदित जालें, तरी ऐसी अमर्यादा करावयास प्रयोजन काय! हे किल्ले महाराजांचे या उपरी देखत आज्ञापत्र आपला जमाव काढून आपल्या स्थळास जाणे," असें ताराबाईनें तुळाजी फर्माविले. विशाळगडचा किल्लेदार लिहितो, "आंगऱ्याने मर्यादा सोडून मुलकाचा उच्छेद केला, प्रभावळी, साखरेपें दोनही तोंडास शह देऊन बसला आहे. प्रतिनिधीच्या मुलकाची खराबी केली. कोणी खावंद त्यास विचारता नाही" तुळाजीने नंतर विशाळगडाचा वेढा उठविला.*

*तुळाजीचा बंधु मानाजी कुलाब्यास होता, त्याच्याशीहीं पेशव्याइतकेंच तुळाजीचे वैर होते. उभय बंधुचा कलह मिटविण्याचे प्रयत्न अनेकांनी केले, पण ते सफल झाले नाहीत.*

# १२. रंगो बापुजी

## (१८०८–१८३९) अ.रा. कुलकर्णी

***रोजा म्हणे कवण तू कोणाचा पुत्र? काय गे वदसि***
***का च स्मृतिरपि तापसि मैव प्रलपात्र भृभुज : सदसी  मोरोपंत***

१. सातारच्या प्रतापसिंह महाराजांना शेवटच्या बाजीरावाच्या कैदेतून सोडवून इंग्रज बहादुरांनी सातारच्या गादीवर बसविले व १८२२ मध्ये त्यांना संपूर्ण अधिकार देण्यात आले. प्रतापसिंह हे फार चतुर, मुत्सद्दी व राजकारणी पुरूष होते, परंतु दुर्दैवाने त्यांचे सद्‌गुण ऊर्जितावस्थेत कारणीभूत न होता कालाच्या विपरीत ओघात व त्यांच्या अध:पतनासच कारण झाले.

२. नागपुरच्या पदच्युत राजाशी, पत्रव्यवहार करणे, बंडासाठी शिपायास फितविणे व गोव्याच्या गव्हर्नराशी इंग्रजांविरुध्द पत्रव्यवहार करणे, असले आरोप यांच्यावर ठेऊन त्यांची गुप्तपणे चौकशी करून इ.स. १८३९ मध्ये त्यांना

---

*1. प्रतापसिंह, बळवंतराव सेनापती व बळवंतराव चिटणीस व पुढे प्रसिध्दीस आलेला रंगोबापूजी हे सर्व तरुण व होतकरू पुरूष एक विचाराने वागून बदललेल्या परिस्थितीत राज्याची व समाजाची ऊर्जितावस्था करण्यास अत्यंत आतुरतेने झटू लागले.*

मराठी रियासत खंड –8, पान–636

पदच्युत करून काशी क्षेत्री नेऊन ठेवले. प्रतापसिंह महाराजांबद्दल इतिहासामध्ये आजला प्रसिध्द असलेली हकीकत एवढाच आहे.[2]

३. प्रतापसिहांवरील आरोपांच्या सिध्दार्थ पुढे आलेल्या पुराव्याची छाननी करून सत्यासत्याचा निर्णय करण्याचे काम कथाकाल इतिहास शोधक करतील तो सुदिन. आपणास तूर्त त्याशी काही एक करायचे नाही.

४. प्रतापसिहांच्या कारकीर्दीत ग्रामण्य प्रकरणात फार ऊत आला होता. प्रभूस वेदोक्ताचे अधिकार असावेत किंवा नसावेत हे त्यावेळी मुख्य प्रश्न होता. तात्कालीन शंकराचार्यांनी प्रभूना हे अधिकार दिले होते व कित्येक प्रभूंनी अग्निहोत्रेंही घेतली होती. काही ब्राह्मण समुदाय त्याच्या विरुध्द होता व बाळाजीपंत नातू हे ब्रह्मवृंदाच्या तर्फे प्रभूविरुध्द पुण्यात राहून खटपट करीत होते. या बाळाजीपंतास प्रतापसिंहाची दिवाणगिरीही मिळविण्याची उत्कट महत्वाकांक्षा होती.[3]

५. ब्राह्मण आणि प्रभू यांच्या या ग्रामण्यासारख्या सामाजिक तंट्याच्या पायी उत्पन्न झालेल्या वैराग्नींत प्रतापसिंह महाराज होरपळून निघाले. प्रतापसिहांनी प्रभूंचा पक्ष घेतला होता म्हणून या ग्रामण्याचे पर्यवसान प्रतापसिहांच्या पदच्युतीत झाले. ब्राह्मणांच्या पक्षास बाळाजीपंत, नातू, चिंतामणराव सांगलीकर अशासारख्या वजनदार व श्रीमंत पुरूषांचे सहाय्य मिळाले. सामाजिक पक्षभेदात राजाने किती धूर्तता वापरली पाहिजे, हे या उदाहरणावरून शिकण्यासारखे आहे.

६. कठिण समय येता कोण कामास येतो? हे जरी खरे असले तरी अशा कठिण समयीही प्रतापसिंहांचे विलायतेच्या पार्लमेंट पुढे मांडण्यासाठी त्यांच्या तर्फे काहीं मंडळी विलायतेस मोठ्या कष्टाने गेली. परंतु तेथेही त्यांच्या तीव्र निराशा होऊन एका पुरूषा शिवाय बाकीचे सर्वजण लवकर परत आले. जो पुरूष तेथे चौदा वर्षे राहिला, त्यांचे नांव रंगो बापूजी हे होय. या रंगो बापूजीच्या उद्योगाची हकीकत आज वाचकांस सादर करावायाची आहे.

७. रंगोबापूजी हा विलायतेस चौदा वर्ष राहिला. त्यास इंग्रजी मुळींच येत नव्हते. एक हिंदी जाणणाऱ्या युरोपियनामार्फत तो आपले म्हणणे इतरांस

---

*2. रंगो बापूजी गुप्ते यास त्याने फेबु.१८३९ त लंडनास रवाना केले.*
मराठी रियासत खंड -8, पान-639

*3. परंतु रंगोबापूजीने जॉर्ज टॉम्प्सन नावाच्या विद्वान गृहस्थास मदतीस घेऊन प्रतापसिंहाची हकीकत तिकडे जाहीर केली.*
मराठी रियासत खंड -8, पान-644

समजावीत असे. विलायतेची सर्व हकीकत लिहून ती रंगो बापूजींनी तेथेच मोडी लिपित शिळा प्रेसवर सन १८४७ मध्ये छापविली, ती आज क्वचित उपलब्ध आहे. सदरहू पुस्तकाची सुमारे २२५ पृष्ठे आहेत. पुस्तक लेखनाच्या अर्वाचीन पद्धतीला रंगो बापूजी हा अनभिज्ञ असल्याने त्यांत हल्लीच्या दृष्टीने पुष्कळच दोष आहेत, असे म्हणता येईल. कित्येक ठिकाणी द्विरुक्ती झालेली आहे. पुस्तकाला अनुक्रमणिका नाही. हे पुस्तक म्हणजे रंगोजी बापूजींनी आपले विचार अव्यवस्थितपणे कागदावर नमूद करून ठेवे, हे होय. अशी जरी स्थिती आहे, तरी सुमारे ७५ वर्षा पूर्वी ते एका इंग्रजी न जाणणाऱ्या हिंदी गृहस्थाने लंडन येथे छापविले, यातच त्यांचे महत्त्व मोठे आहे.

या पुस्तकांतील मजकूराचा सारांश भारत सेवकाच्या नोव्हेंबर 1917 च्या अंकात वाचकांस सादर केलाच आहे. तो असा

८. ''आमच्याजवळ सुंदर मोडी अक्षरांनी लिहून शिळेवार छापिलेले असे एक पुस्तक आहे. या पुस्तकावर त्यांचे अगर त्याच्या कर्त्याचे नाव नाही. याची बांधणी कापडी असून पुठ्ठा इतका मळकट झाला आहे की, तो मूळचा कोणत्या रंगाचा असावा हे सांगणे कठिण झाले आहे. याची बांधणी मजबूत आहे व यातील कागद काही पातळ व काही जाड असे दोन प्रकारचे आहेत. सदरहू पुस्तकात काही मजकूर बालबोध लिपितही लिहिलेला आहे. परंतु असा मजकूर फारच थोडा आहे. बालबोध लिपितील काही भाग चांद्रसेनीस कायस्थ प्रभुंस शंकराचार्याकडून मिळालेल्या आज्ञापत्रातील असल्यामुळे साहजिकच तो संस्कृतांत लिहिलेला आहे. सदरहू पुस्तकाच्या पहिल्या चार पृष्ठांवर क, ख, ग, घ आणि a, b, c, d, असे वर्ण अनुक्रमांकाच्या ऐवजी लिहिलेले आहेत. त्यानंतर १ ते ६५ पावेतोच्या पृष्ठावर मराठी व इंग्रजी अशा दोन्ही प्रकारचे अंक घातले आहेत. याप्रमाणे या पुस्तकांत एकंदर वरप्रमाणचे दोन्ही लिपित आहेत. याशिवाय या पुस्तकाच्या प्रारंभी एकंदर (४+६५+१५६)=२२५ पृष्ठे आहेत. याशिवाय या पुस्तकाच्या प्रारंभी व शेवटी दोन मोठमोठी पत्रके सबंध कागदावर लिहून चिकटविलेली आहेत. पैकी पहिले पत्रक एका बाजूने व दुसरे मात्र दोन्ही बाजूनी लिहिलेले आहेत. आंतील मजकूरावरून असे दिसते की, पहिली चार पृष्ठे प्रस्तावना असून ६५ पृष्ठे मुख्य मजकूराची आहेत. व त्यानंतरची १५६ पृष्ठे काही पत्रव्यवहार आहे. आरंभीच्या पहिल्या मोठ्या कागदावर पुराव्याचा मजकूर पत्रकरूपाने तयार केला असून शेवटच्या मोठ्या कागदावर लेखकाच म्हणण्यास

पुष्टी देणारा अस्सल पुरावा नमूद केला आहे. पुस्तकाच्या आतील प्रत्येक पृष्ठावर बारीक मोठी अक्षरांनी लिहिलेली अठ्ठावीस ओळीपर्यंत मजकूर आहे. सदरहू पुस्तक सन १८४७ मध्ये लंडन येथे छापिलेले आहे असे आतील मजकूरवरून वाटते. पहिल्या पत्रकावर इंग्रजीमध्ये printed on stone by C. Moody High Holbrn Street, london, असे उजव्या बाजूस आडवे छापिलेले आहे. व त्याचप्रमाणे पत्रकावर शेवटी ''सही रंगो बापूजी प्रभु वकील नि छत्रपती सरकार : हा कागद लंडन मुक्कामी दगडावर छापविला. मेस्तर सी. मुडी, घरचा नंबर २६७. पहा इंग्रजी सही या पत्रकावर असे लिहिलेले आहे.

९. या पुस्तकावर मजकूर जुन्या मराठी भाषेमध्ये लिहिलेला असल्यामुळे मजकुराची पुष्कळच पुनरावृती झालेली आहे. इंग्रज शब्दांना मराठी रूपे देऊन ते यांत घातले आहेत. विशेषतः इंग्रजी विशेषनामे फारच विकृत झालेली आहेत. याप्रमाणे या पुस्तकाच्या बाह्यांगाचे वर्णन आहे. अशा या पुस्तकात काय मजकूर आहे त्याची माहिती विशेष: रंगो बापूजीच्या शब्दामध्ये वाचकांस सादर करावयाची आहे.

१०. सातारचे प्रतापसिंह महाराज हे शेवटच्या बाजीरावाच्या कैदेंत होते. परंतु पुढे इ.स. १८१७ मध्ये खडकीच्या लढाईत पेशव्यांचा पराजय झाला व ते सहसैन्य पळाले. त्या वेळी बाजीरावांनी प्रतापसिंह आपले बरोबर घेतले होते. पण एवढ्या मोठ्या सैन्यानिशी पलायनाचा उद्देश पार पडणे शक्ये नव्हते व प्रतापसिंहांनाही राज्यपद पाहिजेच होते म्हणून ते थोड्याशा मध्यस्थींने इंग्रजांच्या स्वाधीन होऊन सातारच्या गादीवर विराजमान झाले. परंतु राज्याचा पूर्ण अधिकार मात्र १८२२ पर्यंत त्यांना मिळाला नव्हता. शिवाजी महाराजानंतर भोसल्यांच्या कुलवंत प्रतापसिंहा एवढा कर्तृत्त्वशाली, दूरदृष्टी व राज्यकार्यधुरंधर राजा कोणीच झाला नाही. प्रतापसिंहला काल अनुकूल नव्हता; इंग्रजीसत्ता हिंदुस्थानात दृढमूल होण्याच्या बेतात होती; बाळाजीपंत नातूसारखे त्याच्या दरबारी डोळ्यात तेल घालून त्याची नसती छिद्रे पहात बसले होते. त्याच्या दरबारात मुत्सद्दी व कुशल मंत्र्यांचा अभाव होता. आणि त्याच्या पाठचा सख्खा भाऊही त्याच्या विरूद्ध वाटेल ती खोटीनाटी साक्ष देण्यास तयार होता. अशा अत्यंत हीन स्थितीत राज्यपद प्राप्त झाल्याने त्याला आपल्या कर्तृत्वाचा काहीच उपयोग करिता आला नाही, हे देशाचेच दुर्दैव म्हटले पाहिजे. प्रतापसिंहाच राज्यव्यवस्था उत्तम होती यांत काही संशय नाही. मराठी दप्तर रूमाल १ यांत

पृष्ठ १६५ वर प्रतापसिंहचे वर्णन आहे ते

'' प्रतापसिंह महाराज छत्रपती यांचा स्वभावगुण व वर्तणूक कशी होती? त्यांची बुद्धी फार विशाल असून ते बोलके उत्तम प्रकारचे होते. आणि धूर्तता चांगली होती व घोड्यावर बसणे व शिपाईगिरीत शूर व सर्व गुण जाणते. ते सर्व विद्याप्रवीण होते व त्यांचे अंत:करण निर्मळ असून पदरचे लोकांचा अभिमान फार होता. कामाची युक्ति ठेवून इनसाफाचे काम वगैरे वक्तशीर करोन जातीचे अक्कलेने राज्याकारभार सुरक्षित चालविला. कोणी अपराध केला तो शरण आल्यावर क्षमेविसी औदार्य फार होते. दरमहा ज्याचा त्यास देऊन सर्व लोक हुषार ठेविले होते. (त्यांनी) यवतेश्वराचा नळ बांधून शहरांत पाणी नेले. जलमंदिर व बाग व तलाव (बांधिले)''

११. प्रतापसिंह राज्यपद अर्पण केल्याबद्दल ग्रॅट डफ् लिहितो

''ता. एप्रिल सन १८२२ रोजी प्रतापसिंहांना पूर्णपणे राज्याधिकार अर्पण करण्यात आले. कंपनी सरकारांनी शिवाजीच्या वंशजाला ही जी देणगी दिली तिच्यायोंगे प्रतापसिंह व त्याचे आप्तस्वकीय यांना तर आनंद झालाच, परंतु राष्ट्रालाही कंपनी सरकारचे हे कृत्य कौतुकास्पद वाटले'' इतके लिहून डफसाहेब कंपनीच्या या औदार्याच्या भवितव्याबद्दल आपला अभिप्राय असा व्यक्त करितात की, ''परंतु कंपनीच्या दातृत्वाची परिणाम कंपनीला अथवा प्रतापसिंहाला कायमचा हितावह होईल किंवा कसे याचा निर्णय (आपोआप प्रसंगानुसार पण) कालावधीने होईल.'' प्रतापसिंहाना पदच्युत करण्यांत त्यांचे बंधु शहाजी राजे यांनी इंग्रजसरकारास मदत केल्यामुळे प्रतापसिंहाशी सन १८१९ मध्ये जो तह केला होता, त्यांतील कलमाची काही फिरवाफिरव करून शहाजींनी कंपनीने सन १८३९ मध्ये नवीन तह केला. त्यायोगे प्रतापसिंह, शहाजी, कंपनी अथवा साताऱ्याचे राज्य यापैकी कोणाचा अवघा १७ वर्षाच्याच कालावधीने कायमचा फायदा झाला हे. इतिहासतज्ञास पूर्णपणे समजून चुकले आहे. या वेळी लॉर्ड ऑकलंड हे गव्हर्नर होते. व सर रॉबर्ट ग्रँट हे मुंबईचे गव्हर्नर असून

**the entire powers of the state were formally deliverd over to him (Pratap Sinh) on the 5th april 1822 at which period th boon, thus conferred by the british nation on the descendent of shivaji. was certainaly aproved by country generally, as well as his relatives and himself but time must prove weather this liberal experiment on the part of authorities of th east India company will be attended with any lasting good effect to governors of the governed. (Grat Duff. Vol. III page 492)*

*जॉन फोर्ब्स एस्कायर, डायरेक्टर नि. ईस्ट इंडिया कंपनी यांचे डिसेंट ८ एप्रिल १८४० पार्लमेंटरी बुकर, पान १२५९*

त्यांना सातारचे दरबारांत कर्नल चार्लस ओविन्स (Ovins) यास रेसिडेंट नेमिले होते. प्रतापसिंहांनी नागपूरकर भोसले व विशेषत: गोव्याचे पोर्तुगीज गव्हर्नर डॉन इमॅन्युएल यांनी हिंदस्थानांतूनन इंग्रजांचे उच्चाटन करण्याची कारस्थाने केली व इमॅन्यूएल यांस फौजेच्या तयारीसाठी पन्नास लक्ष रूपये देण्याचे कबूल करून एक घोडाही नजर केल व फौजेंत फितूर केले. या एकंदर तीन प्रकरणाचे कागदपत्र व दस्ताऐवजी पुरावा बाळाजी नारायण नातु यांच्या मदतीने कर्नल ओविन्स यांनी मिळवून मुंबई सरकारच्या मार्फत पार्लमेंटांत रूजू केले. व गुप्त चौकशी करून "प्रतापसिंह महाराज छत्रपती यांजवर इंग्रजी सरकारांत रूपयाच्या सोळा साक्षी घेऊन बाळाजीपंत नातु यांनी राज्यातून" प्रतापसिंहास पदच्युत करवून काशी दाखविली रंगो बापूजी म्हणतात, "महाराज छत्रपतीविषयी मुंबई गव्हर्नमेटांनी फार रागास येऊन द्वेष करण्याचे मुख्य मुळ तरी काय म्हणाल तर पहा; छत्रपती सरकारच्या जहागीरदार घेण्याचा दगेबाजीने मतलब केल. त्याजवरून महाराज छत्रपतींनी तहनाम्यातील ठरवल्याप्रमाणे जहागीरदार आपले आहेत असे मुंबई गव्हर्नमेंटांनी घेतले." त्याजवरून महाराजांनी या बाबतींत कोर्ट ऑफ डिरेक्टर्स जो ठराव करतील तो आपणांस कबूल असल्याचे लिहून कळवले. "त्यावरून पुढे काम चालून कोर्ट ऑफ डिरेक्टर्स यांनी राज्याचे हक्कविषयी तहनाम्याचे कराराप्रमाणे हे जहागीरदार राजाचे आहेत. असा करून लिहून पाठविले. परंतु ह्या ठरावाचे पत्र मुंबई गव्हर्नमेंटाने समजून उमजून गुप्त ठेविले," प्रतापसिंह महाराजाकडेस काही पाठविले नाही व त्याचा अम्मलही केला नाही. प्रतापसिंह महाराजांस याजबद्दल फार वाईट वाटले व त्यांनी आपली हकीकत विलायतेस कळविण्याचा विचार केला. आपले तर्फे मजकूर बोलण्यास वकील लंडनास पाठविण्याचा विचार केला व या वेळेपासूनच नशीबाने मागे घेतले. यावेळी राजाचे दरबारात रेसिडेंटचे कामगार जनरल लढविक (Ludwik) होते. त्यास प्रतापसिंहांनी आपला मनोदय कळविला. तेव्हा त्यांने आपले मनांत विचार करून सांगितले की, या कामवरून महारांजास काही चागले फळ निर्माण होणार नाही. याचकरतां महाराजांनी असे करू नये. याजवरून या वेळी महाराज छत्रपतींनी वकील लंडनास पाठविण्याचे मना केले. तथापि मुंबई सरकारच्या मनांतील क्रोध काही नाहींसा झाला नाही. त्यांना सातरच्या राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी मि. विलोबी व कर्नल वोविन्स यांचे गुप्त कमिशन ता. १० ऑक्टोबर सन १८३६ रोजी साताऱ्यास पाठविले. या उभयतांनी गुप्त रीतीने सुमोर

१०५ दिवस पावेतो चौकशी करून आपले मते प्रतापसिंहावर राजद्रोहाचा आरोप प्रस्थापित केला व नंतर त्यास आपल्या बंगल्यावर येण्याबद्दल पाचारण केले. साताऱ्यासारख्या अधिपतीला कमिशनाच्या मेंबरांनी आपल्या भेटीस आपल्या बंगल्यावर बोलवावे हा फक्त त्या राजाचा अपमान नसून सबंध राष्ट्राचा अपमान होय. परंतु करणार काय? बडोद्याच्या मल्हाररावांच्या वेळी ज्याप्रमाणे येथील रेसिडेंटाला मुंबई गव्हर्नरांचे पूर्णपणे पाठबळ होते त्याचप्रमाणे कर्नल ओविन्स यालाही सर रॉबर्ट ग्रॅटचे होते. प्रतापसिंह आणि मल्हारराव या २५ वर्षाच्या अंतराने होऊन गेलेल्या दोन मराठी संस्थाानिकांचे इतिहास परस्परांशी पुष्कळ अंशांनी जुळतात. प्रतापसिह बाजीरावाच्या कैदेत होते तर मल्हाररावांना खंडेरावांनी प्रतिबंधित ठेविले होते. तात्पर्य दोघांनाही इंग्रज सरकारांनीच प्रतिबंधातून मोकळे करून राज्यपद दिले. राज्याची चौकशी करण्यासाठी ज्याप्रमाणे बडोद्यास सर रिचर्ड मीडचे कमिशन बसले होते, त्याप्रमाणे साताऱ्यास कर्नल वाविन्सचे कमिशन नेमले होते. साताऱ्यास कमिशनचे मदतनीस बाळाजीपंत नातू होते तर बडोद्यास भाऊ पुणेकर होते. इंग्रज सरकारच्या प्रतिनिधीला म्हणजे रेसिडेंटला विषप्रयोग केल्याचा आरोप मल्हाररावावर होता तर संबंध इंग्रज सरकारलाच हिंदुस्थानातून नेस्तानाबूत करण्याच आरोप प्रतापसिंहावर होता. तात्पर्य, दोघांचेहि इतिहास जवळ-जवळ सारखे असल्याने काळजीपूर्वक पाहण्यासारखे आहेत. आता मल्हारराव महाराज कर्तृत्त्वहीन व क्षणिक बुद्धीचे असल्यानें त्यांच्यावरील आरोपाची चौकशी वाटेल तशी प्रसिद्धपणे झाली व प्रतापसिंह फार हुशार राजा असल्याने इंग्रज सरकारांनी त्यांची चौकशी फारच गुप्तपणाने केली. असो.

१२. कमिशनच्या बोलविण्याप्रमाणे प्रतापसिंह त्यास जाऊन भेटले. तेव्हा त्यांना त्यांच्या वरील आरोपींची माहिती देण्यांत आली. ती ऐकून कमिशनपुढे साक्षीदारांच्या साक्षीच्या मराठी नकला मिळण्याबद्दल प्रतापसिहांनी मागणी केली. परंतु त्या नकला मिळाल्या नाहीत. नकला मिळण्याबद्दल प्रतापसिंहानी सुमारे पाच महिने वाट पाहून ता. २३ मार्च सन १८३७ रोजी मुंबई गव्हर्नरास पत्र पाठविले व त्यात लिहिले की, " आपल्या हुकमाप्रमाणे कमिशनची भेट घेतली. त्यासमयी जबान्या इंग्रजीत वाचून दाखविल्या. तेव्हा कमिशन यास आम्ही सांगितले की, या लोकांच्या हिंदवी कच्च्या मजकूराच्या जबान्यांच्या नकला पाठवाव्या. परंतु कमिशन नकला न देता न भेटता निघून गेले. आणि या कामाची मुदत ही फार झाली आहे. हा आदेश आणून विलायतेचे व

कलकत्त्याचे उत्तर एक प्रकारचेंच आल्यास आणि मग आम्ही बोलल्यास तुम्ही कां अगोदर बोलला नाही? असा प्रश्न आम्हास होईल." सदरहू पत्र सातारच्या दरबारांतून रंगो बापूजीबरोबर मुंबईस रवाना झाले. परंतु मुंबई गव्हर्नराने रंगो बापूजीची भेटही न घेता चीफ सेक्रेटरी वॉशिन यांचे मार्फतीने पत्र घेऊन दोन दिवस ते ठेवून रंगो बापूजीकडेस परत पाठविले व हे पत्र आपण स्वीकारीत नाही, असा त्यास तोंडी जबाब धाडिला. हे मुंबई गव्हर्नराचे उत्तर ऐकून " राजा लाचार होऊन (त्यास) आश्चर्य वाटले." नंतर त्यांनी गव्हर्न जनरल लॉर्ड ऑकलंड यांस ही सर्व हकीकत लिहून डॉ. मीलनमार्फत तरी या प्रकरणाची माहिती मिळवावी अशी विनंती केली. व्हाइसरॉय साहेबांनी ता. ७ आगस्ट सन १८३७ रोजी डॉ. जॉन मीलन यांस पत्र लिहून कळविले की, सातारचे राजाची मर्जी आहे की, तुम्ही त्यांचा सर्व मजकूर घेऊन लॉर्ड साहेबांस निवेदन करावा. याविषयी गव्हर्नर जनरल इन कौन्सिल फार खूष आहेत. परंतु तुमची पत्रे येणे ती मुंबई गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांजकडून शिरस्तेप्रमाणे यावी." याप्रमाणे डॉ. मीलन यांस पत्रे गेल्याची हकिकत मुंबई सरकारास कळताच त्यांनी ता. २५ सप्टेंबर सन १८३७ रोजी त्यांस एक पत्र पाठवुन सूचना दिली की, "तुम्ही साताऱ्याच्या जाण्याविषयी लिहिले, त्यास तिकडून पुन:उत्तर आल्याशिवाय हुकूम देऊ शकत नाही." याप्रमाणे डॉ. मीलन यांस हुकूम पाठवून नंतर थोड्या दिवसांनी पुढील आशयाचे दुसरे पत्र त्यास धाडीले.

"डॉ. मीलन यास जाहीर व्हावे की, तुम्ही कंपनीचे पंशनर आहे. याकरिता राजाविषयी मजकुराचे काही एक कागदपत्र पाठवू नयेत." आणि राजास अथवा त्याचे वकीलासहि "तुम्ही त्यांशी बोलणे जनजाहीर अथवा गुप्तमार्गी केव्हा कधीहि भाषण तुम्ही त्यांशी करू नये."(सही) फेरीस, हंडरसन, डनलप.

याप्रमाणे मुंबई सरकारने जिकडे तिकडे नाकेबंदी करून टाकली , रंगो बापूजी विचारितात, "जर प्रतापसिंह खरोखरी गुन्हेगार होते, त्यांज वर राजद्रोहाचा आरोप शाबित झाला होता, त्यांचेविरूद्ध भरभक्कम पुरावा होता, तर प्रथम गुप्त रीतिने झालेली चौकशी व घेतलेल्या जबान्या मागाहून जाहीर रीतिने प्रसिद्ध करण्यास मुंबई सरकार का भीत? महाराजांची पदच्युती जर गुप्त नव्हती, तर तिचे अप्रसिद्ध का असावे? डॉ. मीनलसारखा नि:स्पृह व सत्यप्रिय गृहस्थाची नेमणूक गव्हर्नर जनरलनें केली असता ती का रद्द करविली? एकंदर कामात झालेल्या साक्षीच्या नकला प्रतापसिंहास देण्यात का इनकार केला?

प्रतापसिंहानी जर कबूलीजबाब हा लिहून दिला, तर त्याचे राज्य त्याजकडून हिसकावून न घेता त्यांजकडेस ठेवण्यांत येईल, अशी लालुच का दाखविण्यात आली? तात्पर्य, एकंदर काम जर खरे होते, तर सिद्धयर्थ असले खोटे मार्ग का स्वीकारले? व यावरूनच अशी खात्री होते की, प्रतापसिंह पूर्णपणे निरापराधी होते. त्यांच्या निरपराधित्वाबद्दल त्यांच्यातर्फे निराळा पुरावा देण्याची काही गरज नाही. वाचकांना येथेही पुन: मल्हाररावावरील आरोपाची आठवण होईल. सार्जब्ट बॅलेंटाईन सा प्रसिद्ध बॅरिस्टराने देखील मल्हारराव तर्फे त्यांच्या निर्दोषित्त्वाचा पुरावा दिला नाही. फिर्यादी तर्फेच्या साक्षीच इतक्या अविश्वसनीय, असंबद्ध व अतएव असत्यपरिपूरित होत्या का, त्यावरूनच मल्हारराव निर्दोष असल्याबद्दलची बॅलेंटाईन यांना कमिशनरांची खात्री पटविली. न्यायसभेत निरपराधी ठरविले, त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील (रंगो बापूजी या) बॅलेंटाईनने प्रतापसिंहांना विलायतेच्या जनतेपुढे निरपराधी ठरिवले. हा एक कालाचा महिमाच म्हणावयाचा! कारण या दोन्ही गोष्टी एकाच शतकातल्या असून फक्त सुमारे तीस वर्षाच्या अंतराने घडलेल्या आहेत.

१३. प्रतापसिंहावरील कमिशनांत मि. लडविक हे अध्यक्ष होते हे प्रथम साताऱ्यास रेसिडेंट होते. हा मनुष्य फार नि:स्पृह व सत्यवक्ता होता. असे त्याच्या वर्तनावरून दिसते. असला मनुष्य आपल्या उपयोगी नाही, म्हणून मुंबई सरकारनी त्यांची बदली करून त्याचे जागी त्यांचे हेतु पार पाडील असा दुसरा रेसिडेंट (colonel ovins) नेमला. कमिशनमधील गुप्त चौकशी संक्षिप्त हकीकत जनरल लडविक यांने जनरल कोर्टात ता. ५ जुलै सन १८४१ रोजी सांगितली. ती एशिसाटिक जर्नलमध्ये पान ७२ वर दिली आहे. ती अशी.

“मी साताऱ्यास होतो तेव्हा या पंचाइतीत माझे समक्ष झालेला मजकूर जो मला माहित आहे तोच मी आता न भिता दिला मजबूत करून तुम्हास सांगतो की, हे कमिशन म्हणजे पंचाईत यथान्यायेकरून सत्य पाहता अगदी योग्य नाही. त्या समयीचा मजकूर असा आहे की, तेविसावे पलटणचे शिपाई लोंकाचे अंमलदारास हुकूम झाला की, तुम्ही कमिशनकडे जाऊन रूजू होणे. त्याप्रमाणे हे साक्षीदार येऊन हजर झाले. ते समयी मी त्यांच्या यथायोग्य खरा मजकूर समजण्याबद्दल पुरसीस उलटपालट इन्साफाच्या शिरस्त्यान्वये कसोशीने घालून चौकशी करावी म्हणून प्रयत्न केले आणि प्रथम एक असामीस बोलावून मी सवाल करताच तो साक्षीदार घाबरा होऊन मोठा भयभीत झाला. तेव्हा

कर्नल ओविन्स व मिस्टर उलवीने पाहून त्या साक्षीदारास मदत करून मधी शिरून मला सांगितले की, यास तेडेबाके सवाल करून विचारू नये. परंतु साक्षीदाराची पूर्तेपणे अद्दल नीतीनी चौकशी केली असती तरी मला पुरती खातरजमा होती की, साक्षीचे तुकडे तुकडे होऊन तेव्हाच मोडून खाली जमिनीस पडते. दुसरे, या शिपायाचे अम्मलदारा विषयी साफ आणि सत्य सांगतो की, जेव्हा अंमलदार साक्ष देत होता, त्यासमयी या साक्ष देणाऱ्याचा चेहरा प्रेताप्रमाणे दिसला. हा साक्षीदार खोटा यास्तव त्याचा चेहरा मृतवत झालेला होता. हे मी दुसरे कमिशनर यास त्याचसमयी यास दाखविल. परंतु त्या उभयतां कमिशनरांनी माझे सांगणे व बोलणे दिलांत आणले नाही. व अद्दल इनसाफाच्या शिरस्तेप्रमाणे या साक्षीदारास सवालजवाब घालून मला पुढील पूरी चवकशी या उभयतांनी करू दिली नाही. म्हणून मी त्याच वेळी बोलले की, राजावर गुन्हा ठरविण्यास व फितुराची शाबिती करण्यास हे दस्ताऐवजी कागद अगदी समूळ खोटे आहेत.

१४. प्रतापसिहावरील आरोपाच्या चौकशीचा वस्तुविन्यास वरप्रमाणे आहे. मि. लडविक याच्या या हकीकतीच्या प्रसिद्धीकरणाने इंग्लंडमध्ये बराच बोभाटा झाला होता. गोव्याच्या ज्या गव्हर्नराशी प्रतापसिहांने हे फितुरी कारस्थान केल्याचा आरोप होता, त्या गव्हर्नरानेही आशयाचे पत्र प्रसिद्ध केले होते.

"लिस्बन, ता. २५ एप्रिल इ.स.१८४१ इ."

आमचे अब्रूने आणि खरेपणाने आमचे अब्रूचे स्वच्छतेकरता इन्साफाचे पुरवणीबद्दल आम्ही अगत्य सांगतो की, ज्या वेळेपासून आम्ही हिंदुस्थानात पोर्तुगाज यांच्या महाली मुलखी गोव्याचे गव्हर्नरीवर होतो, त्यास प्रथमपासून अखेरपावेतो राजाचे कागद आम्हास अगर आमाचा कागद राजास तेथे आम्ही हुकूमत केली तेव्हा कधीही राजकारणी फितूरी कामाबद्दल आम्ही लिहून पाठवला नाही व सातारचे राजाचाही आम्हास आला नाही. व परस्परे बोलणे झाले नाही. असे असता आमचे सहीचे जे काही दस्तऐवजी कागदपत्र राजकरणाविषयी छापुन झाले आहेत, ते सारे खोटे व लबाडीचे आहेत.

साक्ष : सही

१ ह्यूम, एसक्वायर, मेंबर पार्लमेंट, दोनमनायेल, दि पोर्टुगाल इकासत्रो.

१४. सर रॉबर्ट ग्रॅटनंतर सर जेम्स कॉर्नाक हे मुंबईचे गव्हर्नर होऊन आले. त्यांनी "मोठ्या जलदीने एक कागद कलमबंदीचा लिहिला. त्या कागदांत पूर्वीची एक कथा तर्कटीची होती तिचा आरंभ केला. याचा मतलब काय होता

म्हणाल तरी सातारचे राजाचे मुकदम्याची समाप्ती करावी. म्हणून हे हंडरसन (Hundersun) वुल्बी (Wolbey), व कॉर्नाक (Cornack) साताऱ्याय मुद्दाम जाऊन त्यांनी राजास काय सांगितले ते पहा. या गव्हर्नराने महाराज छत्रपतीस बोलावणे पाठविले तेच क्षणी छत्रपती येऊन गव्हर्नरास भेटले. तेव्हा कॉर्नाक यांनी सदरहू तर्कटाचा आरंभाचा कागद राजास वाचून दाखविला. आणि महाराज छत्रपतीस सांगितले की, महाराजांनी फितुर केले म्हणून कबूल करून लिहून द्यावे. आणखी पहा मोठ्या जोराने महाराज छत्रपतीपाशी या फितुराचे तर्कटाचे कबुलायत लिहून मागितले. कार्नाक यांनी सांगितले की, तुम्ही फितुर केले म्हणून कबूल होऊन आम्ही सांगतो त्याप्रमाणे आम्हास लिहून देऊन नंतर महाराजांनी आपले राज्याचे सिंहासनावर कायम निरंतर राहावे. तेव्हा ही गोष्ट छत्रपतीनी अनाहूत ऐकून त्यांस फार आश्चर्य वाटून मोठा अचंबा होऊन संकट प्राप्त झाले. व त्यांनी उत्तर केले की, "आम्ही फितुर केले नाही आणि तुमचे सांगण्यावरून आम्ही या खोट्या कागदावर सही करणार नाही. तुम्ही आम्हास तहनामा तोडीला म्हणता, त्यास आम्ही काय काय केले ते सांगा" तेव्हा कॉर्नाक यांनी उत्तर केले की, तुम्ही नागपुरचे काढलेले राजाशी फितुर केले. त्या राजाचे अस्सल कागद इंग्रजी गव्हर्नमेंटाचे हाती सापडले आहेत. हे कागद नागपुराहुन गेलेले राजांनी साताऱ्यास महाराजांकडे पाठविले, ही गोष्ट शाबित झाली आहे. असे असता तुम्ही कसे नाही म्हणता? तेव्हा महाराज छत्रपतीनी त्यांस उत्तर केले की, एखाद्याने कोणाकडे कागद पाठविला, परंतु ज्यास पाठविला त्यास जर माहीत नसल तर तो उत्तर काय सांगेल? आणि अशावरून कोणी अन्यायदार शाबूत होत नाही. नागपूरचे राजास आमचे उत्तर कोठे आहे, ते दाखवाचे मेस्तर हण्डरसन येथे आहे आणि तिकडून त्याजकडे कोणी कागद पाठविला, व त्यास तो माहीत नाही, तर हंडरसन उत्तर काय सांगतील?

१६. याप्रमाणे या फितुराच्या चौकशीचे काम ता. १ जुलै सन १८३७ पासून ता. १३ जून १८३९ पर्यंत म्हणजे सुमारे साडेतेवीस महिने चालून शेवटी ता. ५ सप्टेंबर १८३९ रोजी छत्रपतीस साताऱ्याहून काढून त्यांची काशीस रवानगी केली. रंगो बापूजी सांगतात, "राजाने फितुर केला म्हणून म्हणणारे ते कोण म्हणाल तर ती नामावली पहा:-

१. बोर्ड ऑफ कंट्रोल म्हणतात, "कोर्ट डिरेक्टर्स यांनी केले ते आम्हास कबूल आहे."

२. कोर्ट डिरेक्टर्स म्हणतात, हे काम गव्हर्नर जनरलचे आहे.

३. गव्हर्नर जनरल म्हणतात, ते मुंबई गव्हर्नमेंटने केले.

४. गव्हर्नर जनरल हे दाखवितात, वुल्बी सेक्रेटरीकडे बोट

५. बुल्बी सांगतो ओविन्स रेसिडेंटाचे नाव.

६. आणि ओविन्स रेसिडेंट म्हणतात, या तर्कटाचा शिरोमणी बाळाजी नारायण नातू हा होय.

तात्पर्य – प्रत्यक्ष आपण भूत पाहिल्याचे ज्या प्रमाणे सांगत नाही त्याचप्रमाणे प्रतापसिंहावरील आरोपसिद्धीची वरील ढकलाढकली आहे. आता नातूने प्रतापसिंहाच्या विरुद्ध कारस्थान करावयाची कारणे रंगो बापूजीच्या मताप्रमाणे दोन आहेत. पहिले चांद्रसेनीय कायस्थ प्रभुंचा संकेश्वरच्या शंकराचार्यांनी वेदोक्ताचा अधिकार मान्य केला हे होय. चिंतामणराव पाडुरंग पटवर्धन सांगलीकर आणि नातू यांस स्वामीचे हे कृत्य मुळीच पसंत नव्हते. प्रतापसिंहानी प्रभुचे हे वेदोक्ताचे अधिकार काढून घेऊन आपल्या मनाप्रमाणे या ग्रामण्याच्या प्रकरणाचा निकाल लावावा, असा या उभयतांच मानस होता. परंतु प्रतापसिहांनी हे ऐकिले नाही. त्यामुळे या उभयतांनी ही राजद्रोहाची घोरपड प्रतापसिहांवर आणली.

“दुसरे कारण, “ एक ब्राह्मण यांचे नाव सर्वत्रास माहीत आहेच. तो बाळाजी पंत नातु, गव्हमेंट सांगते ते करावायास त्वरित सिद्ध आणखी हा माणूस आपले दिलापासून हरएक तरकटी कामे करण्यास निरंतर गव्हर्नमेंटचे हुकूमास हजर आहे. पहा याचे स्वज्ञातीचाच जो पूर्वीचा धनी पेशवा मुख्य प्रधान बाजीराव रघुनाथ त्यानी दगेबाजी केली. त्या कामाबद्दल मुंबई गव्हर्नमेंटानी यास मानमरातब अब्रू देऊन इनाम व बक्षीस, पेनशनसह दिले. हाच निमकहराम खोटा दगलबाज, याचे मनांत असे होते की, आपण सातारच्या राजाचे मुख्य दिवाण व्हावे आणि महाराज छत्रपतीपाशी या नातूनी दिवाणगिरी मागितली. परंतु नातूस दिवाणगिरी दिली नाही. व याजपासून चाकरी घेणे हेही कबूल केले नाही. त्याजवरुन महाराज छत्रपतीविषयी या नातुचे चित्तांत फार द्वेषाची मनोवृत्ती होऊन त्यांने तरकटी खोलखोल कामे केली. आणखी ऐका, हा दुष्मनी करण्यास कधी विसरावयाचा नाही. असे प्रसिद्ध असता यासच या तरकटाची सरदारी मुंबई गव्हर्नमेंटांनी दिली.

१७. या फितुरी कामाचा पुरावा म्हणून, “कर्नल ओविन्स यांनी” रंगो बापूजी लिहितात; “ खोटे कागद अडतीस खरेदी घेतले आहेत. बाळकोबा केळकर

हा चोरांचा नाईक यास चारशे रूपये देऊन ते घेतले. या कागदांत बहुतेक कागद दोन्ही तर्फे या एका मनुष्यापाशीच आहेत. हे तरकटी एकएकाच मनुष्याने दुतर्फा आपआपल्या हातानींच लिहिले म्हणोन कबूल केले आहे. या पत्राचे सारे लेखक नागो देवराव याचे आप्त कोणी भाचा व पुतण्या व काका व मेहुणे वगैरेच आहेत. मोरो बल्लाळ जोशी व हरी बल्लाळ फाटक हे दोघे बहिणीचे दोन (मुलगे) व हा केळकर बायकोचा भाऊ असा ह्या खोट्या साक्षी जमाव करून घेतल्या. स्पूनअ (Spoona) कलेक्टर रत्नागिरी यांचे पत्र सेक्रेटरी वाथीन मुंबई यास ता. २३ सप्टेबर सन १८३७ पार्लमेंटरी बुक २ पान ६८२ यातील तात्पर्य – मी गव्हर्नर सह कौन्सिलास लिहून कळवितो की, बाळाराम चपराशी निसवत अेक्टिंग रेसिडेंट ओविन्स सातारा, यास सांवताचे वाढीतील सरदारास मजकूर विचारावयास पाठविला होता. त्यास हल्ली हा वकील आम्हांपाशी बोलला की, बाळकोबा केळकर यास माफी करून साफ खुलासा करण्याचा हुकुम देऊन सोडावा, "याप्रमाणे या केळकरास माफीचा साक्षीदार करून वाटेल तो अव्यवस्थित मजकूर लिहून घेतला व तोच पुराव्यास ग्राह्य धरून प्रतापसिंहास पदच्युत केले. ती रंगो बापूजीच्याच शब्दांत खाली देतो.

तारीख ४ सप्टेबर सन १८३९ रोजी रात्री विलायती गोरे टोपीवाले व शिपाई बहुत जमा करून कर्नल ओविन्स यांनी शहरात चालविले. कारण राजवाडा चहूंतर्फे घेरून बंदोबस्ताने जप्ती करून घ्यावा असे त्याच्या मनांत होते. त्यास येण्याजाण्यास रात्रीस कोणतीही बंदी करू नये म्हणोन महाराजानी आपले शहराचे शिपाई लोकांस, ताकीद करून ठेविली होती. त्यासी मारामारी करू नये व रक्ताचा बूंदही जमीनीस सांडू नये म्हणून, महाराजांनी आपली सारे फौज व सरदारापासून हत्यारे घेऊन ठेविले. व शहरांत साऱ्या तोफा दारूने भरल्या होत्या, त्यातील दारूगोळे काढून रिकाम्या करून ठेविल्या, व दारूखान्यांत जेथे दारू ठेविली होती त्या दारूंत पाणी घालून ती भिजवून टाकिली. महाराजांनी कामदारास हुकूम करून राजवाडा उघडा ठेविला. हा ओविन्स शहरांत शिरला तो राजवाड्यांपाशी येऊन आमलदार बरोबर घेऊन महाराजांचे वाड्यातील कचेरीत देवघरापुढे खास खोलीत शिरला. तेव्हा महाराज छत्रपती एकटे आपले बिछान्यावर निद्रिस्थ होते. त्यांने निद्रेच्या वस्त्राने छत्रपतीस राजवाड्याचे पहाऱ्याखाली मोठ्या घाईघाईने चालविले. अर्धा मेणा उघडा ठेवून त्यांत त्यांस घालून साताऱ्यापासून एक जागा सुमारे आठ मैल होती त्या ठिकाणी

पहिल्या दिवशी त्यांस ठेविले. ती जागा (म्हणजे) गाई व गुरे बांधण्याचा गोठा होय. यावेळी महाराजांचे अंग उघडे होते. निजण्याचा चोळणा मात्र पायात होता. त्याशिवाय दुसरे वस्त्र काही नव्हते. रस्त्याने कोणी माणसाने एक शाल आणून महाराजाचे अंगावर टाकिली; हे केवळ जगप्रसिद्ध आहे की, ज्या जागेत राजास ठेविले होते त्या जागेस उंदीर वगैरे दुष्ट जीव पसवादी सारे भरलेले होते. अशा त्या खराब जागेत राजास ठेविले होते. महाराजांस ज्या जागेत राजास कैदेत ठेविले होते, तेथे महाराजांची राणी व कुटुंबाची मनुष्ये मागाहून आली. नंतर महाराजांची कन्या सौभाग्यवती गोजरासाहेबही तेथे आली. तिने हे मोठे भयंकर महान आरिष्ट पाहून ती (खरोखरीच ) गर्भगळीत झाली. (म्हणजे) नऊ महिने पुरे न होता त्या जंगलात ती प्रसूत झाली. महाराज छत्रपती सरकारचे नोकर व रयत लोक सुमारे बाराशे आपले खुषीने महाराजांचे मागे गेले. हल्ली महाराज जेथे कैदेत आहेत, ती जागा साताऱ्या पसून सुमारे 900 मैल दूर आहे. तेथे जाऊन पोहचण्यास राजास पाच महिने लागले. तेथे जात असतां एका मजलीत महाराजांचे चुलत बंधु यांच्या स्त्रीस त्या चालते मजलित प्रसूतकालाच्या वेदना होऊ लागल्या, त्यासमयी महाराज छत्रपतीनी त्या बाईसाठी मुक्काम करण्यास सांगितले. परंतु महाराजांचे सांगणे निष्ठुरपणाने कोणी कबूल केले नाही व ती बाई शेवटी रस्त्यातच प्रसूत जाहली.

दुसरे, दृष्ट कर्म मोठ्या आश्चर्याचे सांगतो. चालल्या मजलीत ओविन्स रेसिडेंट यांनी कित्येक हत्यारबंद शिपायांची टोळी पाठविली. त्या टोळीने महाराजांबरोबर जात असलेल्या बाळासाहेब सेनापतीस आडविले. वोविन्स या हुकूम असा होता की, सेनापतीकडे हजारो पौडांचे देणेदारांचे येणे आहे. तो ऐवज त्याजपाशी मागितला जर सेनापतींनी हा ऐवज न दिला तर या टोळीने त्यास तत्काळ कैद करून माघारे साताऱ्यास आणावे. सेनापतीपाशी जो ऐवज मागितला त्याच्या तिप्पट ऐवज साताऱ्यास (त्यांच्या घरी) होता, परंतु या मागण्याप्रमाणे देणेदाराच्या पुरवणीसाठी या नामदार सरदारांनी आपले कुटुंबापाशी जे काही होते ते व मुलांचे आंगावरील जडजवाहीर व रूप्याची भांडी वगैरे सर्व मागून घेऊन यांच्या हवाली केले. परंतु पहा, पुरे शाबूत खास आहे की, सेनापतींनी कोणाएकाचे काही एक देणे नव्हते. या संकटामुळे व बेदादीवरून हा नामदार मोठा सरदार बहदुर शिपाई कोपाविष्ट होऊन फार लज्जित व दु:खित झाला व त्याच्या शरीररास फार क्लेश झाले. त्यामुळे त्याची प्रकृति बिघडून अति अवस्था

झाली. म्हणून मुक्काम करण्यास पुन्हांही महाराजांनी सांगितले परंतु महाराजांच्या सांगण्याप्रमाणे पुन्हाही मुक्काम करण्याचे दृष्ट कामगाराने कबूल केले नाही. तेव्हा त्या चालते मजलीच्या दिवसाच्या कूचांत शेवटी मुक्कामाचे वेळी जेव्हा पालखी उघडून पाहिली तेव्हा तो सरदार मृत्यू पावला होता व त्याचे प्रेत लांब निर्जीव पडले होते. याप्रमाणे प्रमापसिंहाचे स्वारीची हकीकत आहे.

१८. प्रतापसिंहावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याची गुप्त चौकशी झाली होती. परंतु ती फक्त एकतर्फीच होती. प्रतापसिंहाच्या तर्फेचा पुरावा कमिशनला नको होता. ही गोष्ट जेव्हा स्पष्टपण प्रतापसिंहाच्या लक्षांत आली, तेव्हा त्यांनी आपल्या तर्फेची हकीकत इंग्रज सरकारास कळविण्याची तजवीज केली. कोणाहि युरेपियनाने या साताऱ्याच्या प्रकरणांत मध्यस्ती करू नये, असा मुंबई सरकारने ठरावच करून टाकिला होता की काय न कळे. परंतु प्रतापसिंहाला कोणी योग्य यूरोपीयन वकील मिळेना, ही गोष्ट काही खोटी नाही. अशा बिकट प्रसंगी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजे ज्या वेळी इंग्रजी सत्ता नुकतीच प्रस्थापित झाली होती, त्या वेळी त्या शहाण्या व दूरदर्शी राजाने, " विचार करून दिलांत आणिले की, जे आपण प्रथम आरंभिले होते त्याअन्वये हल्ली वकील लंडनास पाठवले; आणि आपला कच्चा मजकूर तेथे इंग्रजी दरबारांत समजावून चांगला बंदोबस्त करून घ्यावा. सदरहुविशीची खबर रेसिडेंटास कळतांच त्यांनी आपले गव्हर्नमेंटास पत्र लिहून कळविले की महाराजांची मसलत झाली आहे. एक फ्रेंच मुंबईत आहे. त्याच्या हवाली आपले वकील करून देऊन इंग्लिश स्थानांत राहणे करावे. त्या फ्रेंचाचे नाव दिऊलमार. हा ह्या वकीलास मुंबईहून विलायतेस जलमार्गे म्हणजे समुद्रातून जहाजातून नेणार. आणखी पहा फेब्रवारी सन १८३९ सालाचे प्रारंभी (महाराजांचे आप्त येशवंतराव हे मुख्य व इतर) वकील व चाकर दुभाषी सुद्धा असामी आठ हे सारे लोक मुंबईस आले होते. त्यांनी लंडनास येण्याबद्दल जहाजास भाडे साडे पाचशे पौंड पाच हजार रूपये देऊन पावती घेऊन फ्रेंचाच्या तारांतून निघून येण्याची तयारी केली.

१९. या वकीलांनी विलायतेस जाऊ नये म्हणून रेसिडेंटाने नाना युक्तीप्रयुक्ती केल्या. मॅजिस्ट्रेटाकडून त्यास कैदाची भीती दाखविली. धाक दपटशाहा दिला. पण त्याचा काहीं उपयोग झालर नाही. सातारच्या राजास याप्रमाणे परभारे आपले वकील लंडन येथे पाठविता येत नाहींत, असाही एक कायदेशीर बूट मुंबई सरकाराने उपस्थित करून त्यावर आपला प्रतिकूल अभिप्राय नमूद करून

ठेविला. रंगो बापूजी, पृच्छा करितात, मी तुम्हास विचारितो, या लंडनात गव्हर्नमेंटाचे (ब्यूरोक्रसीचे ) धनी किंवा चाकर आहेत, ते सांगा बरे, आणखी पहा, मुख्य मॅजिस्ट्रेट कंपनीचे नोकर, त्याचे हुकूमातील लोक, व ॲडव्होकेट जनरल इंग्रजी लॉयर म्हणजे मुख्य सुप्रीम कोर्टाचे वकील आणि हे मुंबई गव्हर्नमेंटास यथान्याय करून सल्ला देणार. पहा त्याची याद व सेक्रेटरी व ॲक्टिंग सेक्रेटरी हे कंपनीचे नोकर गव्हर्नमेंटास उपदेश करून खुणेने दाखवून अशी जी सूचनापत्रे (ती) गुप्त दाबून ठेवणार. हे कोण लोक म्हणाल तरी समुद्राचे बेट बंदरचे महसूलदार कंपनीचे नोकर. यांच्या या तरकटी कृती तुम्ही पहा. अशा अनेक प्रकारच्या हिकमती करून हरतऱ्हेने राज्याचे वकील लंडनास जातात. त्यास हरकती अटकाव करून जाऊ देऊ नये. हिंदुस्थानात मनुष्ये (पुरूष) सुमारे पंधरा कोटी आहेत. त्या सर्व मनुष्याची तोंडे बांधून त्यांच्या कानात बोळे घालून बहिऱ्या व मुक्या व आंधळ्याप्रमाणे करून ठेवावी. आणि त्यास या मुलखातील काही मजकूर कळू देऊ नये. जोरांनी धमकावून दाबून ठोवण्याविषयी मुंबई गव्हर्नमेंटाची इच्छा आहे. मी या कंपनीच्या गव्हर्नरास साफ विचारतो की, ही पंधरा कोट मनुष्य हिंदुस्थानांत आहेत. ते सारे मालमिळकतसुद्धा या फेरीस गव्हर्नराचे बंदे गुलाम आहेत की काय? असो वकील परदेशी जातात त्यासंबधी मुंबईच्या कौन्सिलांत बरीच भवती न भवती होऊन शेवटी सर्वानुमते असे ठरले की, या सर्व कागदाच्या नकला गुप्त कमिटीत ईस्ट इंडिया कंपनीचे डिरेक्टर्स यांजकडे रवाना करून त्यास लिहून कळवावे की, हे वकील ज्या वेळी लंडनास पोहोचतील तेथे कोर्ट डिरेक्टर्स ब्रिटिश गव्हर्नमेंटानी या लोकांस राज्याचे वकील म्हणून बोलावू नये. आणि यांच्या वकीलाचे कामही कबूल करू नये, म्हणून आपण त्यास विनंती करावी व याप्रमाणे मुंबई सरकाराकडून विलायतेस लिहून गेले.

२०. मागे सांगितल्याप्रमाणे सातारचे राजाचे वकील जहाजांत बसून रवाना होण्याचे पूर्वी फ्रेच यांचे जहाजाचे धन्यानी मुंबई बंदरातून हे जहाज नेण्याबद्दल लोकांची नावानिशी दाखवून, कलेक्टर याजपाशी परवानगी मागितली, तेव्हा कलेक्टर या जहाजाचे टिपेंत वकीलाची नावे पाहून जाण्यास रजा दिली नाही. परंतु हे सातारच्या राजाच्या वकीलांनी या जहाजाचे भाडे देऊन करार ठरला असता कप्तान यास कलेक्टर यांनी जातीने वारंवार सांगितले की, तुमचे जाहजावर जोपावेतो हे वकील आहेत, तोपर्यंत तुम्हास जाण्यास हुकूम होणार

नाही. आणि सरहद्दीचे दस्तकही तुम्हास देणार नाही. कप्तानांनी जाण्याबद्दल रजा मिळण्याविषयी प्रयत्न तितका केला; परंतु गव्हर्नमेंटांनी हे जहाज हिंदुस्थानचे बंदराबाहेर अगदी जाऊ देऊ नये, असा पक्का बंदोबस्त करून हुकूम दिला नाही तेव्हा या फ्रेंच जहाजाच्या धन्यानी या वकीलास जाहजांत न घेता टाकल्याशिवाय दुसरी तोड उरली नाही. त्याचा उपयाय थकला. यास्तव वकीलास सोडून देऊन आपले जहाज त्या बंदरातून घेऊन तो निघून गेला. व वकीलांनी भाड्याचे दिलेले साडे पाचशे पौड ठार बुडाले. रंगो बापूजी बजावीतात, सदरहू जहाजास भाड्याचा ऐवज दिला हा मजकूर मुंबई गव्हर्नमेंटास पुरा माहित होता. या प्रमाणे वकीलास निष्कारण भुर्दंड भरावा लागला. यापुढे रंगो बापूजी कथन करितात, नंतर वकीलांनी लंडनांस येण्याबद्दल दुसरे इंग्रजी जहाज लिव्हरपूलचे बंदरास येणारे त्यास तार देऊन इकडे निघण्याची तयारी केली. या कंपनीचे चाकरांनी या जहाजास अटकाव करण्यास मुंबई गव्हर्नमेंटचे हाती जोर नाही. तेव्हा या जहाजावरून वकील लंडन मुक्कामी पोहोचल्यावर त्यास आपण कृतकृत्य झालो असे वाटले. त्यांची अशी खात्री होती की, हिंदुस्थानांतील इंग्रजी अधिकारी वर्गाच्या सुलतानीची खरी व सप्रमाण हकीकत ईस्ट इंडिया कंपनीचे डिरेक्टरास कळवितांच तत्काळ त्यांची दाद लागून न्यायाच्या धारवाढी काट्याने अपराध्यास शासन होईल. परंतु या वकीलास लंडन येथे यांच्या अगदी उलट अनुभव आला. रंगो बापूजी बोलतात, ईस्ट इंडिया कंपनीचे डिरेक्टर्स यास पेशजी फेरीस ॲक्टिंग गव्हर्नर व मुंबई कौन्सिलदारनीं लिहून पाठविले. त्याप्रमाणे कोर्ट डिरनेटर्स यांनी शिस्त ठेवून या वकीला ओळखिले नाही. इतकेच नव्हे तर त्यांचा धिक्कार केला. तेव्हा वकील थोडे दंग होऊन आश्चर्यचकित झाले. पुढे काही दिवस ते तेथे राहून पुन्हा इन्साफ देण्याविषयी त्यांनी कोर्टास विनंती केली, ती व्यर्थ झाली. तेव्हा सरतेशेवटी लाचारीने सारे वकील परत निघून हिंदुस्तानात गेले, रंगो बापूजी सांगतात, त्यातून नुसता एकटा मी येथे राहिलो आणि बहुत दिवस सहा वर्षे कष्ट, मेहेनत व दुःख सोसून या मुक्कांमी राहून मोठ्या कारागृहाचे दिवस काढले.

२१. हिंदुस्तानाला होमरुल प्राप्त करून घ्यावयाचा असला तर इंग्लिश जनतेची प्रार्थना केली पाहिजे. त्याशिवाय आपली दाद लागणार नाही, अशी जी आज हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांची समजूत आहे, तीच सुमारे पाऊणशें वर्षांपूर्वी इंग्रजी विद्येचा गंध व पाश्चात्य विचारांचा यत्किंचितही संसर्ग नसलेल्या रंगो बापूजींचीही पूर्णपणे होती म्हणून त्यांनी छत्रपती प्रतापसिंहावर गुजरलेल्या

जुलुमाची हकीकत लंडन येथे सुमारे पंचवीस निरनिराळ्या ठिकाणी सभा भरवून जाहीर केली. ही हकीकत जागोजागी बोलण्याबद्दल प्रथम मराठीत लिहून नंतर हिंदूस्थानी भाषेने सांगून इंग्रजी तर्जुमा केला. एवढा द्राविडी प्राणायाम, प्रयत्नामध्ये भगीरथासही विस्मयचकीत करणाऱ्या रंगो बापूजींनी कोणामार्फत करविला, ह्याचा या पुस्तकांत उल्लेख नाही. मात्र त्या भाषणाचेंच मराठी भाषांतर या पुस्तकातील ६५ पृष्ठे व्यापून राहिलें आहे.

२२. वर सांगितल्याप्रमाणे रंगो बापूजीचा क्रम सुरू झाल्यावर अर्थातच लंडन मुक्कामी मोठी चळवळ उडून गेली व शेवटी ता. २ डिसेंबर सन १८४६ रोजी हनोवर, स्काय क्वीन कंसल्ट रुम मुक्काम लंडन येथे मोठी सभा जमवून तिचे पुढे सातारच्या राजाच्या मुकदम्याचा मजकूर जगजाहीर प्रगट करून समजाविला. बूची निसीन सर दिलेसी येवेन्स हे या सभेचे अध्यक्ष होते. या सभेंत पार्लमेंटचेही बरेच मेंबर हजर होते. कंपनीच्या डिरेक्टरांसहि मुद्दाम बोलाविणे केले होते. परंतु ते आले नाहीत.या सभेत रंगो बापूजीचे यापूर्वीचे म्हणणे रोटण या नादांच्या कोणी एका गृहस्थाने समजावून सांगितले. तेच मराठीमध्ये मोडी लिपींत आमच्याजवळील पुस्तकांत दिले आहे. इन्साफ मिळण्याबद्दल रंगो बापूजींनी लंडन मुक्कामी काय काय तजबीजी केल्या त्या त्यांच्याच शब्दांत खाली देतोः-

१. मुंबई गव्हर्नमेंटानी खोटे तर्कटी फितूर राज्याचे जहागीरदार घेण्याबद्दल उभे केले. म्हणून गव्हर्नर जनरल यास लिहून पाठविले. परंतु इनसाफ मिळाला नाही. त्याजवरून छत्रपती सरकारचे आज्ञेप्रमाणे या (लंडन) मुक्कामी मी व माझे दोस्त येऊन प्रथम ऑनरेबल कोर्ट डिरेक्टर्स यांसी बहुत वेळा इन्साफ करण्याविषयी बोललो. परंतु कोर्टांचे उत्तर मुंबई गव्हर्नमेंटानी खरे अगर खोटे केले ते आम्हास कबूल आहे.

२. दुसरे, कंट्रोल यांसी बोललें त्याचे उत्तर, कोर्टाने केले ते फिरावयाचे नाही.

३. तिसरे, प्रीव्ही कौन्सिल येथे काम चालवावे तो वकील बालिस्टर म्हणतात, राजा पादशहा(चा)इन्साफ या कौन्सिलांत चालण्यास मॅजेस्टी क्वीनचा हुकूम पाहिले पाहिजे.

४. चौथे, मॅजेस्टी क्वीन व्हिक्टोरियास अर्जी दिली, परंतु उत्तर नाही. क्वीनची हूकमत पहावी तो मोठें नाव. धनी, सारी हुकमत वजीर बारभाई यांच्या हाती.

५.पांचवे, क्वीन सबजेक्टस व कॅबिनेट कौन्सिल येथे प्रयत्न करून खोटे

फितूराचे पुराव्याचे कागदपत्र दिले, परंतु उत्तर नाही.

६. सहावे, हाऊस ऑफ लॉर्डस् या दरबारात अर्ज्या दिल्या परंतु उत्तर नाही.

७.सातवे, मोठी कुदरत व अदल इनसाफ मागण्याचा दरबार मुख्य पार्लमेंट येथे मोकदमा बोलण्यासमयी चाळीस मेंबरही हजर राहात नाही.

याप्रमाणे ठिकठिकाणी प्रयत्न करून हताश झाल्यावर शेवटी रंगो बापूजी निराशेने उद्‌गार काढतात, येणेप्रमाणे इंग्लिश दरबार हा बाजार दाद न लागे. तेव्हा इंग्लिश प्रांतीचे चालीवरून पाहता सर्वत्र मुलखी लोकांची कुदरत हुकमत पार्लमेंटचे मेंबरावर मोठी. सबब विचार करून पाहता इंग्लिश प्रांती सर्व जनांस सदरहू मुकदम्याचा मजकूर जाहीर करावा असे चित्तांत ठरवून दरबारी लोकांस आधी खबर देऊन पार्लमेंटने मेंबर मि. ह्यूम यांचे मार्फत मुख्य वजीर लॉर्ड जॉन रसूल यासही हकीकत जाहीर केली. परंतु दाद लागली नाही. तेव्हा सदरहू मजकूर ठिकठिकाणी जाहीर सभांतून कळविण्यात आला. आपल्या भाषणात शेवटी रंगो बापूजी इंग्रजी जनतेस विनवितात की, पार्लमेंटात तुमचे वकील मेंबर लोक आहेत ते तुमचे जाग्याचे मसलतदार, तुम्ही सर्वत्रांनी प्रमुख करून दिले म्हणून ते राजसभेमध्ये बसतात. त्यांजवर तुमची हुकमत अशी आहे की, त्यास त्या न्यायाधीशींत राजकीय सभेच्या पदावर वाढवून तुम्ही पार्लमेंटचे मेंबर करून त्या ठिकाणी त्यास चढविले. त्यांनी तुमचे आज्ञेप्रमाणे चालवून न्याय बनावून दाखवावा, असा शिरस्ता आहे. त्याजवरून माझी विनंती तुम्हां सर्वत्रांपाशी आहे की, माझे छत्रपती सरकरचा मुकदमा त्या पार्लमेंटचे दृष्टीपुढें नेण्याविषीची तजवीज करून मेंबर लोकांचा मला आश्रय मिळून पुन्हा चौकशी व्हावी.

२३. सरतेशेवटी पार्लमेंटमध्ये दाद लावून घेण्यासाठी वर सांगितलेल्या सभेंत पन्नास मेंबराची एक कमिटी स्थापन होऊन तिच्या अध्यक्षाच्या जागी जॉन बिलियन चर्च वॉर्डन यांची योजना झाली. परंतू या कमिटींच्या प्रयत्नास पुढे काहीच यश आल्याचे दिसत नाही. कारण महाराज प्रतापसिंह काशीक्षेत्रांत राजपदहीन स्थितींत इंग्रजांच्या बंदीवासांतच मरण पावले. हे प्रसिध्द आहे व प्रतापसिंहाच्या मागे त्यांचे बंधू शहाजी राजे निवर्तल्यावर सातारचें राज्यही खालसा करण्यात आले.

२४. बिलायतेस राहून रंगो बापूजींच्या प्रयत्नांस काही यश आले नाही व पुढे हिंदुस्तानांत आल्यावर त्यांचा कोणीही त्राता न राहिल्याने त्यांना फार हालअपेष्टेंत दिवस कंठावे लागले. परंतु त्यांची पुढची हकीकत फारशी उपलब्ध

नाही. बिलायतेतून परत येताना तेथील मंडळींने त्यास एक चांदीचे तबक नजर केले होते. ते तबक हल्ली भिसोटाईपचे प्रख्यात जनक रा. शंकरराव आबाजी भिसे यांच्याजवळ असून दादरचे कुलकर्णींनी त्याचा फोटोही काढिलेला प्रसिध्द आहे.

रंगो बापूजी हे सातारकर चिटणीसांच्या पदरी होते, व प्रतापसिंहाना गादी मिळवून देण्यात ज्यांनी अत्यंत परिश्रम केले त्यात रंगो बापूजींचे नाव प्रामुख्यत्वे करून आहे. तथापि हा पुरूष दुर्दैवी होता यांत काही संशय नाही. प्रतापसिंहांना गादी मिळाल्यावर सुमारे १० वर्षांनी म्हणजे सन १८३१ मध्ये त्यांना एक लांबलचक अर्ज रंगो बापूजींनी पाठविलेल्या रा. राजवाड्यांच्या १५ व्या खंडात ले.३२३ मध्ये छापिला आहे. यावरून त्यांच्या दीर्घोद्योगाची कल्पना होते, त्या लेखांचे तात्पर्य खालील प्रमाणे आहे.

२५. रंगो बापूजी यांचे लंबक नाव रंगोजी बापूजी रोहिडखोरेकर गुप्ते देशपांडे असे आहे. शेवटच्या बाजीरावाच्या कारकीर्दीत शेवटी शेवटी पुण्यात अलपिस्टन हा इंग्रजांचा वकील होता त्याचे मार्फतींने रंगो बापूजींनी प्रतापसिंहास बंधमुक्त करण्याचे कारस्थान रचिले, इत्यादि प्राथमिक हकीकत देऊन प्रतापसिंहाचे पत्र साहेबास नेऊन देण्यासाठी आपण काय केले त्याची माहिती रंगो बापूजी लिहितात– (महाराजांच्या स्वदस्तूरची चिठ्ठी तात्या नारोळकर यांनी)आणून मजपाशी दिली. ती चिठ्ठी खाली येण्याबद्दल पायास कुतरे चावले असा बहाना करून पायास भोंक पाहून जखम करून रक्त न पुसता व त्यावर चूना लावून काही झाड पाल्यांची पेंड बांधून गोसाव्याचा वेश भेट घेऊन ती चिठ्ठी खाली आणून अलपिस्टन साहेबाकडेस पोचविली. या चाकरीच्या मोबदला रंगो बापूजींचा व महाराजांचा असा करार ठरला होता की, महाराजांस राज्य मिळाल्यावर माझे वंदन ता रोहिडखोरे येथील देशकुलकर्णीचे वगैरे पेशजी जबरदस्तींने सचिवपंत यांनी घेतल तरी या सवलतीस यश आल्यावर माझें वतन मज मिळावे. सचिबपंत जबरदस्त, दिलाज चालत नाही, त्यास आपण हल्ली मनांवर घेऊन वतन देवावे. बरे बोलून वचन दिले.....परंतु हे वचन काही पूर्ण झाले नाही. सदरहू अर्जाच्या शेवटी रंगो बापूजी कळवळून लिहितात.(आज दहा वर्षे महाराजांस राज्य प्राप्त होऊन झाली, परंतु माझी दाद लागत नाही.)मी संकट समयी सेवा केली,परंतु माझा जीर्णोद्वार हल्ली कोणी माझे बोलणे बोलून बंदोबस्त करून देवितील असा भरवंसा वाटत नाही सरकारांनीच कृपा करून बंदोबस्त करून दिल्यास होईल, नाहीपेक्षा दारिद्रयांनी व्यापले आहे, माझी सरकारांत ओळखसुद्धा नाही असे

जाहले आहे. इ. सदरहू पत्र फार मोठे आहे, परंतु अत्यंत हृदयद्रावक आहे वाचकांनी ते मुळांतूनच वाचावे म्हणजे रंगो बापूजींची किंमत त्यांस कळेल. (खंड १५ वा, पृ.३३५, लेखांक ३२३ पाहा.) ज्याप्रमाणे प्रतापसिंह रंगो बापूजीला विसरले होते, त्याचप्रमाणे दुष्यंतही शंकुतलेस विसरला होता म्हणूनच त्यावेळी तिला उद्देशून त्यांने काढिलेले उद्गार प्रारंभी दिले आहे. वर जो वचनाचा उल्लेख झाला आहे त्याची संक्षिप्त हकीकत अशी आहे की, हे वतन रंगो बापूजीचे पूर्वज दादाजी नरसी यास त्यांनी शिवाजी महाराजांस सहाय्य केल्यामुळे इनाम मिळाले होते शिवाय स्वराज्यस्थापनेच्या प्रचंड उद्योगात दादाजी हे इ.स.1645 च्या सुमारास सामील झाले. ही हकीकत विजापूर दरबारात कळताच त्यांना शाहाचे खालील फर्मान झाले होते. ''शिवाजी यास तू सामील झालास'' सिरवली अमीनासीर रुजू राहत नाहीस... त्यास हे नामाकूल गोष्ट तुझे जमेदारीचे इज्जतीस आहे. तरी... अमीनासी रुजू राहणे... हे न झालियास खुदावंद शहा तुजला विजापूरी नेवून गरदन मारतील... हे मनीं समजणें (राजवाडे खंड १५, ले.२६७) या सुलतानी हुकमाची खबर शिवाजी महाराजांस लागताच त्यांनी दादाजीस धीर दिला की, श्री रोहिरेश्वरने... आम्हांस यश दिले व पुढें तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे... रा.दादापंताचे विद्यमाने (नरसी) बाबांचे व तुमचे व आमचें श्रीपासीं इमान झाले ते काय न वज्रप्राय आहे. त्यांत अंतर आम्ही व आमचें वंशज लेकराचे लेकरीं वतन वगैरे चालविण्या विसी कमतर करणार नाही. हे राज्य व्हावे हे श्रीचे मनांत फार आहे... (रा. खं.१५,ले.२६८) सारांश, ज्या थोड्या व्यक्तींनी निधड्या छातींने शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेच्या उद्योगांत मदत केली, त्यांच्यापैकी एका घराण्याचा शेवटचा पुरूष रंगो बापूजी होय. वरील वचनाप्रमाणे दादाजी वतन अनुभवीत असता इ.स.१६८३ मध्ये औरंगजेबानें दक्षिणेवर स्वारी केली. ते वेळी म्हणजे स.१६९० मध्ये दादाजीची काय कथा? मराठ्यांचा मुख्य जो छत्रपती राजाराम हा सुध्दा आपले राज्य सोडून कर्नाटकात पळून गेला होता, इतकी ही औरंगजेबाची स्वारी प्रखर होती. यानंतर लवकरच शंकरजी नारायण सचिव यांनी दादाजींचे वचन वळकाविलें ते पुन्हा केव्हाही पुढे सोडिले नाही, व त्यामुळे दादाजीस पुढे फार विपत्तीत दिवस कंठावे लागले.

२६. संभाजीच्या वधानंतर महाराष्ट्र फार अडचणीत सापडला होता. जो बलिष्ट असे तो बलहीनांना नागवीत असे. बळी तो कान पिळी, हा न्याय

तेव्हा सर्वत्र सुरु झाला होता. इ.स.१६८९ पासून इ.स.१७०० पर्यंत मराठ्यांचे नेतृत्व राजारामाकडे होते. परंतु त्याचेही हुकूम धाब्यावर बसविण्याइतके काही सरदार उन्मत्त झाले होते. जमीनदार व वतनदार लोकांची त्यावेळची दैना फारच हृदयद्रावक होती. जगदाळ्यांचे वतन परत देण्याबद्दल राजारामाची आज्ञा झाली असतांही तिची सुंदर तुकदेवाने प्रथम उपेक्षाच केली. संताजी घोरपड्यांने वतन यादवांस देवविले. हा प्रकार शाहूच्या वेळी झाला. यावरून शाहूनें सुध्दा असल्या सरदारांपुढे हात टेंकले होते असे दिसले.(रा.खं.१५,ले.६०. पान ११०-१११), असा. अशा धामधूमीच्या काळांत दादाजी प्रभूचें वतन सचिवांनी आपल्या ताब्यात घेतले आणि राजारामास असे कळविले की, नरसीबाबास औरस संतती नसल्याने हे वतन आमचा कडेस राहू द्यावे. दादाजी हा खरा औरस पुत्र नसून अफलादीचा वंश आहे.

२७. सचिवांचा वादावरील हा आरोप मिथ्या होता. असला आरोप करण्याचे कारण एवढेंच होते की दादाजी हे दत्तक होते. नरसीप्रभूंनी चार स्त्रिया केल्या, परंतू पुत्र झाला नाही. दादाजी प्रभु हे सहा महिन्यांचे असताना वेलवंड येथे त्यांचे तीर्थरुप भानजीबाबा नवज्वराच्या आजाराने मृत्यू पावले व दुष्टांच्या भयाने दादाजींची मातूश्री या सहा महिन्याच्या अर्भकाला टाकून माहेरी पळून गेली. तेव्हा दुसरे दिवशी इतर लोकांनी या मुलास नरसीबाबाकडेस पोहचून दिले. नरसी व भानजी हे सावजीचे पुत्र असल्यांने व नरसीस संतती नसल्याने त्यांनी दादाजीस म्हणजे आपल्या पुतण्यास दत्तक घेतले. ही दादाजीची मूळ कथा. हा दत्तक कबूल करणे शंकराजी नारायण सचिवास सोयींचे नसले तरी दादाजींने स्वतःच्या शास्त्रोक्त दत्तविधानाबद्दल राजारामासुध्दा सर्वांची खात्री पटवून दिली होती.दादाजींचे वय तीस वर्षांचे झाल्यावर त्याचा विवाह झाला, ही गोष्ट येथे नमूद करून ठेवण्यासारखी आहे. असो. इ.स.१६९० मध्ये दादाजी नसरी आपले वतन सोडून गेल्यावर, या प्रांती रामचंद्रपंत अमात्य व शंकरजी नारायण सचिव यांनी राहुल किल्ले कोटाचा बंदोबस्त केला, तेव्हा वतनावर फिरोन यांचे तरी मार्गांची सुनता नाही बाट चालेना. राज्यात त्यात दुष्काळ पडला. ते समयी कागल प्रांती राहून गुजरान केली. सांगे जेधे देशमुख यांनी संक्रांजीपंत सचिवा जवळून काही द्रव्य घेऊन दादाजींचे वतन जें शंकरजीपंतांनी घेतले ते पुनः केव्हांही परत केले नाही. ही हकीकत राजारामाचा हुकूम आला तो तुम्ही प्रभूंवर बलात्कार करून घरांतून कागद नेले त्यास हाही दादाजी प्रभू हुजूर

आल सर्व कैफियत कळविली. तुम्ही गैरवाका हुजूर विनंती लिहिली. तुम्ही व जेथे व लोहकर वगैरे मिळीन हे वतन नाहक घेतलें... हे तुम्हास उचित नाहीं. तरी या उपरी याचे वतनाचे कागद पत्र नेले त्या सुध्दा परत देवून त्यांचे वतन त्याचकडे चालत असल्याप्रमाणे चालवणें..... यांनी कैलासवासी थोरले राजश्री स्वामीपासी फार शर्तीची चाकरी हरवक्त हुजूर राहून धारका रियात मर्दुमी मोठी धाडसे जिवाची परवा न धरितां केली... पेशजी व हल्ली या जातींने फार मर्दुमक्या करून राज्य मिळवलें. स्वामीकरितां खराब झाले व मारिले गेले. तुम्ही.. आपले.. मनी मोठेपणा वागविता व पाहिजे (तें) करितां.... हे वतन परत देंणे....वतन न दिल्या हा बोभाटा आल्यास तुमचे आबरुस व पदास धक्का येईल. अशी करणी तुम्ही केली. यात स्वामीद्रोहाचेंच करणें... उगीच भलते भरी न भरणे. पुढे उर्जित होय तें करणें हे न केलिया केले कामाची फळें ज्याचे ते भरतील....(खं.१५, पृ.२९४,ले.२८६). या प्रमाणे स्पष्ट हुकूम केला असतांनाही शंकरजीपंताने तिकडे कानाडोळाच केला. दादाजीच्या पश्चात त्याचे चिरंजीव कृष्णाजी व येसाजी यांनाही वतन मिळविण्याच्या प्रयत्नांत यश आले नाही. कृष्णाजी व येसाजी यांस अनुक्रमे रामाजी व चिटको असे पुत्र होते, मागे सांगितलेल्या अर्जांत रंगो बापूजी लिहितात, या वतनानिमित्त रामाजीबाबा माजे आजे पेशवे यांचकडे फिर्याद गेले. तें वेळी (पेशवे) पानपतावर जावयास निघालें. ते काळी त्यांनी सांगितले की तुम्ही बराबर चलावें. ही मसलत जालियावर तुमचें वतन पंताकडून देववू. पुढें (रामाजीबाबा) पानपतावर तिकडेच गर्दीत मारले गले व वाद तसाच राहिला. (राजवाडे खं.१५,ले.३२३).

२८. या प्रमाणें १ दादाजी, २ कृष्णाजी, ३ रामाजी, ४ बापूजी व ५ रंगो अशा पाच पिढ्या वतनासाठी भांडता भांडतां दिवंगत झाल्या. परंतु सचिवांनी वतन काही परत दिले नाही. पाचही पिढ्यांनी अधिक निष्ठेने उत्कृष्ट राजसेवा केली. ही सेवा करण्यात त्यांनी जिवाची मुळींच पर्वा केली नाही. त्यांचे दोन पुरूष पानपतावर गेले होते, एक तेथें पडला, एक परत आला. परंतु दुर्दैवाने त्यासेवेचा मोबदला त्यांनी कधीच मिळाला नाही. या राजनिष्ठ घराण्याची वंशावळ रा. राजवाडे यांच्या १५ ज्या खंडावरून तयार केलेली खाली टिपेंत दिली आहे. भगीरथाच्या तीन पूर्वजांच्या तपश्चर्येंने स्वर्गातील भागीरथी या भूलोकावर आली अशी पौराणिक कथा आहे, परंतु रंगो बापूजी व त्यांचे चार पूर्वज अशा पाच पुरूषांच्या तपश्चर्यंनेही त्यांचे या भूलोकावरील वतन त्यास परत


मिळाले नाही. ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. शिवाजी महाराजांचे साहाय्य करणाऱ्यांच्या वंशजाला पुढे अन्नाण स्थिती यावी, याहून अधिक शोचनीय अशी कोणती गोष्ट आहे?

२९. होऊन गेलेला प्रकार बदलता येऊ नसला तरी प्रस्तुतच्या ऐतिहासिक जागृतीच्या काळात दादाजी नरसी प्रभूपासून रंगो बापूजीपर्यंत ज्या घराण्यांने एक निष्टपणें तनुमनोधनें करून स्वरराष्ट्र सेवा बजावली. त्यांच्या देश बांधवांना या घराण्यांचे नुसतें स्मरण सुध्दा असू नये काय?

Some frail memorial... Implores the passing tribute of a sigh. (Gray's Elegy).

यात म्हटल्याप्रमाणे रंगो बापूजींचे अद्वितीय स्मारक जे त्यांचे पुस्तक त्यांच्या स्मरणानें तरी वाचकांनी या घराण्याबद्दल निदान एकतरी दुःखद्गार काढावा, या आशेंने प्रस्तुतचा चरित्र लेख त्यांस सादर केला आहे.

## वंशवृक्ष




(हेच रंगो बापूजी.)

# 13. इब्राहीमखान गारदी

हिंदू मुसलमानांच्या एकीचें चित्र इब्राहीमखानाच्या चरित्रांत दिसून येते. गारद्यांची पलटण हिंदुस्थानांत प्रथम मूसा बूसींने तयार केली. हा इब्राहीमखानही त्याजवळच तयार झाला. [1] मुजफरखानावर सदाशिवरावाची खफा मर्जी झाल्यावर त्याला प्रतिस्पर्धी म्हणूनच याची नेमणूक करण्यात आली असावी असें वाटते. यापूर्वी इबराहिमखान निजामाच्या नोकरींत होता. [2, 3]

---

*1. सिंदखेडचा संग्राम – पेशव्याने पंचवीस लाखांचा मुलूख सलाबत जंगापासून मागितला, सिंदखेडचा संग्राम डिसेंबर ता. १२ ते १७ स. १७५७ पांच दिवस झाला. त्याच काळात बूसीचा दुसरा एक चेला इब्राहीमखान गारदी निजामाच्या लष्करांत प्रमुख होता. पेशवे चालून येतात तर त्यांसी उघड सामना होता. नरम आणूं अशी हिंमत ही मंडळी धारण करीत होती.*

मराठी रियासत खंड–4, पान–327

तेथे त्यास लाख रुपये दरमहा मिळत होता. सन १७५७ मध्ये पेशव्यांनी निजामावर स्वारी केली. तेव्हा इब्राहीमखान निजामाचे बाजूनेंच पेशव्यांशी लढत होता. ही लढाई संपल्यावरच इब्राहीमखानानें निजामास सोडिलें व पेशव्यांनी त्यास आपल्या नोकरीत ठेवून घेतले असे खालील पत्रावरून दिसते. या लढाईतील तारीख २२-१०/१७५७ चे पत्र सदाशिवराव भाऊने लिहिले आहे तें असे -

''सेवेसीं विज्ञापना. मोगलाच्या लस्करांतून एका गृहस्थांनी सांगोन पाठविलें की, इब्राहीमखान गारदी याने नबाबापासून विडा उचलला आहे की आज खामखाह सडी फौज पे जातो. या प्रमाणे वर्तमान आले आहे. आजच्या रात्री बहुत खबरदार राहिले पाहिजे. पुढे चौक्या गेल्या आ...हि.. ही आपल्या ठिकाणी रात्रीचे खबरदार असावे. आले वर्तमान सेवेशी लिहिले असे. सत्यमिथ्य ईश्वर जाणे. परंतू आपण आपल्या ठिकाणी सावधानी केलिया उत्तमच आहे.[4,5] त्याच्याने तो बाहिर येववत नाहीच. परंतु आपले जागी खबरदार असावें हें उत्तम आहे. सेवेसी शृत होय हे

---

*2. पेशव्याने नवाबास कळविले, पंचवीस लाखांचा मुलूख सरकारांत द्यावा, म्हणजे उत्तर गोदावरीचा प्रदेश हे निजामाने कबूल केल्यास उभयतांनी भेटून सलूख जाहीर करावा, अशी ताकीद पेशव्याने दत्ताजीस दिली. त्यावर पेशव्याचे वकिलाचा जवाब आला की, निजामअली, विठ्ठल सुंदर, इब्राहीमखान यांनी लढाईचाच निश्चय केला. इब्राहीमखानास लाख रूपये दरमहा करून निजामअलीने नोकरीत ठेविले. त्याजपाशी अडीच हजार गारदी व पंचवीस तोफा असा सरंजाम होता.*

मराठी रियासत खंड-4, पान- 328-329

*3. परिच्छिन्न गांठ घालावी असा निजामअलीने संकेत केला. दोन अडीच महिने युद्ध चालले. अश्विन शुद्ध १०, तारीख २२ ऑक्टोबर रोजी बातमी आली की, इब्राहीमखानाने निजामअलीकडून विडा उचलून वचन दिले की आजच्या रात्री खामखा मराठ्यावर चाल करितों जाधवाचे बचावास निजामअली व इब्राहीमखान धावून आले. कार्तिक वद्य चतुर्थीपासून (२ नोव्हेंबर, स. १७५७) मोगलांचे आमचे फौजेचे युद्ध सुरू झाले. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेस (१२ डिसे.) आम्ही मोगलाच्या गंच्यावर तोफा सुरू केल्या, त्या सोसवनाश्या जाहल्या, तेव्हा इब्राहीमखान गाडदी यास निजामअलींनी हुकूम केला, मराठ्यांच्या तोफा सोडविणे इब्राहीमखानांनी आमच्या तोफांवर चालून घेतले.*

मराठी रियासत खंड-4, पान-329-333

विज्ञप्ती.

सय्यद गुलाम हुसेनखान या गृहस्थांनें आपल्या सियर मुताखरीन या ग्रंथात इभराहिमखान गारद्यांचे वर्णन येणें प्रमाणे केलें आहे.

इब्राहीमखान अंगानें अगदी किरकोळ व वर्णांने काळा असून देवीच्या वणांनी त्यांचे तोंड अत्यंत विद्रूप झालेले होते. पांडिचेरी येथे द ब्यूरी नावांचा एक कामगार होता, त्याच्या पालखीपुढें छडी घेवून धावणारा एक लहानसा शिपाई म्हणून इभराहीमखान नोकरीस लागला. त्यास थोडेंसे पोर्तुगीज येत असल्यामुळे काही लष्करी कवाईस माहित होतांच द ब्यूरींने इब्राहीमखानास शिपायांचा नाईक केलें. त्यानंतर लवकरच त्यास फौजेंत अंमलदारी मिळून, त्याच्या हाताखाली दोन हजार पायदळ व दोनशे स्वार जमा झाले. अशा रीतीने फ्रेंच फौजेंत अंमलदारी मिळताच पुष्कळसे इसम स्वतंत्र उद्योग करूं लागत, तद्नंतर इमराहीमखानानें फ्रेचांची नोकरी सोडली आणि निरनिराळ्या दरबारात स्वेच्छेनें शिरकाव करून घेतला.[6] (भाग ३ पृ.३५५)

इब्राहीमखानास पेशव्यांनी आपल्या नोकरीत सन १७५९ मध्ये ठेविले व थोड्याच दिवसांनी सदाशिवराव भाऊंने उत्तरकडेस अबदालीवर स्वारी केली. या स्वारीत भाऊबरोबर इब्राहीमखान आपल्या तोफखान्यासुध्दा होता. मराठ्यांना मुसलमान लोक तेव्हा गनीम असे म्हणत व त्यामुळे मराठेही स्वतःला गनीम याच संज्ञेंने संबोधीत असत. गनीमी काव्याने लढण्यात मराठ्यांची प्रसिध्दी असल्याने तोफखान्यासारखे अवजड सामान सहसा बरोबर फिरवीत नसत. शत्रू बेसावध

---

*4. इब्राहीमखान गारदी निजाम अलीपाशी नोकरीस होता. सलाबतजंगाने सन १७५९ त . सलाबत जंगास कारभारावरून काढून निजामअलीस त्या जागी नेमिले. त्यावेळी सलाबतजंगाने निजामअलीस अट घातली की, तुम्ही इब्राहीमखान नोकरीतून दूर करावे, तरच तुमचे हातून कारभार घेऊ, निजामअलीस ही अट मान्य करणे भाग पडले. ता. ४ जुलै, सन १७५९ च्या पत्रांत पेशाव्यास वर्तमान आले.*

मराठी रियासत खंड-4, पान-341

*6. पेशव्याच्या पूजेची सोन्याची भांडी देव मुसलमानांनी लांबविले तो स्वतः घोड्याच्या उघड्या पाठीवर बसून निसटला, या प्रसंगात बूसीचे गार्दी चेले मुजफ्फरखान व इब्राहीमखान त्याजबरोबर होते. हा प्रसंग २० किंवा २१ नोव्हेंबर १७५१ चा होता.*

मराठी रियासत खंड-4, पान-314

असेपर्यंत त्यावर हल्ला चढवुन त्याची दाणादाण करणे व त्याच्या गोटांत लूटपाट करणे हे मराठ्यांचे गनीमी शुद्ध शत्रू सावध होऊन लढाईस सज्ज झाला की ही गनीमांची फौज पळून जावयाची. इब्राहीमखानाला भाऊने बरोबर घेतलें तेव्हा त्या उभयतातंत पुढीलप्रमाणे संभाषण झाल्याचा उल्लेख भाऊसाहेबांच्या बखरीत आहे.

इब्राहीमखान गारदी यास समागमे घेतले ते वेळेस इब्राहीमखान गारदी यांने भाऊसाहेबांस जाबसाल केला की, तुम्ही गनीम लोक दहावेळ पळा व दहावेळ उभे राहाल. आम्ही गारदी लोक केवळ पाय उतारे, आम्हांस पळावयास पाय नाहीत आणि गांठ तों रोहिल्याची पडणार. त्याची आज्ञा काय, हे समयीं भाऊसाहेब यांनी इ मन दिले की, निदान प्रसंग पडला तरी तुम्हांस सोडून निघणार नाही. तुझी गाडून उभे रहाल तेथे, मीही उभा राहीन. यास अंतर करणार नाही. म्हणोन बेल

*5. निजामअली, विठ्ठल सुंदर, इब्राहीमखान यांचे अत्यंत रहस्य होते. रोज खलबते, नाच, मेजवान्या वगैरे चालत. इब्राहीमखानाच्या लेकीची शादी जाली. त्यास सलाबतजंग, निजामअली वगैरेंनी हजर गौरव केला. हा प्रकार ता. १८ ऑगस्ट, सन १७५९ च्या पत्रात वर्णिलेला आहे. यानंतर ता. ९ ऑक्टोबर, सन १७५९ रोजी इब्राहीमखानांस निजामअलीने नोकरीतून दूर केले. इब्राहीमखानाचे देण्याचा हिशेब केला. तीन लाख रूपये बाकी निघाले. महमूदखान गारदी आला आहे त्यास नोकर ठेवणार तथापि इब्राहीमखानाची समजूत करून त्यास पुनः जवळ आणण्याचा निजामअलीचा विचार होता. पुढे पानिपतच्या स्वारीत निघतांना गारद्यांची संख्या वाढवून बारा हजार केली. निजामाकडून फुटून पेशव्याचे नोकरींत आला असे भाऊसाहेंबांचे पत्रांत आहे. इब्राहीमखानाचे हाताखाली खुद्द फ्रेंच लोक नव्हते, इब्राहीमखान नोकरीत घेतला म्हणजे मुजफ्फरखानास काढून टाकला असे समजण्याचे कारण नव्हते, पण मुजफ्फरखानास तसें वाटले यांत नवल नाही. सदाशिवरावास ही बातमी समजतांच त्यांने लगोलग केशवराव पानंशाचे मार्फत इब्राहीमखानाशी ठराव करून त्यास आपले नोकरीत घेतले. इब्राहीमखान निजामाअलीकडून तुटला, सरकारांत आला असा मजकूर ता. ११/११/१७५९ च्या पत्रांत आहे. ता. ५/११ रोजी इब्राहीमखानशी भाऊसाहेबाची बोली झाल्याचा उल्लेख आढळतो. मिळून ऑक्टोबर स. १७५९ त. इब्राहीमखान निजामी नोकरी सोडून पेशव्याने नोकरीत आला हे सिद्ध आहे.*

मराठी रियासत खंड-4, पान-341

भांडार दिला. त्याजपासून साजुक रोटी आपण घेतली आणि कूच केले. या प्रमाणे इब्राहीमखान आणि भाऊसाहेब यांची आणभाक झाली. या वेळी दहा हजार गारदी इब्राहीमखानचे हातखाली होते व शंभर तोफांचा तोफखाना होता. अशा तयारीनिशी भाऊसाहेबांची स्वारी अहमदशहा आबदालीवर चालून गेली.

भाऊसाहेबांनी स्वारी उत्तरेकडे बऱ्हाणपूर, सिराज, खेचीवाडा, ग्वाल्हेर, मथुरा, दिल्ली या मार्गाने गेली. दिल्ली काबीज केल्यावर अबदालीवर चालून जावयाचे, परंतु त्यावेळी मराठ्यांच्या दुर्दैवाने अबदाली यमुनेच्या पलीकडील तीरावर होता. यमुनेला त्यावेळी फार मोठा पूर आला असल्याने मराठे आणि गिलचे यापैकी कोणी कोणावर चालून जाणें शक्य नव्हते. अर्थात यमुनेचा उतार होईपर्यंत भाऊसाहेबांस दिल्लीतच बसून राहणे आवश्यक होते. परंतू दिल्ली काबीज झाल्यानंतर भाऊसाहेबांसारख्या कार्यक्षम पुरूष निष्कारण वेळ गमावित बसणें मुळींच शक्य नव्हते. म्हणून पुढे कुंजपुऱ्यावर चालून जाण्याचे भाऊसाहेबांनी ठरविले. कुंजपुऱ्यावर मराठ्यांनी चालून जाऊ नये, असे ते वेळी सूरजमल जाट वगैरेचे म्हणणे होतें पण या म्हणण्याला संयुक्तिक असें कारण कोणासच न सांगता आल्याने अर्थातच तें सदाशिवराव भाऊस पटले नाही. त्यांनी एकदम कुंजपुऱ्यावर चाल केली.[7] सर्वांच्या पुढे शिंदे, होळकर यांना रवाना करून मागाहून स्वतः भाऊसाहेब व इब्राहीमखान निघाले यांचा मुक्काम कुंजपुऱ्यांजवळ गेला तेव्हा त्यांना गिलचाकडील काही पत्रें वाटेंत मिळाली त्या पत्रांवरून असें दिसलें की, कुंजपुऱ्यांत कुतुबशहा आणि शहामतखान कझलबाश असे दोघे आडकले आहेत, त्यास लवकरच म्हणजे एक दोन दिवसांत अहमदशहा अबदाली कुमक पाठविणार आहे. ही खबर भाऊसाहेबास मिळतांच सदाशिवरावाने निकड करून इब्राहीमखान गारदी मागें सहा कोसावर होता त्याजला जलदीने स्वार पागेचे पाठविले की पत्र पावतांच स्वार होऊन येणें, आम्हीही कुंजपुऱ्यास पोचलों. ते दिवशी रात्र झाली. दुसरे दिवशी सर्वत्रांस ताकीद करून किल्ल्यावर हल्ला केला. इब्राहीमखान

---

*7. मराठे कुंजपुऱ्यावर गेल्याचे ऐकून अब्दालीने कांही फौज यमूनापूर्वतीराने तिकडे रवाना केली, आणि अब्दुस्समदखानास कळविले, मदत येईपर्यंत कसाबसा टिकाव धराहे अब्दालीचे पत्र सहजगत्या मराठ्यांचे हाती लागले त्याबरोबर त्वरा करून कुंजपुऱ्यावर इब्राहिमखानाच्या तोफांनी जोराचा मारा देवविला आणि तीन टोळ्यांनी तिहीकडून चढाई केली, त्या वेळी लढाई निकराची झाली.*

मराठी रियासत खंड-4, पान-599

रातोरात कूच करून प्रातःकाळीच दाखल झाले. परभारें येऊन किल्ल्यास झगटला. श्रीमंतांनी इभरामखान यास सांगोन पाठविले की, मुहूर्तास तीन घटका अवकाश आहे तूर्त न उठावें. त्यांणे सांगोन पाठविले की, मुहूर्त कशास पाहिजे? आम्ही किल्ला फत्ते करितों आणि हुजूर येतों. साहेबी धीर धरून एक प्रहर बसावें. परंतु याणी ऐकिलें नाही. सर्वत्रांस ताकीद देवून हल्ल्यास उठले. किल्ला फत्ते झाला. या वेळची इब्राहीमखानाची कामगिरी मोठी लक्षात ठेवण्यासारखी आहे. किल्ल्यातील लोकांस अहंमदशहा अबदालीकडून लवकरच मदत येणार होती. मराठ्यांनी किल्ला सर केला तेव्हां बाहेर दोन चार कोसावर अहंमदशहाची फौज येऊनही ठेपली होती. तत्कालीन समजुतीप्रमाणे भाऊसाहेबांने हल्ल्यास मुहूर्त ठरविला होता व तो तीन घटकांनी लागणार होता. अर्थांत किल्ल्यातील फौजेस व कुमक आलेल्या फौजेसही तीन घटका तयारी करण्यास मुहूर्ताच्या नादी इब्राहीमखान लागला असता तर मिळाल्या असत्या. परंतु ही मुहूर्ताची दुर्बुद्धी भाऊसाहेबाप्रमाणे इब्राहीमखानाला सुचली नाही. इतकेच नव्हे पण त्याने मुहूर्तांसाठी खोळंबून बसण्याच्या सूचनेला धुडकावून दिले आणि लगेहात किल्ल्यावर हल्ला चढवून दिला आणि म्हणूनच बाहेरची मदत येण्यापूर्वीच किल्ला मिळाला. सदाशिवराव भाऊने या मुहूर्तांच्या नादी लागून पानितपच्या संग्रामांत मराठ्यांच्या तयारीस अपयश दिले. 'दुर्दैवी रंगूत'. नानासाहेब वैद्यांनी लिहिले आहे. परंतू हा त्यांचा तर्क असल्यांने संशयास्पद आहे. कारण सदाशिवरायाची एकंदर कामाची तडफ पाहतां तो मुहूर्तांसाठी अडून बसणारा वीर नसावा असे वाटतें. या उत्तरेकडेच्या स्वारीसाठी सुध्दा तो मुहूर्ताची वाट पाहत बसला नाही. स्वारीस मुहूर्त पाहतां ही बऱ्याच लांबच्या निघाल्यांने दररोज असणाऱ्या शिवालिखिताच्या मुहूर्तावरच त्यानें कूच केले हें प्रसिध्द आहे. कसेंही असो, बखरींत तरी कुंजपुऱ्यासंबंधाने वरील हकीकत दिली आहे. असो.

या प्रमाणे कुंजपुरा हस्तगत करून यमुना ओलांडून अबदालीवर जाण्याचा भाऊसाहेबांचा विचार होता. परंतु इतक्यांत अबदालीच यमुना उतरून अलीकडच्या तीरास आल्याची बातमी भाऊस मिळाली, तेव्हा मराठे परत फिरले आणि त्यांनी पानपतावर मुक्काम केला.[४]

या प्रमाणे पानपतावर मुक्काम झाल्यावर तीन युद्धें मोठी झाली. त्यावेळी इब्राहीमखानानें चांगलाच पराक्रम केला. परंतु पानपतावरील दीर्घकालिक मुक्काम अखेर मराठयांस फारच भोंवला. सैन्यात दाणावैरण मिळानासें झाले. मनुष्ये व जनावरें खाण्यापिण्यावाचून पटापट मरू लागली. तेव्हा शेवटी या संकटांतून कसें

पार पडून जावें याचा विचार सर्व सरदारांसमवेत त्यांनी केला. त्यांत असें ठरले की, दिल्लीच्या रोखे आपण कूच करून निघून जावे. परंतु अबदालीची फौजमध्ये वाटेत असता तिच्या अंगावरून जाणें शक्य नाही असें मल्हारराव होळकरादिकांचे म्हणणें पडले. तेव्हा शेवटी कसेही झाले तरी निघून जावेंच. या प्रमाणे मनसबा ठरवून इब्राहीमखान गारदी यास बोलावूं पाठविले. यासही हा विचार पुसला तों इब्राहीमखान गारदी याने जाबसाल केला की, भाऊसाहेब तुम्ही जे समयीं इकडे यावयाची मसलत केली ते समयीं तुमचें आमचें ईमान प्रमाण जाहलें तेच करार आहे. आमचें गैर इमान असतें आमचें इमान प्रमाण जाहलें तेंच करार आहे. आमचे गैर इमान असतें तरी आम्ही आजपर्यंत येथें तुझ्यांपाशी न ठरतों. तुम्हांस मिथ्या भासेल तरी प्रचीत दाखवितों. म्हणोन बोलोन दुर्राणी व नजीबखान रोहिला व सुजाउद्दौला यांची पत्रे पंचवीस दाखविले की, तुम्ही आम्ही एकजात आहों. या समयीं आम्हांकडे यांचे म्हणजे तुम्हांस पंचवीस लक्षांचा मुलूख देऊ.[9] पातशाही उमरावी देतों. म्हणोन पत्रें दाखविली. प्रवीष्ट केली. भाऊसाहेबांनी वाचून पाहिली तेव्हा इब्राहीमखान गारदी याची निखालसता देखिली. उत्तर लिहिले की, तुमचे आमचे इमान आहे. तेच करार (शाबूद) आहे. परंतु आता दिल्लीस जाऊन पोंचावयाची

---

*8. यापेक्षा कुंजपुऱ्यावरच यमूना उतरून तो पलीकडून अब्दालीस शह देता तर चालले असते, पण तो मार्ग उरला नाही. भाऊसाहेबा बरोबर बायका व बिनलढाऊ संख्या मोठी असून त्यांचे संरक्षण करणे अपरिहार्य झाले. हा बोजा अंगावर नसता तर त्याच वेळी अब्दालीवर घुसून मराठे दिल्लीकडे जाऊ शकले नसते. अशा स्थितीत इब्राहीमखानाच्या सल्ल्याने पानिपत गांब पाठीशी घेऊन पूर्वपश्चिम सहा मैल लांब व दक्षिणोत्तर दोन मैल रूंद अशा मैदानावर तंबू ठोकून छावणी बनविली ता. १ नोव्हेंबर स.१७६० पासून ता. १४ जानेवारी पर्यंत अडीच महिने भाऊसाहेब बचावाच्या छावणींत कोंडून बसला. त्या समयी आणखी कित्येक शहाणे तार्किक होते त्यांनी मसलत दिली की दिल्लीस जाऊन पोंचावे म्हणजे बचाव होईल. त्यावरून इब्राहीमखानास विचारले, त्यांने मसलत सांगितली, तुम्ही गोल बांधून चालला तर निभावणी करून देईन हे ऐकून तोच मनसबा प्रधान करून दिल्लीचे रोखे परत राहिले, तो दुर्राणीची गांठ पडली. निघून जाण्याची हिंमत राहिली, तेव्हा शोध करता खंदक होता त्याजवर तोफो ठेवून राहिले. तोंडावर इब्राहिमखान गारदी राहिला.*

मराठी रियासत खंड-4, पान-604

मसलत कोणती करावी? निभावणी कशी होईल? याची मसलत काय? या प्रमाणे पुसतांच इब्राहीमखाम गारदी यांने उत्तर दिले की, तुम्ही गनीम लोक, तुम्हांस हिंमत पुरवणार नाही. तुम्ही आम्हांस घेऊन आलां ते काही निभावणी करावयाची दिसत नाही. रणांत आम्हास सोडून जाल. आम्हांस मात्र मृत्यूनें गांठिले, हेच खरें, असे ऐकून मागती भाऊसाहेब दुसरे ईमान दिले की, तुम्हास सोडून आम्ही कदापि जाणार नाही. तुझी जेथे उडी टाकून उभे रहाल तेंथे आम्हीही कत्तल होऊन जाऊ. परंतु रण सोडून जावू हे घडणार नाही. म्हणोन ईमान प्रमाण दिले. तेव्हा इब्राहीमखान यांने निखालसता मसलत दिली की, हरमते दिल्लीस पोंचावे हे खरेंच आहे. आता जावयास उपाय सांगणे त्या रीतीने तर अवघेच पार पडून जावू. याची मसलत एक आहे की, देतो मोगल निजामअल्ली नवाब तुह्याशी लढाई हमेशा करितो, याच प्रमाणे गोल बांधून मध्ये बुणगे घालावे व भोंवताला आरावा वाटून द्यावा, चहूंकडे चार सरदार मातबर देऊन जिकडील तिकडे बाजवा वाटून घ्यावा आणि कोस दोन कोस लढत भांडत दिल्लीस जावून पोंचावे. ही इब्राहिमखानाची मसलत सर्वांत पसंत पडली.[10] या मसलती प्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी खास आपण व विश्वासराव अंबारीत स्वार झाले. सौभाग्यवती पार्वतीबाई व नाना फडणवीस यांची मातोश्री व स्त्री एका अंधारित पार्वतीबाईचे नजीक होती. आणि तोफखाना (ब) इबराहिमखान गारदी (पुढे) उजावे माणूस शिंदे होळकर होते. डावे बाजूस दमाजी गायकवाड व यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर व विठ्ठलराव शिवदेव व समशेर बहाद्दर व आणखी लहान थोर पथके डावे बाजूस होते. मध्ये खाशे

---

*9. ता. ७ डिसेंबरास नजीबखानानें अब्दाली हुकमाविरूद्ध एकदम मराठ्यांवर चाल केली. त्या दिवशी मराठे आपल्या तोफा छावणीच्या पुढे बाहेर आणून .काही नवीन रचना करीत होते. ते पाहून नजीबखानाला वाटेल, ही संधी बरी आली आहे. त्यांने चालून येऊन मराठ्यांना मागे रेटीत थेट खंदकापर्यंत आणिले, ते पाहून मराठे चंहूकडून चवताळून उठले इब्राहीमखान व बळवंतराव मेहेदंळे यांनी असा सडकून मार दिला की, तीन हजारावर राहिले भरून पडले आणि उरले सुरले जीव घेऊन आपल्या छावणीत परत गेले. या प्रसंगात भाऊसाहेबाचा मुख्य सेनानायक बळवंतराव मेहेदळे निघड्या छातीने घोड्यावर बसून सर्वांपुढे लोकांस उत्तेजन देत असतां एकदम छातीत गोळी लागून ठार झाला, त्यामुळे या विजयाची किंमत बुडाली.*

मराठी रियासत खंड-4, पान-613

व हुजरात होती. किती एक पथके पिछाडीस बुणगे मध्ये घालून होते. याप्रमाणे मराठ्यांचे लष्कर दिल्लीस जाण्यासाठी आपला तळ सोडून निघाले. ही बातमी अबदालीस पोहताच तोही आपली फौज तयार करून युध्दासाठी सिध्द होऊन उभा राहिला. अबदालीची ही तयारी पाहताच दिल्लीस निघून जाण्याचा पूर्वीचा बेत भाऊसाहेबांनी एकदम सोडून दिला व अबदालीशीं लढाई देण्याचे ठरविले.[11] रात्री मनसबा केला होता तो राहिला आणि पुढे होणार विनाशकाली विपरीत बुध्दी निर्माण झाली. ते समयीं सर्वत्रांस सांगून आराबा अवघा मागे टाकून निशाणें सोडून, फौजा पुढे चालिल्या. तेव्हा फौजा जमून नव्हती. मुजऱ्यास आरसा धरावा तैसा फरा बांधोन उभी राहिली. तेसमयीं इब्राहीमखान गारदी यांने हे पाहून चित्तांत विचारणा केली की, रात्रौ भाऊसाहेब यांनी मनसवा केला काय? आणि कर्तव्य हे केले काय? असो. आदी मसलतीस धक्का पुरता बसला. उपाय अवघाच राहिला. भाऊसाहेबांच्या बोलण्याची शाश्वती पुरती समजली. असो आम्ही भाऊसाहेब यास ईमान दिले आहे. त्यापेक्षा आता मागे पुढे पहावे तरी आपले पूर्वजास बोल लागेल. भाऊसाहेब जे करतील, त्यास सादर न होता गत्यंतर नाही. दैवी असेल तसे घडेल. परंतु रणात विन्मुख व्हावयाचें नाही. असो आपले आयुष्यांची सीमा होऊन शंभर वर्षे आताच पूर्ण भरली, हे खरें आता आपले बळे घालावी कास, कोणाची न धरावी आस तैसे घडले इब्राहीमखान गारदी याने आराबा सोडून तोही डावे बाजूसआला या नंतर लढाईस तोंड लागून इब्राहीमखानाच्या तोफ खान्याने नावाजण्यासारखी कामगिरी केली. त्याच्या तोफांच्या माऱ्यांत अबदालीच्या फौजेचा चक्काचूर होवून गेला. नजीबखान, बरखुरदार खान इत्यादी नामांकित योद्ध्यांचीही त्यांने त्रेधा उडवून दिली गिलचाची एवढी मोठी कबाज

---

*10. इब्राहीमखानाच्या तोफांचा प्रभावही लोकांच्या नजरेस आला. विश्वासरावास पुढे करून भाऊसाहेबांने किल्ल्यांत प्रवेश केला आणि तेथील वस्तुलाताचा कबजा घेतला. या राजधानीच्या दर्शनाने भाऊसाहेबास धन्याता वाटली. इब्राहिमखान मल्हारराव, जनकोजी, दमाजी गायकवाड, समशेर बहाद्दर, यशवंतराव पवार, इत्यादिकांसमवेत त्यांने सर्वा किल्ला व जागा फिरून पाहिल्या, दरबार भरवून त्यांने सर्वांकडून विश्वासरावस नजरा करविल्या. द्रव्यही मिळाले. नारोशंकरास राजेबहादूर किताब देऊन दिल्लीचा बंदोबस्त सांगितला हाताखाली मीरखान टोके व पाच हजार फौज ठेविली.*

मराठी रियासत खंड-4, पान-586

फौज परंतू ती ही हा मारा सहन करीना, इब्राहीमखानाने याप्रमाणे पराक्रम करून गिलचाच्या फौजेस मागें फिरविले तेव्हा इब्राहीमखान गारदी यावर खासा दुर्राणी व रोहिला यांनी चालून घेतले. यांची एक रंजक उडालीर. तिकडील(गिलचांकडील) लोक बहुत पडले. परंतु जाग्यावरून हालले नाहीत. तैसेच नेट धरून मारीत आले आणि इब्राहीमखान गारदी याजवरी चालोन आले. इब्राहीमखान गारदी याजवरील पडले. यावेळी दमाजी गायकवाडांने इभराहिमखानाची कुमक फार उत्तम प्रकारे केली. या प्रमाणे लढाई मोठ्या रंगांत आली. विठ्ठल शिवदेव, अंताजी माणकेश्वर, मल्हारराव होळकर, जनकोजी व तुकोजी शिंदे, यशवंतराव पवार हे सगळे वीर एकदाच चोहोंकडून उठले. इकडे हुजरातीने व इब्राहीमखान गारदी याने कडनिकड करू एक वेळ त्यास (गिलचांस) मोडून त्यांचे जाग्यापावेतों तुडवीत तुडवीत नेलें. तेव्हा गिलचांकडूनही बरखुरदारखान, अमीर बेगखान, दुंदेखान रोहिला, हाफीज रहमतखा, शहा पसंदखान, नजीबखान राहिला, अहंमद खान बंगश, वजीर शहावल्लीखान ही मंडळी मराठ्यांवर चालून आली. यावेळी मराठ्यांनी आपल्या पराक्रमांची शिकस्त केली.[12] परंतु फौज जमून नाही. यास्तव सर्वांचेच उपाय हरले. पोवार यांचे मुंडमोचन करून इभराहिमखान गारदी याजवर तोंड लागले. (इभराहिमखानानें) जिवाचा निधडा करून शिपायगिरी म्हणावी तैशी केली. कित्येक गारदी कामास आले. परंतु कुमक कोणाची झाली नाही. मग एके क्षणांत पाच हजार गारदी ठार झाले. होते की नव्हते असे केले. हुजरातीचे जवळच लोक पळों

---

*11. बुधवार पौष शु. ८, ता. १४ जानेवारीस पानिपताच्या मैदानावर मराठे–अब्दालीचा जो शेवटचा प्रचंड संग्राम झाला. मराठ्यांकडे बाण होते तसे अब्दालीकडे नव्हते, पण घोड्यांस भिवविण्यापलीकडे हे बाण तितके मारक होत नसत. इब्राहीमखानाची आठ हजार शिपायांची गोळ्या लहान असून झपाझप सूटत नसत. अब्दालीला मुख्य भीती इब्राहिमखानाच्या तोफांवी वाटे. म्हणूनच त्यानें मराठा छावणीवर अखेरपावेतो हल्ला केला नाही.*

मराठी रियासत खंड–4, पान–622

*12. " मारामारी होता होता भारी खणाखणी झाली. रावसाहेबांचे वर्तमान ऐकून जनकोजी शिंदे व मुकूंदजी शिंदे यांनी मोठी मर्दुमकी करून मारामरी करीत भाऊसाहेबापाशी आले, तो इब्राहीमखान गारदी यांजवर झूट पडली.*

मराठी रियासत खंड–4, पान–629

लागले. तोफखाना बंद झाला. जातीनिशी शिकस्त त्यांणे (इब्राहीमखानानें) पुरती केली. जाऊन गिलचाच्या लष्करांत मिसळला आणि दहा पाच नामांकित सरदार मारून ठार केले. भोंवताला वेढा गिलच्या पडला. अंगावरी जखमा चढल्या. दुर्राणी पळोन गेले होते, ते माघारे आले. गारदी यांचे मुडद्याचे ढीग पडले.[13] इब्राहीमखान गारदी याचा पुत्र  भाचा होता तो ठार झाला. खासा इब्राहीमखान गारदीही रणांत घायाळ झाला. असें असता लढतच होता. यत्न चालेना तेव्हा हत्यार राहिले. मग धरून गेला... जाग्यावरच इब्राहीमखान गारदी होता की नव्हता असे जाहले. [14]

बहुतेक मराठे योध्दे या पानपतच्या युध्दांत नामोहरम झाले.[15] दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव, मल्हारराव होळकर, अंताजी माणकेश्वर, महादजी शिंदे, असली धेंडे पानपतावरून पळून गेली. हे सरदार पेशव्यांच्या जिवास जीव देणारे म्हणून प्रसिध्द होते. पण ही त्यांची प्रसिध्दी यावेळी चांगली कसोटीस लागली. इब्राहीमखानानें मात्र आपले ईमान शेवटपर्यंत शाबूद ठेविले. सर्वांचा मोड झाल्यावर तुकोजी शिंद्याचा व सदाशिवराव भाऊचा पुढील संवाद बखरींत वर्णिला आहे. तेव्हा तुकोजी शिंदे म्हणो लागले की, महाराज क्षात्र धर्माची शर्थ जाली. चोहीकडून आभाळ फाटले. या उपरी निघावें यात उत्तम आहे. तेव्हा भाऊसाहेबांनी उत्तर केले की, तुकोजीबाबा, आता कोणीकडे जावे? काय तोंड नानासाहेबांस दाखवावें? रावसाहेबांची (विश्वासरावाची) गत काय झाली ती पाहावी आणि इब्रामखान गारदी यास ईमान दिले ते काय? असे ऐकून मागती तुकोजी शिंदे वाणी उत्तर केले की, भाऊसाहेब तुम्हीं वाचंला तरी अवघ्यांचा सूड घ्याल. नाही तर तुमचे मागे जडव्याच गोष्टी आटोपल्या. असे ऐकून भाऊसाहेब बोलले

---

*13. पाच सहा तास मेहनत झाली. तोंडांत पाणी घालण्यास सवड नाही. अशा दमल्या भागल्या स्थितींत अब्दालीनें आपला राखीव कझलबाश रिसाला मराठ्यांवर सोडला, तेव्हा एकदम धीर सुटून त्यांचा पळ सुरू झाला. इब्राहीमखानानें आरंभी शिकस्त करून शत्रुंचा फन्न उडविला, पण शत्रूस ताजी कुमक येऊन तो सांपडला जनकोजी शिंदे असाच जिवंत पकडला गेला.*

मराठी रियासत खंड-4, पान-631

*14. इब्राहिमखानाचा भाऊ फत्तेखान गाडदी याने कांही हाततोफा ओढीत नेऊन रात्री अब्दालीच्या छावणीवर छापा घातला, पण त्यास अफगाणांनी परत हाकलून दिले.*

मराठी रियासत खंड-4, पान-612

की, पुणियात नाना साहेबांस तोंड काय म्हणोन दाखवावे? निघावे अशी गोष्ट घडणार नाही. रणाचे ठायी ईश्वरसत्तेकरून जे घडणार असेल ते घडेल. परंतु कदापि नामोहोरम व्हावयाचे नाही. व सदाशिवराव भाऊने हा आपला शब्द कायम ठेवून शेवटी खरा करून दाखविला. ज्याप्रमाणे इब्राहिमखानानें आपले वचन पाठले. त्याचप्रमाणे सदाशिवरावानेंही आपले वचन अक्षरशः पाळिले. व्यक्तीशः का होईना पण हिंदू मुसलमानांची एकी पाळा म्हणावे.

यानंतर दोन चार रोजांनी दुर्राणीही मागे इकडे दिल्लीस पोचला. तेव्हा इब्राहिमखान गारदी रणांत घायाळ त्यांजकडे सापडला होता. त्यास आपणांकडेस चाकरीस राहावे म्हणोन बदली घातली. परंतु त्यास चाकरीस राहावयाचे अनुकूल पडलें नाही. भाऊसाहेब यांचे व आमचे वचनाचे ईमान प्रमाण झाले आहे. यास्तव अशी गोष्ट आपणांकडून कदापि घडणार नाही, ह्यणोन साफच जाबसाल केला.

इब्राहीमखान गारदीयाची माहिती भाऊसाहेबांच्या बखरीच्या आधाराने जेवढी मिळाली तेवढी वर सादर केली आहे व तीही विशेषतः बखरीच्या शब्दात दिलेले आहे. या वीर पुरूषांचा अंत पुढे फारच वाईट रीतीने झाला. कारण अबदालींने त्याचा तात्काल शिरच्छेद केला.

या पानपताच्या युद्धांत सदाशिवरावाचा अनेक चुका झाल्या आहेत. मराठ्यांनी

---

*15. इब्राहीमखान व जनकोजी यांचे अंत विशेष कठोर बनले जनकोजी घायाळ स्थितींत बरखुरदारखानाचे हातांत सांपडला. खानाने त्यास आपले मुक्कामावर नेऊन जखमांचे उपचार चालविले आणि पुढे दंड वगैरेचा विचार सुटकेसाठी करणार तो नजीबखानाने खानाविरूद्ध प्रमुख कैदी लपवून ठेवल्याची तक्रार अब्दालीकडे केली. त्यावरून खानाचे तंबूचा झाडा घेण्याचा शहाने हुकूम केला. त्याबरोबर बरखुरदारखानाने आपली माणसे लगोलग पुढे पाठवून जनकोजीस ठार करून पुरून टाकले, मागमूस राहू दिला नाही. इब्राहीमखानाचा तर शाहाने शिरच्छेदच केला. पानिपतासारख्या एखाद्या प्रचंड सग्रामात असेल तर क्रूर प्रकारे घडले नाहीत तरच नवल भाऊसाहेब, विश्वासराव, जनकोजी शिंदे, यशवंतराव पवार, इब्राहिमखान गारदी, शिवाय त्याचा पुत्र व मेहुणा संताजी वादा, मनाजी वायगुडे, तुकाजी शिंदे खंडेराव निंबाळकर सोनाजी भापकर, नारायण बापुजी रेठरेकर, दादजी दरेकर इत्यादी तरूणा कर्ते पुरूष रणांगणावर लढून मृत्यू पावले.*

मराठी रियासत खंड-4, पान-632

उत्तरेत कुंजपुऱ्यापर्यंत जाणें, दिल्लीचे तक्त फोडणे, पानपतावर दोन तीन महिने तळ देऊन पडून राहणे, युध्दाच्या पूर्वरात्री सुजाउदौल्यास सहाबद्दल चिठ्ठी पाठविणे, शिलकी फौज मुळींच न ठेविणे, गोल बांधून निघून जाण्याचा पूर्वरात्रीचा विचार अगदी ऐन वेळी बदलणे, विश्वासराव पडल्यावर स्वतः बेहोश होणे, सर्वांशीच अत्यंत उद्दामपणानं वांगणे, युद्धांत बरोबर बायका ठेविणें अशा अनेक चुकांचा परिणाम मराठ्यांच्या पराजयांत झाला. इब्राहीमखानने मराठ्यांच्या छावणीभोवती जो खंदक खणला होता तो खणू नये असे मल्हारराव वादिकांचे म्हणणे होते. व इब्राहीमखानाच्या सल्ल्याने भाऊसाहेब वागत असून त्यांनी हा खंदक खणला ही इतर चुकाबरोबरच आणखी एक मोठी चुकी असे कित्येक म्हणतात परंतु हे त्यांचे म्हणणे बरोबर आहे, असे वाटत नाही. कारण मल्हारराव होळकर आणि इब्राहीमखान गारदी याच्या युध्दपध्दती अगदी भिन्न होत्या. मल्हारराव हा गनीमी काव्याच्या पध्दतीचा पुरस्कर्ता असून इब्राहीमखान हा कवाइती पध्दतीचा अभिमानी होता. पानपतच्या शेवटच्या संग्रामापूर्वी अबदालींने मराठ्यांशी दोन तीन सामने केले. त्या प्रत्येक वेळी अंताजी माणकेश्वर व शिंदे होळकर यांचा सर्वांचा मोड झालेला आहे. अर्थात गनीमी काव्याच्या पध्दतीने अबदाली जेरीस येणे शक्य नव्हते. हे सदाशिवराव भाऊ पूर्णपणे समजून चुकला होता. कारण गनीमी काव्यात दौड करण्याचे सामर्थ्य अधिक असावयास पाहिले असतें. हे सामर्थ्य मल्हाररावात जरी काहीसें होते तरी दुर्राणीच्या फौजेत हे त्याच्यापेक्षा अधिक होते. पळता पळता मराठे थकत असत परंतु गिलचे थकत नव्हते. नसत हा अनुभव आलेला होता. त्याचप्रमाणे इब्राहीमखानाच्या तोफखान्याचा प्रभाव सदाशिवरावांने अगदी शेवटी सुध्दा कुंजपुऱ्यांवर पाहिला होता. तेव्हा अबदालींशी झगडण्याच्या मसलतींत त्यांने इब्राहीमखानाच्या मसलतीस जर प्राधान्य दिले असले तर त्यात काही त्यांची चूक झाली होती असे म्हणता येणार नाही. आता हा असा खंदक खणल्यामुळे पुढें हजारो माणसें त्या खंदकांत पडून मेली हे जरी खरे असले तरी त्याचा दोष इब्राहीमखानाकडेस न येता ऐनवेळी ठरलेली मसलत बदलल्यामुळे सदाशिरावाकडेसच येतो. इतकेही करून होळकरासारख्या मातबर सरदारांनी जर रणांतून पळ काढला नसता व इब्राहीमखानाप्रमाणे सरून जाण्याचा निश्चय केला असता तर त्या युध्दांत अबदालीस यश आलेच असते असे म्हणवत नाही. आता ऐनवेळी बदललेला हुकूम यास कळला नसेल व हाणून हे पुढे दिल्लीच्या रोखे निघून गेले असतील असे कोणी म्हणेल पण सदाशिवराव, विश्वासराव आणि

जरी पटका हे तर त्यात तेथे दिसत होते ना? मग या सर्वांना सोडून त्यांनी निघून जावे असे कसे उचित म्हणता येईल? तात्पर्य हे पळून गेले हेच सर्वांहून फार वाईट झाले या सर्वांहून मोठी अशी मराठ्यांची चुकी म्हणजे ते पळून गेले हीच होय. इब्राहीमखानाच्या तोफखान्याच्या माऱ्यापुढे पहिल्या प्रथम दुराणीची फौजही अशीच पळून जाऊ लागली. तेव्हा स्वतः अहमदशहाने तिची कत्तल करण्याचा हुकूम दिला व कित्येकाची कत्तल केली. हेच उदाहरण होळकरासारख्यांनी यावेळी गिरवून दाखविणे हे त्यांचे कर्तव्य होते. कसेही असो, गोड होऊन गेली तिला आता काही इलाज नाही पण इब्राहीमखानाने काही आपलें इमान सोडिले नाही हे मात्र लक्षात ठेवण्यासारखे आहे आणि म्हणून त्याची योग्यता पळून आलेल्या सरदारांपेक्षा अधिक ठरले.

# १४. सखाराम हरि.

## जन्म इ.स.१७२०. मृत्यू इ.स. १७७९

१) सखाराम हरि हा चांद्रसेनीय कायस्थ प्रभू यांचे आडनाव गुप्ते हे होय. हा शूर, करारी व बाणेदार पुरूष असून राघोबारील व्यक्तिनिष्ट प्रेमामुळे याचे हे सर्व सद्‌गुण जवळ जवळ वाया गेले.[1] याचा वडील भाऊ बाबुराव हरि हा पहिल्या बाजीरावाच्या पदरी होता. सन १७३५ मध्ये बाजीरावाने जजीऱ्यावर स्वारी केली तेव्हा बाबुराव हरि व सखाराम हरि असे उभयता बंधू आपआपल्या सरंजामासह सैन्याबरोबर होते. यावेळी सखाराम हरिंचे वय लहानच म्हणजे पंधरा सोळा वर्षांचे होते. अर्थात त्याचा जन्म सन १७२० च्या सुमाराचा असावा असे वाटते. या स्वारीत सखारामाचे शौर्य बाजीरावांच्या नजरेत भरले. कारण त्याने सीदीचे फौजीवर जोराचा हल्ला करून सीदी रहेमान ज्या हत्तीवर बसला होता तोच हत्ती हस्तगत करून वळवून आणला. अशा लहान वयात एवढा पराक्रम केलेला पाहून

---

*1. बाबुराव हरि, सखाराम हरि व महिपतराव चिटणीस यांनी शिपाईगिरी बहुत केली. मुख्य लढाई हुजरातीने केली.*

मराठी रियासत खंड-5, पान-65

बाजीरावांने खूष होऊन तो जिंकून आणलेलाच हत्ती सखारामास बक्षीस दिला व बाराशे स्वाराचे पथक नेमून दिले. या प्रमाणे सखाराम स्वतः स्वतंत्र सरजामी सरदार झाल्यामुळें पुढील बहुतेक मुलुखगिरीत याचा पराक्रम आढळतो. सन १७३८ साली बाजीरावाने निजामावर केलेल्या स्वारीत सखाराम हजर होता व गनीमी काव्यांने त्याने निजामास त्यावेळी आणिले. यावेळी सखारामाने दाखविलेल्या युद्ध कौशल्याने बाजीरावास फार समाधान वाटले व त्याने त्यास फौजेची बक्षीगिरी, सरदारीच्या बंदोबस्ताचा सरंजाम व कारभार असे तीन अधिकार करून दिले. या वेळेपासूनच सखाराम हरिचा व रघुनाथराव दादाचा स्नेह जमला.

किंबहुना सखाराम हरि म्हणजे राघोबाचाच सरदार असे सर्व समजू लागले. बाजीरावाच्या पश्चात नानासाहेब पेशवेपद प्राप्त झाले.

नानासाहेबांच्या कारकीर्दीतही सखारामाने राघोबाबरोबर सर्व स्वाऱ्यात हजर राहून पराक्रम गाजिवलेला आहे. सखाराम हरिच्या चढत्या पराक्रमावर नानासाहेबही खूश झाला व त्याने त्यास सन १७४५ मध्ये खर्चाच्या नेमणुकीस खाजगी सरंजामसुध्दा सालीना तीन लक्ष रुपये रोकड व सहा लक्षाच्या वरती देण्याचा ठराव केला. सरंजाम हा सरदाराच्या फौजेसाठी असून वराती सरकारी फौज सरदाराच्या हाताखाली देऊन तिच्या खर्चासाठी दिलेल्या असतात. सन १७४५ पासून ज्या अर्थी दर साल सहा लक्षांच्या वरती होण्याचा हुकूम आहे त्या अर्थी लहानशा फौजेचा सखाराम हरि हा सेनापती म्हणूनच नेमीला गेला असे दिसते.

२) सन १७४९ पासून अहमदशहा अबदालीच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊ लागल्या. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नानासाहेबांने राघोबास सन १७५८ मध्ये अबदालीवर पाठिवले. या वेळी सखाराम हरि राघोबा बरोबर होता. राघोबा फौजेची जमावाजमव करून आपल्यावर चालून येत आहे, असे कळताच अबदाली स्वदेशास परत निघून गेला. परंतु त्यांचे जिंकलेले मुलुखाच्या बंदोबस्तासाठी मोठी फौज मागे ठेविली होती. राघोबाने या फौजवर चालू करून तिचा अगदी धुव्वा उडवून दला व अटकेपार मराठ्यांचा झेंडा रोवला. यावेळी बिनीवर म्हणजे आघाडीवर बाबूराव हरि व सखाराम हरि स्वत: आपल्या फौजेसह असून त्यांनीच अबदालीच्या फौजेचा अटकेपार पाठलाग केला होता हे त्यांचे शौर्य पाहून

दिल्लीच्या बादशहाने त्यास पुण्याजवळील मुशेखोऱ्यातील आंबेगावकर हे नाव प्रसिध्द झाले. ही आंबेगावची सनद या उभयतां बंधूच्या नावही आहे. या उभयंता बंधूंनी शौर्याने कमविलेल्या गावांच्या नावावरून प्राप्त झालेले आडनांव ज्या गुप्त्यांच्या वंशजास आज आहे. त्यांनी आंबगाव हरतऱ्हेने आपणांकडेच जतन करून ठेवणे त्यास भूषणावह होय. आज (१९२५) या गावांपैकी बहुतेक भाग सावकारांकडेच गहाण ठेवून कायमचा त्याच्या ताब्यात जाणाऱ्या तयारीत आहे व खरोखरच जर तो कायमचा गेला तर मग आंबेगावकर हे पोकळ नांव लावण्यात काहीच अर्थ उरणार नाही. तर मग आंबेगांवकर हे पोकळ नाव लावण्यात काहीच अर्थ उरणार नाही.

३. पेशव्यांची फौज उत्तरेकडे आली की अबदाली स्वदेशास निघून जात असे आणि ती परत फिरली की तो पुन: हिंदुस्थानांत परत येई हा अबदालीचा क्रम सतत बारा वर्षे चालला होता. सन १७६० मध्ये सदाशिवराव असाच मोठ्या फौजफाट्यासह अबदालीवर चालून गेला. त्यावेळी राघोबा व सदाशिवराव यांच्यात काही बेवनाव झाला होता. स्वारीवर जाताना सदाशिवरावाने राघोबाजवळ सखाराम हरिची मागणी केली पण राघोबाने ती मान्य केली नाही.

४. थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीच्या आरंभी राघोबाने बरीच बंडाळी सुरू केली होती. परंतु पुढे लवकरच या काका पुतण्यांचे सख्य झाले. सन १७६३ चे सुमारास मोरोबा फडणवीस, सदाशिव रामचंद्र,भवानराव प्रतिनिधी आणि गोपाळराव पटवर्धन अशी सर्व मंडळी रघुनाथराव दादा साहेब यांचे विरुध्द होऊन हैदराबादचे निजामास जाऊन मिळाली. तथापि दादासाहेब यांनी सखाराम हरि वगैरे आपले प्रामाणिक सरदारांवर पूर्ण भरवसा ठेऊन निजामावर स्वारी केली. त्यावेळी दादासाहेब यांनी निजामाच्या सैन्याचा पुष्कळ वेळा मोड केला. परंतु एका प्रसंगी तर दादासाहेबांवर असा प्रसंग गुदरला की, ते आपल्या सैन्यापासून अगदी वेगळे पडले आणि शत्रूने त्यास एकाकी घेरले. अशा भयंकर प्रसंगातून ते मोठ्या सुदैवाने (व थोरल्या माधवरावाच्या चातुर्याने) सुटले. त्यावेळी त्याचे जवळ मात्र त्यांचे शूर विश्वासू व जीवप्रिय सखाराम हरिच होते. यावेळी दादासाहेबांनी सखाराम हरिचे फारच उपकार मानले आणि त्यांचे स्वत:चे अंमलात करून दिला. सखाराम हरिवर दादासाहेबांनी मेहेरबानी

दिवसेदिवस अशी वाढत चालली. तरी थोरल्या माधवरावांनी पेशवाईंची सूत्रे हाती घेतल्यावर सखाराम हरिंने त्यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या बहादुरीच्या स्वाऱ्या शिकाऱ्या केल्याचा उल्लेख आहे. हैदराच्या अचाट पराक्रमामुळे त्याचा सर्वत्र दरारा बसला होता. कवाईती कंपू व गनीमी काव्या या दोन्ही युध्दपध्दतीत तो मोठा निष्णात होता त्याचे शौर्य व धाडस शिवाजी महाराजांप्रमाणे अद्वितीय होते. त्याची कल्पकता व दूरदृष्टी त्या वेळच्या इंग्रजांसही चकीत करीत असे. सारांश अशा पराक्रमी हैदर नाइकाची खोड थोरल्या माधवरावाने गोपाळराव पटवर्धन, त्रिबंकरावा मामा, सखाराम हरि, मुरारराव घोरपडे अशा अत्यंत शूर सरदारांच्या साहाय्याने पूर्णपणे मोडिली. हैदरावरील मोहीम सुरू असताना गोपाळराव पटवर्धन जलोदराच्या विकारांने मृत्यू पावला व परशुराम भाऊही  छावणीस कंटाळून पळून येण्याचा विचार करीत होता. अशा भयंकर हैदरखानाची बिनी पहिल्या धडाक्यात सखाराम हरिने लुटली. हैदरखानाजवळ चाळीस पन्नास हजार स्वार, शे दोनशे तोफा, पाच सात कवाइती कंपू असे साहित्य नेहमी जय्यत असे. रात्रीच्या वेळी मोठ मोठ्या मजला मारून पहाटेच्या तो मराठ्यांच्या गोटावर अचानक येऊन घाला घालीत असे. सारांश हैदराच्या स्वारीला सगळे मराठी लष्कर कंटाळून गेले होते. परंतु सखाराम हरिने अशाही स्थितीत हैदरावर छापे घालण्यास व त्यास जर्जर करण्यास कमी केले नाही. या वेळचे एक पत्र सुंदर असल्याने येथे देतो हे पत्र तारीख ३ मार्च १७७१ सालचे म्हणचे  हैदरावरील तिसऱ्या स्वारींतील आहे. राजश्री सखाराम हरि बातमीस मेलकोटेकडे गेले होते(त्यांनी) थेट हैदरखानाच्या लष्करापर्यंत जाऊन काही  लुटली. उंटे व तट्टे व पाच सात हजार बकरी वळवून गोटाच्या आसपास कोसाच्या अंतो माल्यास पासोड्या बांधोन मातबर फौज आली अशी दिखाई देऊन आनंदराव तोफखाने व भवानजी जाधव यास वाट तीट पाहावयास पाठविले. चैत्रगिरीस आघाडीस, पश्चिमेस मेलकोटा, येणे प्रमाणे हैदर उतरला आहे. तोंडाशी झाडी मात्र थोडी थोडी आहे. डावे उजवे बाजूस मैदान मातबर आहे. सखाराम हरि यांजबरोबर फौज मातवर असती तर काम पोक्ते झाले असतें. बातमीस तीनशे राऊतासहीत गेल्यासारखे त्यांनी काम असल्यास करून माघारे नाग मंगलास येऊन गाव मारून तलफ करून मनस्वी लुटले. हैदरखानाच्या

गोटांत नगारे होऊन गडबड झाली. एक दोनही तोफांचे वार झाले. तेथे राहिल्यास निभाव नाहींसा पाहून माघारे चार पाच कोस बेळुरास आले. यांत अवघ्या तीनशे स्वारानिधी सखाराम हरिने हैदीरचा गोट लुटल्याची हकीकत आहे ती त्यांच्या अत्यंत शूरत्वाची निदर्शक आहे. सखाराम हरि जरी रघुनाथरावाचा सरदार होता तरी थोरल्या माधवरावाच्या अंतापर्यंत स्वराज्याच्या नोकरींत अगर मुलूखगिरीत त्यांने यत्किंचितही दुर्लक्ष केलेले दिसत नाही, हे यावरून व सखाराम हरिच्या यावेळच्या इतर पराक्रमावरून दिसतें. [2, 3]

५. इकडे गुजराथप्रांती बडोद्याचे गादीबद्दल गोविंदराव गायकवाड व फत्तेसिंगराव गायकवाड व उभयतांचा बखेडा चालत होता.त्याबद्दल त्या उभयतांपैकी गादीचा अधिकार कोणास मिळावा एतद्विषयी पुणे मुक्कांमी पेशवे सरकारांत विचार चालला होता. तेथे विचारांअंती असे समजले की, दमाजीराव गायकवाड यांचे थोरले चिरंजीव सयाजीराव गायकवाड यांस दमाजीचे पश्चात फत्तेसिंगराव यास मुतालिकीचा अधिकार मिळाला पुढे सयाजीराव वारल्यानंतर त्यांचे पश्चात फत्तेसिंगराव गादी बळकावून बसले. अशा प्रकारे व्यवस्था चालत असता दरम्यान गोविंदराव गायकवाड हे

---

२. ***( परस्परांचे डावपेच)*** *– सखाराम हरिच्या या अद्भुत पराक्रमाची हकीकत अजरामर बनली आहे. लगेच नागमंडळास जाऊन तें ठाणें त्यानें लुटून फस्त केले. ही बातमी हैदरास कळताच त्याने त्याचा प्रतिकार करण्याची शिकस्त केली. त्याला चुकवून सखाराम हरि विद्युत गतीने बेलुरास पोचला आणि हैदराच्या हालचालींची बातमी पेठ्यास पोचवून त्यास त्वरेने मेलकोट्यावर बोलाविले. दरम्यान वामनराव पटवर्धनाने हैदरची कटी मारून अनेक घोडे, उंट व बैल पळविले.सखाराम हरिचा निरोप येताच दुमकुराहून मामाने आपला मुक्काम हलविला व तो हैब्बूरला आला.*

मराठी रियासत खंड–5, पान–103

३. ***(मोती तलावाची लढाई)*** *– तेव्हा मराठ्यांनी त्याचे तीनशे घोडे पकडले. मात्र या झटापटीत  तीस चाळीस घोडे हैदरने काबीज केले. त्याचे ५०–१०० लोक जखमी अगर मृत झाले व सखाराम हरिच्या डोळ्यात जखम लागली.*

मराठी रियासत खंड–5, पान–105

पुणे मुक्कामी आपण स्वत:श्रीमंताचे साधन ठेवून राहात असे. तेथे सखाराम हरि यांचे राज्यांत तेज जास्ती पाहून त्यांची भेट घेऊन त्यांशी त्यांही स्नेह केला. एका प्रसंगी गोविंदराव गायकवाड सखाराम हरिस म्हणाले की, आपला व माझा स्नेह फारच व या राज्यांत आपले तेज व मान्यता विशेष म्हणून आपणास सांगण्याचे की, आम्ही त्रिवर्गबंधू त्यांत माझी मातुश्री श्रेष्ठ आणि सयाजीराव व फत्तेसिंगराव यांची मातोश्री कनिष्ठ तेव्हा गादीचा अधिकार कोणाचा हे उघडच दिसते. आता सयाजीराव यास गादीचा अधिकार मिळाला होता. त्याचे कार एवढेंच की, त्यावेळी मी फार अल्पवयी व अज्ञान होतो, परंतु आता फत्तेसिंगराव यास म्हणजे कनिष्ठेच्या वंशास गादीचा अधिकार असणे हे कसे? या प्रसंगी तुम्हाशिवाय दुसरा कोणाचा वसीला नाही तर ह्याबद्दल सरकारांत यथार्थ न्याय होण्यासाठी आपण श्रम घेऊन तजबीज करावी. तेव्हा सखाराम हरि यांनी उत्तर दिले की, माझ्याकडून होईल तितका मी प्रयत्न करतो. या गोष्टीस बरेच दिवस लोटल्यावर सखाराम हरि श्रीमंताजवळ सहज बोलत बसले असता म्हणाले की, एक पुरूषास दोन स्त्रिया, त्यात प्रथम स्त्रिचा मुलगा वयाने लहान व दुसरीचा मोठा, तेव्हा विशेष अधिकार कोणाचा ह्या प्रमाणे विनंती केल्यावरून श्रीमंत पेशवे सरकार व दादासाहेब पेशवे या उभयताही सखाराम हरिस विचारले की, असा प्रकार कोठे आहे. त्यावर सखाराम हरि यांनी गोविंदराव गायकवाड व फत्तेसिंगराव गायकवाड या उभयतांची हकीकत निवेदन केली. तेव्हा श्रीमंतांनी रामशास्त्री प्रभृती विद्वान मंडळींना बोलावून सभा जमवली. तीत सर्वांनुमते असे ठरले की, प्रथम स्त्रीचे पुत्रास अधिकार असावा हें वर्तमान फत्तेसिंगराव यांचे वकीलास कळल्यावर त्यांने बडोद्यास लिहून कळिवले की, गोविंदरावबाबांस पदाधिकारी करून श्रीमंत माधवराव साहेब यांनी त्यांस वस्त्रे देण्याचे ठरविले. या कामात सखाराम हरि यांची बहुत प्रकारे मदत केली. तशात श्रीमंतांची त्यावर पूर्ण कृपा असून त्यांचा भरवसाही सरकारास विशेष आहे. तेव्हा त्यांचे बोलणे न फिरती त्यांनी केलेले काम नि:संशय सिध्दीस जाईल, असे पूर्णपणे दिसले. अशा प्रकारचे पत्र पाहून फत्तेसिंगराव गायकवाड यांनी सखाराम हरिस मोठ्या आदराने पत्र लिहिले की, जसा आपला व गोविंदरावबाबा यांचा स्नेह त्याचप्रमाणे माझा व आपला असे मी समजतो. मी आपणास अगदी अंतर देणार नाही.

आपल्यास दरबार खर्चाबद्दल २,००,००० दोन लक्ष रुपये व स्नेहाचे नात्याने ५,००,००० पाच लक्षाची चिठ्ठी व सिनोर महाल वंशपरंपरे करून देतो. परंतु गोविंदरावबाबांचा पक्ष स्वीकारून आमचे अगदीच विरुद्ध होइल असे करू नये. अशा मजकुराचे पत्र बडोद्याहून त्यांचे पुण्यातील वकीलास आले, ते त्याने सखाराम हरिस वाचून दाखिवले. पत्रातील सर्व मजकूर एकाग्रतेने ऐकून सखाराम हरि वकीलास म्हणाले, मी द्रव्य लोभी नाही. मजला न्यायावर लक्ष देऊन चालले पाहिजे. सरकारांत मी कधीही अप्राणपणे वागण्याचा व बोलण्याचा मार्ग ठेविला नाही. गोविंदरावबाबा हे ज्येष्ठ स्त्रीचे पुत्र होत. तेव्हा त्याचा गादीचा अधिकार यथार्थ आहे. तशात तुम्ही माझे काय बिघडले. अथवा तुमचा माझा काही कारणावरुन द्वेष आहे असेही नाही. मी हो तुम्हास स्नेहाप्रमाणेच मानतो. परंतु मी श्रीमंतास विनंती करून रामशास्त्री वगैरे विद्वान मंडळीची सभा भरविली. तीत जो शास्त्रार्थ ठरला त्यांत माझा निरुपाय आहे. असे बोलल्यावर वकील मुकाट्याने घरी जाऊन फत्तेसिंगराव गायकवाड यांस सदरहू मजकुराचे पत्र लिहिले त्यांचे उत्तर आले की, आपले दरबारची व सर्व संस्थानकांची प्रसिध्द चाल आहे की, सरकारास नजराणा देऊन आपला अर्थ साध्य करून घ्यावा. त्याप्रमाणे श्रीमंतास नवगिरी महाल नजराणा कबूल करून रोकडही पाच पन्नास लक्ष रुपये कबूल करावेत आणि सखाराम हरिसही सिनोर व तेलाडी महालांची जहागिरी देण्याचे कबूल करावें. अशा मजकुरांचे पत्र पुणे मुक्कामी वकीलास पावताच त्याने ते घेऊन सखाराम हरिकडे नेऊन त्यास त्यातील इत्यंभूत मजकूर विदित केला. तो ऐकिल्यानंतर सखाराम हरि त्यास रागावून म्हणाले की, द्रव्यलोभाने मी तुमचे ऐकेन असे कधीही होणार नाही.गोविंदराव ज्येष्ठ स्त्रीचे पुत्र, तेव्हा त्यांचाच अधिकार. हाच न्याय. बाकी त्यापासून मजला मोठा अर्थ प्राप्त होणे असे मुळीच नाही. त्याचा अधिकार यथार्थ असून त्यांचे वय अल्प व ते द्रव्यहीन असल्याकारणाने ते सर्वथैव संकटांत आहेत. म्हणूनच मजला त्याचा कळवळा येऊन त्याचविषयी श्रींमताजवळ विनंती केली आणि सरकारांनी योग्य न्यायाकडे लक्ष देऊन त्यास अधिकार देण्याचे ठरविले. अशा प्रकारे निष्पक्षपताचे व योग्य उत्तर मिळाल्यामुळे त्या वकीलाचा निरुपाय झाला व तो निमूटपणे परत आपल्या मुक्कामास गेला. इकडे गोविंदराव गायकवाड व

सखाराम हरि या उभयतांचा दिवसेंदिवस इतका स्नेह जडत चालला की, केव्हा केव्हा गोविंदराव गायकवाड काही संकटात आहे असे पाहून यांनी सावकार लोकांची खात्री करून त्यांच्याकडून त्यांना खर्चासही कर्जाऊ पैसे देत असत व सखाराम हरि व गोविंदराव गायकवाड यांचे वाडे फार जवळ व समोरासमोर असल्यामुळे दोघांच्या परस्परांशी वारंवार भेटी होत असत. अशा प्रकारे त्या उभयतांचा स्नेह वाढत चालला. काही पदार्थ भोजनात गोड लागला की, सखाराम हरिंने तो गोविंदराव गायकवाड सखाराम हरिस म्हणाले की, मी आता कोठपर्यत अशा तऱ्हेने दिवस काढावेत? तेव्हा सखाराम हरि यांनी पुन्हा श्रीमंतास विनंती करून गोविंदराव गायकवाड यास बडोद्याचे गादीची वस्त्रे दिली आणि श्रीमंताच्या आज्ञेने आपण स्वत: आपला सरंजाम व सरकारी हुजूरांतीतले पाच सात हजार लोक बरोबर घेऊन मोठया थाटाने गोविंदराव गायकवाड यांच्याबरोबर बडोद्यास आले. इकडे फत्तेसिंगरावही बडोद्याची गादी बळकावून बसलेले होते, त्यास सखाराम हरि यांनी सांगून पाठविले की, गोविंदराव गायकवाड यास गादीचा अधिकार सोंपवून तुम्ही मुतालिकीचा कारभार पाहावा, अशी सरकार आज्ञा आहे. ही गोष्ट फत्तेसिंगराव यांनी जुमानली नाही. त्यास वाटले की, आपण प्रत्यक्ष अधिकार संपन्न आहोत, ते सर्व देशात प्रसिध्द आहेच. असे असता अधिकार घालवून प्रस्तुत मृत्युतुल्य होणे त्यापेक्षा सामना करणे बरें असा निश्चय करून त्यांनी सखाराम हरिस सामना करण्याचा निरोप पाठविला. हा निरोप सखाराम हरिस कळताच त्यांन लढाईची तयारी केली. पुढे त्या उभयपक्षांचे मोठे युध्द झाले. त्या युध्दात सखाराम हरि सर्वांचे पुढारी असल्याकारणाने त्यास बऱ्याच जखमा झाल्या. परंतु शेवटी त्यांचा जय

---

*4. **(दादांच्या कैदेची सक्ती)** – परंतु दादा अटकेत असल्यामुळे त्याची भेट होण्यास मुश्कील पडू लागली. तेव्हा दादाचे पक्षपाती सखाराम हरि वगैरे नारायणरावावर रुष्ट असलेले पाहून त्यांची भेट व्यंकटराव व लक्ष्मणराव त्यांनी घेतली आणि काही तरी युक्ती योजून दादास बंदीतून सोडविण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला.*

मराठी रियासत खंड–5, पान–310

*5. सखाराम हरि, चिंतो विठ्ठल, गंगाधर यशवंत, विसाजीपंत लेले, आबाजी महादेव सोहोनी यांची कारस्थाने पुण्यात खेळू लागली.*

मराठी रियासत खंड–5, पान–111

होऊन गोविंदराव गायकवाड यास गादीचा अधिकार प्राप्त करविला आणि श्रीमंतांची आज्ञा शेवटास नेली. त्याप्रमाणे सखाराम हरिचे आपणावर उपकार फार झाले त्याबद्दल त्यास स्नेहाच्या नात्याने तरी काही द्यावे असे जाणून त्यांनी त्याच वेळेस म्हणजे सन १७७२ साली २०,००० वीस हजारांची पाच गावे जहागीर करून दिली आणि म्हणाले की, एवढ्यानेच मी तुमचे उपकार फेडले असे नाही. आपण मजवर जे जे उपकार केले व अनेक प्रसंगी मदत केली, त्याचकडे पाहतां देणे तर काहीच नाही. एवढेच काय परंतु मी माझे शरीरातील प्राण जरी तुम्हास दिले तरी तेही थोडेच. परंतु एवढेच की, मजकडून आदर स्मरणार्थ तुम्हास काही तरी असावे, असे म्हणून २०,००० वीस हजारांच्या उत्पन्नाच्या पाच गावांची सनद करून दिली आणि श्रीमंतास फौजेच्या खर्चाबद्दल व नजराण्याबद्दल २००,००० दोन लक्ष रुपये पाठविले. बडोद्यास चहूकडे शांतता झाल्यावर व अशा प्रकारची व्यवस्था झाल्यावर व अशा प्रकारची व्यवस्था झाल्यावर सखाराम हरि पुण्यास गेले. तेथे श्रीमंताची भेट घेऊन बडोद्याकडील सर्व हकीकत श्रीमंतांस निवेदन केली. पुढे सुमारे दोन वर्षेपर्यंत गोविंदराव गायकवाड यांचा अधिकार सुरळीतपणे चालला. उपरांत फत्तेसिंगराव यांनी फौज फितून करून गोविंदराव यांचा अधिकार हिसकावून घेतला. हे वर्तमान गोविंदराव यांनी पुन्हा पुण्याचे दरबारात जाहीर केले.[4,5]

६. पुढे सन १७७४ चे साली रघुनाथराव दादासाहेब हैदरअलीवर चढाई करून गेले. त्यांचे बरोबर सखाराम हरिही होते.[6,7,8]

उभय सैन्यांची गाठ कर्नाटक प्रांती पडली. हैदराचा मुलगा टिपू सुलतान हा यावेळेस शत्रूच्या सैन्याचा अधिकारी होता. टिपू स्वत: जरी शूरवीर होता

*6) सदाशिव रामचंद्र, सखाराम हरि, आबाजी महादेव, हरि भिडे, विठ्ठल विश्रम, तुळ्या पवार आणि सरदार हे सदैव दादाचे पक्षास चिकटून राहिले, आणि दादाची भिस्तही सर्वदैव त्यांजवरच होती.*

मराठी रियासत खंड–5, पान–343

*7) त्यांसच रस्त्यांत कोणी सखाराम हरि अगर महंमद इसफ सारख्याने पकडून किंवा मारून टाकिले, म्हणजे सर्व कारभार आटोपला असता.*

मराठी रियासत खंड–5, पान–360

*8) महंमद इसफ, सखाराम हरि, सदाशिव रामचंद्र वगैरे कित्येक जिवास जीव देणारे साथीदार त्याचे होते, तोपर्यंत त्यावा निभाव लागला.*

मराठी रियासत खंड–5, पान–363

तथापि दादासाहेबांचे बरोबर त्यांचे महशूर सरदार सखाराम हरि आहेत असे जाणून आपले कडील चंगीजखान या नावाच्या एका सरदारास पेशव्यांचे छावणीत तहाचे बोलणे करण्याकरिता पाठविले. त्यावेळेस सायंकाळचा समय असल्यामुळे दादासाहेब आपले जीवलग सरदार सखाराम हरि यास बरोबर घेऊन आपल्या सैन्याची खबर घेण्याकरिता बाहेर निघाले होते. त्यावेळी किती एक चाकर व शिपाई लोक आपल्या धन्याच्या व त्यांचे महशूर व प्रतापी सरदार सखाराम हरि यांच्या शूरत्वाच्या गोष्टी करीत बसले होते. किती एक मोठ्या आनंदाने श्रीमंतांवर केलेल्या पोवाड्यात त्यांचे गुण गात होते व किती एक जवळ येऊन पोहोचलेल्या युध्दाच्या गोष्टी करीत होते. अशा समयी चंगिजखान समोरून भरधाव घोडा फेकित श्रीमंता पुढे येऊन ठेपला. उभयतांचा परस्पर आदरसत्कार होऊन भेटीही झाल्या. प्रथमत: त्याने श्रीमंतापुढे सखाराम हरिची बरीच प्रशंसा केली त्यात तो म्हणाला की, सखाराम हरि शूरोंके शोकी ह्या प्रमाणे काही वेळ पर्यंत भाषण झाल्यानंतर त्याने हैदरअलीकडील तहाची सूचना दादासाहेबांस प्रदर्शित केली. दादासाहेब यांनी मागितलेल्या सर्व अटी त्याने कबूल केल्यानंतर तो परत आपल्या छावणीत आले व पुढे थोड्याच वेळानंतर दादासाहेबही आपल्या छावणीत आले. अशारीतींने लढाईची व्यवस्था झाल्यावर दादासाहेब लवकरच पुण्यास गेले.(चा.का.प्र.इ.साधने).[9,10,11,12,13,14]

७. सन १७७६ या साली गोविंदराव गायकवाड बडोद्याचे गादीवर

---

*9. दादाचा महाराष्टास शेवटचा रामराम – 10. फक्त सखाराम हरि, मानाजी फाकडे, सदाशिव रामचंद्र, मालोजी घोरपडे व बाबुराव पाटणकर हे सरदार, दोन हजार स्वार व हजार गार्दी दादाबरोबर नर्मदा पार होऊन इंदूरास गेले.*
मराठी रियासत खंड-6, पान-30

*10. **(शिंदे होळकरांची शिष्टाई)** एकंदर वातावरण भीतीप्रद व क्षुब्ध राहिले. मोरोबा, सखाराम बापू, बजाबा पुरंदरे, चिंतो विठ्ठल, सखाराम हरि, मानाजी फाकडे, धायगुडे, आनंदराव गोपाळ, विसाजी कृष्ण, रघुपत नारायण असल्या अनेक कर्तबगार माणसांवर वहीम आलेला पाहून जनतेस इकडे आड आणि तिकडे विहीर असे होऊन गेले आणि नानास सुध्दा केवळ महादजीची आजवीं करून रहावे लागले.*
मराठी रियासत खंड-6, पान-34

नसल्याकारणाने अधिकार पुन्हा प्राप्त होण्याविषयी पुणे मुक्कामी पेशव्यांचे दरबारात खटपट करीत असता त्यांचेजवळ खंडे जिवाजी तांबेकर कामकाज करीत होते. खंडे जिवाजी यांची वर्तणूक सखाराम हरि यांचे लक्षात बरोबर आल्यावरून त्यांनी गोविंदराव गायकवाड यांच्यापासून खंडे जिवाजीस दूर केले व त्यांच्या जागी आपले मंडळातील व भरवशाचे रावजी आप्पाजी फणसे प्रभू यांची गोविंदराव गायकवाड यांचपाशी सोपवणूक केली. त्या दिवसापासून रावजी आप्पाजी गोविंदराव गायकवाडांचे राज्य संबंधी पेशवे आप्पाजी, गोविंदराव गायकवाड बडोद्याचे गादीवर आले तेव्हा त्यांचे दिवाण झाले. [15,16,17,18,19]

८. पेशव्याचे मुजुमदार नारायण नीळकंठ हे मृत्यू पावल्यार दादासाहेबांनी बाबुराव हरिस मुजुमदानी सन १७६२ मध्ये दिली होती व ही तुमच्याकडून काढणार नाही अशी शपथही दिली होती. परंतु पुढे इ.स.१७६६ मध्ये इतर मुत्सद्यांच्या आग्रहामुळे माधवरावांने जुन्या मुजुमदारास मुजुमदारी दिली व बाबूराव हरियास वाईट वाटू नये म्हणून अहमदाबादचा सुभा त्यास सांगण्याचे ठरविले. म्हणजे या उभयतां भावांवर पेशव्यांची फारच मर्जी असे व त्यातल्या त्यात दादासाहेबांची विशेष असे. पुण्याची एक पेठ बाबुराव हरिने वसविली आहे.

९.नारायणराव पेशव्याच्या कारकीर्दीत सर्वच प्रभूंना फार त्रास झाला. या पेशव्यांने प्रभूपासून एक नऊ कलमी याद बळजबरीने लिहून घेतली होती. त्या यादीखाली १ रामराव जिवाजी, २ विठ्ठलराव यशवंत, ३

---

*11. आनंदमोगरीची लढाई - त्याचे सरदार मानाजी फाकडे व सखाराम हरि यांस जखमा लागल्या.* मराठी रियासत खंड-6, पान-54

*12. (सुरतेचा तह व आडासची लढाई) - नंतर सखाराम हरि, मानाजी फाकडे, आबाजी महादेव व सदाशिव रामचंद्र हे आपल्या फौजा घेऊन ता. 19-04-1775 रोजी खंबायत जवळ धर्मज येथे इंग्रज फौजेस सामील झाले.* मराठी रियासत खंड-6, पान-56

*13. या लढाईत सखाराम हरिंने पराक्रम केल्याबद्दल आनंदीबाईने त्याचे अभिनंदन केले.* मराठी रियासत खंड-6, पान-58

*14. दादाने यावेळी सखाराम हरिस लिहिलेली दोन पत्रे परिस्थितीवर प्रकाश पाडणारी आहेत.* मराठी रियासत खंड-6, पान-60

रामाजी मल्हार, ४ मुरारराव दौलत, ५ बाजीराव साबाजी, ६ सोयरो वामन, ७ बचाजी खंडेराव, ८ आप्पाजी भिकाजी, ९ खंडेराव बापूजी, १० त्रिंबक महिपतराव, ११ बळवंतराव शंकर, १२ सखाराम हरि, १३ नीळकंठ रामचंद्र, १४ नारायणराव हरि, १५ बाळाजी गणेश, १६ त्रिंबक सूर्याजी अशा त्या वेळच्या प्रमुख सोळा प्रभूंच्या सह्या आहेत. पुढे नारायणरावाचा खून झाल्यावर पुण्यास उघड दोन पक्ष झाले. त्यात सखाराम हरिने रघुनाथरावाचा पक्ष घेतला. कारभारी पक्षांशी पहिली लढाई राघोबाने दिली व जीत त्रिंबकराव मामा मारला गेला.

१०. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान सर्व कळले. तुमची निष्ठा उत्तम आहे, हे अनुभवास आली. त्यास ही गोष्ट उत्तम आहे. तुम्हास हे योग्य आहे. ये निष्ठेने तुमचे ईश्वर ऊर्जित करील. चिंता नाही. तुम्हास जखम लागली होती, ती बरी झाली की नाही हे लिहिणे पथ्य उत्तम प्रमाणे करीत जाणें बहुत रक्षित जाणे. चिरंजीव राजश्री बाजीराव सुखरूप आहेत.फितुरी यांचे (कारभारी पक्षांचे) पारपत्य होऊन हुजूरची (राघोबाची) व चिरंजीवाची (बाजीरावाची) भेट कधी होईल हे लिहिणे.

११. हे पत्र  आंनदीबाईने घारेच्या किल्ल्यापासून लिहिलेले आहे. पुढे प्रसिध्द पुरंदरच्या तह्ानंतर दादासाहेबांचे बंड मोडले व त्यांच्याकडील सर्व सरदार पुण्यास येऊन राहिले. त्याचबरोबरच सखाराम हरिही पुण्यास चाकरीस येऊन राहिले. यापूर्वी सवाई माधवरावाच्या भेटीचा दरबार झाला होता पण सखाराम हरिस त्या दरबारास नानाने मनाई केली होती. म्हणजे नाना फडणिसाच्या मनात सखाराम हरिबद्दल फार मोठी तेढ होती. तथापि त्यांचा सरंजाम वगैर पूर्ववत चालत होता. परंतु तारीख २५ सप्टेंबर १७७६ रोजी त्यांना पुरंदरावर शिद्यांनी एकदम कैद केले. त्याजबद्दलची सविस्तर

---

*15. सखारामहरिनेही असेच केवीलवाणे लिहिले – 'मसलत पेचांत पडली'; सारे अर्थ विलग झाले; त्यातही आपआपल्यात विरुद्धे वाढली.*
मराठी रियासत खंड–6, पान–67

*16. येथे इंग्रज सेनापती कर्नल किटींग होता. त्याने त्याचा बचाव केला. त्याच्या पुढील व्यवस्थेसंबंधाने दादाचे तर्फेने सखाराम हरि व सदाशिव रामचंद्र आणि हरिपंताचे तर्फेने अप्पा बळवंत यांचा पत्रव्यवहार सुरु झाला.*
मराठी रियासत खंड–6, पान–71

हकीकत खरे ले. १८९४ यात पुढीलप्रमाणे आहे.

१२. सखाराम हरिस श्रीमतांची (राघोबाची) पत्रे आली होती, त्यांची उत्तरे लिहून दिली. त्यात फितवा फौजेत केल्याचा व फौज नवी ठेवितो असे व कित्येक प्रकार लिहिले ते सापडले. त्याजवरून मशारनिल्हस किल्ल्यावरी बोलावून आणिले. श्रीमंताचे पत्र आले होते काय? म्हणून पुसीले. त्यांनी पत्र आले म्हणून सांगितले. उत्तर काय दिलेंत.उत्तर दिले नाही. म्हणून सांगितले. तेव्हा जाव काय करतात. तेच समयी वेडी घालती. गोट त्याचा पुरंदर किल्ला खाली होता तेथे चौक्या पाठविल्या. पुतण्या खाली होता तो धरून आणून कैद केला. बाबुराव हरिकडील माणसे घरावयासी जनार्दन राम वगैरे सात आठशे राऊत मावळात गेले आहेत.

१३. या प्रमाणे सखाराम हरिस नगरच्या किल्यावर, बाबुराव हरिस सिंहगडावर व बाबूराव हरिचा मोठा मुलगा दौलत बाबुराव यास चाकणच्या किल्लयावर आणि धाकटा मुलगा महिपत बाबुराव यास त्रिंबकच्या किल्लयावर बंदोबस्ताने कैदेत ठेवले. या वेळचा किल्लेदारावरचा हुकूम वाचनीय असल्याने पुढे देतो.

१४. (सखाराम हरि) यास पक्क्या बंदोबस्ताने किल्ले मजकुरी अटकेत ठेवून भोजन घालीत जाणे. प्रभू कारकुन त्याजवळ जाऊ न देणे चौकीस माणसे ठेवील ती वरचेवर बदलीत जाणे, मराठा एक माणूस खिदमतगारीस ठेवून देणे, तो पंधरा दिवसा बदलीत जाणे, धोत्रे अगर शेलापागोटे लागल्यास देणे, जेवणाची व वस्त्रपात्राची आबाळ न करणे, बेडी नेहमी असो देणे, सखाराम हरि खेळ्या राजकारणी आहे. कोणे गोष्टीसी चुकणार

---

*17. सखाराम हरिने दादाच्या तर्फेने हरिपंतांची गाठ घेतली.... दादासही पुण्यास आणावयाविशी सखाराम हरिनें पुष्कळ खटपट केली.*

मराठी रियासत खंड-6, पान-72

*18. मानाजी शिंदे फाकडे, सखाराम हरि, रामचंद्रबाबाचा पुत्र सदाशिव रामचंद्र हे सर्व दादाचे अभिमानी सरदार पुरंदराखाली सन 1776 च्या जून महिन्यात पेशव्यांचे भेटीस आले.*

मराठी रियासत खंड-6, पान- 324

*19. सखाराम हरि व मानाजी फाकडे हरिपंताबरोबर पुरंदरास येऊन हुजरातीत दाखल झाले. पैकी सखाराम हरिचा फितूर पुढे लवकरच उघडकीस येऊन त्यास व त्याच्या कुटुंबास पकडून नानाने कैदेत घातले.*

मराठी रियासत खंड-6, पान- 80

नाही, याजकरिता एक कोठडी करून त्यात घालून बाहेरून कुलूप घालीत जाणे, एकास त्याच्याजवळ जाऊ न देणे, याचे गुण तुम्हास ठाऊक आहेत, या करिता चांगला बंदोबस्त ठेवला तरी सखाराम हरिस त्याचे शालक भास्करराव राजापुरकर यांनी नाना फडणवीसच्या सांगण्यावरून विश्वासघाती पकडविले अशी एक समजूत प्रचलित असून चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या इतिहासाच्या साधनात ती नमूद केली आहे. परंतू ती अगदीच निराधार आहे. त्याच्या बंधनाचा प्रकार घर प्रमाणे आहे. सखाराम हरिचा या प्रमाणे बंदोबस्त ठेवला तरी सखाराम हरिने धनगड किल्लयावर असताना फितूर केलाच.[20] परंतू तो उघडकीस आल्याने चौघास तोफेच्या तोंडी दिले व दोघांचे उजवे हात कापून टाकले व तेव्हापासून सखाराम हरिच्या छळास अधिक क्रूर स्वरुप प्राप्त झाले असावे. त्याच्या पायातील बेडी वाढविणे व त्यास पोटभर अन्नपाणीही न देणे अशा प्रकारचा छळ यावेळी म्हणजे सन १७७८ मध्ये सुरू झाला. [21,22] व पुढे अशा विपत्ती भोगीत असताना या शूर पुरूषाचा अंत सन १७७९ मध्ये जून महिन्यापूर्वी केव्हा तरी झाला.[23] शेवटी यांच्या पत्नीने बराचसा दंड देण्याचे कबूल करून पतीच्या भेटीची परवानगी मिळवली होती. परंतु या पतिपत्नींची भेट होण्यापूर्वीच सखाराम हरि मृत्यू पावला. तथापि त्याच्या पत्नीकडून दंड वसूल करण्याची तजवीज मात्र जोराने चालू होती. अखेर ती हृदयद्रावक बातमी महादजी शिंद्यास समजल्यावर त्यांनी पुढील पत्र नाना फडणीसास लिहिले व दंड माफ केला. हे पत्र बहुधा तारीख १६ नोव्हेंबर सन १८८९ चे असावे.

---

*20. रामरावाचा मुलगा मल्हारराव छत्रपतींच्या बखरीचा लेखक हा सखाराम हरिचा जावई, म्हणून त्याचेही उत्पन्न नानानी जप्त केले.*
मराठी रियासत खंड-6, पान-92

*21. (15 मे 1778) मोरोबाचे हाती कारभार येताच त्याने एकदम अधिकार गाजवण्यास सुरुवात केली. नरसिंहराव गोविंद, सखाराम हरि वगैरे दादाच्या हस्तकास त्याने बंधमुक्त केले.*
मराठी रियासत खंड-6, पान-107

*22. दादाची सोडचिट्टी व झासीस रवानगी (मार्च 1779) - मोरोबा फडणीस, बजाबा पुरंदरे, रघुपंतराव नारायण बाबूराव व सखाराम हरि याशिवाय बाकीचे अटकेत असलेले लोक सोडून देण्याचेही कारभाऱ्यांनी कबूल केले.* मराठी रियासत खंड-6, पान- 143

श्री राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यास –

दंडवत विनंती उपरी : सखाराम हरि कैदेत धनगडी होते. त्यास बेडी मातबर व भोजनाचेही यथास्थित नव्हते. याचमुळे प्राणांतिक अवस्था झाली होती. यावरून याचे स्त्रीने सरकारांत रदवदली केली की, बेडी हलकी करून अन्नपाण्याची व औषधे उपाय करावयाची मोकळीक करवून, मजला किल्लयावर जावयाची परवानगी द्यावी. त्यावरून उत्तर झाले की, बारा हजार रुपये द्यावे, म्हणजे सदरहू प्रमाणे परवानगी दिली जाईल, तेव्हा त्यांनी मोलभीक मागोन. घरोघर फिरून बारा हजार रुपये द्यावयाचा करार करून, किल्लयावरी जाऊन पोहोचेन अशी सनद द्यावी, म्हणजे कराराप्रमाणे एका महिन्याचे मुदतीने ऐवाजा हमीदार घेतला. त्यास सनद तिच्या हातास पोहोचेन ती किल्लयावरी न जाता सखाराम हरि मृत्यू पावला. हल्ली हमीदारास ऐवजाकरिता सरकारचा तगादा लागला आहे. हमीदार तिजला तगादा करीतो, ऐसियास जो अन्यायी तो मृत्यू पावला व बायकोची त्याची भेटही न झाली, यास्वत बायकोस तगादा, ऐवजाचा, हमीदाराचा नसावा व हमीदारासी सरकारांतून न व्हावा, ज्या पक्षी अपराधी मरण पावला, त्यापक्षी सरकारांतून माफ करून, ऐवज न घ्यावा. यांचे मुला माणसांचे चालवून आजात करावे. वरकड बारा हजारांनी सरकार किफायत होती ऐसे नाही. तशात त्याजवळ ऐवज आहे नाही, हे कळलेच आहे. मोल मागोन ऐवज जमा करणार. तोही सखाराम हरि यांचे मरण्यामुळे. कोणी ऐवज देईल हे ही नाही. सारांश मुला माणसांची मुक्तता होय ते करावे. हमीदारास सरकारातून तगादा झाल्यास हमीदार बायकामुलांस तगादा करील. घरांचे सर्व जप्तींत आले असता त्यास ऐवज मिळणे कळतच आहे. या करिता लिहिले असे. रवाना चंद्र 7 जिल्काद हे विनंती. या प्रमाणे सखाराम हरिंचे संक्षिप्त चरित्र आहे.

विनंती

हे चतुर्दश रत्नांचे ताट वाचकांस पसंत पडल्यास दुसरे सिध्द करण्यास प्रस्तुत लेखकास हुरूप येईल.

---

*23. चिंतो विठ्ठल, सखाराम हरि, मोरोबा फडणीस, तुळ्या पवार, बाजीराव बर्वे वगैरे त्याचे सर्व साथीदार ठिकाणी लागले. सर्व दुनियेत त्यांचे नाव बहू झाले.*

म.रि. खंड–6, पृष्ठ क्रं. 272

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे